
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

श्रीसंत एकनाथ कृत

# चतुःश्लोकी भागवत
# हस्तामलक
# स्वात्मसुख
# शुकाष्टक
# आनंदलहरी
# चिरंजीवपद
# अनुभवामृत
# आनंदानुभव



REFBK-0016959

५३६९९
२१३६७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ५३६९९ वि: काव्य
क्रमांक १९३७ नों दि: २१३६७

श्रीसंत एकनाथमहाराजकृत

# -आठ ग्रंथ-

ग्रं. क्र. १६९५९

-: संपादक :-

नरहरि विष्णुशास्त्री पणशीकर

REFBK-0016959

किंमत : ५ रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय संवर्धन योजना
१९७०

* * *

यशवंत प्रकाशन पुणें, २

प्रकाशक :
अनंत सदाशिव वैद्य
यशवंत प्रकाशन,
सदाशिव पेठ हौदाजवळ,
पुणें २

श्रीदत्तजयंती
शके १८९०
४ डिसेंबर, १९६८

किंमत : ५ रुपये

मुद्रक :
वि. ना. भंडारे
स्वानंद मुद्रणालय,
२०३, शनिवार पेठ,
पुणें २

# श्रीकृष्णदयार्णवकृत श्रीएकनाथ-स्तोत्र

सप्रेमयुक्त घडली गुरुभक्ति साची । झाली कृपा सफल साध्य जनार्दनाची ॥
ब्रह्मैव बोध समता निजनिर्विकारी । श्रीएकनाथ विबुधा भरणावतारी ॥१॥

पाहोनि देव यवनाकृति आर्त आले । श्राद्धान्न घालुनि तयांप्रति तृप्त केलें ॥
साम्य प्रशंसुनि सुतृप्त उमेश शौरी । श्रीएकनाथ विबुधा भरणावतारी ॥२॥

यत्कीर्ति पुण्यसरिता कलिदोष नाशी । यत्संप्रदाय परमामृत दे जनासी ॥
जो कां वरें जडमुढां भजनेंचि तारी । श्रीएकनाथ विबुधा भरणावतारी ॥३॥

संपादिलें ऋण बहु द्विजभोजनासी । तें फेडिलें यदुवरें श्रुत सज्जनांसी ॥
केला ऋणी निजबळें भवबाधहारी । श्रीएकनाथ विबुधा भरणावतारी ॥४॥

श्रीखंडिया म्हणवि कृष्णचि ब्रह्मचारी । सर्वोपचार-जल-वाहक टाळधारी ॥
सेवा सुखें विसरला स्वपदा मुरारी । श्रीएकनाथ विबुधा भरणावतारी ॥५॥

श्रीकृष्णदास नमितां जडलिंगभागी । केला उभा राम स्वयें रजनि प्रसंगीं ॥
तैं युद्धकांड करवी परिपूर्ण हारो । श्रीएकनाथ विबुधा भरणावतारी ॥६॥

रामायणादि दशमांतिल रुक्मिणीचें । केलें स्वयंवर फलप्रद वाक्य ज्याचें ॥
अध्यात्मतंतु न तुटे कविता प्रकारी । श्रीएकनाथ विबुधा भरणावतारी ॥७॥

वाराणसींत विदुषा मतिमान्य झाली । एकादशावरि टिका सुगमार्थ केली ॥
ब्रह्मीं स्वकर्म विनियोग जनोपकारी । श्रीएकनाथ विबुधा भरणावतारी ॥८॥

ब्रह्मीं प्रतीति प्रगटी भजनि द्विजाचा । दुष्टा घरींच हरि पादरजेंचि ज्याचा ॥
भूतीं दया भजन सर्वघटीं विचारी । श्रीएकनाथ विबुधा भरणावतारी ॥९॥

देहात्मभाव निरसी जडदृश्यरोधें । जीवात्मता विसरवी स्वरुपावबोधें ॥
लक्षांश जीव शिव ऐक्य दिप स्विकारी । श्रीएकनाथ विबुधा भरणावतारी ।१०।

हा एकनाथ दशकस्तव नित्यभावें । वाग्देवता प्रगटितां सकळार्थ फावे ॥
त्यासी जगद्गुरु दयार्णव साहकारी । श्रीएकनाथ विबुधा भरणावतारी ॥११॥

# अनुक्रमणिका


| | | ओंव्या | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | चतुःश्लोकी भागवत | १०३६ | १ ते १०५ |
| २ | हस्तामलक टीका | ६७४ | १०६ ते १७२ |
| ३ | स्वात्मसुख | ५११ | १७३ ते २१४ |
| ४ | आनंदलहरी | १५४ | २१५ ते २२९ |
| ५ | शुकाष्टक | ४४७ | २३० ते २६४ |
| ६ | आनंदानुभव | २४१ | २६५ ते २८५ |
| ७ | अनुभवामृत | ३० | २८६ ते २८८ |
| ८ | चिरंजीवपद | ४२ | २८९ ते २९२ |

# संपादकीय-

श्रीज्ञानेश्वरांच्या नंतर भागवतधर्माची विजयध्वजा आपल्या अपूर्व कर्तृत्वानें आणि वाङ्मयानें सतत लहरत ठेवून मराठी बहु-जनसमाजांत श्रद्धा, भक्ति, प्रेम, समता आणि विश्वबंधुत्वाचें अतूट नातें निर्माण करणारे सत्पुरुष म्हणजे पैठणचे महाभागवत श्रीएकनाथमहाराज हेच होत. श्रीनाथांनीं चतुःश्लोकी भागवत, श्रीभागवतांतील एकादश स्कंधावरील टीका म्हणजेच नाथभागवत, हस्तामलक, रुक्मिणीस्वयंवर, स्वात्मसुख, आनंदलहरी, शुकाष्टक, आनंदानुभव, अनुभवामृत, चिरंजीवपद, सुमारें पांच हजार अभंगांची गाथा, पदें व भारुडें, आणि भावार्थ रामायण अशी महान् ग्रंथ-संपत्ति निर्माण केली. त्यापैकीं ओवीबद्ध काव्याची ग्रंथसंख्या सुमारें ६०,००० असून, इतर पदें, अभंग व भारुडें मिळून एकंदर कविता पाऊण लाखाच्या घरांत जाईल. पैकीं नाथभागवत, रुक्मिणीस्वयंवर आणि भावार्थ रामायण हे ग्रंथ सहज उपलब्ध आहेत; परंतु जे सहज उपलब्ध नाहींत असे त्यांचे इतर आठ ग्रंथ या ग्रंथांत समाविष्ट करून आम्ही नाथभक्तांना ते आज सादर करीत आहोंत.

आपल्या अजोड गुरुशुश्रुषेनें श्रीनाथांनीं सद्गुरु जनार्दन-स्वामींची कृपा संपादन केली होती. नाथांचा पहिला ग्रंथ म्हणजे चतुःश्लोकी भागवत हा होय. एकदां सद्गुरु जनार्दनस्वामींबरोबर तीर्थयात्रा करीत असतां हे गुरुशिष्य गोदावरीच्या तीरावरील चंद्रावती गांवीं चंद्रभट ब्राह्मणाच्या घरीं आले. त्या ब्राह्मणानें नित्याप्रमाणें केलेलें चतुःश्लोकी भागवतावरील प्रवचन ऐकून जनार्दनस्वामींस फार संतोष झाला व त्यांनीं त्या चार संस्कृत श्लोकांवर श्रीनाथांना मराठींत टीका करण्याची आज्ञा केली.

तीर्थयात्रा करीत करीत चंद्रभटासह गुरुशिष्य त्र्यंबकेश्वरक्षेत्रीं आले. तेथेंच श्रीनाथांनीं या ग्रंथाची रचना पूर्ण केली.

या ग्रंथाची रचना करण्यापूर्वी श्रीनाथांनीं कोणतीच ग्रंथ–रचना केली नव्हती; परंतु सद्गुरुकृपेचा महिमा अगाध आहे. याच ग्रंथांत नाथांनीं म्हटलें आहे––

**" तैं मज प्रथमावस्था । नेणें संस्कृत पदपदार्था ।**
**परि बापु आज्ञेची सामर्थ्यता । वचनें ग्रंथा प्रबोध झाला ॥**
**माझे वेडेवांकुडे आरुष बोल । त्यामाजि ब्रह्मज्ञान सखोल ।**
**नित्यनवी प्रेमाची वोल । हे कृपा संतांची ॥ "**

यावरून श्रीनाथांची गुरुभक्ति व अभिजात विनम्रता प्रत्ययास येते.

ब्रह्मदेवाला भगवंतानें सृष्टि निर्माण करण्याची आज्ञा केली. परंतु हें कार्य आपल्या हातून कसें पार पडणार अशी चिंता ब्रह्मदेवाला लागून राहिली. तेव्हां उदकांतून 'तप तप' म्हणजे तप कर असा ध्वनि त्यानें ऐकला, त्याप्रमाणें ब्रह्मदेवानें दशेंद्रियें व मन यांचा निरोध करून उग्रकठोर तपश्चर्या केली. त्यामुळें भगवंतांनीं प्रसन्न होऊन ब्रह्मदेवाला आपलें चतुर्भुज आणि दिव्य-तेजस्वी असें दर्शन दिलें व फक्त चारच श्लोकांत त्याला गुह्यज्ञान सांगितलें. श्रीनाथ म्हणतात––

**" पावोनि चतुःश्लोकींचें ज्ञान । ब्रह्मा झाला ज्ञानसंपन्न ।**
**करितो सृष्टीचें सर्जन । तिळभरी अभिमान बाधीना ॥**
**त्या ज्ञानाची रसाळ कथा । मन्हाठियां सांगेन आतां ॥ "**

श्रीनाथांनी ही कथा या ग्रंथांत अत्यंत बहारीनें व रसाळ वाणीनें वर्णिली आहे. पुढें हें गुह्यज्ञान ब्रह्मदेवाकडून नारदांना व नारदां-कडून व्यासांना प्राप्त होऊन व्यासांचा अंशमात्र असलेलाहि

अहंकार नाहीसा झाला व ते स्वानंदसम्राट् झाले. महर्षि व्यासांनीं तें ज्ञान श्रीशुकाचार्यांना देऊन त्यांनाहि परमानंदाचे अधिकारी केलें. हेंच ज्ञान श्रीमद्भागवताच्या दुसऱ्या स्कंधांत नवव्या अध्यायांत श्रीशुकमुनींनीं फक्त चारच श्लोकांत आणून तें बहुजनहिताय समाजाच्या हवालीं केलें.

परंतु हें ज्ञान संस्कृतांत असल्यामुळें त्याचा फायदा फक्त संस्कृत जाणणाऱ्या पंडितांनाच काय तो व्हावयाचा. इतर सामान्य प्राकृतांना त्याचा उपयोग नव्हता. अशा वेळीं समाजाची ही ज्ञान-लालसा पूर्ण करण्यासाठीं षड्गुणैश्वर्यसंपन्न भगवानच जणुं श्रीएकनाथांच्या रूपानें अवतीर्ण झाले आणि त्यांनीं या चार श्लोकांवर गुरुकृपाश्रित वाणीनें रसनिस्यंदी साज चढविला व संसारश्रांतांना मोक्षमार्गींचे कापडी बनविलें, अनाथांना सनाथ केलें आणि सर्व वर्णांना अध्यात्माचीं कवाडें खुलीं करून दिलीं.

या ग्रंथांत श्रीनाथांच्या प्रतिभेचें एक आगळेंच तेज प्रत्ययाला येतें. स्वतः श्रीनाथ हे अनन्यसाधारण गुरुभक्त असल्यामुळेंच त्यांच्या प्रत्येक ओवीओवींतून गुरुभाव आणि ज्वलंत आत्मविश्वास प्रगट झालेला आहे. गुरुकृपा हा अनुभूतीचा विषय असल्यामुळें व ती ज्या भाग्यवंताला लाभली तोच यांतील मर्म यथार्थपणें जाणूं शकेल. हा विवेचनाचा विषय नसून अनुभवण्याचा आहे. तरीहि श्रीनाथांनीं इथून तिथून सर्वत्र गुरुसेवेचें महिमानच गायिलें आहे. पदोपदीं गुरुसेवेची महति वर्णिली आहे.

श्रीनाथ म्हणतात--

**" त्याची सद्भावें जैं घडे सेवा । तैं जीवत्व शोधितां न मिळे जीवा ।**
**तंव शिवही मुकला शिवभावा । हा अभिनव ठेवा सेवेमाजी ॥१३॥**

**तो ज्यासी आश्वासी आपण। त्यासी हरिहर वंदिती पूर्ण।**
**कळिकाळ घाली लोटांगण। रिघती शरण कामक्रोध ॥ १४ ॥**
**ऋद्धिसिद्धिहि अंगें आपण। त्याचें घरींचें वाहती जीवन।**
**एवढें गुरुदास्याचें महिमान। सभाग्यजन पावती ॥ १५ ॥**
**गुरुसेवेहोनी वरुता। उपाय नाहीं परमार्था।**
**हे सत्य सत्य माझी वार्ता। वेदशास्त्रार्थी संमत ॥ १६ ॥**

अशा किती तरी ओंव्या सांगतां येतील. चार श्लोकांचें निमित्त करून श्रीनाथांनीं चतुर्वेदांचें मर्मच जणुं या छोटयाशा ग्रंथांत सामान्यांना असामान्य करण्यासाठीं उलगडून दाखविलें आहे. याच संदर्भांत तप म्हणजे काय? भगवद्भजनाशिवाय ज्ञानप्राप्ति नाहीं, चित्तशुद्धि कां आवश्यक ? क्रोध हा तापसांचा वैरी कसा? आत्म-ज्ञानासाठीं गुरुकृपेची जरुरी कां? वैकुंठमहिमा, हरिभक्तांचें स्वरूप व त्यांचीं लक्षणें, नाममहिमा, ज्ञानाचा अधिकारी कोण ? मायेचें लक्षण, ही कोठें असते व कोठें नसते? समाधि म्हणजे काय ? गुरूचें लक्षण, भागवताचीं दहा लक्षणें इत्यादि विषय रसाळ व सुगम करून समाजावर महान् उपकार केले आहेत.

नाथांच्या या सर्व आठहि ग्रंथांतून मानवी देहाचें साध्य काय याचा सर्व अंगोपांगांनीं ऊहापोह झाला आहे. बाह्यत: माणूस कितीहि प्रगत झाला किंवा विकसित झाला तरी जोंपर्यंत त्याचें मन त्याला स्वाधीन करतां येणार नाहीं तोंपर्यंत सर्व परमार्थसाधना ही सर्वांशानें व्यर्थच ठरत असते. स्वस्वरूपाची ओळख होण्यासाठीं, मन निर्विकार करण्यासाठींच गुरुसेवेची आवश्यकता आपल्या पूर्वसूरींनीं प्रतिपादिली आहे. मन हें मुळांत निर्विकल्प असलें तरी अविद्येमुळें, अज्ञानामुळें त्यावर मळ सांचतो व प्रसंगीं माणसाला माणुसकी सोडून जाते. अज्ञानाचें प्राबल्य असेल तेथेंच षड्विकारांचें

थैमान चालू असलेलें दृष्टीस पडतें आणि असा हा षड्विकार-संपन्न माणूस ज्या वेळीं गुरुसेवा सोडून इतर परमार्थसाधना अगत्यानें आणि निर्धारानें करूं लागतो त्या वेळीं त्याचा तो प्रयत्न म्हणजे मृगजळाचा हव्यास ठरतो. त्याचा पदरीं अहंकाराचा प्रचंड सांठा असल्यामुळेंच त्याच्या परमार्थाच्या सर्व लीला या विकारविलसितच ठरतात. कारणहि उघड आहे. तो स्वतःच्या अहंकारानें, स्वकर्तृत्वानें इतका भारावलेला असतो कीं, जणुं कांहीं आपणच सृष्टीची निर्मिति केली आहे! अशा अहंकारमन्यांचा परमार्थ हा ढोर मेहनत न ठरला तरच नवल!

म्हणूनच ज्ञानदेवांनीं ज्ञानेश्वरींत अगत्यानें म्हटलें आहे—

**“ म्हणोनि थोरपण पऱ्हां सांडिजे। जेथ व्युत्पत्ति आघवी विसरिजे।**
**जैं जगा धाकुटें होईजे। तैं जवळिक माझी ॥ ”**

परमेश्वराची जवळीक किती सहजसाध्य आहे हें वरील ओवींतून सांगितलें आहे; परंतु हीच साधी क्रिया माणसाला कां जमूं नये? विचार करण्यासारखा प्रश्न आहे. त्याचें उत्तरहि सोपें आहे. वर्षानुवर्षें मंदिरांत जाणाऱ्या भक्तांना देवाच्या मूर्तीचें दर्शन घडलें तरी हृदयस्थ परमात्म्याचें दर्शन कां होत नाहीं? या भक्तांना दर्शन देण्यासाठीं भगवंत आपली जागा सोडून त्यांच्या घरीं कां जात नाहीं? पिढ्यान्पिढ्या संतग्रंथांचें पारायण करूनहि हे भक्त अगदींच कसे कोरे राहतात? त्यांच्या विकारांची जागा विवेकानें कां घेऊं नये? सदैव परमार्थपरायण असलेल्या या भक्तांना चराचरांत दिव्यत्वाचा साक्षात्कार कसा घडत नाही? ‘ वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें ’ अशी त्यांची भावना कां होत नाहीं? अणुपरिमाण मुंगींतील चैतन्य आणि आपल्यांतील चैतन्य हा एकाच चित्शक्तीचा विलास आहे हें त्यांच्या कसें लक्षांत येत नाहीं?

याचें उत्तर एकच आणि तें म्हणजे यांची भक्ति ही भगवंताकरितां नसून स्वत:करितां, क्षुद्रस्वार्थाकरितां असते. सर्व क्रिया मग त्या प्रपंचाकरितां असोत किंवा परमार्थाकरितां असोत, त्या स्वार्थमूलकच असल्यामुळें त्यांची साधना झाली तरी ती नि:स्वार्थ व्हावी कशी ? म्हणून प्राचीन काळापासून आपल्या भारतांत गुरु-सेवेची महति वर्णिली आहे. आपल्या गुरुविषयीं निर्विकल्प भाव हाच आपल्या आत्मोद्धाराचा एकमात्र प्रभावी मार्ग सांगितला आहे. गुरुसेवा करीत असतांना मनाचे अहंकाराचे कंगोरे हळूहळू मुलायम होतात आणि केवळ गुरुसमोर नम्र होणारा माणूस मग सर्व चराचरासमोर विनम्र होऊं लागतो. गुरुकुलक्लिष्ट सेवा घडल्यानें मन निरामय, निर्विकल्प होऊन तो सृष्टींतील चिरंतन सौंदर्याचा आस्वाद घेण्यास समर्थ होतो. त्याची बुद्धि तलस्पर्शी होते आणि मन निरुद्ध झाल्यामुळें विश्वांतील आनंदाचा अनुकार आणि दु:खाचा स्पंद तत्क्षणींच त्याच्या हृत्पटलावर उमटल्या-वांचून रहात नाहीं. सागराची विशालता पाहून तो मुग्ध होईल तर आकाशाची अगाधता देखून तो प्रमुदित होईल. हिरव्यागार वृक्षराजी, सुंदर सुकोमल लतापल्लव, एखादी ललितविभ्रम करणारी मृगनयना, हरिणशावकें, सागराकडे जीवाच्या ओढीनें सुसाट धांव घेणारी एखादी नदी, उत्तुंग हिमनगांतून प्रचंड वेगानें खालीं कोसळणारा एखादा धबधबा यांतील सौंदर्य तो अनिमिष-पणें पहात असतां स्वस्वरूपाचींच हीं अनंत रूपें अनंत आकारांत साकारलेलीं त्याला दिसतील. गुरुकृपेनें अनुप्राणित झालेला हा शिष्य मग केवळ गुरूचा शिष्य न राहतां तो सर्व चराचराचाच सच्छिष्य होऊन जातो. अशा या विश्वात्मक शिष्याला विश्वां-तील दैन्य, दारिद्र्य, हीनता याबद्दल कणव वाटली तर नवल तें

कोणतें ? असे शिष्य सांप्रत फार विरळा असले तरी अशाच शिष्यवरांनीं भारताची शान आजवर राखली आहे हें विसरून चालणार नाहीं. वेदकालांतील ऋषिमुनींपासून चालत आलेली ही गुरुसेवेची प्रदीर्घ परंपराच भारताचें अमोल धन आहे. श्रीमदाद्य शंकराचार्य, विद्यारण्यांपासून तो श्रीज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, निळोबा, रामदास इत्यादि थोर थोर विभूतींच्या मागें गुरुसेवेचेंच अपूर्व तेजोवलय विलसत आहे हें दृष्टिआड करून कसें चालेल ?

हें विवेचन करण्याचें प्रयोजन एवढेंच कीं नाथांचे ग्रंथ वाचतांना वाचकांनीं आपली भूमिका प्रथम पारखून घ्यावी. श्रीनाथांच्या आठहि ग्रंथांवर भाष्य करण्याचा आमचा अधिकार नाहीं व हें स्थळहि नव्हे. परंतु ग्रंथ वाचीत असतां मनांत स्फुरलेले विचार फक्त आम्हीं शब्दांकित केलें आहेत एवढेंच.

**हस्तामलक——**

एका दरिद्री ब्राह्मणाला एक पुत्र झाला. तो इतर मुलांसारखा रडण्यासाठीं जन्मला नव्हता तर तो उपजतच महाज्ञानी होता. जन्मतांच तो रडलाहि नाहीं आणि हंसलाहि नाहीं. त्याला कसलाच विकार संभवत नव्हता. आनंद व दुःख यांच्या पलीकडे असलेला 'स्वानंदें नित्य तृप्त' असा तो मुलगा राहूं लागला. मात्र त्याचें '**तेज अंगीं न समाये । देखतां तहान भूक जाये ।**' असें लोकविलक्षण तेज होतें. मानुषसुलभ अशी कोणतीहि लीला तो मुलगा करीना म्हणून त्याचे प्रपंचपरवश आईबाप मनांतून फार फार कष्टी झाले. तो आठ वर्षांचा झाला म्हणून त्याच्या बापानें त्याची मोठ्या आशेनें मुंज केली; परंतु मुखांतून गायत्रीमंत्रहि तो मुलगा म्हणेना. म्हणून बापानें त्याला घरांतून बाहेर घालवून दिला. त्याबद्दलहि त्याला कसलीच खंत नाहीं, खेद नाहीं, नाहीं आनंद !

असा हा आत्मक्रीड, आत्मरत, नित्यतृप्त मुलगा ज्या गांवांत रहात होता त्या गांवांतील इतरांचीं आमंत्रणें सोडून श्रीमदाद्य शंकराचार्य नेमके या ब्राह्मणाच्या घरीं आले. श्रीशंकराचार्य म्हणजे साक्षात् चालतेंबोलतें ज्ञानच तें ! गुरुकृपेच्या वैभवानें स्वनामधन्य झालेल्या श्रीशंकराचार्यांची ती तेज:पुंज मूर्ति पहातांच मात्र तो मुलगा

**" साच आणि मवाळ । मितले आणि रसाळ ।**
**शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ॥ "**

असे मधुस्रावी शब्द बोलूं लागला. श्रीशंकराचार्यांची व त्याची दृष्टादृष्ट होतांच परस्परांनीं ' आंतला आवाज ' ओळखला आणि त्याच्या मुखांतून अमृताचे घनसांद्र बोल ऐकावेत म्हणून आचार्यांनीं त्याला प्रश्न केला.

**' तूं कैचा ? कोणाचा ? कोठील कोण ? । काय नाम? कोण वर्ण?।**
**तुझें कोठूनि आगमन ? । पुढारें गमन तुज कोठें ? ॥ ५६ ॥**

पौर्णिमेच्या पूर्णशीतल पूर्णचंद्राला पाहून सागराला होणारा आनंद भरतीच्या रूपानें किनारा ओसंडूं लागतो अगदीं तशीच आचार्यांच्या प्रश्नानें त्या ज्ञानघन सागराची अवस्था होऊन गेली ! त्या मुलाच्या दृष्टीनें आजवर मौन पाळणेंच इष्ट होतें. कारण बोललेलें समजेल असा समकक्ष होताच कोण तिथें ? त्या मुलाच्या आजवरच्या मौनामुळें इतरेजनांनीं केलेली वाचाळता किती निरर्थक होती याचा प्रत्यय त्यानें मौन सोडतांच त्यांना आल्यामुळें ते सामान्यजन मात्र अवाक् झाले !

**" नाहं मनुष्यो न च देवयक्षो । न ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्रः ।**
**न ब्रह्मचारी न गृही वनस्थो । भिक्षुर्नचाहं निजबोधरूपः ॥ "**

असें त्यानें आचार्यांना तत्काळ उत्तर दिलें.

आचार्यांचे हे मूळ चौदा श्लोक प्रसिद्ध आहेत. त्या चौदा श्लोकांवर नाथांनीं ६७४ ओव्यांचें भाष्य लिहून आपले हृदयींचें गुह्य-ज्ञानच सामान्यांसाठीं उपलब्ध करून दिलें आहे. त्या मुलाला तळहातावरच्या आवळ्यासारखें ज्ञान होतें म्हणून त्याला 'हस्ता-मलक' असें म्हणत असत. आचार्यांच्या प्रश्नाला उत्तर देतांना तो दरवेळीं 'स नित्योपलब्धिः स्वरूपोऽहमात्मा' असें म्हणत असे. स्वतःच्या देहातीत अवस्थेचें त्यानें केलेलें मूळ वर्णन थोडक्यांत असें असलें तरी श्रीनाथांची वाणी मात्र या 'आत्मारामा'चें वर्णन करतांना अतिशय पल्लवित झालेली दिसून येते. 'सूर्य जसा एकच असून अनेक क्रिया करूनहि तो अलिप्तच असतो तद्वतच मी निर्मल आहें, असंग आहें अलिप्त आहें, जीव व शिव हे आभासात्मक असून त्यांना पुण्य व पाप यांचा संस्पर्शहि नाहीं. जगांतील ज्ञान काय किंवा अज्ञान काय आत्म्याला कधींच बाधक होऊं शकत नाहीं. हाच विषय नाथांनीं अत्यंत प्रभावीपणें या ग्रंथांतून मांडला आहे. सुलभ दृष्टांत देऊन हा क्लिष्ट विषय अतिशय सोपा केला आहे. श्रीनाथांनीं खालीलप्रमाणें स्पष्टीकरण केलें आहे.

**"जग भासे जें सकळ। तो जगदात्माचि निखळ।**
**ऐसा निश्चयो ज्याचा प्रबळ। मुक्त केवळ तो एकू॥**
**जो विषयसेवनीं समाधिस्थ। तो स्वयें अतीत बंधमोक्षांसी॥**
**आकाश न माखे काजळें। आत्मा न माखे मोहमैळें॥**
**आकाश न जळे अग्निज्वाळें। आत्मा क्रोधानळें संतापेना॥**
**गोड मऊ आणि शुभ्र। त्रिविध नांवीं एक साखर।**
**तेवीं सच्चिदानंद साचार। वस्तु एकाक्षर एकत्वें॥**

**स्वात्मसुख—**

हें नाथांचें एक उत्कृष्ट असें काव्य आहे. यांतहि सद्‌गुरु-भजनाचाच महिमा वर्णिला आहे. यांत गुरुविषयीं भाव असला म्हणजे गुरूची अनन्यभक्ति होते व नंतर केवळ निष्कलंक भावानेंच स्वात्मसुखाची प्राप्ति होते असें प्रतिपादन केलें आहे. भावार्थावरील नाथांचें भाष्य किती अर्थपूर्ण व अनुभवाच्या मुशींतून साकारलें आहे त्याची कल्पना हें काव्य मुळांतूनच वाचल्याशिवाय कळणार नाहीं. शुद्ध भावाचा महिमा ओंवी ३२ ते ४७ पर्यंत अत्युत्कृष्ट रीतीनें व ठामपणें निरूपिला आहे तो मुळांतूनच पहावा.

**आनंदलहरी—**

या छोट्याशा काव्यांत नाथांनीं गुरुभक्ताला बद्धता नाहीं, तो जन्ममरणरहित असतो याचें सुंदर व समर्पक वर्णन केलें आहे. ओव्या आहेत फक्त १५४. पण प्रत्येक ओवी म्हणजे

**"शब्दापुढें ज्ञान धावें। ओवीपुढें अर्थ पावे।**
**जें जें जीवीं विवंचावें। तें तें आघवें ग्रंथार्थ होय॥"**

अशीच स्वानंद वर्णन करतांना नाथांची परमोत्कट अवस्था झाली. हें काव्य म्हणजे नाथांच्या प्रतिभेची अपूर्व बरसात आहे. आनंदाच्या लहरींचा नृत्यविलास इतका मनमोहक आहे कीं वाच-काचें देहभान हरपून जावें. काव्य तेंच कीं जें वाचीत असतां वाचक स्वतःला कुठें तरी हरवून बसावा. श्रीनाथांचा आनंद गगनांत मावेना म्हणून ते आनंदधुंद झाले आणि त्याच पूर्णानंद स्थितींत असतांना ओवीच्या अनुबंधांतून मृदुमुलायम शब्दगंगा प्रवाहित झाली. तीच ही आनंदलहरी !

या काव्यांत गुरुभक्तीचें महिमान विशेषत्वानें गायिलें आहे. श्रीनाथ म्हणतात—सद्‌गुरुकृपा नव्हती तोंपर्यंत निजस्वरूपाची ओळखहि नव्हती म्हणून—

**“ बंधमुक्तीची आटाआटी । संचरली होती माझे पोटीं ।**
**होतां तुझी कृपादृष्टी । उठाउठीं पळालों ।।**
**निजस्वरूप पाहतां दृष्टीं । निजानंद न समाये सृष्टीं ।**
**तुटल्या जन्ममरणाच्या गांठी । निर्भय पोटीं मी जालों ।। ”**

असें म्हणून ते अत्यानंदानें बेहोष झाले. गुरुकृपेची अनुभूति त्यांनीं सांगून आत्मनिवेदन केलें आहे.

**“ श्रोतीं न मानावा खेद । म्यां आपुल्या मनासी केला बोध ।**
**भावें भजावा आनंदकंद । मोक्षाचें पद पावावया ।**
**अनंत जन्माचीं पुण्यें फळती । तरीच प्राप्त सद्गुरूभजन ।। ”**

असें म्हणून ते पुढें सिद्धांतच सांगतात कीं—

**“ सद्गुरूकृपेंवीण । पावले मोक्षाचें सदन । ”**
**भूतभविष्यवर्तमान । ऐकिलें नाहीं जनीं कोठें ।।**

व शेवटीं करुणाकोमल होऊन सर्वांना हात जोडून प्रार्थना करतात कीं—

**“ सकळां साष्टांग नमन । तुम्हीं जावें सद्गुरूसी शरण । ”**
**चुकवावें जन्ममरण । पावावें सुख मोक्षाचें ।।**

**शुकाष्टक—**

श्रीशुकाचार्यांनीं हस्तामलकाप्रमाणेंच स्वानंदस्थितीचे जे उद्गार काढले आहेत त्यावर ही नाथांची प्राकृत टीका आहे. ‘ निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः ’ असा चौथा चरण असलेलें एक अष्टक प्रसिद्ध आहे. त्याच्यावर टीका करून नाथांनीं अध्यात्मज्ञान रसाळ वाणीनें सामान्यांच्या गळीं उतरविलें आहे. स्वप्रकाश आत्मा हा त्रिगुणरहित व विधिनिषेधातीतच असतो हें मुख्य सूत्र आहे. आत्मस्वरूपीं रममाण झालेल्या महात्म्यालाहि विधिनिषेधांची बाधा पोहोंचत नाहीं. तो सदैव, चिरंतन नित्ययुक्त आनंदरूपच विचरत असतो.

**आनंदानुभव–**

आनंदानुभवांतहि गुरु-शिष्य-संवाद असून स्वतःच आपण ब्रह्म-रूपानें कसें रहावें त्याचें दिग्दर्शन गुरूकडून शिष्याला झालें आहे. ब्रह्मसाक्षात्कार होण्यासाठीं गुरुकृपेचीच आवश्यकता या ग्रंथांत प्रतिपादिली आहे.

**अनुभवामृत–**

हें श्रीनाथांचें अनुपलब्ध असें ३० ओव्यांचें काव्य आहे. श्रीज्ञाने-श्वरांच्या अनुभवामृतांतील पहिल्या पांच संस्कृत श्लोकांवर श्रीनाथांनीं केलेली ही प्राकृत टीका आहे.

**चिरंजीवपद–**

म्हणजे श्रीनाथांच्या सर्व शिकवणुकीचें सूत्ररूपानें वर्णिलेलें सार होय. अक्षय्य असें चिरंजीवपद प्राप्त करण्याची ज्याला प्रांजळ इच्छा असेल त्यासाठीं हें थोडक्यांत मार्गदर्शन आहे. या पदांतील वैरा-ग्याचीं त्रिविध लक्षणें मननीय आहेत. या पदांतील नियम जरी साधकानें प्रत्यक्ष आचरणांत आणले तरीहि तो चिरंजीवपदाचा अधिकारी झाल्याशिवाय रहाणार नाहीं. जीवनाचा महामंत्र या पदांत सांगून श्रीनाथांनीं भक्तिभुक्त भाविकांना हें पद म्हणजे अमर असें पाथेय निर्मिलें आहे. या पदांतील ४२ ओव्या म्हणजे बेचाळीस पिढयांचा उद्धार करावयाची सोपानपरंपराच म्हणणें उचित होईल. असो !

श्रीनाथवाणीच्या संदर्भांत लिहावें तितकें थोडेंच आहे, तरीहि यावच्छक्य प्रयत्न केला आहे. श्रीनाथवाणीचें समालोचन करण्याचें महद्भाग्य ज्या नाथांच्या कृपेनें आम्हांस लाभलें त्याला कारण म्हणजे नाथच कृपावंत आहेत म्हणून आमच्याकडून ही धिटाई झाली. नाहीं तरी

> वोहळें हेंचि करावें । जे गंगेचे आंग ठाकावें ।
> मगही गंगा जरी नोहावें । तैं ते काय करी ? ॥

सर्वांचा नम्र,

**–– नरहरि विष्णुशास्त्री पणशीकर**

१६९५८

॥ श्री ॥

# श्रीएकनाथमहाराजकृत चतुःश्लोकी भागवत

## श्रीगणेश–शारदा–सद्‌गुरुवंदन

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीकृष्णाय नमः । आदीं वंदू गणनायका । नरकुंजरा अलोलिका । नरगजस्वरूपें तूं एका । नमन श्रीविनायका सद्‌गुरू ॥१॥ तुज सद्‌भावें करितां नमन । विघ्नचि होय निर्विघ्न । यापरी तुझी कृपा पूर्ण । चैतन्यघन गणराजा ॥२॥ सालंकृतशुक्लांबरी । हंसारुढी परमेश्वरी । सद्‌गुरूरुपें वागेश्वरी । म्यां मजमाझारीं वंदिली ॥३॥ वाच्यवाचक वदता । तिहींसी आली एकात्मता । यापरी येथें वाग्देवता । गुरुत्वें तत्त्वतां वंदीली ॥४॥ पूर्वपरंपरा पूज्यता । एकरूप एकनाथा । आह्मां सद्‌गुरूचि कुळदेवता । एकात्मता एकवीरा ॥५॥ तिचेनी नांवें माझेंही नांव । म्हणोनी मिरवीं कवि–वैभव । तंव नामरूपा नुरेचि ठाव । हा निजानुभव कुळदेव्या ॥६॥ आतां वंदूं संतसज्जन । जे सर्वांगीं चैतन्य-घन । ज्यां सगुण निर्गुण समसमान । जे निजजीवन सद्‌भावा ॥ ७ ॥ ज्यांची सद्‌भावें ऐकतां गोष्टी । चैतन्यघन होय सृष्टी । लागे परमानंदी दृष्टी । ऐसी कृपादृष्टी साधूंची ॥ ८ ॥ आतां वंदूं श्रीजनार्दन । ज्याचें ऐकतां एक वचन । त्रैलोक्य होय आनंदघन । जें निजजीवन सच्छिष्या ॥ ९ ॥

## गुरुमहिमा

त्याचे चरणींची माती। अवचटें लागल्या स्वचित्तीं। जन्ममरणा होय शांती। चारी मुक्ती वोळगण्या ॥१०॥ तो जिकडे पाहात जाय। ते दिशा सुखरूप होय। त्याचे जेथें लागती पाय। तेथें धांवे लवलाहें परमानंदु ॥११॥ यालागी त्याचे वंदितां चरण। जीवासी वोडवे शिवपण। चरणस्पर्शें स्वानंद पूर्ण। अगाध महिमान गुरुचरणीं ॥१२॥ त्याची सद्भावें जें घडे सेवा। तें जीवत्व शोधितां नमिळे जीवा। तंव शिवही मुकला शिवभावा। हा अभिनव ठेवा सेवेमाजीं ॥१३॥ तो ज्यासीं आश्वासी आपण। त्यासी हरिहर वंदिती पूर्ण। कळिकाळ घाली लोटांगण। रिघती शरण कामक्रोध ॥१४॥

## गुरुदास्याचें महिमान

ऋद्धिसिद्धिही अंगें आपण। त्याचे घरींचें वाहती जीवन। एवढें गुरुदास्याचें महिमान। सभाग्यजन पावती ॥१५॥ गुरुसेवेहोनी वरुता। उपाय नाहीं परमार्था। हे सत्य-सत्य माझी वार्ता। वेदशास्त्रार्थी संमत ॥१६॥ ते गुरुसेवेची अभिनव खूण। स्वामीसेवक न होती भिन्न। नुरवूनियां मीतूंपण। सेवका जनार्दन संतुष्टे ॥१७॥ हें वर्म जंव नये हातां। तंव सेवा न घडे गुरुभक्ता। ज्याचें हाता चढे एकात्मता। तो शिष्य सरता गुरुचरणीं ॥१८॥ दुर्घट वाटेल एकात्मता। तंव गुरुशिष्यआंतौता। एकचि परमात्मा लखतां। हे एकात्मता स्वतःसिद्ध ॥१९॥ एकात्मता

श्रीजनार्दन। नुरवूनियां मीतूंपण। शिष्याची सेवा संपूर्ण। सर्वकर्मी आपण अंगीकारी ॥२०॥

## नाथांचें अनहंकारी आत्मनिवेदन

नुरवूनि मीतूंपणाची वार्ता। वदविताहे ग्रंथकथा। तेथें मी एक कविकर्ता। हे कोणें अहंता धरावी ॥२१॥ मज नाहीं ग्रंथ अहंता॥ म्हणोनि श्रोत्यांतें विनविता। ते विनवणीच तत्त्वतां। अंगीं अहंता आणूं पाहे ॥२२॥ तंव माझें जें कां मीपण। तें सद्‌गुरु झाला आपण। तरी करितांही विनवण। माझें मीपण मज नलगे ॥२३॥ माझी क्रिया कर्म कर्तव्यता। सद्‌गुरुचि झाला तत्त्वतां। आतां माझ्या मीपणाची अहंता। मजसी सर्वथा संबंध नाहीं ॥२४॥

## श्रोत्यांना विनंती व कथासूत्र

आतां अवधारा ग्रंथकथन। कल्पादि हें पुरातन। हरिब्रह्मयांचें जुनाट ज्ञान। तेथें अवधान श्रोतीं द्यावें ॥२५॥ जेणें संतोषती ज्ञानसंपन्न। सुखें सुखरूप होती मुमुक्षुजन। तें हें हरिब्रह्मयांचें ज्ञान। तेथें अवधान श्रोतीं द्यावें ॥२६॥ जो जडमूढ होता तटस्थ। तो चौश्लोकीं जाण नेमस्त। ब्रह्मा केला ज्ञानसमर्थ। तो अगाध ज्ञानार्थ अवधारा ॥२७॥ पावोनि चतुःश्लोकींचें ज्ञान। ब्रह्मा झाला ज्ञानसंपन्न। करितां सृष्टीचें सर्जन। तिळभरी अभिमान बाधीना ॥२८॥ त्या ज्ञानाची रसाळ कथा। मऱ्हाटिया सांगेन आतां। येथें अवधान द्यावें श्रोतां। हे विनवणी संतां सलगीची ॥२९॥ पूर्ण सलगी दिधली स्वामी। म्हणोनि निःशंक झालों आम्ही।

परी जें जें बोलेन ज्ञानांग मी। तें सादर तुम्हीं परिसावें ॥३०॥ ऐसे प्रार्थुनी श्रोतेजन। प्रसन्न केले साधुसज्जन। पुढील कथेचें अनुसंधान। एका जनार्दन सांगेल ॥३१॥

श्रीशुक परिक्षितीला ब्रह्मदेवाची कथा सांगतात

आदिकल्पाचिय आदीं। एकार्णवजळामधीं। ब्रह्मा झाला जडमूढबुद्धी। सृष्टिसर्जनविधि स्फुरेना ॥३२॥ यापरी केवळ अज्ञान। नाभिकमळीं कमळासन। विसरला आपणा आपण। मी हें कोण स्फुरेना त्या ॥३३॥ यालागीं श्रीनारायण। द्यावया निजात्म शुद्ध ज्ञान। आपुली निजमूर्ती चिद्घन। तिचें दर्शन देऊं पाहे ॥३४॥ श्रीनारायणाची दिव्य मूर्ती। देखतांचि स्फुरे स्फूर्ती॥ तोचि इतिहास परीक्षिती। ज्ञानगर्भ स्थिती शुक सांगे ॥३५॥

श्रीशुक उवाच– आत्ममायामृते राजन्परस्यानुभवात्मनः। नघटेतार्थसंबंधः स्वप्नद्रष्टुरिवांजसा ॥१॥ बहुरूप इवाभाति मायया बहुरूपया॥ रममाणो गुणेष्वस्या ममाहमिति मन्यते ॥२॥यर्हि वाव महिम्नि स्वे परस्मिन्कालमाययोः। रमेत गतसंमोहस्त्यक्त्वोदास्ते तदोभयम् ॥३॥ आत्मतत्त्वविशुध्यर्थं यदाह भगवानृतम्॥ ब्रह्मणे दर्शयन् रूपमव्यलीकव्रतादृतः ॥४॥

श्रीमद्भागवत, द्वितीय स्कंध, अध्याय ९

अज्ञानें जीवा जीवभाव। त्यासि द्यावया निजात्म ठाव। शुक सांगे सुगम उपाव। इतिहास पहाहो हरिविरंचींचा ॥३६॥ जें श्रीमुखें श्रीभगवंतें। सांगीतलें विधातयातें। संतोषोनि उत्तम वृत्तें। निजरूपातें दावोनि तेणें ॥३७॥

जीवासी दृढ देहबुद्धी। भगवंतहि देहसंबंधी। तें त्याचे भजनें मोक्षसिद्धी। नघडे त्रिशुद्धि जीवासि या ॥३८॥ ऐसी उठों पाहे आशंका। तेविषयींचें उत्तर आइका। जीवा आणि जगन्नायका। देहसमत्व देखा नघडे ॥३९॥ जाति पाहतां दोन्ही दगड। परी रत्नगार नव्हे पडिपाड। तेवीं देवाजीवा समत्व दृढ। हें केवळ मानिती मूढ न ज्ञाते ॥४०॥ धूम्र ज्वाळा पाहतां दोन्ही। जरी जन्मती एके स्थानीं। तम निवारे ज्वाळां-पासुनी। धूम्रा न मानी तम दाटे ॥४१॥ जीव ज्ञानस्वरूप सत्य ज्ञानी। परी तो झाला देहाभिमानी। ज्ञान वेंचलें विषयध्यानीं। यालागी दृढबंधनीं तो पडला ॥४२॥ आपणियाचि सारिखा देख। हरि मानी पंचभौतिक। त्या परममूर्खातें देख। आकल्प दुःख सरेना पैं ॥४३॥ ऐसेहि जे जडमूढ मूर्ख। भावार्थें झाल्या भजनोन्मुख। त्यांचें निःशेष झडे दुःख। ते निजात्मसुख पावती देखा ॥४४॥ भगवद्देह चैतन्यघन। तेथें वसेना देहाभिमान। यालागीं करितां त्याचें भजन। अज्ञान जन उद्धरती ॥४५॥ आनंदोनि बोले शुकमुनी। परीक्षिती भक्तशिरोमणी। जो निजदेहीं निर-भिमानी। तो मी मानी परमेश्वर ॥४६॥ जो निःशेष निर-भिमान। त्याचा देह तो चैतन्यघन। त्याचें करितां भजन। जडमूढ जन उद्धरती ॥४७॥ निरभिमानाहोनी परता। ठाव नाहीं गा परमार्था। तो तैंच ये आपुल्या हाता। जैं अनन्यता हरिभक्ती ॥४८॥ हा मुख्य भगवंत भजतां। जीवासी केवीं उरे अहंता। यालागीं भजनीं मुक्तता। जाण

तत्त्वता परीक्षिती तूं ॥४९॥ भगवद्देहाचें श्रेष्ठपण। विशेषेंसी अतिगहन। त्या देहाचें होतां दर्शन। जडमूढ जन सज्ञान होती ॥५०॥ ऐसें निजदेहाचें लक्षण। जाणोनियां नारायण। हरावया ब्रह्मयाचें अज्ञान। निजात्मदर्शन देऊं इच्छी ॥५१॥

भगवद्भजनाशिवाय ब्रह्मदेवालासुद्धां ज्ञानप्राप्ति नाहीं

न करितां भगवद्भक्ती। ब्रह्मयासी नव्हे ज्ञानप्राप्ती। तेथें इतरांची कोण गती। अभजनी प्राप्ती पावावया पैं ॥५२॥ जीवाचे निरसावया अज्ञान। मुख्यत्वें असे भगवद्-भजन। स्वयें करिताहे चतुरानन। तेंचि निरूपण शुक सांगे ॥५३॥ केवळ चैतन्य विग्रहो। सत्यसंकल्प भगवद्देहो। त्याचे दर्शनार्थं पहाहो। तपादि उपावो हरी प्रेरी ॥५४॥

कामनारहित तपानें भगवत्प्राप्ति

कामनारहित निष्पाप। श्रद्धापूर्वक सद्रूप। निष्कपट करितां तप। भगवत्स्वरूप तैं भेटे ॥५५॥ न करितां भगवद्भजन। ब्रह्मा होऊं न शके पावन। यालागीं तपादि साधन। स्वयें निजभजन हरी प्रेरी ॥५६॥ या ब्रह्मयाची निजस्थिती। कल्पाचिये आदिप्राप्ती। कैशी होती परीक्षिती। ते मी तुजप्रती सांगेन पां ॥५७॥

स आदिदेवो जगतां परो गुरुः स्वधिष्ण्यमास्थाय सिसृक्षयेक्षत ॥
तां नाध्यगच्छद्दृशमत्रसंमतां प्रपंचनिर्माणविधिर्यथा भवेत् ॥५॥

इंद्रादिदेवां पूज्य तत्त्वतां। यालागीं आदिदेव विधाता। प्रजापतींचाही पिता। परमगुरुता पाहे तूं ॥५८॥ गायत्रीमंत्र

उपदेशिता । हाचि झाला परंपरता । यालागीं परमगुरुता । जाणत तत्त्वतां ब्रह्मयासी ॥५९॥ ऐसा परमगुरु ज्ञाननिधी । तोहि कल्पाचिये आदीं । होऊनि ठेला मूढबुद्धी । सृष्टिसर्जनविधी स्मरेना तया ॥६०॥

## स्वरूपाचो यथार्थ ओळख न झाल्यामुळें ब्रह्मदेव सृष्टिरचना करण्यास भांबावला

एवं नाभिकमळीं कमलासन । बैसला केवळ अज्ञान । तंव हृदयीं झाली आठवण । मी येथें कोण कैंचा पां ॥६१॥ मज कैंचें हें कमलासन । येथें याचें मूळ तें कवण । तें पाहावया आपण । जळीं निमग्न स्वयें जाहला ॥६२॥ सहस्त्रवरुषें बुडी देतां । कमळमूळ नयेचि हाता । तेथें निरबुजला ये वरुता । बैसे मागुता कमळासनीं ॥६३॥ विधाता विचारी चारी खाणी । चौऱ्यांसीलक्ष जीवयोनी । या चराचराची मांडणी । सृष्टी कैसेनी सृजावी हे ॥६४॥ सुर नर आणि पन्नग । उत्तममध्यमअधमभाग । कैसेनी सृजावें म्यां जग । पूर्वत्रविभाग स्फुरेना मज ॥६५॥ ऐसी स्त्रष्टा चिंता करी । निश्चळ बैसे कमळावरी । पंचभूतें हीं कवणेपरी । देही देहधारी होतील ॥६६॥ ऐसी तो चिंता करी । चित्त उगें न राहे क्षणभरी । मी कोण मजभीतरीं । हें मनीं निर्धारीं कळेना ॥६७॥ नकळतां माझें मीपण । केवीं प्रपंच होय निर्माण । ऐसें चिंतोनी अतिगहन । चतुरानन अनुतापी होत ॥६८॥

## किंकर्तव्यमूढ ब्रह्मदेवाचा भगवंताचा धांवा

कृपा करी गा अच्युता । धांवे पावे गा भगवंता । या एकार्णवाआंतोता । होई रक्षिता मज स्वामी ॥६९॥ मी अतिशयें तुझें दीन । मजवरी कृपा करी संपूर्ण । निजभावें अनन्यशरण । मनीं लोटांगण घालितसे पैं ॥७०॥ ऐसी ब्रह्मयाची ती चिंता । तत्काळ कळली भगवंता । तो अंतर्यामी जाणता । करता करविता तो एक ॥७१॥

## हरिकृपेशिवाय अनुताप नाहीं

जंव हरी हृदयीं कृपा न करी । तंव अनुताप नुपजे शरीरीं । त्याची पूर्ण कृपा ज्यावरी । तो विषयोकांकुरीं वीतरागी ॥७२॥विवेकाविण वैराग्य उठी ।तें अपायीं घाली कडेकपाटीं। कीं वैराग्याविण विवेक उठी । तो जन्मला पोटीं नपुंसक ॥७३॥ विवेकाविण वैराग्य आंधळें । वैराग्याविण विवेक पांगुळें । हें एकएका अवेगळें । झाल्याविण नकळे परमार्थ ॥७४॥ जैं कृष्णकृपा पूर्ण घडे । तैं विवेकवैराग्य समपाडें । हृदयीं वाढती वाडेंकोडें । तैं ब्रह्म आतुडे तत्काळ पूर्ण ॥७५॥ वैराग्याविण जें स्थिती । त्यांतें गिळी विषयशक्ती । विवेकहीन वैराग्यस्थिती । ते जंतू पडती अंधत्वें ॥७६॥ जैं कृष्णकृपा पूर्ण आकळे । तैं विवेक वैराग्य एके वेळे । जैं हृदयीं वाढे प्रांजळें । तैं परंब्रह्म लोळे दोंदावरी ॥७७॥ तेणें श्रीनारायणें आपण । ब्रह्मायावरी कृपा केली पूर्ण । कमळासनीं बैसोनि जाण । झाला विवेकसंपन्न वीतरागी ॥७८॥

### चित्तशुद्धीशिवाय हरीची भेट नाहीं

त्यासी द्यावी आपुली भेटी । कृपा उपजली हरीचे पोटीं । नव्हती चित्तशुद्धि गोमटी । म्हणुनी हरिरूपीं दृष्टी रिघेना ॥७९॥ जरी म्हणाल बहुत दूरी । इंद्रियां तो व्यापारी । निजज्ञानें नांदे श्रीहरी । घडे कैशापरी प्राणिया प्राप्ती ॥८०॥ इंद्रियव्यापार ज्ञानें होती । तें ज्ञान वेंचलें विषयासक्तीं । यालागीं हृदयस्थाची प्राप्ती । प्राणी न पावती विषयांध जे ॥८१॥ ते विषयासक्ती ज्याची उडे । त्या नांव चित्तशुद्धि जोडे । तैं हृदयीं हरि आतुडे । सर्व सांपडे परमात्मा मग ॥८२॥

### चित्तशुद्धीसाठीं सद्भावपूर्वक भगवद्भजनच आवश्यक

त्या चित्तशुद्धीलागीं जाण । भावें करावें भगवद्भजन । कां गुरुदास्य करितां पूर्ण । परब्रह्म जाण पायां लागे ॥८३॥ ते घडावया भगवद्भक्ती । तपादिसाधन सुयुक्ती । देव सांगे ब्रह्मयाप्रती । ऐक परीक्षिती नृपवर्या ॥८४॥

स चिंतयन् द्व्यक्षरमेकदांभस्युपाश्रृणोत् द्विर्गदितं वचो विभुः । स्पर्शेषु यत्षोडशमेकविंशं निष्किंचनानां नृपयद्धनं विदुः ॥६॥

### अनुतापयुक्त ब्रह्मदेवाला तप हीं दोन अक्षरें ऐकावयास आलीं

एवं कमलासनीं ब्रह्मा आपण । बैसलासे अनुतापें पूर्ण । तंव एकार्णवीं निकट जाण । द्व्यक्षर वचन द्विवार ऐके ॥८५॥ कोण रूप कोण वर्ण । कैसेपरीचें उच्चारण । त्या अक्षरांचा अर्थ कोण । तेंही लक्षण ऐक राया ॥८६॥ तकारापासुनी पकारावरी । ऐसें ब्रह्मा साक्षात्कारी । त्याची

ऐक्यता झडकरी । हो लवकरी विधात्या तुज ॥८७॥ ऐसीं तप हीं अक्षरें दोन्ही । परमेष्ठी ऐके कानीं । तेचि दोन्ही वेळा करूनी । तपतप हे ध्वनी परिसत ॥८८॥ जैसा परमआप्त येऊनी । हितोपदेश सांगे कानीं । तेवीं आईकोनी दोन्ही । विधाता मनीं चमत्कारला ॥८९॥ हें तपस्वियांचें निजधन । यालागीं ते तपोधन । तपोबळे ऋषिजन । प्रतिसृष्टी जाण करूं शकती ॥९०॥

## तपाचें महिमान

नवल तपाचें कौतुक । तापसां भिती ब्रह्मादिक । तपस्वियाचें नवल देख । दशावतारादिक विष्णूसी ॥९१॥ तपाचेनि नेटपाटीं । सूर्यमंडळ तपे सृष्टी । तपाच्या बळें निजनेटीं । दर्भाग्रीं सृष्टी धरिती ऋषी ॥९२॥ तपोबळें समुद्रा क्षार केलें । यादवकुळ निर्दाळिलें । शिवाचें लिंगपतन झालें । क्षोभलेनी बोलें तपोधनी ॥९३॥ जे सत्यवादी संत सज्जन । जे वासनात्यागी अकिंचन । तप हें त्यांचें निजधन । सत्य जाण नृपनाथा ॥९४॥ तप तें परम निधान । साधकांचें निजसाधन । ब्रह्मप्राप्तीचें दिव्यांजन । ऐकोनी चतुरानन विचारी ॥९५॥

निशम्य तद्वक्तृदिदृक्षया दिशो विलोक्य तत्रान्यदपश्यमानः ।
स्वधिष्ण्यमास्थाय विमृश्य तद्धितं तपस्युपादिष्ट इवादधे मनः ॥७॥

परंतु ' तप ' हीं अक्षरें उच्चारणारा ब्रह्मदेवाला दिसला नाहीं

तप तप ऐसें बोलिला । तो प्रत्यक्ष नाहीं देखिला । पाहतां अदृश्य जाहला । तो पांगेला दशदिशा ॥९६॥ तप

या अक्षरांचा उच्चारी। पाहतां न दिसे देहधारी। अवलोकितां दिशा चारी। वक्ता शरीरीं दिसेना ॥९७॥ तप या अक्षरांचा वक्ता। नातुडे दृष्टीचिया पंथा। मग तप या वचनार्था। होय विचारिता निजहृदयीं ॥९८॥

स्वयंचिंतनांतून 'तप' याचा अर्थ त्याला स्फुरला

म्हणे दंतौष्ठपुटेंवीण। नव्हे या अक्षराचें उच्चारण। हो कां येथें बोलिला कोण। देहधारी आन दिसेना ॥९९॥ तप या नांवाची काय स्थिती। तपें पाविजे कोण प्राप्ती। ऐसें विधाता निजचित्तीं। तपाची स्थिति गति विवंचीत ॥१००॥ तप म्हणिजे परमसाधन। येणें साधे निजात्मधन। ऐकोनी ऐसें सावधान। स्वहित स्फुरण हृदयीं स्फुरलें ॥१॥ तप म्हणिजे माझें हित। तपें एकाग्र होय चित्त। तपें होईजे आनंदयुक्त। ऐसा निश्चितार्थ पैं केला ॥२॥ जंव नाहीं केलें दृढ तप। तंव नटके तपवक्त्याचें रूप। आहाच कष्टतां अमूप। तेणें स्वस्वरूप भेटेना ॥३॥ ऐसा दृढ निश्चय मानुनी। विधाता बैसे कमलासनीं। जैसा प्रत्यक्ष येउनी कोण्ही। हितालागोनी बैसवी ॥४॥ एकांतीं शिष्यालागोनी। जें गुरु उपदेशित कानीं। मग तो प्रवर्ते अनुष्ठानीं। तेवीं कमलासनीं विधाता ॥५॥

तप म्हणजे नेमकें काय ?

तप म्हणिजे नव्हे स्नान। तप म्हणिजे नव्हे दान। तप नव्हे शास्त्रव्याख्यान। वेदाध्ययन नव्हे तप ॥६॥ तप म्हणिजे नव्हे योग। तप म्हणिजे नव्हे याग। तप म्हणिजे

वासनात्याग । जेणें तुटे लाग कामक्रोधांचा ॥७॥ शरीर-शोषणा नांव तप । तें प्रारब्धभोगानुरूप । हरि हृदयीं चिंतणें चिद्रूप । तप सद्रूप त्या नांव पैं ॥८॥

दंभ-लोभ-अहंकार यांना तोडतें तें तप

जेणें दंभलोभ निःशेष आटे । अहंममता समूळ तुटे । यासचि नांव तप गोमटें । मानी नेटेंपाटें विधाता ॥९॥ तीर्थोंतीर्थींचिया अनुष्ठाना । क्षमा नुपजे सज्ञानघना । तेथें कोप येउनी जाणा । करीं उगाणा तपाचा ॥१०॥

क्रोध हा तापसांचा वैरी

कोप तापसांचा वैरी । केल्या तपाची बोहरी करी । तो जंव निर्दळेना जिव्हारीं । तों तपाची थोरी मिरविती मूर्ख ॥११॥ जरी जाहला संन्यासी । तरी कामक्रोध ज्यापासीं । तो प्रपंचातें दिधला आंदणासी । मा इतरांसी कोण पुसे ॥१२॥ जेथें कामक्रोधांचें निर्दाळण । या नांव शुद्ध अनुष्ठान । हा निश्चय करूनि चतुरानन । तपासी आपण सरसावला ॥१३॥ एवं तप मानूनियां हित । बुद्धिनिश्चयें निश्चितार्थ । ब्रह्मा तपश्चर्या करित । एकाग्रचित्त भावार्थें ॥१४॥

दिव्यं सहस्राब्दममोघदर्शनो जितानिलात्मा विजितोभयेंद्रियः ।
अतप्यतस्माखिललोकतापनं तपस्तपीयांस्तपतां समाहितः ॥८॥

कामक्रोधनिरसनार्थ ब्रह्मदेवानें तप आरंभिलें

मनुष्याचा जो जाणिजे मास । तो देवांचा एक दिवस । ऐसी संख्या सहस्रवरुष । तपसायास करी ब्रह्मा ॥१५॥ ऐसीं सहस्रवरुषेंवरी । ब्रह्मया कमलासनीं तप करी ।

त्याच्या तपाची थोरी। व्यासमुनीश्वरीं वर्णिली ॥१६॥ हे आदिकल्पींची जुनाट कथा। होय श्रीव्यासची वक्ता। तेणें आणोनियां वेदार्था। यथार्थ वार्ता निरूपिली ॥१७॥ तीच श्रीशुकें परीक्षिती। निरूपिली कृपामूर्ती। या विरिंचीची तपप्राप्ती। उत्कृष्ट स्थिती अवधारा ॥१८॥

तपःप्रभावानें ब्रह्मदेव अंतर्बाह्य बदलला

ब्रह्मा कमलासनीं तप करी। नवल त्याचे धारिष्टाची थोरी। नानाइंद्रियविकारी। परी झाला अविकारी निजनिष्ठ ॥१९॥शमदमांचेनी निजमेळें। जिंतिले मनपवनांचे उल्लाळे। इंद्रियांचे अपार पाळे। तेणें तपोबळें आक्रमिले ॥२०॥ मन अमन पाहों आदरिलें। तंव तें चंचलत्व विसरलें। चित्त विषयचिंते मुकलें। चित्तीं चिंतलें चैतन्य पैं ॥२१॥ बुद्धीनें दृढबोध धरिला। तेथें अहंकार कांपिन्नला। तेणें सोहंभाव बळकावला। तेव्हां प्राण परतला दचकोनी ॥२२॥ देहीं दशधा धांवत होता। तो एकवटुनी आंतौता। धरूनि सोहंचा सांगाता। पश्चिमपंथा चालिला ॥२३॥ यापरी मनपवनांसी। जिंतिलेंसें निजनिष्ठेसी। तंव बहिरिंद्रियांसी। दशा आपैसी बाणली ॥२४॥ डोळचां डोळे देखणें झालें। तेणें दृश्याचें देखणें ठेलें। श्रवण अनुहतध्वनी लागले। तंव शब्दा वरिलें निःशब्दें ॥२५॥ स्पर्श स्पर्शावें जंव देहीं। तंव देहीं देहत्व स्फुरण नाहीं। देहींच प्रगटला विदेही। तेथें स्पर्श काई स्पर्शावें पैं ॥२६॥ चित्कळा वोळली वोरसें। गोडी रसने-माजीं प्रवेशे। रसना लाजे विषयतोषें। सर्वांग तेणें रसें

अतिगोड ।।२७।। घ्राणीं घेऊं जातां गंधासी। प्राण चालिला पश्चिमेसी । मागें कोण सेवी गंधासी । एवं विषयासी विरक्ति स्पष्ट ।।२८।।

मनाची गति थांबून तें निर्विषय झालें

मन इंद्रीयद्वारें विषयीं धांवे । त्यासी प्रत्याहार लाविला सवें । यालागीं तें जीवेंभावें । झालें निजस्वभावें निर्विषय ।।२९।। ज्ञानेंद्रियें जिंकिलीं ऐसीं । तैं कर्मेंद्रियांची स्थिति कैसी । तेंही सांगेन तुजपाशीं । ऐके राजर्षि नृपवर्या ।।३०।। जेवीं धूर जिंकिलिया रणीं । कटक जिंकिलें तेच्चिक्षणीं । तेवीं मनोजयाची बांधावणी । तोचि करणीं सर्व विजय समजे ।।३१।। विजय बांधावा राजद्वारीं । तंव गुढिया उभविजे घरोघरीं। तेवीं मनोजयाची थोरी । तेंचि इंद्रियद्वारीं नांदत ।।३२।। वाचा वदली सत्यासत्य । तिसी रामनामें दिलें प्रायश्चित्त । वाच्यवाचक स्फुरेना तेथ । वाचा स्फुरत तच्छक्ती ।।३३।। जें भेटोंनिघे मना मन । तैं हात मोकळे संपूर्ण । तेव्हां क्रियेमाजीं अकर्तेपण । आपुलें आपण हातावरी ।।३४।। क्रिया रतली चिच्छक्ती । तेणें ज्ञानगम्य चरणांची गती । तेव्हां गमनप्रत्यावृत्ती । समाधान स्थिती आसनस्थ ।।३५।। यापरी जिंतूनी चरण। दिव्यसहस्र वरुषें जाण । दृढ घालूनियां आसन । प्राणापान वश्य केले ।।३६।। मनीं कामाचा अतिसाटोप । तेणें खवळला उठी कंदर्प । तें मन चिंती जें चिद्रूप । तैं कामकंदर्प असतांच नाहीं ।।३७।।

### मन चिद्रूप झाल्यावर कामभावना संभवतच नाहीं

जेथें मन असे इंद्रियें उरलें । तेथें कदर्पाचें चालों शकलें । चित्त चिद्रूपध्यानीं गुंतलें । तैं कांहीं नचलें काम कंदर्पाचें ॥३८॥ देखोनी रंभेचा साटोप। शुकपोटीं नुठे कंदर्प। ज्याचे हृदयीं नुठे कामसंकल्प । तो निर्विकल्प सर्वार्थी ॥३९॥ काम तापसांचा उघड वैरी । मन जिंको नेणे त्यातें मारी । जे गुंतले चिदाकारीं । त्यांचे तोडरीं अनंग रुळत ॥४०॥ गुदेंद्रियाचा स्वभाव क्षर । तंव ध्यानबळें साचार । क्षरीं प्रगट होय अक्षर । क्षराक्षर नुरवुनी तेथें ॥४१॥ ज्ञान-कर्मेंद्रियें दाही । अकरावें मन ते ठायीं । यापरी उभयेंद्रियें पाही । जिंतूनी दृढदेही तो झाला ॥४२॥ अंतरीं निग्रह दृढ केला । शम शब्दें तो वाखाणिला । बाह्येंद्रियां नेम केला । तो दम बोलिला शास्त्रज्ञीं ॥४२॥ हृदयींचेंनी विवेकमेळें । वैराग्याचे अनुतापबळें । शमदमाचेनी निखळें । तप प्रांजळें दृढ केलें ॥४४॥ परी तें तप जाहलें कैसें । लोक प्रकाशे निजप्रकाशें । एवढी महिमा आली दशे । त्रैलोक्य भासे त्या तपामाजीं ॥४५॥ ऐसा निष्ठेचा निजप्रताप । तेणें तप जहालें सफळरूप । ब्रह्मा जाहला सत्यसंकल्प । तप वक्त्याचें रूप देखोनियां ॥४६॥ यालागी सफळदर्शन । विरिंचीचें तें तपाचरण । आचरला निजांगें जाण । ब्रह्मा आपण नेमनिष्ठा ॥४७॥ तपाचे निजनेमेंसी कष्ट । साधिले स्वनिष्ठें चोखट । यालागी तो अतिश्रेष्ठ । जाहला वरिष्ठ तपस्व्यांमाजी ॥ ४८ ॥ देखावें तपवक्त्याचें रूप । ऐसा

ब्रह्मयाचा पूर्वसंकल्प । यालागीं वैकुंठपीठदीप । कृपाळू सत्यसंकल्प स्वरूप दावी ।।४९।।

गुरुकृपेशिवाय आत्मज्ञान नाहीं

न होतां गुरुकृपा संपूर्ण । कदा न साधे आत्मज्ञान । त्या गुरुत्वालागी नारायण । आपुलें आपण स्वरूप दावी ।।५०।। न सेवितां सद्गुरुचरण । स्रष्टयासी नव्हें ब्रह्मज्ञान । त्या गुरुत्वाचें महिमान । श्रीनारायण स्वयें दावी ।।५१।। मागें उपदेशिलें 'तप तप' । परी प्रत्यक्ष नव्हे सद्गुरुरूप । गुरुकृपा नव्हतां सद्रूप । शिष्याचे विकल्प न तुटती कदा ।।५२।। संतोषोनी सद्गुरुनाथ । शिष्याचे माथां जों न ठेवी हात । तोंवरी नातुडे परमार्थ । हा निश्चितार्थ हरि जाणे ।।५३।। यालागी श्रीनारायण । गुरुत्वें आपुलें आपण । शिष्यासी देऊनी दर्शन । स्वयें ब्रह्मज्ञान उपदेशितसे ।।५४।। निष्ठें केली तपस्थिती । तेणें झाली सद्गुरुप्राप्ती । आतां गुरुमुखें प्रजापती । आत्मज्ञानप्राप्ती पावेल पां ।।५५।। जैं पूर्वपुण्याची निष्काम जोडी । तैं सद्गुरुचरण जोडिती जोडी । गुरुचरणीं आवडी गाढी । तैं पाविजे रोकडी ब्रह्मप्राप्ती ।।५६।।

गुरुविषयीं लवमात्रहि विकल्प उपयोगी नाहीं

गुरूच्या ठायीं नीचपण । शिष्यें देखिलें असे जाण । अणुमात्र केलिया हेळण । ब्रह्मज्ञान कदा नुपजे त्या ।।५७।। गुरूतें पाहतां मनुष्यबुद्धी । ज्ञान नव्हेगा त्रिशुद्धी । यालागी कृष्णकृपानिधी । निजवैभवसिद्धि स्रष्टयासी दावी ।।५८।।

गुरूचे अगाध महिमान। दावावया श्रीनारायण। जेथें लक्ष्मी करी संमार्जन। तें वैकुंठभुवन स्वयें दावी ॥५९॥

तस्मै स्वलोकं भगवान्सभाजितः संदर्शयामास परं न यत्परम् ॥
व्यपेतसंक्लेशविमोहसाध्वसं स्वदृष्टवद्भिर्विबुधैरभिष्टुतम् ॥९॥

## वैकुंठमहिमा

तें वैकुंठ जाण साचार। सर्व लोकां वरिष्ठवर। त्याहून परतें नाहीं पर। यालागीं परात्पर म्हणती त्यातें ॥६०॥ जेथें परमात्मा नांदे स्वयंज्योती। त्या वैकुंठाची वैभवस्थिती। वर्णितां खुंटली परेची गती। यालागी म्हणती वैकुंठ लोक ॥६१॥ ज्या लोकाचिये ठायीं। क्लेशमात्र प्राणियांसी नाहीं। मोहाची वार्ता कांहीं। कोणी स्वप्नींही न देखती ॥६२॥ नित्य देखतां हरीचें पाय। क्षुधातृषा जिरोनी जाय। तेथें मोहक्लेश कैंचा राहे। आनंदें नांदताहे वैकुंठ-लोक ॥६३॥ ज्या वैकुंठाचें नांव घेतां। काळ पळे मागुता। तेथें कैंची भयाची वार्ता। जननिर्भयता नांदे पैं ॥६४॥ ज्या लोकाचिये ठायीं। मरणाचें नांव नाहीं। जरा प्रगटे निज-देहीं। हें जन कोणी जाणेचिना ॥६५॥ ज्या लोकाचें स्तवन। सदाशिव करी आपण। इंद्रादिदेवगण। वैकुंठाचे गुण स्वयें वदती ॥६६॥ मृत्युलोकींचे मुनिगण। पावावया वैकुंठभुवन। अद्यापि करिती अनुष्ठान। भगवद्भजन निज-निष्ठा ॥६७॥ तोचि वैकुंठलोक। पांचश्लोकी श्रीशुक। वर्णितसे आत्यंतिक। ऐके त्यक्तोदक परीक्षिती ॥६८॥

प्रवर्तते यत्र रजस्तमस्तयोः सत्त्वं च मिश्रं न च कालविक्रमः ॥
न यत्र माया किमुतापरे हरेरनुव्रता यत्र सुरासुरार्चिताः ॥१०॥

## वैकुंठलोकाची स्थिति

ज्या लोकाची निजस्थिती । शुद्धसत्वजन वर्तती । रजतम-मिश्रित गती । ज्या लोकाप्रती असेना ॥६९॥ नवल ते लोकींचा ठसा । बालयतारुण्यवृद्धदशा । नाहीं तेथें तिन्ही वयसा । क्षय आहे कैसा हें नेणिजे ॥७०॥ तेथें समूळ माया नाहीं । मा कालिविक्रम कैंचा ते ठायीं । मोहलोभादिद्वेष पाही । मायेच्याठाईं वर्तती ॥७१॥ उगमीं वाकडी लागे नेटें । तेणें नदनदीपूर लोटे । तेवीं माया विषयसंघट्टें । चढणी नेटेपाटें मोहादिदशा ॥७२॥ जेथें उगम नाहीं मायेचा । तेथें रागदशे ठाव कैंचा । परमानंदें पूर्ण साचा । हरिप्रियांचा समूह नांदे ॥ ७३ ॥ भक्तिप्रतापें जे आथिले । यालागीं ते देवदैत्यीं पूजिले । मायामोहातीत जाहले । अढळ बैसले वैकुंठीं ॥७४॥ देवाची माया ऋद्धिसिद्धी । दैत्यांची माया विघ्नें बाधी । भक्त नळढतीच दृढबुद्धी । जिणोनी उपाधि पूज्य झाले ॥७५॥ शोधिती सत्व अतिसात्विकें । जे हरिभक्त हरिप्रेमाधिकें । जे झाले श्रीहरिसारिखे । त्यांचें स्वरूप सुखें शुक सांगे ॥७६॥

श्यामावदाताः शतपत्रलोचनाः पिशंगवस्त्राः सुरुचः सुपेशसः ॥
सर्वे चतुर्बाहव उन्मिषन्मणिप्रवेकनिष्काभरणाः सुवर्चसः ॥११॥
प्रवालवैडूर्यमृणालवर्चसः परिस्फुरत्कुंडलमौलिमालिनः ॥
भ्राजिष्णुभिर्यःपरितो विराजते लसद्विमानावलिभिर्महात्मनाम् १२

## हरिभक्तांचें स्वरूप

हरिभक्त शोभायमान। हरिचरणीं आवडी गहन। नित्य नवीन प्रेमें हरिदर्शन। तेणें हरिसमान स्वयें झाले ॥७७॥ कीटकी भयें ध्यातां भृंगीसी। तद्रूपता बाणली तियेसी। मा जे जीवें भावें भजती हरीसी। ते हरिपासीं स्वयेंची येती ॥७८॥ भजनें पावले हरिरूपासी। म्हणोनी झाले वैकुंठवासी। यालागीं त्यांच्या स्वरूपासी। परीक्षितीपासी शुक सांगे ॥७९॥ वैकुंठवासी भक्तजन। घनश्याम राजीवलोचन। गंभीरगिरा प्रसन्नवदन। शोभायमान निजतेजें ॥८०॥ मुकुटकुंडलें मेखळा। गळा आपाद रुळे वनमाळा। कासे कसिला सोनसळा। जेवीं मेघमंडळामाजीं बीज ॥ ८१ ॥ आजानुबाहु भुजा चारी। बाहुअंगदे अतिसाजिरीं। जडितमुद्रिका बाणल्या करीं। वीरकंकणावरी मणिमुद्रा ॥८२॥ सांवळी कमलमृणालें। तैसें मस्तकींचे केश कुरले॥ कुंकुमांकित करचरणतळें। लाजली प्रवाळें अधररंगें ॥८३॥ ललाटीं तिलक पिवळा। आपादरल वनमाळा। वैजयंती रुळे गळां। घनसांवळा घवघवित ॥८४॥ ज्यांची वदतां सुंदरता। तंव ते पावले हरिस्वरूपता। त्याहुनीयां सुंदरत्व आतां। बोलें बोलतां सलज्ज ॥८५॥ नवल त्यांची सुकुमारता। चंद्रकर खुपती लागतां। सेजेमाजीं निजों जातां। गगनाची शून्यता सले त्यांसी ॥८६॥ त्यांचिया अंगप्रभा। लाजोनी सूर्य द्वारा पैं उभा। ज्यांचिया निजतेजशोभा। हिरण्यगर्भा

प्रकाश असे ॥८७॥ ऐसें सुंदर आणि सुकुमार । निज-भजनें भगवत्पर । वैकुंठवासी अपार । हरिकिंकर विमानस्थ ते ॥८८॥ पूर्ण चंद्रप्रभेसमान । निजपुण्यें झळके विमान । ऐसे विमानीं बैसोनि जाण । हरिसी आपण क्रीडती स्वयें ८९

## पतिव्रतांचें निवासस्थान

जे शुद्धसत्वेंकरुनी संपन्न । नुल्लंघत पतीचें वचन । जे निर्विकल्प पतिव्रता पूर्ण । तिसी निवासस्थान वैकुंठ ॥९०॥ जे पतिपुत्रा आणि अतीता । भोजनी न देखे भिन्नता । जे धनलोभाविण पतिव्रता । तें जाण तत्वतां वैकुंठवासी ॥९१॥ जे पतीतें मानी नारायण । जे कोणाचे न देखे अवगुण । जे निर्मोह पतिव्रता पूर्ण । तिसी निवासस्थान वैकुंठ ॥९२॥ ज्यांसी निवास वैकुंठस्थान । ऐका त्यांचें वर्णन । श्रीशुक सांगतसे आपण । सभाग्यपण तयांचेंची ॥९३॥

विद्योतमानाः प्रमदोत्तमा द्युभिः सविद्युदभ्रावलिभिर्यथानभः ।
श्रीर्यत्र रूपिण्युरुगाय पादयोः करोति मानं बहुधा विभूतिभिः ॥१३॥

## पतिव्रतांचें वैकुंठलोकींचे स्थान

ज्या परमपुण्यें अतिपावन । त्या स्त्रिया वैकुंठीं विराज-मान । सौंदर्यगुणें विष्णूसमान । तेज विराजमान शोभे कैसें ॥९४॥ लावण्य स्त्रियां केवीं दिसे । तेथें स्वयें स्वरूपें

लक्ष्मी वसे । तद्रूपें स्त्रियां सौंदर्य भासे । यापरी शोभतसे वैकुंठलोक ॥९५॥ वैकुंठ नव्हे तें शुद्ध गगन । मेघस्थानीं गमे विमान । तेथें विद्युल्लता स्त्रिया जाण । सौंदर्यें संपूर्ण झळकती त्या ॥९६॥ इतरां ठायीं लक्ष्मी असे । तें ऐश्वर्ययोगें आभासे । ते निजरूपें वैकुंठीं वसे । यालागीं शोभतसे वैकुंठलोक ॥९७॥ लक्ष्मीसी अतिशय लावण्य । यावया हेंचि कारण । सप्रेमें सेवी हरिचरण । यास्तव शोभमान अतिसौंदर्य ॥९८॥ जेणें सुख होय निजजीवा । ऐसी गोड हे हरीची सेवा । मेळवुनी उत्तम वैभवा । रमा सद्भावा हरिचरणीं ॥९९॥

प्रेंखं श्रिता या कुसुमाकरानुगैर्विगीयमाना प्रियकर्म गायती ॥
ददर्श तत्राखिलसात्वतां पतिं श्रियः पतिं यज्ञपतिं जगत्पतिम् ॥१४॥

## सर्वांगमनोहर शृंगारवनांतील लक्ष्मीची हरिसेवा

शृंगारवाटिकेमाजीं डोल्हारा । लावूनीयां सुवर्णसूत्रा । लक्ष्मी निजभावें निजवरा । नानोपचारा सप्रेम भजे ॥२००॥ शृंगारवाटिकेचें वन । वसंतें शृंगारिलें संपूर्ण । पराग उधळती पुष्पांतोन । सुवासित पूर्ण वन झालें ॥१॥ मृगमद अत्यंत शीतळ । ढाळीं झळके मलयानीळ । पंचम कूजती कोकिळ । झंकारें अळिकुळ भ्रमती तेथें ॥२॥ कुंकुमकेशरकस्तूरीरोळा । एकवटपणें कर्दम केला । सुगंध चंदन उधळला । नाना सुमनमाळा सुवासित ते ॥३॥ चंद्रकांतीचें शीतळ नीर । शुद्ध सुमनांचे विचित्र हार । हंस त्राहाटिले शेजार । त्यावरी

अरुवार शतपत्राचें ॥४॥ ऐसी देखोनी शेज मनोहर। संतोषोनी पहुडला श्रीधर। तेथें डोल्हारियाचा दोर। अंतः-स्थिर हालवी रमा ॥५॥ येथें हरिगुणचरित्र। शुक बोलती विचित्र। हरिखें कूजताती मयूर। जेवीं कवीश्वर गर्जती नामें ॥६॥ कोकिळांचे पंचमस्वर। जैसें सामगायन गंभीर। मधुर भ्रमरांचें झणत्कार। सारंगधरगुण वर्णिती पैं ॥७॥

## स्वानंदधुंद रमेकडून हरिगुणसंकीर्तन

ऐसे ऐकतां हरिगुण। रमा झाली स्वानंदें पूर्ण। तेही संतोषोनी आपण अगाध त्याचे गुण गाऊं लागली ॥८॥ ऐकतां हरिनामगुणकीर्ती। ज्यासी उल्हास नुपजे चित्तीं। तो परम अभाग्य त्रिजगतीं। जाण परीक्षिती निश्चित तूं ॥९॥ मी हरीचें निजअर्धांग। म्हणे परी न देखें अंगसंग। सांग नाहीं म्हणती श्रीरंग। व्यापुनी सर्वांगें वर्तवी माते ॥१०॥ माझें लावण्यसमर्थपण गुण। रमा आणि रमारमण। अवघे श्रीहरिनारायण। माझें वर्ते मीपण तया-चेनी ॥११॥ त्यातें मी मानीं आपुला कांत। तंव मीपण नुरे त्याआंत। मज सबाह्य श्रीभगवंत। असे वर्तत निजानंदें तो ॥१२॥ आतां त्याची कीर्ति गावी कैसी। तंव वाच्य वाचक हृषीकेशी। यास्थिती करितां कीर्तनासी। कीर्तिवंतासी निजलाभ होय ॥१३॥ देवा तूं सर्वभूतनिवासी। म्हणतां भूतमात्रा नातळसी। भूतें भूतात्मा तूंच होसी। नमो हृषीकेशी परमात्मया ॥१४॥

## श्रीविष्णूंची स्तुति

नमो आदिपुरुषा अव्यक्ता । सच्चिदानंदा गुणातीता । विश्वात्मका सदोदिता । नमो अच्युता अव्यया तुज ॥१५॥ तूं योगीजनां अगोचर । वेदशास्त्रां नकळे पार । भक्तजनासी प्रियकर । दिधला चरणादर निजसेवे त्वां ॥१६॥ हरिचरणसेवेपरता । ठाव नाहीं परमार्था । मिथ्या मोक्षसायुज्यता । ह्मणती लाता हरिभक्त पैं ॥१७॥ हातीं जोडल्या हरिचरण । भक्तां नाहीं जन्ममरण । यापरता परमार्थ कोण । अभाग्य जन न मानिती हें ॥१८॥ थिजलें विघरलें तूप देख । तैसें सगुणनिर्गुण दोन्ही एक । हे स्वयें जाणती हरिसेवक । नेणती नास्तिक वेदबाह्य जे ॥१९॥ सर्वभूतीं वासुदेव । स्वतःसिद्ध असतां स्वयमेव । ह्या भेदवाद्यां नुपजे भाव । हृदयस्थ देव दुणाविला स्वयें ॥२०॥ भेदवादी अभेदवादी । वंदी अथवा जो कां निंदी । तो भगवद्रूपचि त्रिशुद्धी । हें सर्वेचि विधी अनन्यभक्तां ॥२१॥ भावें हरिभक्ति करितां । भेदीं प्रकटे अभेदता । भक्तांसी नित्यमुक्तता । भावें भजतां हरिचरणीं ॥२२॥ ज्ञानाभ्यासी विषय त्यागिती । त्यागिती ते अतिदुःख पावती । भक्त विषय भगवंतीं अर्पिती । तेव्हांचि ते होती नित्यमुक्त ॥२३॥ ऐसें उल्हासें रमा बोले पूर्ण । माझा सद्गुरु स्वयें नारायण । त्याचे सेवितां सद्भावें चरण । स्वयें ब्रह्मज्ञान पायां लागे ॥२४॥ यापरी रमा आपण । आनंदें गाय

हरीचे गुण । हेंही करावया गुणवर्णन । तो रमारमण वाचा वदवी ॥२५॥ सांडूनियां अहंमती । रमा करी साकारस्तुती । देव संतोषला निजात्मस्थिती । यालागीं श्रीपती बोलिजे त्यातें ॥२६॥ श्रियेसी जे निजस्थिती । तिसी चाळविता निजात्मशक्ती । यालागी त्यातें श्रीपती । वेदशास्त्रार्थी बोलिजे ॥२७॥ न भागतां भक्तांची आर्ती । निवारी निजांगें कृपामूर्ती । यालागीं त्यातें सात्वतपती । सज्ञान बोलती सद्भावें पां ॥२८॥ याज्ञिक यागहोम करितां । कल्पनेसारिखें फळदाता । यालागीं यज्ञपति तत्त्वतां । होय बोलता श्रीव्यास ॥२९॥ जग सृजुनी प्रतिपाळिता । शेखीं उदरीं सामाविता । एवढी सत्ता श्रीभगवंता । यालागीं तत्त्वतां जगत्पति होय ॥३०॥ ऐसा भक्तपती श्रीपती । यज्ञपति आणि जगत्पती । भक्तांसमान वैकुंठपती । देखे प्रजापती स्वकारला ॥३१॥ मागें बोलिले भगवद्भक्त । जे भजनभावें नित्यमुक्त । ते हरिलागीं प्रिय सात्वत । ब्रह्मा देखत पार्षदगण ॥३२॥

सुनंदनंदप्रबलार्हणादिभिः स्वपार्षदमुख्यैः परिसेवितं विभुम् ।
भृत्यप्रसादाभिमुखं दृगासवं प्रसन्नहासारुणलोचनाननम् ॥१५॥

## वैकुंठींचे मुख्य पार्षदगण

वैकुंठीं हरिभक्त पूर्ण । ब्रह्मा देखताहे आपण । त्यांचीं नांवें सांगूं शके कोण । मुख्य पार्षदगण ते ऐका ॥३३॥ नंद सुनंद मुख्यत्वें पूर्ण । बल आणि प्रबलार्हण । धाता विधाता

निकटघन जय विजय जाणीं द्वारपाळ ।।३४।। चंड प्रचंड सुशीळ । भद्र सुभद्र पुण्यशीळ । कुमुद कुमुदाक्ष सकळ । हा पार्षदमेळ श्रीहरीचा ।।३५।। इहीं पार्षदगणांसमवेत । ब्रह्मा देखे श्रीभगवंत । त्यातें भजता निजभक्त । स्वानंदयुक्त सर्वदा तो ।।३६।। सप्रेम सद्भावी सात्विक । त्यांसीं सदा हरि सन्मुख । दुष्टला होय प्राङ्मुख । निजानंदे सुख सर्वदा देत ।।३७।।

## हरिदर्शनाचा महिमा

ज्याचे दर्शन स्वयें गोड । विसरवी अमृताची चाड । पहातयाचें पुरे कोड । दृष्टी होय गोड देखणेंपणें ।।३८।। त्या निजभक्तांचें ठायीं । नाममात्र स्मरतां देहीं । मृत्यु रिघों न शके कांहीं । अमृतरूप पाही यापरी भक्त ।।३९।। ज्याचें नाम निवारी जन्ममरण । त्याचे भाग्यें झालिया दर्शन । भक्तांसी तो सुप्रसन्न । प्रसन्नवदन गोविंद पैं ।।४०।। आकर्णविशाळनयन । दोहीं प्रांतीं आरक्त पूर्ण । यालागीं तो अरुणलोचन । स्वयें चतुरानन हरि देखे ।।४१।।

किरीटिनं कुंडलिनं चतुर्भुजं पीतांबरं वक्षसि लक्षितं श्रिया ।
अर्ध्यर्हणीयासनमास्थितं परं वृतं चतुःषोडशपंचशक्तिभिः ।।१६।।

## ब्रह्मदेवाला भगवंत कसा दिसला ?

मागुतेनी तो कैसा भगवंत । निजभाग्यें विधाता देखत । माथां मुकुट रत्नखचित । सुमनीं संयुक्त कबरीबंध पैं ।।४२।। चतुर्भुज घनसांवळा । मकरकुंडलें कौस्तुभ गळां ।

वैजयंती वक्षस्थळा । आपाद वनमाळा रुळत ॥४३॥ विजू शरण आली हरीसी । अस्ता जाणें खुंटलें तीसी । तैसा पीतांबर कासेसीं । दिव्य तेजेंसी तळपतसे ॥४४॥ नाभीं आवर्तला आनंद । परमानंदे वाढलें दोंद । सर्वांगें सच्चिदानंद । स्वानंदकंद शोभतसे ॥४५॥ पाहतां हरीचीं करतळें । संध्याराग लाजिन्नला पळे । अधर आरक्तपोवळें । सुकुमार रातोत्पळें तैसें चरण ॥४६॥ चरणीं तोडर गर्जती देखा । ध्वजवज्रांकुशऊर्ध्वरेखा । पाहतां पायींच्या सामुद्रिका । सनकादिकां आनंद बहु ॥४७॥ पडतां पायींच्या पायवण्यासी। शंकर वोढवी मस्तकासी । तेणें शिवत्व आलें त्यासी । अद्यापि शिरीं वाहतसे ॥४८॥ त्याचिये वक्ष:स्थळीं वामा। वामांगीं बैसलीसे रमा । तिच्या भाग्याची थोर सीमा । न वर्णवे महिमा श्रुतिशास्त्रां ॥४९॥ रमा बैसतांचि अर्धांगीं । तिच्या निजशक्ति अनेगी । उभ्या तिष्ठती निजविभागीं । आज्ञाविनियोगीं अधिकार त्या ॥५०॥

## अशा भगवंताजवळ सृष्टीच्या निर्मितीचें कार्य कसें चालतें तें ब्रह्मदेवाला दिसलें

श्रेष्ठ सिद्धासनीं आरोहण । रमासमवेत रमारमण । तेथें सृष्टीचें कार्यकारण । ब्रह्मा आपण स्वयें देखे ॥५१॥ करावया सृष्टिसर्जन । ब्रह्मा पुढें देखे नारायण । सृष्टीचें कार्यकारण । आपुलें आपण निजशक्ति दावी ॥५२॥ चारी पांच आणि सोळा । ऐसा पंचविसांचा मेळा ।

आज्ञाधारक हरिजवळा । विधाता डोळां स्वयें देखे ॥५३॥ त्यांची शक्ति कोण कोण । कोण कार्य कोण कारण । कैसें कैसें त्यांचें लक्षण । नामाभिधान तें ऐका ॥५४॥ प्रकृति पुरुषमहदहंकार । हा चतुःशक्तींचा प्रकार । पंचशक्तींचाहि विचार । जाण साचार महाभूतें ॥५५॥ ज्ञानकर्मेंद्रियांचें लक्षण । अकरावें गणिजें पैं मन । पंचतन्मात्रा विषय जाण । यापरी संपूर्ण षोडशशक्ती ॥५६॥ या पंचविसांच्या पोटीं । ब्रह्मांडेंसीं उठिजे सृष्टी । त्याहि माजीं त्रिगुणत्रिपुटी । अतर्क्य दृष्टी विधाता देखे ॥५७॥

युक्तं भगैः स्वैरितरत्र चाध्रुवैः स्व एव धामन् रममाणमीश्वरम् ।
तद्दर्शनाल्हादपरिप्लुतांतरो हृष्यत्तनुः प्रेमभराश्रुलोचनः ॥१७॥

## भगवंत हा षड्गुणयुक्त असल्यानें त्याच्या भक्तांनाहि षड्गुणांची प्राप्ति होते

षड्गुणभाग्यें भाग्यवंत । यालागीं बोलिजे भगवंत । ज्ञान वैराग्य ऐश्वर्यवंत । यशश्रीमंत औदार्येंसी ॥५८॥ हे साही गुण भगवंतीं । सहज स्वाभाविक असती । योगानें करितां भगवद्भक्ती । षड्गुणप्राप्ती तत्प्रसादें पैं ॥५९॥ सहज षड्गुण भगवंतीं । योगियां आगंतुक प्राप्ती । भक्तांतें भगवंत म्हणती । जाण निश्चितीं या हेतु ॥६०॥ पावोनि षड्गुणप्राप्ती । भक्तांतें भगवंत म्हणती । ऐकें तयांची नामकीर्ती । संक्षिप्तस्थिती सांगेन तुज ॥६१॥

## षड्गुणसंपन्न भक्तश्रेष्ठांची संक्षिप्त नामावली

वसिष्ठ वामदेव नारद । व्यास वाल्मीक प्रल्हाद । शुक षड्गुणी प्रसिद्ध । इत्यादि अनुवाद भगवद्रूप पैं ॥६२॥ अगाध हरीचें उदारपण । दासां देऊनियां षड्गुण । भगवद्रूपीं परिपूर्ण । त्यांसी भिन्नपणें न देखें स्वयें ॥६३॥ देउनी षड्गुणसंपत्ती । भक्त भगवद्रूप होती । त्यांची उरों नेदी भिन्न वृत्ती । चिदात्मस्थिती निजबोधें ॥६४॥

## औदार्यसिंधु भगवंत

नवल सामर्थ्याचें औदार्य । आपणासगट दे षड्गुणैश्वर्य । अभिन्नज्ञानें तेजवीर्य । परात्परवर्य महामहिमा ॥६५॥ मर्दुनी भक्तांचा जीवकण । भेद निरसुनी दे षड्गुण । स्वयें स्वरूपीं रमारमण । स्वानंदमयपूर्ण परमात्मा ॥६६॥

## अशा षड्गुणैश्वर्यसंपन्न नारायणाच्या दर्शनानें ब्रह्मदेव आत्मानंदीं रममाण झाला

यापरी श्रीनारायण । आनंदविग्रही चिद्घन । त्यातें देखोनि चतुरानन । विस्मयें पूर्ण जाहला असे ॥६७॥ घवकरी देखिला हृषीकेशी । घवकरी सत्त्व दाटलें त्यासी । प्रेम न सांवरे ब्रह्मयासी । सुखोर्मीसी विव्हळ होत ॥६८॥ घवघवीत शामसुंदर । देखतां मनीं मना विसर । चढिला सुखाचा महापूर । त्यामाजीं संसार बुडों पाहे ॥६९॥ चित्त चिंतेसी विसरलें । अहंसोहं एक जाहलें । बुद्धिबोधा खेंव

पडिलें । भरितें दाटलें सत्वाचें त्या ॥७०॥ निजात्मज्योती लखलखिली । तेणें हरिखें जीवदशा लाजिली । देहीं देहत्वाची स्फूर्ति गेली । विषयाची झाली पहांट तेथें ॥७१॥ मोडिलें त्रिपुटीचें बिदान । मावळों लागे विकारभगण । जीवाशिवा होऊं पाहे लग्न । मधुपर्क विधान शुद्धसत्वें केलें ॥७२॥ गुरुकृपा अरुणोदय होत । अज्ञानअंधार जाय तेथ । इंद्रियें विषयीं नियुक्त । तीं उठूं पाहत निजबोधें ॥७३॥ कंठीं अतिबाष्प दाटला । तेणें शब्दव्यवहार खुंटला । गदगदोनी रोमांचित जाहला । सर्वांगीं चालिला स्वेद कंप ॥७४॥ अंतरीं हर्ष कोंदाटोनी । आनंदाश्रु लोटलें नयनीं । स्फुंदे सुखोर्मीचिया स्फुंदनीं । हर्षें विव्हळोनि विधाता पैं ॥७५॥ ते सत्वावस्था आवरोन । अंगीचा स्वेद परिमार्जून । ब्रह्मा सावधान होऊन । वंदी श्रीचरण नारायणाचे ॥७६॥

ननाम पादांबुजमस्य विश्वसृग्यत्पारमहंस्येन पथाऽधिगम्यते ।
तं प्रीयमाणं समुपस्थितं तदा प्रजाविसर्गे निजशासनार्हणम् ॥१८॥

## अहंकारशून्य ब्रह्मदेवाचें नारायणाला नमन

जीं परहंसप्रांजळें । योगवैराग्यज्ञानबळें । पाविजेती हरीचीं पादयुगुळें । तीं चरणकमळें वंदिलीं भावें ॥७७॥ जे वेदविवेकव्युत्पत्ती । जाणोनी सद्भावें भक्ति करिती । ते भगवच्चरण पावती । ते प्रजापती वंदिता झाला ॥७८॥ हरिचरणद्वंद्वयुगुळें । वंदितांची भावबळें निर्द्वंद्व करिती तात्काळें । तीं चरणकमळें वंदिलीं ॥७९॥ हरिचरणपदद्वंद्व ।

वंदितां करी निर्द्वंद्व । यालागीं स्रष्टा स्वानंद । भगवत्पद स्वयें वंदी ॥८०॥ भावें वंदिता हरिचरण । जगाचा स्रष्टा झाला आपण । न करवे म्हणे सृष्टिसर्जन । त्या जगाचें दर्शन विधाता देखें ॥८१॥ न रचितां भूतभौतिककोटी । स्रष्टा देखे सकळ सृष्टी । यालागीं विश्वदृक्‌दृष्टी । ब्रह्मयाची नामाटी सत्यत्वा आली ॥८२॥ करितां हरिचरणीं नमन । विश्वद्रष्टा झाला आपण । विश्वदृक् नामाभिधान । ब्रह्मयासी जाण याहेतू ॥८३॥ ब्रह्मा सद्‌भावें आपण । साष्टांग घाली लोटांगण । तो भाव देखोनी नारायण । स्वानंदें पूर्ण संतुष्टला ॥८४॥

### ब्रह्मदेवाची पूर्णावस्था पाहून नारायणाचें त्याला आश्वासन

येऊनी ब्रह्मयाजवळी । कृपें अवलोकी वनमाळी । संतुष्ट होऊनी त्याकाळीं । म्हणे याची झाली परिपक्वदशा ॥८५॥ एवं करावया सृष्टीसर्जन । स्रष्टयासी स्वाधिकारी पूर्ण । स्थापावया श्रीनारायण । आइका निजाश्वासन बोले तें ॥८६॥

बभाष ईषत्स्मितरोचिषा गिरा ।
प्रियः प्रियं प्रीतमनाः करे स्पृशन् ॥१९॥

### भगवंताची वाणी म्हणजे दिव्यामृतधाराच ती !

ब्रह्मयाच्या प्रीती पावला । प्रियवंतापरिस प्रिय मानला । प्रीतीकरूनि करीं धरिला । प्रियकर झाला परमेष्ठी ॥८७॥ जो शब्द बोलिला निःशब्दाचा । वाचिक विश्वतोमुखाचा ।

ज्याचेनी प्रकाशती चारी वाचा । तो वेदवाचा बोलता झाला ।।८८।। तो शब्दांचें निजजीवन । ज्याचेनी वाचा देदीप्यमान । तो स्वयें होऊनि भगवान । हास्यवदन करूनि बोलत ।।८९।।

श्रीभगवानुवाच

त्वयाऽहं तोषितः सम्यग्वेदगर्भसिसृक्षया ।।
चिरंभृतेन तपसा दुस्तोषः कूटयोगिनाम् ।।२०।।

लहरी लोटली चित्सागरा । आनंदाचा सुटला झरा । सुख मेघ गर्जे गंभीरगिरा । ऐशिया वरा रमाधव बोले ।।२९०।। परमानंदाची आली भरणी । निजसुखाची उघडली खाणी । तेवीं मृदुमंजुळमधुरवाणी । सारंगपाणी बोलतसे ।।९१।। तो स्वमुखें म्हणे ब्रह्मयासी । सृष्टिसर्जनसामर्थ्यासी । तप केलें माझे आज्ञेसीं । तेणें मी संतोषी बहुत झालों ।।९२।। जेवीं कां निजबाळ तान्हें । नाचोंलागे मातेच्यानी वचनें । तें देखोनियां पां नाचणें । सुखावे मनें माउली जैशी ।।९३।। तेंवी 'तप' माझें वचन । ऐकोनी केलें अनुष्ठान । तेणें अनुष्ठानें मी आपण । जाणिजे संपूर्ण संतोषलों ।।९४।। जो मी तुझेनी तपें संतोषलों । प्रत्यक्ष तुजसी भेटलों । तो मी हृदयस्थ दूर केलों । दुष्प्राप्य जाहलों कूटयोगियां ।।९५।।

## माझी प्राप्ति कोणाला होत नाहीं ?

जे विषय कल्पूनि चित्तीं । नाना तपें आचरतीं । त्यांसी नव्हे माझी प्राप्ती । जाण निश्चितीं कूटयोगी ते ।।९६।।

ज्यां कनककांता आवडे चित्तीं । ज्यांसी लोकेषणेची[1] आसक्ती । त्यांसी नव्हे माझी प्राप्ती । ते जाण निश्चितीं कूटयोगी ॥९७॥ जो जग मानी अज्ञान । तेथें मी एकचि सज्ञान । तो कूटयोगी संपूर्ण । कल्पांतींही जाण नपवे मातें ॥९८॥ कूट ऐसें देहातें म्हणती । त्या देहाची ज्या आसक्ती । त्यासी कदा नव्हे माझी प्राप्ती । ते जाण निश्चितीं कूटयोगी ॥९९॥

## नारायण ब्रह्मदेवाला वर देण्यास उद्युक्त

ऐसी कूटयोगियांची स्थिती । देव सांगतसे प्रजापती । तपें तुष्टला लक्ष्मीपती । होत वरदमूर्ती विधातया ॥३००॥

वरं वरय भद्रं ते वरेशं माऽभिवांछितम् ।
ब्रह्मञ्छ्रेयः परिश्रामः पुंसो मद्दर्शनावधिः ॥२१॥

संतोषें श्रीनारायण । ब्रह्मयासी म्हणे आपण । जें अभीष्ट वांछी तुझें मन । तो वर संपूर्ण माग वेगीं ॥१॥ वरांमाजीं वरिष्ठ । तुज जो वाटेल श्रेष्ठ । मागतां अतिउत्कृष्ट । तोही उद्भट वर देईन मी ॥२॥

## नाममहिमा

तंवचि प्राणी पावती श्रम । तंवचि देखती द्वंद्वविषम । तंवचि भोगिती मरणजन्म । जंव श्रद्धें हरिनाम नये वाचें ॥३॥ तंवचि द्वंद्वद्वेषखोडी । तंवचि विषयाची गोडी ।

१ लोकांकडून बरें म्हणवून घेण्याची इच्छा.

तंवचि पापाची तथा कोडी । जंव नाम अवघडी नये वाचें ॥४॥ तंवचि भवभय लागे पाठीं । तंवचि मदमोह महाहटी । तंवचि अविद्या हे लाठी । जंव मातें निजदृष्टी देखिलें नाहीं ॥५॥ तंवचि कामक्रोधाची गोष्टी । तंवचि कल्पना नांदे पोटीं । तंवचि अहंतेची दृढ गांठी । जंव मातें दृष्टी देखिलें नाहीं ॥ ६॥ सकळ आश्रमांची अवधी । प्राणियांसी दर्शनसिद्धी । मज देखिलिया त्रिशुद्धी । आधिव्याधी बांधूं न शके ॥७॥ माझें नाम नाशी दुखःकोटी । त्या मज देखिलिया निजदृष्टीं । संसार पळे उठाउठी । आश्रमाची गोष्टी उरे कोठें ॥८॥

मनीषितानुभावोऽयं मम लोकावलोकनम् ।
यदुपश्रुत्य रहसि चकर्थ परमं तपः ॥ २२ ॥

## नारायण उवाच

तुझिया परमहिताकारणें । माझी इच्छा वैकुंठ दावणें । यालागीं म्यां तुजकारणें । एकांतीं सांगें जाणें तपीं दीक्षा ॥९॥ परी त्या तपाचें तपसाधन । भलें केलें तुवां अनुष्ठान । यालागीं मी जाहलों प्रसन्न । वैकुंठदर्शन तुज देऊनी ॥३१०॥

प्रत्यादिष्टं मया तत्र त्वयि कर्मविमोहिते ।
तपो मे हृदयं साक्षादात्माऽहं तपसोऽनघ ॥२३॥

कर्तव्याचें निजकारण । तुज न करवे सृष्टिसर्जन । त्या काळीं म्यां आपण । तप तप जाण उपदेशिलें ॥११॥

न करवे सृष्टिसर्जन । कर्मभोहें तूं अतिअज्ञान । तेव्हांचि म्यां कृपेनें पूर्ण । तप तप संपूर्ण उपदेशिलें ॥१२॥

## तपस्सामर्थ्य

त्या तपाची जाण महादीप्ती । तपामाजीं परमशक्ती । तपें उपजे ज्ञानस्थिती । जाण निश्चितीं विधात्या ॥१३॥ साधुनी अंतरंग तप । तपें पूर्णज्ञानस्वरूप । तपें होइजे सद्रूप । तपें निष्पाप झालासी तूं ॥१४॥ अस्तित्व निश्चयें पूर्ण । नित्य वाहे अंतःकरण । या नांव गा तप जाण । शरीरशोषण नव्हे तप ॥१५॥ यापरी तप ज्ञानरूप । ऐकें त्या तपाचा प्रताप । तपोबळें मी चिद्रूप । सृष्टी अमूप घडीं मोडी ॥१६॥

सृजामि तपसैवेदं ग्रसामि तपसा पुनः ।
बिभर्मि तपसा विश्वं वीर्यं मे दुश्चरं तपः ॥२४॥

ज्ञानतपाची पाहा थोरी । तेणें तपें मी श्रीहरी । सृष्टि सृजीं पाळीं संहारीं । अंगींच्या अंगावरी अलिप्तपणें ॥१७॥ ऐसें तपाचें वीर्य पूर्ण । नेणती देहाभिमान । यालागीं त्यांसी तपाचरण । दुस्तर जाण परमेष्ठी ॥१८॥ ज्यांसी विषयवासना संताप । त्यांसी नकळे तपाचें निजरूप । तें तूं आचरोनियां तप । होऊनि मातें आप पावलासी पैं ॥१९॥ ऐसें बोलिला नारायण । तेणें हरिखला चतुरानन । पाहोनियां हरीचें वदन । काय आपण बोलत ॥३२०॥

ब्रह्मोवाच–

भगवन् सर्वभूतानामध्यक्षोऽवस्थितो गुहाम् ।
वेद ह्यप्रतिरुद्धेन प्रज्ञानेन चिकीर्षितम् ॥२५॥

## ब्रह्मदेवाकडून नारायणस्तुति व निजज्ञानप्राप्तीची अपेक्षा

तूं सर्वभूतां अधिष्ठान । भूतहृदयस्थ सज्ञान । तुझेनि बुद्धीसी जाणपण । तुझेनि चेतन इंद्रियवर्ग ॥२१॥ तूं कर्माध्यक्ष तत्त्वतां । तेथें तूंचि कर्ता करविता । तरी ऐके माझी अवस्था । तुज मी अच्युता सांगेन ॥२२॥

तथाऽपि नाथमानस्य नाथ नाथय नाथितम् ।
परावरे यथा रूपे जानीयां ते त्वरूपिणः ॥२६॥

ऐसा स्वामी विश्वनाथ । तूं अनाथांचा निजनाथ । मज करावें जी सनाथ । ऐसें प्रार्थित उपतप्यमान ॥२३॥ कां म्हणसी उपतप्यमान । मी केवळ जाहलों अज्ञान । त्या मजवरी कृपा करून । निजगुह्यज्ञान सांगावें पैं ॥ २४ ॥ कोणतें म्हणसी गुह्यज्ञान । तुझें सूक्ष्मस्वरूप निर्गुण । आणि स्थूल तेंही तूंचि आपण । हें अभेद निजज्ञान सांगिजे मज ॥ २५ ॥ मी जडमूढ अतिदीन । तुझें नाम हें दीनोद्धरण । माझें समूळ निरसे अज्ञान । ऐसें गुह्यज्ञान उपदेशी ॥२६॥ स्थूलसूक्ष्म तुझेंचि रूप । रूपीं वर्तोनी तूं अरूप । हें तुझें ज्ञान निर्विकल्प । कृपानुरूप मज सांगे ॥२७॥

यथाऽऽत्ममायायोगेन नानाशक्त्युपबृंहितम् ।
विलुंपन्विसृजन्गृण्हन्बिभ्रदात्मानमात्मना ॥२७॥

तूं चिन्मात्र मायायोगें । न होऊनि जग होसी अंगें । ब्रह्मा विष्णु रुद्रादि वेगें । रूपें अनेगें तूं धरिसी ॥२८॥ न मोडतां सोनेपण । जेवीं लेणें होय सुवर्ण । तेवीं सोडुनि पूर्णपण । जग संपूर्ण तूं होसी ॥२९॥ आपआपणावरी पाहे । उत्पत्ति

स्थिती दाविसी लय। हे नानाशक्तिसमुदाय। सद्रूपें स्वयें तूंचि होसी ॥३३०॥ ऐसें अलिप्तपणें क्रीडन। स्वयें क्रीडसी तूं आपण। त्या क्रीडनाचें लक्षण। ऐक सावधान दृष्टांतें येणें ॥ ३१ ॥

क्रीडस्यमोघसंकल्प ऊर्णनाभिर्यथोर्णुते।
तथा तद्विषयां धेहि मनीषां मयि माधव ॥ २८ ॥

सकळसंकल्प तुझ्या पोटीं। तुज जंव सृष्टीची इच्छा उठी। तंव ब्रह्मांडांचिया कोटी। चराचर दाटी स्वेच्छें दाटे ॥ ३२ ॥ ऐसें संकल्पितसृष्टीसी। भूतभौतिकें तूंचि होसी। नानाअवतार–चरित्रेंसी। तुजमाजीं क्रीडसी तूंचि देवा ॥३३॥ जैसी कांतणी स्वेच्छेकरीं। तंतु काढी मुखाबाहेरी। त्यावरीच स्वयें क्रीडा करी। परतोनी निजउदरीं सामावी ते ॥३४॥ तये कांतणीपरी ऐसी। तुझी क्रिया हृषीकेशी। कल्पादि खेळ हा मांडिसी। खेळोनी ग्रासिसी कल्पांतीं तूं ॥३५॥ हात न माखोनी विश्व रचिसी। अमायिकत्वें विश्व पाळिसी। ना नासितां हें संहारिसी। ऐसा होसी सत्संकल्प तूं ॥३६॥ ऐसा गुह्यज्ञाननिजठेवा। कृपा करूनियां मज द्यावा। येच विषयीं हो माधवा। मज करावा पूर्णानुग्रह ॥३७॥ वर मागावया आज्ञा दिधली। यालागीं हे सलगी केली। सत्य करावी ते वरदबोली। सांभाळी आपुली भाक स्वामी ॥३८॥ मूळीं वरं वरय भद्रं ते। ऐसें बोलिलें वरदहस्तें। तें सत्य करावें श्रीअनंतें। गौरवी मातें निजगुह्यज्ञानें ॥३९॥ वरदेश वदोनी जरी न देसी। तरी काय करावें

हृषीकेशी । समर्थी वळावें निजभाकेसी । हेंचि आम्हांसी भांडवल पा ॥३४०॥ तूं सत्यसंकल्प भगवंत । तुझें वाक्य मिथ्या नव्हे येथ । येणें गुणें भावार्थ निश्चित । गुह्यज्ञानार्थ आम्हां सांगे ॥४१॥

भगवच्छिक्षितमहं करवाणि ह्यतंद्रितः ।
नेहमानः प्रजासर्गं बद्धये यं यदनुग्रहात् ॥२९॥

भगवंता तूं ऐसें म्हणसी । म्यां सृजूं सांगितलें सृष्टीसी । तें करूं काय म्यालासी । यालागीं पुससी तत्त्वज्ञान ॥४२॥ किंवा सृष्टी सृजूं उद्वेगला । यालागीं गुह्यज्ञान पुसों लागला । म्हणसि आज्ञा उल्लंघू केला । येणें न मांडिला सृष्टिक्रम पैं ॥४३॥ तुवां सृष्टी सृजूं सांगीतलीं । तें अनालस्यें मीं रचियेली । परी निर्विघ्न पाहिजे निपजली । यालागीं वांछिली ज्ञानकृपा तुझी ॥४४॥ कीं देवा तूं ऐसें मानिसी । सृष्टी करीन ते म्हणसी । आणि पुनः पुन्हा कां पुससी । गुह्यज्ञानांसी अत्यादर ॥४५॥

## निजज्ञानामुळें देहाभिमान होणार नाहीं

तुझें पावोनी गुह्यज्ञान । सृष्टी रचीन मी निर्विघ्न । न पावतां तुझें ज्ञान पूर्ण । मानाभिमान मज बाधी ॥ ४६ ॥ तूं जवळी असतां नारायण । बाधूं न शके मानाभिमान । सृष्टी सृजतां तुज विसरेन । तेव्हां मानाभिमान बाधी कीं ॥४७॥ म्हणसि कां होईल विस्मरण । अतर्क्य तुझें माया-विदान । तें वाढवील देहाभिमान । तुझी आठवण नुरवुनी

पैं ॥ ४८ ॥ जैंसी दीपासी काजळी । तैसी तुझी माया तुजजवळी । देहाभिमानें सदा सकळी । मजही झांकोळीं विषयासक्तीं ॥४९॥ जे विषयाची अतिआसक्ती । तेचि मायेची दृढप्राप्ती । ते समूळ निरसे विषयासक्ती । ऐसी ज्ञानस्थिती उपदेशी ॥३५०॥ काजळी आली दीपापासी । तेंचि आलेपन दीपप्रकाशीं । तेवीं त्वन्माया तुजपासी । बांधी जगासी विषयासक्तीं ॥५१॥ आतांचि मी स्वयें आपण । झालों होतों जडमूढदीन । तुवां उपदेशिलें तपसाधन । तेव्हां तुझें दर्शन मज जाहलें ॥५२॥ 'तपतप' म्हणतांही मजपासीं । त्या तुज न देखें मीं हृषीकेशी । अभिमानें भुलविलीं ऐसीं । तुज हृदयस्थासी न देखती ॥५३॥ ऐसा बाधक देहाभिमान । तो मायायोगें सबळ पूर्ण । ते मायेचें होय निर्दाळण । तैसें गुह्यज्ञान मज सांगे ॥५४॥ कर्माकर्मीं तुझें स्मरण । असावें गा समसमान । करितां सृष्टिसर्जन । न बाधी अभिमान तेंचि सांगे ॥५५॥

यावत्सखा सख्युरिवेश ते कृतः
प्रजाविसर्गे विभजामि भोजनम् ।
अविक्लवस्ते परिकर्मणि स्थितो
मा मे समुन्नद्धमदोऽजमानिनः ॥३०॥

अहंमद कां होईल म्हणसी । तुवां मज अहंकारियासी । सखा मानोनि सख्यासी । ऐसिये स्थितीसी आणिलें त्वां ॥५६॥ म्या प्रजासृष्टि करावी । तेथें माझी श्रद्धा रिघावी । यालागीं केली स्वभावी । निजगौरवीं मानेल पैं ॥५७॥

ऐसियावरी सृष्टि करितां । अहं स्वतंत्र प्रजा करिता । ऐसी माझे उत्कट अहंता । अंगीं तत्त्वतां वाढेल कीं ॥५८॥ श्रेष्ठापासूनी सन्मान । तोचि इतरांसी हृदयाभिमान । तेणें धाकें कांपलें मन । तुज गुह्यज्ञान यालागीं पुसें ॥५९॥ तुझे आज्ञे उल्लंघ न घडावा । यालागीं सृष्टिक्रम म्यां सृजावा । तोचि मानितां तुझी सेवा । अभिमान नीचनवा मजमाजीं उठी ॥३६०॥ अभिमान यावयाचे काय कारण । सृजितां अधमोत्तमयोनीजन । मी सृष्टिकरिता तुजसमान । अवश्य अभिमान येईल स्वामी ॥६१॥ वृत्ति करूनियां अविकळ । सृजितां भूतजात सकळ । तोचि अभिमानाचा जन्मकाळ । हें मज समूळ कळे देवा ॥६२॥ तो अभिमान मज न यावा । यालागीं प्रार्थिलसें तुज देवा । आश्वासी पां ज्ञानगौरवा । श्रीवासुदेवा निजजनका ॥६३॥

## स्तुतीनें नारायण संतुष्ट झाला

ऐकोनी ब्रह्मयाची विनवण । परम संतोषला नारायण । त्यासी द्यावया निजज्ञान । स्वानंदपूर्ण तुष्टला असे ॥६४॥ कोण्हाचें न लागतां मन । अनुष्ठित गुह्यज्ञान । ते द्यावया श्रीनारायण । स्वानंदें पूर्ण संतुष्टला ॥६५॥ करितां नाना-कर्माचरण । निजांगीं न लागे कर्तेपण । ऐसें अलिप्त निज-ज्ञान । द्यावया श्रीनारायण संतुष्टला ॥६६॥ देखोनी तेव्हां ब्रम्हयासी । अतिस्नेह भगवंतासी । निजज्ञानधन देतसे त्यासी । जन्मला कुशीं म्हणवूनियां ॥६७॥ जैसा दिपला

हरिणा पुढें। पाहों विसरला आणिकेंकडे। तैसा आवडीच्यानि पडिपाडें। ब्रम्हयाकडे हरि पाहे ॥६८॥ कां चुंबकांचिया वाटा। लोह भंवे न लागतां झटा। तैसें झालें हो वैकुंठा। जिकडे पाहे स्त्रष्टा तिकडे देव ॥६९॥ जेवीं आदित्याचीं फुलझाडें। नित्य सन्मुख सूर्याकडे। तेवीं आवडीचेनि पडिपाडें। चतुर्मुखापुढें सन्मुख देखे ॥३७०॥ उफराटी हे चाली केशी। शौरी भुलला स्त्रष्टयासी। येणें आवडलेपणें त्यासी। गुह्यज्ञानासी सांगेल पां ॥७१॥ सांगावया त्या गुह्यज्ञानवाव। स्वयें तुष्टला श्रीवासुदेव। येणें विरिंचीचा जीवभाव। स्वयें स्वयमेव चमत्कारला ॥७२॥ पुढिले निरोपणीं आवडी। स्त्रष्टा उठिला धडफुडी। अवधानाची परवडी। निजनिवाडी थोरावली पैं ॥७३॥ देहावेगळें अंतःकरण। करूनि निवडिलें अवधान। श्रवणीं एकाग्रता पूर्ण। स्वयें संपूर्ण सरसावला ॥७४॥ अष्टदळें जैसीं कमळे। तैसे टवकारिले आठही डोळे। चारीमुखें एकेवेळें। सप्रेममेळें लांचावलीं ॥७५॥ श्रीगुरुश्रीहरी तुष्टमान। देखोनि उठावले ते नयन। श्रवणापूर्वी आपण। दृश्यभेदाविण निजज्ञान सेवूं ॥७६॥ श्रवणीं ऐसें तें शुभाक्षर। आम्हीच सेऊं साचार। ऐसा दृष्टीचा चमत्कार। देखणेपणें द्वार श्रवणाचें व्यापी ॥७७॥ घ्राण म्हणे मी सवेगें। सुगंधवृत्तीसीं धांवेन वेगें। श्रवणनयनांपुढें लगबगें। उभे स्वानंदयोगें सुखेसी पैं ॥७८॥ ऐकोनी सद्गुरूच्या गुह्यज्ञाना। रसना विसरे विषयवासना। न चाखतां सद्गुरुगुह्यज्ञाना। ब्रह्मरस रसना सेवूं धावे

॥७९॥ स्पर्श पांगला शरीरपांगें। देहबुद्धीसी घालूनि मागें। स्पर्शावया लागवेगें। मी रिघेन सर्वांगें श्रीरंग-संगीं ॥३८०॥ धन्य धन्य श्रीगुरुसप्रेमज्ञान। बाह्यांसी येतसे स्फुरण । खेंव द्यावया आपण। भुजाहि सच्चिद्घन आलिंगू पाहती ॥८१॥ ऐसा इंद्रियांचा विवाद। ऐकोनि शब्द जाहला निःशब्द। मौनें सेवावया परमानंद। हरिनामाचा छंद सर्वांगीं गर्जे ॥८२॥ ऐसा सर्वांगीं परिपुरता। सर्वांगें जाहला धडौता। यापरी देखोनि विधाता। कळलें भगवंता परमार्थी ॥८३॥ श्रवणीं जें पडेल वचन। तें तत्काळचि होईल आपण। यालागीं निजगुह्यज्ञान। श्रीनारायण उपदेशी ॥८४॥

## ज्ञान देण्याला अधिकारी कोण

ऐसा पुरता जो असेल। त्यासि सद्‌गुरुज्ञान गवसेल। येऱ्हवीं आहाच बोलतां बोल। वाचेचें फोल करावें नलगे ॥८५॥ यालागीं श्रद्धाळू सात्विक। गुरुसेवेचा नीच सेवक। गुरु आज्ञेचा पाइक। तोचि निष्टंक ज्ञानार्थी ॥८६॥ जो वीतरागी सद्विवेक। जो सद्भावें विश्वासिक। जो लोके-षणे रहित रंक। तो निष्टंक ज्ञानार्थी ॥८७॥ विकल्पशून्य ज्याचें मन। वासनारहित निजभजन। तो मुमुक्षांमाजीं चिद्रत्न। अधिकारी पूर्ण ब्रह्मज्ञाना ॥८८॥ ऐशीं विधात्याचीं पूर्ण लक्षणें। निर्धारूनि श्रीनारायणें। त्यासि पूर्णब्रम्ह-निरूपणें। ज्ञानार्थ परिसणें सावधान श्रोतीं ॥८९॥ हें कल्पादीचें जुनाट ज्ञान। वक्ता स्वयें श्रीनारायण। एका विनवी जनार्दन। श्रोतीं अवधान मज दीजे ॥३९०॥

यदंघ्रिकमलद्वंद्वं द्वंद्वतापनिवारकं ।
तारकं भवसिंधौ च श्रीगुरुं प्रणमाम्यहं ।।

श्रीभगवानुवाच–
ज्ञानं परमगुह्यं मे यद्विज्ञानसमन्वितं ।
सरहस्यं तदंगं च गृहाण गदितं मया ।।१।।

जो ॐकाराचा तरुवरू । स्वानंद सुखाचा सागरू ।
सत्यसंकल्प सर्वेश्वरू । तो परात्परु स्वमुखें बोले ।।९१।।

## ज्ञानाची व्याख्या

शास्त्रव्युत्पत्ती व्याख्यान । जालिया वेदांतश्रवण । त्यावरी उठी जें जाणपण । त्या नांव ज्ञान शास्त्रोक्त ।।९२।। विषयवासनेविण । वृत्तीसी जें विवेकस्फुरण । त्या नांव बोलिजे ज्ञान । सत्य जाण स्वयंभू ।।९३।। चिद्रूपें वृत्तीचें स्फुरण । तें जाणिवें नाकळे ज्ञान । तेंचि स्वयें होइजे आपण । त्या नांव विज्ञान विधातया ।।९४।। हृदयीं जें आत्मपण । तें स्वयें होईजे आपण । जेथें हारपे देहाचें स्फुरण । तें सत्य विज्ञान विधातया ।।९५।। जळीं मीनलिया लवण । सर्वांगें विरे संपूर्ण । जळींचें हारपे क्षारपण । यापरी विज्ञान वस्तुत्वाचें ।।९६।। देहींचें जाऊनि अहंपण । 'ब्रह्माहमस्मि' स्फुरे स्फुरण । तें स्फूर्तिही विरे संपूर्ण । त्या नांव विज्ञान पूर्णत्वाचे ।।९७।।

## ज्ञानप्राप्तीसाठीं अत्यावश्यक असणाऱ्या भक्तीचीं लक्षणें

हे पावावया पूर्णप्राप्ती । भावें करावी भगवद्भक्ती । ते

भक्तीची निजस्थिती । ऐक तुजप्रती सांगेन ॥९८॥ भगवद्भाव सर्वभूतीं । यानांव मुख्य माझी भक्ती । हेंचि भजन ज्यासि अनहंकृती । विज्ञानप्राप्ती तैं त्यासी ॥९९॥ हे भक्ती करी जो निजांगें । विज्ञान त्याच्या पायां लागे । ते भक्ती उपजे जेणें योगें । ते भक्तिचि अंगे हरी सांगे ॥४००॥ माझें नाम माझें स्मरण । माझी कथा माझें कीर्तन । माझ्या चरित्रांचें पठण । गुणवर्णन नित्य माझें ॥१॥ माझा जप माझें ध्यान । माझी पूजा माझें स्तवन । नित्य करितां माझें चिंतन । विषयध्यान विसरले ॥२॥ भक्तांचें विषयसेवन । तेंही करिती मदर्पण । यानांव भक्तीचीं अंगें जाण । स्वयें नारायण विधीसी सांगे ॥३॥ ज्ञान विज्ञान उत्तमभक्ती । सांग सांगेन तुजप्रती । कृपेनें तुष्टला कृपामूर्ती । धन्य प्रजापती निजभाग्यें ॥४॥ जगाचें गुह्य मी आपण । त्या गुह्याचें गुह्य संपूर्ण । पूर्ण गौप्याचें गुप्तधन । तुज मी सांगेन स्वयंभू ॥५॥ ऐसें गौप्याचें जें अति गौप्य । कोणा नाहीं सांगितलें अद्याप । माझें निजानंद-निजरूप । तुज मी सुखरूप सांगेन ॥६॥ कृपेनें तुष्टला जनार्दन । जीवीं जीव घालूं पाहे आपण । आकळावया ज्ञान विज्ञान । अनुग्रहपूर्ण आवडी करी ॥७॥ आवडीं सद्गुरुनाथु । जंव मस्तकीं न ठेवी हातू । तोंवरी शिष्याचा निजस्वार्थू । पूर्ण परमार्थू सिद्धी नपवे ॥८॥ यालागीं श्रीनारायण । वरदहस्तें संपूर्ण । अनुग्रही चतुरानन । तेंचि निरूपण श्रीशुक सांगे ॥९॥

यावानहं यथाभावो यद्रूपगुणकर्मकः ।
तथैव तत्त्वविज्ञानमस्तु ते मदनुग्रहात् ॥२॥

नारायण म्हणाले "माझ्या अनुग्रहानें तूं माझ्यासारखाच हो"

मी जेवढा जैसा तैसा । जग नहोऊनि जगत्वाऐसा । ऐसा स्वरूपतेचा पूर्ण ठसा । तुज प्राप्त हो हे दशा अनुग्रहें माझ्या ॥४१०॥ सत्वगुणेंवीण सत्वस्थिती । जेणें करीं धरी हरी त्रिजगती । परी आंगीं न लागे अहंकृती । हा भाव प्रजापती प्राप्त हो तुज ॥११॥ मी सगुण निर्गुण रूपें धरीं । परी न विकारें रूपाकारीं । ये स्वरूपतेची निजथोरी । प्राप्त हो झडकरी विधात्या तुज ॥१२॥ रूपीं असोनि अरूपता । गुणीं वर्तोनि गुणातीतता । हे मदनुग्रहें पूर्णावस्था । पावसी तत्त्वतां परमेष्ठी तूं ॥१३॥ जेवी जळीं असोनि गगन । वोलें हो नजाणे आपण । तेवीं माझें कर्माचरण । अकर्तात्मता पूर्ण परमात्मयोगें ॥१४॥ सृष्टिस्त्रजनालागीं तत्त्वतां । सकळ कर्मीं अकर्तात्मता । मदनुग्रहें पावसी विधाता । म्हणोनि माथां ठेविला हात ॥१५॥ कृपा पद्महस्त ठेवितां माथां । ब्रह्मावबोध पावे विधाता । करस्पर्शें निवाला विधाता । तें सुख सांगतां सांगतां नुरे ॥१६॥ एवं स्वयंभू ऐशिया परी । संबोधूनि केला ब्रह्माधिकारी । हे जाणोनि आपली थोरी । पूर्णत्वाचा करी प्रबोध त्यासी ॥१७॥ सद्गुरूनें अनुग्रहिल्यापाठीं । शिष्याची स्वरूपीं प्रवेशे दृष्टी । हें पुरुषोत्तम जाणोनि पोटीं । करसंपुटीं आश्वासिला ॥१८॥ विष्णु-

विरिंचीसंवादकथन । कल्पादीचें जुनाट ज्ञान । तेथें श्रोतीं द्यावें अवधान । आनंदवन बोळला ॥१९॥ साचचि ब्रम्हा जन्मला पोटीं । यालागीं हरीशी कळवळ मोठी । गुह्य-ज्ञानाची गोड गोष्टी । उठाउठी हरी सांगें ॥४२०॥ पुत्र जाहला ब्रह्माधिकारी । येणें उल्हासे श्रीहरी । जें गुह्यज्ञान असे जिव्हारीं । तें काढूनि बाहेरी सांगे तयासी ॥२१॥ विधा-त्यासि विचारितां । स्वयें देवचि माता पिता । तो उभय-स्नेहो एकात्मता । निजगुह्य तत्त्वतां सांगेल त्यासी ॥२२॥ श्रीहरीस पुत्रस्नेह अमुप । त्यासि दाटूनि सांगे 'तप तप' । आपलें दाखवूनि निजरूप । ज्ञान निर्विकल्प आदरें सांगें ॥२३॥ पित्यानें जोडिलें जें वित्त । पुत्र अधिकारी होय तेथ । यालागीं गुह्यज्ञान समस्त । देईल निश्चित विधातयासी ।२४॥

आत्मज्ञान चार श्लोकांत नारायणानें शब्दबद्ध केलें.

इतरांसी ज्ञान सांगतां । अमुप वाढेल ग्रंथकथा । पुत्रस्नेहें कळवळोनि आतां । चौश्लोकीं निजात्मता उपदेशी देवो ॥२५॥ यालागीं श्रोते सज्जन । धांवा पावा सावधान । कल्पादी जें पुरातन । अनादि ज्ञान हरी सांगे ॥२६॥ ज्ञान-घन नारायण । देऊं रिघे पुत्राकारणें । एका जनार्दनाचे तानें । विभागी परी नेणें वांटा मागों ॥२७॥ यालागीं श्रीजना-र्दनें । मऱ्हाटी वाटा मजकारणें । दीधला ज्ञानें समसमानें । माउली जाणे कदां तान्हें न करी ॥२८॥

## तें श्रीनाथांनीं मराठींत रूपांतरित केलें

यालागीं संस्कृताचा ज्ञानार्थू । मऱ्हाटियामाजीं सांगतू । निडारिला घमघमितू । असे नांदतु परमानंदें ॥२९॥ पाहातां चारी श्लोक नेमस्त । तेणें हाता चढे परमार्थ । थोडेनि जोडे निजस्वार्थ । संसाराचे खत समूळ फाटे ॥४३०॥ विषयाचें धरणें उठी । अहंकाराची विरे गांठी । हे चतु:श्लोकींची गोष्टी । सर्वथा धाकुटी म्हणों नये ॥३१॥ हें चतु:श्लोकी भागवत । स्रष्टयाशी सांगे श्रीभगवंत । तेथें श्रोतीं व्हावें दत्तचित्त । श्रवणें परमार्थ जिवासी जोडे ॥३२॥ पुढील ज्ञान सांगावयासी । अनुग्रहिलें विधातयासी । मग उल्हासें हृषीकेशी । काय त्यापासीं बोलत ॥३३॥

## पूर्णबोधाचा ज्ञानोपदेश

जें समस्त ज्ञानाची आदी । जें सृष्टिकर्माचेंही आधीं । ते स्वरूप सांगेन त्रिशुद्धी । आइक सुबुद्धी विधातया ॥३४॥ जें निजज्ञानाचें निजमूळ । जें विज्ञानाचें परिपक्व फळ । जें स्वरूप शुद्ध केवळ । सांगेन अढळ आत्मभू तुज ॥३५॥ जें समस्त गुह्यांचें निजसार। जें प्रेमाचें निजभांडार । ज्याचा वेदशास्त्रां नकळे पार । ते परात्पर सांगेन ॥३६॥ जो आनंदाचा निजानंदू । जो बोधाचाही निजबोधू । जेणें होय परमानंदू । तो पूर्णबोधू परियेसी विधातया ॥३७॥ जें सुखाचें परमसुख ।

जें अमृताचें निजपीयूष । जेणें निवारे जन्मदुःख । तें ब्रह्मतारक ऐक विधात्या ॥३८॥ जें मनें नाहीं देखिलें । जें बुद्धीनें नाहीं ओळखिलें । तें निजस्वरूप आपुलें । सांगेन संचलें परमेष्ठी ॥३९॥ ज्यापूर्वी कोणी नाहीं । शेवट ठाई नपडे कांहीं । ऐसे स्वरूप जें कांहीं । तें सांगेन पाही परमेष्ठी ॥४४०॥ मीच्चि एकू असुळ विसुळू । मीच एकू सकळीं सकळू । मीच्चि एकू सूक्ष्मस्थूळू । तें स्वरूप प्रांजळू परियेसी ॥४१॥

अहमेवासमेवाग्रे नान्यद्यत्सदसत्परं ।
पश्चादहं यदेतच्च योऽवशिष्येत सोऽस्म्यहम् ॥३॥

नारायण म्हणाले– "सृष्टीपूर्वी मी स्वानंदस्थित होतों"

सृष्टिपूर्वी मी निजरूप । शुद्धब्रह्म निर्विकल्प । स्वानंदकंद स्वरूप । पूर्णत्वें पूर्ण अमूप मीच्चि स्वयें ॥४२॥ न पेरितां उंसाचीं कांडीं । रस न चाखतांही तोंडीं । जैशी आहे उंसाची गोडी । तेवीं स्वानंदस्थिती चोखडी पूर्वी माझी ॥४३॥ बोल न येतां वाचे आंतू । बोलें न बोलतां ते मातू । ते काळींचा जैसा शब्दार्थू । तेवीं मी अच्युतू सृष्टिपूर्वी ॥४४॥ दृष्टी न रिघतां दृष्टीसी । भेटी न होतां दृश्यासी । ते देखणी स्थिती जैसी । तेवीं मी अच्युत सृष्टिपूर्वी ॥४५॥ न निफजतां निशाणासी । घावो न घालितां तयासी । तैं त्या नादाची स्थिती जैशी । तेवीं मी हृषीकेशी सृष्टिपूर्वी ॥४६॥ रसीं न येतां रसत्वासी । रसनेनें न चाखतां त्यासी । तैंच्या

स्वादाची स्थिती जैशी। तेवीं मी हृषीकेशी सृष्टिपूर्वी ।।४७।। स्त्रीपुरुषयोग जो बोधू। न होतां रतीरमणसंबंधू। ते काळीं जैसा असे आनंदू। तेवीं मी परमानंदू सृष्टिपूर्वी ।।४८।। न निपजतां चराचर। न होतां घटमठादि आकार। गगन जैसें निर्विकार। तेवीं मी चिदंबर सृष्टिपूर्वी ।।४९।। पूर्वी म्हणावयाचें लक्षण। नसतां सत्‌असत् कारण। मी परमानंदें परिपूर्ण। या नांव जाण सृष्टिपूर्वी ।।४५०।। सत् म्हणिजे सूक्ष्ममूळ। असत् म्हणिजे नश्वरस्थूळ। या अतीत मी निर्मळ। या नांव केवळ सृष्टिपूर्वी ।।५१।। सूक्ष्म स्थूळ माया घटी। माझ्या निजांगें जगत्वें उठी। माझे पूर्णत्वाचे पोटीं। भासली सृष्टी तेही मीचि ।।५२।। सांज-वेळें पडिला दोर। त्यातें म्हणती सर्प थोर। तेंवीं पूर्णब्रह्म परमेश्वर। त्या मातें संसार मानवी म्हणती ।।५३।। भिंतीवेगळें चित्र नुठी। तेवीं मजवेगळी न दिसे सृष्टी। मी जगद्रूप जगजेठी। माझिया निजपुष्टी जगत्व जगा ।।५४।। जगाचें जें नांवरूप। तो मी परमात्मा चित्स्वरुप। माझ्या निजांगाचें स्वरूप। तें विश्वरूप स्वयें भासे ।।५५।। जेवीं सुवर्णाचें केलें लेणें। तें सोन्यावेगळें होऊं नेणें। तेवीं माझेनि पूर्णपणें। जगाचें नांदणें मद्रूपें नांदे ।।५६।। गोडी तेचि साखर देख। तेवीं चिदात्मा मी तेचि हे लोक। जगासी मज वेगळिक। अणुमात्र देख असेना ।।५७।। जेवीं सोनेंचि अलंकार। तेवीं संसार मी सर्वेश्वर। मजवेगळा वेव्हार। नाहीं अणुमात्र भवभावा ।।५८।। जेवीं तंतूवेगळा

नव्हे पट। मृत्तिकेवेगळा नव्हे घट। अक्षरावेगळा नव्हे पाठ। तेवीं मी चिद्रूपें प्रगट संसार भासे ॥५९॥ जो मी सृष्टिपूर्वी एकला। एकपणेंचि असें संचला। तो मी सृष्टी आकारें आकारला। परी दुजा नाहीं आला वटीं बीज जेवीं ॥४६०॥ जैशा वटाचिया पारंबिया। वटीं वटरूप निघालिया। तैसा मी संसारा ययां। स्थूलसूक्ष्ममायाकारणरूपें ॥६१॥ पारंबिया नांवाच्या भिन्नता। हरवीचिना स्वस्वरूपता। तेवीं स्थूलसूक्ष्म माया म्हणतां। माझी चित्सत्ता मोडेना ॥६२॥ तेवीं जंगमस्थावरादि आकारें। अंडजस्वेदजादिसाकारें। सृष्टी भासली सृष्टयाकारें। जाण साचारें मद्रूप जग ॥६३॥ कूर्म आपुल्या स्वभावा। लपवी इंद्रियें अवयवां। प्रगट करीतसे तेव्हां। दुजयाचा यावा स्पर्शला नाहीं ॥६४॥ तेवीं जगदाकारें होता। कां आकारलोपे अलोपता। माझी न मोडे अद्वैतता। ऐशी चित्सत्ता संचली ॥६५॥ कां सूक्ष्मतंतू एकवटू। सहस्रसंख्या होय पटू। तेवीं सृष्टयाकारें स्पष्टू। भासे मी प्रगटू परमात्मा स्वयें ॥६६॥ एवं मीचि मी सृष्टयाकारा। भूतभौतिकादिपसारा। विषम आकारविकारा। नाना कल्लोळ सागरामाजीं जैसे ॥६७॥ जें अद्वितीय अत्यंतिक। निर्विकल्प वस्तु एक। तेंचि केवीं जालें अनेक। तदर्थीचा देख दृष्टांत दाखवूं ॥६८॥ पहातां जे गोडी उंसीं। तेचि गोडी ओसंडे रसीं। ते गोडी बांधयासी। गूळीं गूळरूपें गुळासि झाली ॥६९॥

त्या स्वादाची साखर केली । तेचि गोडी नाबद[1] जाली । ऐशी नानाकारें रूपा आली । परी गोडी ते संचली जैशी तैशी ॥४७०॥ तेवीं मी चिद्रूपें प्रबळ । स्वयें जालों सूक्ष्मस्थूळ ।. मायागुणें सृष्टी सकळ । चित्सत्ता केवळ मीचि भासें ॥७१॥ कां मृत्तिकेचीं गोकुळें केलीं । नाना-नामाकारें पूजिलीं ।. परी मृत्तिकेपणा नाहीं मुकलीं । तेवीं सृष्टी जाली मद्रूपें सकळ ॥७२॥ यापरी गा सृष्टयाकारें । असिजे मीया श्रीधरें । तेचि सृष्टीनंतरें उरे । स्वरूप साचोकारें चिन्मात्र माझें ॥७३॥ जेवीं कां कुलालाचें चक्र । गरगरा भोंवें चक्राकार । भंवोनि रहातां स्थिर । उरे पैं चक्र चक्ररूपें ॥७४॥ तेवीं नामरूप संबंध । जाऊनि भूतभौतिकभेद । अंतीं उरे मी परमानंद । स्वानंदकंद निजरूपें ॥७५॥ दोर भासला सर्पाकारू । सर्परूपें भासे दोरू । दोरी लोपल्या अजगरू । अंतीं उरे दोरू दोररूपें ॥७६॥ जळींचिया जळगारा । भासती नानाकार अपारा । अंतीं विरोनियां साचारा । उरती त्या नीरा नीररूपें ॥७७॥ तेवीं सृष्टीआदिमध्यअंतीं । मीच एक भासें चैतन्यमूर्ती । हें सत्य जाण प्रजापती । इतर उपपत्ती ते वाचो ॥७८॥ जेवीं सुताचिये सुतगुंजे । आदिमध्यअंतीं नाहीं दुजे । तेवीं म्यां एकले अधोक्षजें । सृष्टीचा होइजे आदिमध्यअंतू ॥७९॥ हो कां ज्याचें नांव म्हणती लुगडें । तें पाहों जातां सूतचि उघडें । तेवीं जग पहातां धडफुडें । आद्यंतीं चोखडें निजरूप

१ खडीसाखर

१६९५९

माझें ॥४८०॥ यालागीं सृष्टिआदी मीचि असें । सृष्टिरूपें मीचि भासें । अंतीं सृष्टिचेनि नाशें । म्यां उरिजे अवि-नाशें अच्युतानंतें ॥८१॥

माया म्हणजे काय ?

हे माझिया स्वरूपाची स्थिती । सत्य सत्य यथानिगुती । तुवां माया पुशिली प्रजापती । तेही उपपत्ती एक सांगेन ॥८२॥ अथाऽऽत्ममायायोगेन । हा मायाविषयक प्रश्न । ब्रह्मेन पुशिला आपण । तें मायेचें लक्षण सांगतां नये ॥८३॥ माया सत् ना असत् । शेखीं नव्हे सदसत् । माया मिथ्यत्वाचें मथित । जाण निश्चित विधातया ॥८४॥ सत् म्हणों तरी जीत नसे । असत् म्हणो तरी शस्त्रें न नासे । आधीं असे पाठीं नसे । ऐसें मढेंही न दिसे मायेचे डोळां ॥८५॥ माझे मायेचें निरूपण । वेद बोलों न शके आपण । लक्षितां मायेचें लक्षण। राहिलें सज्ञान आरोगूनि मुग॥८६॥ माया वांझेचें लाडिके बाळ । माया गगनसुमनाची माळ । माया मृगजळाचें शीतळ जळ । माया तें केवळ गंधर्वनगर ॥८७॥ माया रज्जुसर्पाचें मृदु अंग । माया शुक्तिका-रजताची सांग । माया आकाशींचें मर्गजलिंग । माया मत्त मातंग वोडंबरीचा ॥८८॥ माया स्वप्नींची सोनकेळी । माया आरशाची चाफेकळी । माया कमठघृताची पुतळी । माया मृगजळींची सोंवळी स्वयंपाकिण ॥८९॥ माया असत्याची निजमाये । माया बागुला प्रतिपाळी धाये । माया

चित्रींची दीपद्राक्ष खाये । माया मुख्यत्वें राहे मिथ्यत्वापाशीं ।।४९०।। ऐशिये मायेचे निरूपण । मी निरोपूं न शके आपण । तरी तुझ्या प्रश्नालागीं जाण । कांहीं उपलक्षण सांगेन ।।९१।।

ऋतेऽर्थं तत्प्रतीयेत न प्रतीयेत चाऽऽत्मनि ।
तद्विद्यादात्मनो मायां यथा भासो यथा तमः ।।४।।

मायेचें उपलक्षण कोणतें ?

मी परमात्मा जो आधिष्ठान । त्या मज सत्यार्थातें न देखोन । जें जें देखिजे द्वैतभान । माया जाण विरिंची ।।९२।। कनकबीज सेऊनि पुरें । तंव आपण आपणां विसरे । जें जें देखों लागे दुसरें । व्याघ्र वानरें ससे मासे ।।९३।। तेवीं निजात्मयाचेनि विसरे । जें जें देखोंलागे दुसरें । ते माझी माया निजनिर्धारें । जाण साचोकारें विधात्या ।।९४।। निजरूपें असतां दोरू । तो न देखोनि म्हणे सर्प थोरू । तेवीं माझे मायेचा विकारू । नाथिला संसारू यापरी दावी ।।९५।। गगनीं चंद्र एक असे । तिमिरदृष्टिदोषें दुजा भासे । तेवीं द्वैताचेनि अभासें । माया उल्हासे भवभावरूपें ।।९६।। सूर्यउदयीं जग प्रकाशें । अंधाच्या ठायीं अंधकार दिसे । आत्मा न देखोनि तैसे । माया उल्हासे भवभावरूपें ।।९७।। सूर्य जेव्हां न देखणें । तेव्हां तम वाढे प्रबळपणें । सूर्य जे काळीं देखणें । तेव्हां तमाचें जिणें नाहींचि होये ।।९८।।

## माया कोठें असते व कोठें नसते ?

तेवीं मज आत्म्याचें अदर्शन। तेंच मायेचें प्रबळपण। आपुल्या स्वरूपाचें विस्मरण। ते माया जाण विरिंची ॥९९॥ स्वरूप स्वयें आनंदघन। नित्यनिर्मम स्फुरण। तें स्वरूपीं स्फुरे जें मीपण। तें जन्मस्थान मायेचें ॥५००॥ स्वरूपीं अभिमानाचें स्फुरण। ते माया मुख्यत्वें संपूर्ण। केवळ जें निरभिमान। तेथें माया जाण असेना ॥१॥ सत् असत् विवंचना। करितां माया नये अनुमाना। त्या मायेच्या निजलक्षणा। सांगेन चतुरानना तें ऐक ॥२॥ विषयविषयिक कल्पना। ते अविद्या जाण चतुरानना। अहमात्मैकभावना। ते जाण कमलासना सद्विद्या ॥३॥ विषयविषयिक कल्पना। त्या स्थूलमायेचे लक्षणा। निजात्मविषयीं भावना। ते जाण चतुरानना मूळमाया ॥४॥ आपुली कल्पना विधातया। ते जाण मुख्यमाया। विद्याअविद्या दोन्ही या। विवंचिलिया वृत्तीच्या ॥५॥ जेथें विषयकल्पनेची वस्ती। तो आतुडला मायेचे हातीं। जो निर्विकल्प निश्चितीं। माया त्याप्रती असेना ॥६॥ जैशी छाया रुपापाशीं। नातळत वर्ते देहासरसी। ब्रम्हीं माया जाण तैशी। असे अहर्निशीं मिथ्यात्वें ॥७॥ सदा छाया सरशीं असतां। कोणी नकरी छायेची वार्ता। तेवीं जाण गा तत्त्वतां। मायेची वार्ता ब्रह्मीं नाहीं ॥८॥

## छाया व माया यांच्यांत साम्य

छाया कोठें असे कोठें नसे। घाली भुकेली ज्याची तो

न पुसे । ब्रह्मीं मायेचें जाण तैसें । स्फुरणही नसे सत्यत्वें ॥९॥ माझी छाया मजसवें आहे । हेहि आठवण कवणा कल्पांतीं नोहे । यापरी ब्रह्माचे ठायीं पाहे । स्फूर्तिही न साहे मायेची ॥५१०॥ निजछाया शस्त्रें न तुटे । पर्वतभारें कदा नदटे । काष्ठें कुटितां नकुटे । लोटितां न लोटे अणुमात्र ॥११॥ तेवीं निरसावया निजमाया । वाट नचले गा उपाया । ते उपाय येती अपाया । साधनीं माया ढळेना ॥१२॥ निजछाया लोडावया निवाडें । जें आणिजे त्यावरी छाया पडे । परी छाया तळीं सांपडे । तें साधका नातुडे निज-साधनें ॥१३॥ छाया ज्याची त्यातळीं दडे । तेवीं ब्रह्मीं माया समूळ उडे । माया दुजेपणें पहातां पुढें । अधिक वाढे अनिवार ॥१४॥ छाया जो धरूं पाहे पुढें । धरूं जातां अधिक वाढे । तेवीं माया साधनीं नातुडे । जाण फुडें पर-मेष्ठी ॥१५॥ तेवीं करावया माया निरसन । साधन तितुकें मायिक जाण । जेणें होय मायेचें निर्दळण । तें साधका लक्षण लक्षेना ॥१६॥ लटिकपणें पहातां छाया । स्वयें लोपे लाजोनिया । तेवीं मिथ्यात्वें पाहतां माया । जाय हारपोनियां परब्रह्मीं ॥१७॥ देह लक्षितां मिथ्या छाया । स्वरूप लक्षितां मिथ्या माया । हें सत्य जाण विधातया । छाया माया समान ॥१८॥

## सद्गुरुचरणसेवेनें मायेचा निरास होईल

एवं निजात्मप्राप्तीवीण । नव्हे निजमाया निर्दळण । तें

आत्मप्राप्तीलागीं जाण। सद्‌गुरुचरण सेवावे ॥१९॥ सद्भावें करितां गुरुभजन। गुरुभक्ताचे निजचरण। माया स्वयें वंदी आपण। माया निर्दळण गुरुदास्यें ॥५२०॥ एवं सद्‌गुरुकृपेपुढें। माया मशक बापुडे। त्याच्या वचनार्थें सुरवाडें। मायाही रोकडें ब्रह्म होये ॥२१॥ जेवीं उगवलिया सुभानु। अंधार होय प्रकाशघनु। तेवीं बोधा आलियां गुरुवचनु। माया परिपूर्ण ब्रह्म होय ॥२२॥ एवं आत्मयाचें निरूपण। उत्पत्तिस्थितिजनिधन। तुज म्यां सांगितलें संपूर्ण। सत्य जाण स्वयंभू ॥२३॥ तंव श्रोते म्हणती नवलावो। मायेचा अनिर्वाच्य भावो। तिचा साधूनी अभावो। ग्रंथान्वयो निर्वाळिला ॥२४॥ न संडिता पदपदार्थां। मायानिरूपणाच्या अर्थां। साधूनियां निश्चितार्थां। यथार्थ ग्रंथा चालविलें ॥२५॥ तुझेनि मुखें श्रीजनार्दन। वक्ता जहाला संपूर्ण। हे आम्हांसि पावली खूण। रसाळ निरूपण स्वानंदयुक्त ॥२६॥ बाप निरूपण सखोल। पेलत स्वानंदाचे पेल। येताति सुखाचे डोल। येकेक बोल ऐकतां ॥२७॥ येणें चतु:श्लोकींचेनि अर्थें। जें सुख जालें आमुतें। तें सुख सांगावया येथें। वाचाळपणातें वाचा विसरे ॥२८॥ चतु:श्लोकींचें गोष्टीसाठीं। वाचे पडिली वळवटी। स्वानंद न समाये पोटीं। परमानंदें सृष्टी परिपूर्ण जाली ॥२९॥ हे ऐकोनि संतवचन। हर्षला एका जनार्दन। जेवीं ऐकतां घनगर्जन। स्वानंदपूर्ण मयूरासि उपजे ॥५३०॥ तेणें स्वानंदें पूर्ण। अभिवंदिले श्रोतेसज्जन। नमस्कारूनियां संतचरण। माझें विनवण अवधारा ॥३१॥

## श्रीनाथांचें मनोगत

माझें हेंचि मनोगत । संतुष्ट व्हावे साधुसंत । यालागीं श्रीभागवत । आरंभिला ग्रंथ भावार्थेंसी ॥३२॥ ऐकोनियां वचनासी । साच देखोनि सद्भावासी । अतिसंतोष सज्जनांसी । रिझोनि ग्रंथार्थेंसी बोलते जाले ॥३३॥

## श्रोत्यांकडून ग्रंथाची स्तुति

अगा तुझें एक एक अक्षर । क्षराक्षरातीत पर । येणें ग्रंथार्थें साचार । आम्ही अपार सुखी जालों ॥३४॥ देऊनि पदपदार्थाचा झाडा । करूनि श्लोकार्थ उघडा । बाह्यब्रह्मींचा निजनिवाडा । दाऊनि चोखडा रचिला ग्रंथू ॥३५॥ ग्रंथ स्वानुभवें रसाळ । आनंदरसें घोळिले बोल । परमानंदाचे कल्लोळ । ग्रंथार्थी केवळ रूपासी आले ॥३६॥ ऐसे संतोषोनि सज्जन । स्वानंदें जाले तुष्टमान । तेणें सुखेंशी संपूर्ण । एकाजनार्दन ग्रंथासि वदवी ॥३७॥ स्वानंद वोसंडला ग्रंथीं । तेणें विराली ग्रंथार्थस्फुर्ती । दूरी ठेली श्लोकसंगती । क्षमा संतीं मज कीजे ॥३८॥ आतां पुढील निरूपण । भुतीं प्रविष्ट अप्रविष्टपण । स्वयें सांगे श्रीनारायण । सावधान अवधारा ॥३९॥

यथा महांति भूतानि भूतेषूच्चावचेष्वनु ।
प्रविष्टान्यप्रविष्टानि तथा तेषु न तेष्वहम् ॥५॥

जो मी परमात्मा हृषीकेशी । न रिघोनि रिघालों सृष्टीसी । नातळोनि चाळीं जगासी । ते दृष्टांतेंसी स्थिती

सांगों ॥५४०॥ येथें महाभूतें जैशीं । उच्चनीच देहासरसीं । प्रवेशलीं दिसती कार्येंसी । कारणस्थितीसी अप्रविष्ट ॥४१॥ तैसा मीही याचि परिपाठीं । जगीं प्रवेशलों कार्यदृष्टी । कारणरूपें मीचि सृष्टी । मज प्रवेशावया शेवटीं ठावो कैंचा ॥४२॥ सागर पाहतां दृष्टीं । उठती कल्लोळांच्या कोटी । तो सागरु कल्लोळाच्या पोटीं । केवीं उठाउठी समावे ॥४३॥ कार्यदृष्टीं पाहतां पाहीं । भूतें प्रवेशलीं माझ्या ठायीं । कारणत्वें भूतहृदयीं । मी असोनि नाहीं प्रवेशलों ॥४४॥ यापरी मी सृष्टीसी । प्रवेशलों कार्यदृष्टीसी । कारणत्वें सृष्टीं मी आपैसी । मज प्रवेशासी भिन्नत्व नाहीं ॥४५॥ येथें कार्य म्हणिजे तें कार्ये । औट हातामाजीं गवसूनि ठाये । मानी 'मी इतुकाचि आहे' । या नांव पाहे कार्य म्हणिजे॥४६॥ अद्वैतीं देखणें विषम । द्वैतबुद्धीचा दारुण भ्रम । सत्व मानी रूपनाम । कार्यसंभ्रम यानांवें ॥४७॥ देहांसी इंद्रियवृत्ती । चळती माझिया चिच्छक्ति । त्या मज चालकातें नेणती । हे देह अहंकृती यानांव कार्य ॥४८॥ कार्य म्हणिजे तें ऐसें । कारण तूं म्हणसी कैसें । जेणें मी निजात्मा दिसें । अद्वैत-विन्यासें अप्रविष्ट ॥४९॥ व्याप्य मजवेगळें उरों लाहे । मा मी व्यापकू व्यापूनि राहें । हे वार्ता मजमाजीं न साहे । जगद्रूप मी स्वयें चिदात्मा एक ॥५५०॥ कोटि घट प्रवेशता गगनीं । गगन अप्रविष्ट घटीं प्रवेशोनी । तें जैसें स्वयें पूर्ण-पणीं । तेवीं मी जगीं पूर्णत्वें पूर्ण ॥५१॥ म्हणशी तूं पूर्णत्वें एकवद । तऱ्ही पर्वत पाषाण कां स्तब्ध । वृक्षवल्ली इत्यादि

मुग्ध । सज्ञानशुद्ध एक कां म्हणसी ॥५२॥ अनेकीं एकत्व परिपूर्ण । तेंचि अर्थीचें निरूपण । आतां ऐक सावधान । विरिंची तुज मी संपूर्ण सांगेन ॥५३॥ अग्नि सोज्वळ ज्वाळा दिसे । अथवा धूम्रांकित भासे । कां खदिरांगारीं उल्हासें । इत्यादि विलासें अग्नि तो येकु ॥५४॥ आदळीं उठती खळाळ । वोघीं दिसे अतिचंचळ । डोहीं राहिलें निश्चळ । त्रिविधभेदें जळ एकचि जैसें ॥५५॥ घटमठादि महाकाश । इत्यादि भेदें एक आकाश । तेवी विकाररूपें मी ईश । नांदें अविनाश अविकारित्वें ॥५६॥ यालागीं अप्रविष्टपणें संचलें । माझें मजवरी स्वयंभ रचिलें । जैसे अथावीं घट बुडविले । तेथें भरोनियां भरलें एकत्वें जल ॥५७॥ पोळीआंतील गव्हांशी । सबाह्याभ्यंतरीं कणिक जैशी । तेवीं मी सृष्टिकार्यासी । प्रवेशोनि पूर्णत्वेंसी अप्रविष्ट ॥५८॥ कार्यकारणविन्यासें । जग नांदे सावकाशें । तो जगद्रूप मीचि असें । सहज समरसें परमात्मा ॥५९॥ मजहूनि कांहीं वेगळे असे । मा मी जाऊनि त्यांत प्रवेशें । अथवा न प्रवेशतु असें । सावकाशें वेगळा कीं ॥५६०॥ मेघमुखींची गार दुर्लभ । तीमाजीं गोंठूनि जळथेंब । ते गारेतें निर्धारितां सर्व अंभ । तेवीं जाणा स्वयंभ चित् स्वयें ॥६१॥ तेवीं जन तोचि जनार्दन । जनार्दन स्वयें जन । ऐसा जनार्दन अभिन्न । जगीं प्रवेशोनि अप्रविष्ट ॥६२॥ ऐसे सावळेनि सुंदरें । बुद्धिबोध प्रबोधचंद्रें । सांगितलें ज्ञान नरेंद्रे । कृपा उपेंद्रें प्रजापतीसी ॥६३॥ येथें सृष्टीची स्थिती ते ऐशी । मी जगद्रूप हृषीकेशी । हेंही तूं जरी नकळे म्हणसीं । तैं प्राप्ति उपायाशी सांगेन ॥६४॥

## माझी प्राप्ति कोणाला होत नाहीं ?

मज जाणावयालागीं । अभिमानें कष्टले हठयोगीं । अहंतेनें न पावोनि माझी मार्गीं । वंचले विभागीं काळवंचनेच्या ॥६५॥ मज पावावयाकारणें । दाटोनि ते देहाभिमानें स्वकर्म शिखासूत्र त्यजणें । तैं मज पावणें खुंटलें त्यांचें ॥६६॥ न जिणतां कामक्रोधासी । एकाकी जाला संन्यासी । देहाभिमानें ग्रासिलें त्यासी । क्रोधलोभांसी स्वयें विकला ॥६७॥ संन्यासी स्वप्नीं विषय देखे । तरी विरजाहोम केला हें लटिकें । तेणें अधोगती यथासुखें । विषयअभिलाखें आणिली घरां ॥६८॥ माझा निश्चयो नाहीं मनें । आम्ही सज्ञान ज्ञानाभिमानें । देह दंडितां पुरश्चरणें । क्रोधाचें नागवणें नागवी कामू ॥६९॥ मंत्राची बीजाक्षरें । चित्स्वरूपज्ञान गंभीरें । हें नेणोनि जापक निदसुरे । जपमाळाद्वारें भ्रमणीं पडिले ॥५७०॥ एकीं शाब्दिकशास्त्रमूढीं । ज्ञातेपणाची उभविली गुढी । पडतां कामक्रोधांची धाडी । स्वयें चरफडी देहलोभें ॥७१॥ शब्दादेवाऽपरोक्षधीः ' । हे सत्य सच्छास्त्रोक्ती । शब्दीं शब्दविद्या नेणती । यालागीं नपवती अपरोक्षसिद्धी ॥७२॥ सत्य कापुसाचीं वस्त्रें होतीं । परी कापूस नेसतां नागवे दिसती । तेवीं शब्दविज्ञानस्थिती । त्यां शाब्दिकां अंतीं अपरोक्ष कैंचें ॥७३॥ चाटु नाना मधुररस वाढी । परी चाटु खातां नलभे गोडी । तेवीं शब्दें स्वानंदजोडी । चवी चोखडी शब्दीं नाहीं ॥७४॥ या रितीं

हे साधनधर्म । आचरतां नाना कर्म । माझे प्राप्तीचें निज-वर्म । नेणती संभ्रम देहाभिमानी ॥७५॥ माझी पावावया निजप्राप्ती । अन्वयें करावी माझी भक्ती। व्यतिरेकें माझी स्वरूपस्थिती । सांगेन तुजप्रती गुह्य माझें ॥७६॥

एतावदेव जिज्ञास्यं तत्त्वजिज्ञासुनाऽऽत्मनः ॥
अन्वयव्यतिरेकाभ्यां यत्स्यात्सर्वत्र सर्वदा ॥ ४ ॥

तत्त्वजिज्ञासीं तत्त्वज्ञानें । अन्वयें सर्वत्र मज भजणें । व्यतिरेकें मज जाणणें । अविकारपणें तें ऐक ॥७७॥ सृष्टि आदि मी स्वयंभू असें । सृष्टिरूपें मी स्वयें आभासें। सृष्टीचे निःशेष नाशें । म्यां उरिजे अविनाशें अविकारित्वें ॥७८॥ अन्वय जाणणें जयातें। वस्तूपासोनि तत्वें समस्तें। उपजती तद्रूप निश्चितें। कार्यकारणत्वें अभिन्न ॥७९॥ श्वानारूढ खंडेरावो। सुवर्णाचा करविला पहाहो। तेथें पहातां श्वान आणि देवो। सुवर्णान्वयें अभिन्न ॥५८०॥ जेवीं तांब्याचा केला नाग । फणा पुच्छ मध्यभाग । पहातां तांबेचि सर्वांग। तेवीं अन्वयें जग मद्रूप सर्व ॥८१॥ पेरिजे उंसाचीं पेरीं बरवीं । ते ऊंसपणें विरूढे हिरवीं । कांडोकांडीं निजस्वभावीं। वाढती आघवी ऊंसरूप ॥८२॥ तेवीं वस्तूपासोनियां जाण । माया महत्तत्व चिद्घन । भूतें भौतिकें चिद्रूप पूर्ण । हें अन्वयलक्षण विरंची ॥८३॥ जेवीं घृताचिया कणिका । घृतेंशी नव्हती आणिका । तेवीं भूता आणि भौतिका । वेगळीक देखा मजसी नाही ॥८४॥

## भगवद्भक्तीनेंच माझी प्राप्ति

ऐशिया अन्वयस्थिती । भावें करितां भगवद्भक्ती । मी परमात्मा सर्वभूतीं । भजतां माझी प्राप्ती मद्भक्तां सुगम ॥८५॥ सर्वभूतीं भगवद्भजन । हें अंतरीचें गुह्य साधन । तो मज पढियंता संपूर्ण । जो भूतें चिद्घन सदा देखे ॥८६॥ जो भूतें देखे चैतन्यघन । त्यासि मी परमात्मा आपण । जिवें करीं निंबलोण । त्याहूनि आन मज प्रिय नाहीं ॥८७॥ तो जेऊती वास पाहे । तो तो पदार्थ मी होतु जाये । तो जेथें जेथें ठेवी पायें । ते धरा मी होये धरणीधरू

## अन्वयभक्तीचें महिमान

अन्वयस्थितीच्या भक्तिपरतें । मज आन नाहीं पढियंतें । मजवेगळें नदेखे आपणातें । मद्रूप जगातें चिदन्वयें देखे ॥८९॥ नंद यशोदा श्रीकृष्ण । गोकुळें तीं मृत्तिका पूर्ण । तेथीं नामरूपविकारगुण । जग संपूर्ण चिन्मात्र ॥५९०॥ जें जें तत्त्व उपज जाण । मायामहत्तत्वादि तिन्ही गुण । तें तें देखिजे चैतन्यघन । अन्वयभजन यानांव ॥९१॥ ऐशियापरी भगवद्भजन । सभाग्य पावती सज्ञान । ते भक्तिलागीं मी आपण । श्रीनारायण स्वयें विकलों ॥९२॥ ऐसें निःसीम ज्यांचें भजन । ते भक्त मजही पूज्य पूर्ण । श्रीसमवेत मीं आपण । त्यांचें श्रीचरण स्वयें वंदी ॥९३॥ माझिया भक्तांची महती । मी स्वयें जाणें श्रीपती । कां जे माझिये

भक्तीची पूर्णप्राप्ती । भक्त जाणती भावार्थी ॥९४॥ ऐसिया अन्वयप्रतीतीकरी। भक्त समावले मजभीतरीं । मीही अनन्य आवडीकरी । भक्तसबाह्याभ्यंतरीं स्वानंदे नांदे ॥९५॥ अन्वयें जे अवलोकन । या पदाच्या पोटीं भगवद्भजन । स्वयें बोलिला श्रीनारायण । तेंचि म्यां व्याख्यान सविस्तर केलें ॥९६॥ मागा स्वमुखें श्रीपती । बोलिला होता ब्रह्म-याप्रती । सांग सांगेन भगवद्भक्ती । तेचि ये श्लोकार्थी विशद केली ॥९७॥ तत्त्वजिज्ञासुलागीं जाण । स्वरूप-प्राप्तीचें निजसाधन । देवो बोलीला भगवद्भजन । तेंचि निरूपण म्यां प्रगट केलें ॥९८॥

## व्यतिरेकाचें लक्षण

ऐसिया अन्वयभक्ती । अतिसुगम माझी प्राप्ती । आतां व्यतिरेकाची स्थिती । ऐक प्रजापती सांगेन ॥९९॥ कारणा-पासोनि कार्य अभिन्न । या नांव अन्वय जाण । कार्य मिथ्या सत्य कारण । तें व्यतिरेक लक्षण विधातया ऐक ॥६००॥ दोरा अंगीं सर्पाकारू । भासोनि निमाला भयंकरू । तो नातळतां सर्पविकारू । दोरु तो दोरु जैसा तैसा ॥१॥ तेवीं जगाची उत्पत्ति स्थिती । लय पावती प्रळयांतीं । माझिया स्वरूपाप्रती । विकारवदंती असेना ॥२॥ सुवर्णाचे अलंकार । जेवीं करविले नानाप्रकार । मोडूनि करितां एकाकार । निखळ भांगार घडमोडीरहित ॥३॥ तेवीं प्रपंचाची घडमोडी । माझिया स्वरूपीं नलगे वोढी । संचली

निजानंदगोडी । व्यतिरेक परवडी यानांव विधातया ॥४॥ लेणें घडितां सोनें नघडे। लेणें मोडितां सोनें नमोडे। तेवीं माझ्या स्वरूपाकडे। नपडे सांकडें प्रपंचाचें ॥५॥ स्वरूपीं स्वरूपस्थिती पाहतां। प्रपंच येक झाला होता। तो लया गेला काळसत्तां। हे कथावार्ता असेना ॥६॥ माया महत्तत्व तिन्हीगुण। भूत भौतिकादि जन्मनिधन। होतां न मोडे पूर्णपण। हें मुख्य लक्षण व्यतिरेकाचें ॥७॥ आणीकही साधारण। स्थल व्यतिरेकलक्षण। भूतीं भूतें होती लीन। सकारण तें ऐका ॥८॥ ज्याचें जेथोनि जन्मस्थान। तें भूत तेथें होय लीन। हें महाभूत परी लीन। होय सकारण महाकारणीं ॥९॥ प्रथम गंधु दुसरा स्वादू। रूप स्पर्श पांचवा शब्दू। हा परस्परें उपमर्दू। होय निर्द्वंद्व कारणा-माजीं ॥६१०॥ तें कारणही आपण। महाकारणी होय लीन। तेव्हां दुजें ना एकपण। स्वरूप परिपूर्ण पूर्णत्वें ॥११॥ त्या परिपूर्ण स्वरूपासी। प्रपंच जडला दिसे अंगेसी। तो ठाउका नाहीं त्यासी। जेवीं शुक्तिकेसी रजताकारू ॥१२॥ शिप शिपपणें असे। भ्रांतासि तेथें रुपें दिसें। तेवीं वस्तुपणें वस्तु असे। प्रपंच भासे जडमूढां ॥१३॥ वस्तू परमानंदें शुद्ध बुद्ध। तेथें अविवेकी अतिमंद। देखती भूतभौतिकादि भेद। जेवीं कां अगाध गंधर्वनगर ॥१४॥ यापरी मिथ्या मायिक संसार। वस्तु नित्यानंद निर्विकार। हा व्यतिरेक शुद्ध सादर। जाण साचार परमेष्ठी ॥१५॥ प्रपंच एक झाला होता। हे स्वरूपीं मिथ्या वार्ता। पुढें

होईल मागुता । हेंही सर्वथा असेना ॥१६॥ ऐसा लक्षितां व्यतिरेक । जगीं मी एकुला एक । या एकपणाचा गणक । नाहीं आणिक गणावया ॥१७॥ आहाचवाहाच विचारितां । हा व्यतिरेक न ये हातां । गुरूकृपेवीण तत्त्वतां । येथिच्या अर्था प्राप्ती नव्हिजे ॥१८॥ अन्वय माझी पूर्ण भक्ती । व्यतिरेक शुद्धस्वरूपस्थिती । साधक जे स्वयें साधिती । त्यांसि स्वरूपप्राप्ती अविनाशी ॥१९॥ येणें अन्वयव्यतिरेकें पाहीं । निजात्मता ठेविल्या ठायीं । तिसी प्रळयकाळें कहीं । व्ययो नाहीं विघातया ॥६२०॥ अन्वयव्यतिरेकाचें सूत्र । साधूनि साधक पवित्र । स्वयें जाले वस्तु चिन्मात्र । सर्वदा सर्वत्र अविनाश ॥२१॥ एवं अन्वयव्यतिरेकयुक्तें । साधन-महाराजपंथें । विसरोनि वेगळेपणातें । मदैक्यातें साधक येती ॥२२॥ 'ऐक्या येती' हें बोलणें । बोलतां दिसे लाजिरवाणें । तें सर्वदां माझेनि पूर्णपणे । परिपूर्ण असणें स्वानंदें ॥२३॥ येणें पूर्ण परमानंदें । जीवभाव स्वयें उपमर्दें । लाजोनियां निमिजे भेदें । स्वानंदबोधें निजयोगी ॥२४॥ सिंधूमाजीं सैंधवाचा खडा । पडोनि होय सिंधुएवढा । तेवींचि अन्वय-व्यतिरेकें होडा । योगी धडफुडा मीचि होये ॥२५॥ जैसा कल्लोळ सागरीं । तैसा योगी मजमाझारीं । वर्ततांही देहाकारीं । मज बाहेरी रिघों नेणें ॥२६॥ हे ऐक्य-तेची योगयुक्ती । वेदशास्त्रां संमती । तुवां अनुष्ठावी सुनिश्चिती । हें माझें हृद्गती अतिगुह्य ॥२७॥ ऐसें गुह्य-ज्ञान पुरुषोत्तमें । निष्कामकामकल्पद्रुमें । स्वमुखें सांगिजे आत्मारामें । कृपासंभ्रमें स्वयंभूसी ॥२८॥

एतन्मतं समातिष्ठ परमेण समाधिना ॥
भवान्कल्पविकल्पेषु न विमुह्यति कर्हिचित् ॥ ७ ॥

ह्या परमगुह्यज्ञानार्था । म्या सांगितलें निजात्ममता । येणें मतें समस्ता । सृजी मी अलिप्तता ब्रह्मांड कोटी ॥२९॥ मी अव्यक्तपणें व्यक्तीतें धरीं। मी निर्गुणपणें गुणकार्य करीं । मी निःसंग येणें मतें करीं । अंगावरी जग व्यालों ॥६३०॥ नवल या मताची मातू । मी निजांगेंवीण जग होतू । अव्यक्तही व्यक्तिआंतू । न रिघोनि रिघें ॥३१॥ या मताचेनि निजनेटें । मी नामरूपीं अवघा वेठें । परी नांवरूपाआंतुवटें । आणुमात्र न पालटें स्वरूप माझें ॥३२॥ येणें मतें मी महाशून्य जालों । शून्यस्वरूपेंसी आकारलों । अतींद्रिय इंद्रियें व्यालों । विऊनि ठेलों वांझोटा मी ॥३३॥ मी विदेहपणें देह धरी । मी अचक्षुपणें डोळे धरीं । मी अकर्ता सर्व कर्में करी । या मतमुद्रेवरी विरिंचि ॥३४॥ मज अश्रोत्रा येणें श्रवण । मज अगोत्रा येणें गोत्रपण । मज आघ्राया येणें घ्राण । मज अचळा चळपण या मतमुद्रा ॥३५॥ मज निरसा येणें रसन । मज अभोक्त्या येणें भोजन । मज निःशब्दा येणें गायन । मज अमना मन येणें कल्पनारहित ॥३६॥ मी अजन्मा येणें जन्म धरीं । मी अकर्मा येणें कर्म करीं । मी अनामा येणें नाम धरीं । या मताची थोरी माझी मीचि जाणें ॥३७॥ मज अबाहूसि येणें हस्त । मज अचरणा येणें चरण होत । मज अगम्या

गमन होत । आध आपल्यांत येणें मतमुद्रा ।।३८।। या मत-
युक्तीचेंनि समसाम्यें । मी न जन्मोनि जन्में । तिर्यग्योनी
मत्स्यशूकरादिकूर्में । हे अवतार संभ्रमें पुराणीं वर्णिजे
।।३९।। या मताचेंनि निजबळें । माया आपधाकें पळे ।
द्वैत निर्दाळितां या मताभिमेळें । मी अकळ आकळे या मता-
माजी ।।६४०।। नवल या मताचा परिपाकु । मी एकचि
होये अनेकु । अनेकीं मी येकला येकू । । हा मतविवेकू
अतर्क्य ।।४१।।

## या मताचें सामर्थ्य

अभिनव या मताची थोरी । मी एक विस्तारें नानापरी ।
परी एकपणाच्या अंगावरी । नाहीं दुसरी चीर गेली ।।४२।।
या मताचेंनि महायोगें । निजले ठायीं मी जागें । जागाही
निजें, निजोनि जागें । यापरी दाटुगें मत हें माझें ।।४३।।

## हें मत कशानेंहि प्राप्त होत नाहीं

हें मत नातुडे अष्टांग योगें । हें मत नातुडे महायोगें ।
हें मत नातुडें स्वर्गभोगें । शिखात्यागे नातुडे मत ।।४४।।
हें मत नातुडे तपें । हें मत नातुडे मंत्रजपें । हें मत नातुडे
दिगंबररूपें । शास्त्रपाठें आटोपे नव्हें तैसें ।।४५।। हें मत
नाटोपे वेदाध्ययनें । हें मत नाटोपे महाव्याख्यानें । हें मत
नाटोपे महादानें । बैसतां धरणें नाटोपे मत ।।४६।। हें मत
नाटोपे स्वधर्माचारें । हे मत नाटोपे बहुधा विचारें । हें
नाटोपे तीर्थसंभारें । मतमतांतरें नाटोपे हें ।।४७।। हें मत

नाटोपे पढणी पढतां । हें मत नाटोपे त्रिवेणीं बुडतां । हे मत नाटोपे थोरें रडतां । जाणिवा चरफडितां नाटोपे हें ॥४८॥ हे मत नाटोपे वेदविधी । हे मत नाटोपे अष्टमहासिद्धी । हे मत नातुडे नानाछंदीं । हें जीवबुद्धीसीं नाटोपे ॥४९॥ हे मत नाटोपे ध्येयध्यानें । हें नाटोपे दृढमौनें । हें मत नातुडे अनुष्ठानें । ज्याचें देखणें तोचि जाणें ॥६५०॥ हे मत नातुडे घराचारीं । हें नातुडे आश्रमांतरीं । हें नातुडे गिरिगव्हरीं । रिघतां कंदरीं नातुडे मत हें ॥५१॥ हें मत नातुडे सिद्धीसाठीं । हें मत नातुडे करितां गोष्टी । हें मत नातुडें कपिलपीठीं । भेददृष्टीं नाटोपे ॥५२॥ हें मत नातुडे तीर्थवासीं । हें नातुडें क्षेत्रसंन्यासीं । हें नातुडें वैराग्यासी । कामक्रोधासी न जिंकिता ॥५३॥ हें मत नातुडे प्रयाग स्नानीं । हें नातुडे महास्मशानीं । हें नातुडे गयावर्जनीं । कष्टतां त्रिभुवनीं नातुडे मत ॥५४॥ हें नातुडे पृथिवी फिरतां । हें नातुडे तीर्थें करितां । हें नातुडे ध्यान धरितां । साधनीं सर्वथा नातुडे हें ॥५५॥ हें मत नातुडे कथा ऐकतां । हें नातुडे कथा करितां । हें नातुडें शास्त्रार्थां । गुरुकृपेवीण हातां नये हें मत ॥५६॥

## गुरुकृपेनेंच फक्त हें 'मत' लाभतें

हें मत नातुडे क्षीरसागरीं । हें मत नातुडे वैकुंठशिखरीं । हें मत नातुडे सगुणसाक्षात्कारीं । साम्यसमाधीवरी गुरुकृपें लाभे ॥५७॥ विवेकवैराग्य यथाविधी । विषयविरक्ती ।

निरवधीं। सर्वत्र होय समबुद्धी। तें गुरुकृपा प्रबोधी हे मतसिद्धी माझी ॥५८॥ विवेकाचें निजनेटीं। धडधडीत वैराग्य उठी। विषयाची काढूनी कांटी। समाधिदृष्टी समसाम्य प्रगटे ॥५९॥ ऐशी सर्वत्र समबुद्धी। या नांव परमसमाधी। ते समाधीवरी त्रिशुद्धी। माझ्या मताची सिद्धी गुरुकृपा लाभे ॥६०॥

## समाधि म्हणजे काय ?

सर्वत्र जे समसाम्यता। या नांव समाधी तत्त्वतां। परी तटस्थादि काष्टावस्था। समाधि सर्वथा नव्हे ब्रह्मा ॥६१॥ समाधिमाजीं जो तटस्थ। तो जाणावा वृत्तियुक्त। वृत्ति असतां समाधिस्थ। तें मी अनंत सत्य नमनी ॥६२॥ मूर्च्छित वृत्ति असतां पोटीं। समाधि म्हणणें गोष्टी खोटी। जेथ अहं सोहं विराल्या गांठी। ते समाधि गोमटी मी मस्तकीं वंदीं ॥६३॥ ज्वर असतां नाडी आंत। आरोग्य स्नान तोचि घात। तेवीं वृत्ती असतां समाधिस्थ। तो जाण निश्चित आत्मघाती ॥६४॥ सर्वभूतीं निजात्मता। तिसी पावोनि जाली सर्व समता। ते बोलतीचालती समाधिअवस्था। मजही सर्वथा मानिली ॥६५॥ ऐसी सर्वत्र समताबुद्धी। त्या नांव परमसमाधी। ते म्यां तुज गुरुकृपें त्रिशुद्धी। यथाविधी प्रबोधिली ॥६६॥ या समाधीच्या समदृष्टीं। संकल्पें सृजी ब्रह्मांडकोटी। विकल्पें संहारितां शेवटीं। कर्तेपण पोटीं उठोंविसरे ॥६७॥ निजसमाधी समसाम्यता। देखोनि पळाली देहअहंता। तेथ मी एक सृष्टीचा कर्ता। या स्फुर-

णाची वार्ता स्फुरों केलाहो ? ॥६८॥ सिंधुमाजीं पडिलें सैंधव घन। विरे तंव स्फुरे रवेपण। तें विरालिया संपूर्ण। 'मी झालों जीवन' हेंहि न राहे ॥६९॥ तेवीं मज एक होती बद्धता। आतां पावलों मुक्तता। येहिविषींची कथा-वार्ता। तुज सर्वथा स्फुरेना ॥६७०॥ ऐशीया पूर्णसमता। सृष्टी तुज करितां हरितां। आंगीं न लागे मोहममता। सत्य सर्वथा स्वयंभू ॥७१॥ देशकालेस्वभावता। कल्पविकल्पमहा-कल्पांता। सृष्टिसर्जनाची मोहममता। तुज सर्वथा बाधीना ॥७२॥ हें मी तुज सांगो काये। अनुभव तूंचि पाहे। जें तुज पूर्णत्व प्रकाशिलें आहे। तेथें होय नव्हे रिघेना ॥७३॥

ब्रह्मदेव अहंकारशून्य पूर्णबोधयुक्त झाला

रोग गेलियाची लक्षणें। रोगी नेणें, वैद्य जाणे। तेवीं ब्रह्मा सांडिला अभिमानें। हें नारायणें जाणितलें ॥७४॥ लक्ष भेदितां धनुर्धरें। जेवीं कां निविजे निजकरें। तेवीं ब्रह्मा निवटला अहंकारें। हें स्वयें श्रीधरें जाणितलें ॥७५॥ जे बोधा आलें शिष्यासी। तें न सांगतां कळे श्रीगुरूसी। तेवीं जाणोनियां हृषीकेशी। म्हणे ब्रह्मयासी सावधान ॥७६॥ 'निजानुभव पाहे पूर्ण'। ऐसें ऐकतां सद्‌गुरुवचन। चमत्कारला चतुरानन। देहीं देहपण विदेहत्वा आलें ॥७७॥ जीवदशा वोवांडितां। निजात्मता पावोंजातां। ते संधीं सत्वावस्था। अतिसप्रेमता वोसंडे ॥७८॥ निजात्मरूपीं पडतां दृष्टी। सुखाचा पुर लोटे पोटीं। हर्षें बाष्प दाटे कंठीं। परेंसी गोष्टी सद्‌गदित वाचा ॥७९॥ नेत्रीं आनंदा-

श्रूचिया धारा । सुखोर्मी कांपे थरथरां । हर्षें उचलल्या रोममुद्रा । स्वेदामृतपुरा सार्द्रत्व ॥६८०॥ अहं सोहं झाले लीन । मनें मन झालें उन्मन । चित्त जाले चैतन्यघन । जीव परिपूर्ण ब्रह्म जाला ॥८१॥ जेथें एक ना दुसरें । सन्मुख ना पाठिमोरें । जें जागें ना निदसुरें । जें सहजान्वयें खरें सदोदित ॥८२॥ जें केलें ना झालें । जें गेलें ना आलें । जें होतें ना हरपलें । संपूर्णत्वें संचलें परिपूर्ण ॥८३॥ जेथें न साहे रूपनाम । जेथें न साहे क्रियाकर्म । जेथें न रिघे धर्माधर्म । तें पूर्णब्रह्म परमेष्ठी झाला ॥८४॥ जेथें न रिघें हेतूमातू । जेथें न रिघें दृश्य दृष्टांतु । जिचा नसे आदिअंतू । तें वस्तु सदोदितू विरंची झाला ॥८५॥ ज्याचा न लागे लागमाग । ज्यासि न लगे अवयव अंग । आंगेवीण अव्यंग। निजवस्तु सांग स्वयंभु झाला ॥८६॥ जेथें दुःखत्वें न रिघे दुःख । सुखत्वें न रिघे सुख । जिचें हरिहरां न करवें तुक । ते वस्तु सम्यक् स्त्रष्टा झाला ॥८७॥ जेणें सुखें आनंदमय शंभू । जेणें सुखें सुखरूप झाला स्वयंभू । तें सुखरूप पावला स्वयंभू । आनंदलाभु सद्गुरुकृपा ॥८८॥ भावें सद्गुरुतें भजतां । स्त्रष्टा पावला स्वस्वरूपता । यालागीं गुरुभक्तीपरता । मार्ग परमार्था असेना ॥८९॥

परमार्थ करणाऱ्या साधकानें सकलसाधनश्रेष्ठ गुरुभक्तीच केली पाहिजे

जरी साच चाड परमार्था । तरी भावें भजावें गुरुनाथा ।

सकल साधनांच्या माथां। जाण तत्त्वतां गुरुभक्ति ॥९०॥ ज्याचे मुखीं गुरूचें नाम। ज्यासि गुरुसेवा नित्यकर्म। तो देहासहित परब्रह्म। त्यासि कर्माकर्म बाधीना ॥९१॥ ज्यासि स्वानंदें गुरुभक्ती। त्याच्या चरणतीर्था तीर्थें येती। वेद बंदीजन होती। सुरनर वंदिती पदरज त्याचे ॥९२॥ गुरुभक्ती नांदे ज्याचे घरीं। यम त्याची तराळकी[1] करी। काळ आज्ञा वाहे शिरीं। तो पूजिजे हरी परमात्मभावें ॥९३॥ गुरुभक्तीचें पवाडे। वर्णितां वेदासि मौन पडे। गुरुभक्तीवरतें चढें। ऐसें चोखडें साधन नाहीं ॥९४॥

गुरूचें लक्षण

शिष्यें करावें माझें भजन। ऐसें वांछी जरी गुरूचें मन। तो गुरुत्वां मुकला जाण। अभिमानें पूर्ण नागवला ॥९५॥ जगीं दाटुगा ज्ञानाभिमान। धनालागीं विकती ज्ञान। ते जाण शिश्नोदरपरायण। तेथ अर्धक्षण ज्ञान न थारे ॥९६॥ मुख्यत्वें गुरूचे लक्षण। ज्ञान असोनि निरभिमान। सर्वांगीं शांतीचें भूषण। तो सद्गुरु पूर्ण परब्रह्म ॥९७॥

गुरुभक्तीनेंच ब्रह्मदेवास स्वस्वरूपाची ओळख झाली

त्या सद्गुरूची निजभक्ती। सद्भावें करूनि प्रजापती। पावला स्वस्वरूपप्राप्ती। स्वानंदस्थिती निजबोधें ॥९८॥ यापरी चतुरानन। नारायणवचनें जाण। सांडूनि देहाभिमान। ब्रह्म परिपूर्ण स्वयें जाला ॥९९॥ येवढें पद प्राप्त जालें। परी न म्हणे नवें आजि आलें। अनादिसिद्ध आपुलें।

---

१. हमाली.

स्वतःसिद्ध संचलें रूप माझें ॥७००॥ ऐसे अनुभवाचे पूर्णोद्गार। जाणोनि सुखावे उपेंद्र। जैसा देखोनियां पूर्णचंद्र। भरितें समुद्र उल्हासे ॥१॥ बालका कीजती सोहळे। तेणें माउलीचे निवती डोळे। तेवीं शिष्य निजबोध आकळे। तव सुखाचे सोहळे सद्गुरूसी ॥२॥ सेवक परचक्र विभांडी। राजा हर्षाची उभवी गुडी। शिष्य स्वानंदी दे बुडी। तेणें सुखोर्मी गाढी सद्गुरूसी ॥३॥ तेणें सुखें नारायण। चारी भुजा पसरोन। आलिंगिला चतुरानन। परमानंदें पूर्ण सुखावोनी ॥४॥ आधींच प्रीती पुत्रावरी। तोही जाला ब्रह्माधिकारी। तेणें पूर्णानंदें श्रीहरी। निजहृदयावरी आलिंगी ॥५॥

## चार श्लोकांत ब्रह्मदेवाला सुखी केलें

साचचि ब्रह्मा जन्मला पोटीं। यालागीं हरीसी कळवळ मोठी। पूर्णब्रह्म चौश्लोकांसाठीं। त्यासि उठाउठी वोपिता झाला ॥६॥ न माखतां शब्दाचें वदन। नायकतां श्रोत्राचे कान। न देखतां वृत्तीचे नयन। चौश्लोकीं चतुरानन सुखी केला ॥७॥ आतळों न देतां गगन। नलगतां सूर्यकिरण। प्राणस्पर्श न होतां जाण। चतुःश्लोकीं चतुरानन सुखी केला ॥८॥ दूरीं दुरावोनि अज्ञान। जागें न होतां शहाणपण। मौनेंचि जिवें जीव मारून। चौश्लोकीं चतुरानन सुखी केला ॥९॥ ऐशिया युक्तीं नारायण। निजपुत्रालागी आपण। थोडे निरूपणें जाण। ब्रह्मपरिपूर्ण केला देवे

॥७१०॥ येथें नघडे हें निरूपण। शिष्य जालिया ब्रह्मसंपन्न। पुत्रस्नेह बापुडे कोण। त्यासि सद्‌गुरू संपूर्ण पूज्यत्वें मानी ॥११॥ ब्रह्मसंपन्नतेपुढें। पुत्रसुख कायसें बापुडें। हे गुरुकृपा जयासी घडे। त्यासि करी रोकडें ब्रह्मपूर्ण ॥१२॥ जें बोला बुद्धी नातुडे। जें वृत्तीच्या हाता न चढे। तें द्यावया निजनिवाडें। खेवांचें धडफुडें मिस केलें ॥१३॥ हृदया हृदय एक झालें। ये हृदयींचें ते हृदयीं घातलें। यापरी न बोलतां बोलें। पूर्णत्व दिधलें प्रजापतीसी ॥१४॥

## गुरु–शिष्य एक झाले

जेवीं दोन्ही दीप एक होती। तेथें प्रकाशे प्रबळदीप्ती। तेवीं विष्णुविरिंची खेवो देती। प्रबळ चिच्छक्ती कोंदाटे ॥१५॥ ब्रह्मयाचें नुरेचि ब्रह्मपण। नुरेचि नारायणीं नारायण। कोंदाटलें चैतन्य घन। ब्रह्मा परिपूर्ण ब्रह्म जाला ॥१६॥ तेथें बोध ना अबोध। स्वानंद ना निरानंद। गुरुशिष्य जाले एकवद। पूर्ण परमानंद सदोदित ॥१७॥ गुरुशिष्य जाले अभिन्न। खुंटला बोल पडिलें मौन। निःशेष विरालें मी तूंपण। अद्वय अलिंगन ऐसें पडिलें ॥१८॥ स्वरूपाचें नवलपण। अंगीं मुरालें ब्रह्मस्फुरण। निःशेष झालें विस्मरण। अव्ययज्ञान पावला विधाता ॥१९॥ यापरी श्रीनारायण। आपुलें देऊनि पूर्णपण। पुढें करावया सृष्टीस्रजन। अकर्तात्मबोधें पूर्ण प्रबोधिला विरिंची ॥७२०॥ मुख्य बिंबीं न होतां भिन्न। सूर्यापुढें प्रकाशती किरण।

तेवीं न देखोनि वेगळेपण। सुटलें आलिंगन हरिब्रह्मयांचें ॥२१॥ जळीं जळावरी वसती कल्लोळ। कल्लोळीं असे सबाह्य जळ। तैसा आलिंगन खेळ। जाला वेगळ हरिब्रह्मयांचा ॥२२॥ जेवीं दीपें दीप लाविला। तेथ नकळे वडील धाकुला। तेवीं चिद्रूपें समत्वा आला। हरिरूप जाला प्रजापती ॥२३॥

## ब्रह्मदेव सृष्टी करण्यास पात्र झाला

सृष्टी न करवे सर्वथा। करितां येईल अहंता। ऐसा ब्रह्मा म्हणत होता। तोचि यापरी तत्त्वतां अनुग्रहिला देवें ॥२४॥ जो सृष्टी न करवे म्हणत होता। तोचि आपुल्या अकर्तात्मता। सृष्टी करावयाची योग्यता। पावला विधाता पूर्णबोधें ॥२५॥

## सृष्टिपूर्व गुह्यज्ञान

पुढें सांठविले बुद्धिबळ। तेचि खेळतां विस्तारिले खेळ। तेवीं पूर्वसृष्टी सकळ। ब्रह्मा तत्काळ विस्तारी स्वयें ॥२६॥ पूर्ण पावोनि समाधान। श्रीनारायणाचें चरण। वंदिता जाला चतुरानन। उल्हासे पूर्ण पूर्णानंदबोधें ॥२७॥ हे कल्पादीची गुह्यज्ञानकथा। येणें ज्ञानसंपन्न जाला विधाता। तेचि कथा ऐकतां आतां। साधका तत्त्वतां लाभ काय ॥२८॥ सृष्टीपूर्वील कथा जीर्ण। जीर्णपणें वीर्यक्षीण। परीक्षिती तूं ऐसें न म्हण। हे नित्य नूतन टवटवीत ॥२९॥ कल्पादीचा हा दिनकर। वृद्धपणें अतिजर्जर। याचेनी नलोटे

अंधकार। ऐसा विचार मूर्खही न करी ॥७३०॥ बहुकाळ ठेविला पुरोनी। अग्निहोत्रींचा जुना अग्नि। म्हणोनि ठेवूं जातां वळचणीं। धडधडी तत्क्षणीं नित्य नूतनत्वें ॥३१॥ तेवीं कल्पादि हें गुह्यज्ञान। गुरुमुखें ऐकतां सावधान। साधक होती ज्ञानसंपन्न। यालागीं नित्य नूतन कथा हे ॥३२॥ स्वभूस्वयंभूगुह्यज्ञान। ऐके परिक्षिती सावधान। सुखरूप होईजे आपण। यालागीं नित्य नूतन कथा हे ॥३३॥ कथा नित्य नूतन आणि गोड। निर्दळी दैन्य दुःख दुर्वाड। साधका नित्य सुरवाड। पुरवी कोड श्रोतयाचें ॥३४॥ ऐसी नित्य नूतन सुखरूपता। हरिस्रष्टयांची ज्ञानकथा। हे सृष्टीपूर्वील व्यवस्था। कैसेनी हाता आली पैं ॥३५॥

## जनार्दनकृपेनेंच आपणांस ही कथा श्रोत्यांना सांगता आली—एकनाथ

मी नेणें वेदशास्त्रव्यवस्था। बंशीं मूर्ख म्हणती वस्तुता। त्या मज निजभाग्यें अवचिता। अतुडला हाता गुरु लोष्ट परिस ॥३६॥ परिस सर्वथा कोठें नाहीं। जरी असला येखादे ठायीं। तो काष्ठ लोष्ट पाषाण मूर्ख मही। मज जोडला पाहीं चिद्रत्नाचा ॥३७॥ माझ्या अंगीं मूर्खपण। नेणें मी परिसलक्षण। त्या मज ज्ञानदाता परिपूर्ण। श्रीगुरुचरण जनार्दनाचे ॥३८॥ परिस लोहाचें करी सुवर्ण। परी लोहाचा परिस नव्हे जाण। श्रीजनार्दनाचे चरण। मी पाषाणचि पूर्ण तो मज परिस केला ॥३९॥ ऐसा महानिधि

श्रीगुरुजनार्दन। तेणें मज देखोनी अतिदीन। कल्पादींचें गुह्यज्ञान। कृपा करोनी बोधिलें ॥७४०॥ एक चिन्मात्र एकाक्षर। उमाशिव हें द्व्यक्षर। विठ्ठल हा त्र्यक्षर। एक पंचषडक्षर द्वादशाक्ष पैं ॥४१॥ माझा मंत्र चतुराक्षर। चतुरचित्तप्रबोधकर। ज्ञानाब्धीचा पूर्णचंद्र। आर्तचकोर-अमृतांश ॥४२॥ या मंत्राचें एकाक्षर। क्षराक्षरातीत पर। स्वयें क्षरचि अक्षर। तो हा महामंत्र जनार्दन ॥४३॥ स्त्रष्टचा उपदेशी नारायण। तोचि मजलागीं झाला जनार्दन। तेणें पूर्ण कृपा करून। अनादिगुह्यज्ञान बोधिलें मज ॥४४॥ मज बोधिलें म्हणों जातां। जनार्दन मजआंतौता। तोचि ज्ञान तोचि ज्ञाता। यापरी ज्ञानार्था अर्थविलें ग्रंथी ॥४५॥ यालागीं श्रीजनार्दन। माझेनि नांवें आपण। करिता होय ग्रंथनिरूपण। तेथें झाडा घ्यावा मीपण कैंचें आणूं ॥४६॥ आतां तो कर्ता मी अकर्ता। हेंही बोलणें मूर्खता। याही बोला बोलता। जाणता तत्त्वतां जनार्दन ॥४७॥ जनार्दन स्वयें जाण। स्त्रष्टा अनुग्रहुनी संपूर्ण। अदृश्य होऊं पाहे आपण। तेंचि निरूपण श्रीशुक सांगे ॥४८॥

श्रीशुकउवाच–

संप्रदिश्यैवमजनो जनानां परमेष्ठिनम् ॥
पश्यतस्तस्य तद्रूपमात्मनो न्यरुणद्धरिः ॥३८॥

जो गुह्यज्ञानाचा निजसार। जो आनंदाचा अलंकार। जो योगियांचें परात्पर। तो शुकयोगींद्र स्वयें बोले ॥४९॥ तो स्वानंदें म्हणे परिक्षिती। भगवंतें आपुली ज्ञानगती।

सांगीतली प्रजापती । अन्वयस्थिती निजबोधें ॥७५०॥
सृष्टीची उत्पत्ती स्थिती शांति । ज्ञान विज्ञान अद्वयभक्ती ।
आपुलें मत यथास्थिती । प्रजापती उपदेशिला ॥५१॥
पितामाता भिन्न दोनी । नसोनी जन्मला नाभिस्थानीं ।
पाहे तूं तो आत्मयोनी । अजन्म जनी म्हणती ब्रह्मा ॥५२॥
मोह ममता अहंभावो । नसतां भूत भौतिक पहाहो । तेव्हां
सृष्टि स्रजी निःसंदेहो । यालागीं पितामहो ब्रह्मयासी
म्हणती ॥५३॥ नाभीं जन्मला निजपोटीं । त्यासी सृजावया
भूतसृष्टी । देऊनियां निजात्मपुष्टी । पूज्य परमेष्ठी सर्वांसी
केला ॥५४॥ असुरसुरनर आपण । वंदिती स्रष्टयाचे
निजचरण । एवढें देऊनी आत्मज्ञान । अहंकृतिपूर्ण प्रतिष्ठिला
ब्रह्मा ॥५५॥ जवळुनी दूर न वचतां । चतुर्मुखा सन्मूख
असतां । नारायणाची निजरूपता । पाहतां पाहतां अदृश्य होय
॥५६॥ जे घृताची पुरुषाकृती । थिजोनी अभासली होती ।
ते विघरोनी मागुती । राहे घृतीं घृतरूपें जेवीं ॥५७॥
तेवीं स्रष्टयावरीची कृपा पूर्ण । स्वलीला सगुणनारायण ।
तोचि निर्गुणत्वें महाकारण । आपआपण अदृश्य जहाला
॥५८॥ जेवीं जळाचिया गार । क्षणएक भासली साकार ।
तोचि पाहतां आकार । विरोनियां नीर स्वभावें होय ॥५९॥
तेवीं श्रीनारायणाची मूर्ती । स्वलीला भासली होती । ते
निर्गुणाचेचिये गती । सहजस्थिती अदृश्य झाली ॥७६०॥
ब्रह्मयापुढुनी नाहीं गेला । तेथेंचि असोनी अदृश्य जाहला ।
आकार लोपोनी असे उरला । स्वयें संचला निर्गुणत्वें तो

॥६१॥ यापरी देव अंतर्धान । स्वयें पावला नारायण । त्यालागीं ब्रह्मा आपण । सद्भावें पूर्ण नमिता होय ॥६२॥

अंतर्हितेंद्रियार्थाय हरये विहितांजलिः ॥
सर्वभूतमयो विश्वं ससर्जेदं स पूर्ववत् ॥३९॥

श्रीनारायण साकारला । तंव तो इंद्रियां विषय केला । तोचि इंद्रियातीत जाहला । या नांव पावला अंतर्धाना ॥६३॥ वस्तु असुनी परिपूर्ण । इंद्रियां विषय नव्हे जाण । यानांव सत्य अंतर्धान । सत्य सज्ञान बोलती ऋषी ॥६४॥ इंद्रियांतें नव्हे दृष्ट । त्यातें म्हणती गा अदृष्ट । याअर्थी ते पुराणश्रेष्ठ । बोलती पाठ अंतर्धान पैं ॥६५॥ एवं हरि पावला अंतर्धान । त्यासी स्वयें चतुरानन । बद्धांजळी करी नमन । स्वानंदपूर्ण सम्यसाम्य ॥६६॥ पूर्वी सृष्टि नकरवे म्हणे । ते सगळी सृष्टि स्वयें होणें । बाप सद्गुरूचें करणें । अगम्य दावणें सुगम करुनी ॥६७॥ न माखतां हातपावो । सृष्टिसर्जनीं ब्रह्मदेवो । सद्गुरूचे कृपेचा नवलावो । आलिप्तपणें पहाहो ब्रह्मांड रचवी ॥६८॥ एवं निर्विकल्प कल्पना । ब्रह्मा करी सृष्टि जंना । भूतभौतिकादिगुरुरचना । पूर्णस्थिती जाणा जैशीतैशी ॥६९॥ रचिले चतुर्विध भूतग्राम । चारी वर्ण चारी आश्रम । सुरनरादि अधमोत्तम । अखिल-स्वधर्मकर्म विधानोक्त ॥७०॥ स्रष्टा करी सृष्टिसर्जन । तें आपणाहुनी नदेखे भिन्न । आपणामाजीं सृष्टि संपूर्ण । आपण परिपूर्ण सृष्टीमाजीं ॥७१॥ ब्रम्हा स्वये सृजी

निष्काम । तरी लोकहितार्थ यमनियम । आचरोनी स्वधर्मकर्म । दावी सुगम प्रजांसी विधी ॥७२॥

प्रजापतीधर्मपतिरेकदानियमान्यमान् ।
भद्रं प्रजानामन्विछन्नातिष्ठत्स्वार्थकाम्यया ॥४०॥

### ब्रह्मदेवाला प्रजापति कां म्हणतात ?

ज प्रजांतें सृजूं शकती । ऐसियांची करी हा उत्पत्ती । यालागी ब्रह्मयातें म्हणती । प्रजापति पति पुराणें तीं ॥७३॥ लोक ज्याच्या आज्ञें वर्तती । सर्व लोक ज्यातें भजती । यालागीं लोकपती म्हणती । जाण निश्चितीं ब्रह्मयातें

### लोकहितार्थ आचरण करणारा म्हणून त्याला धर्मपति असें म्हणतात

स्वधर्मकर्माची व्युत्पत्ती । स्वधर्मकर्माची स्थितिगति । त्याचेनी वर्ते लोकांप्रती । यालागीं धर्मपती ब्रह्मयाते म्हणिजे ॥७५॥ धर्मकर्मआचारस्थिती । प्रजा आचरूं नेणती । त्यासाठीं यमनियमांची युक्ती । धाता आचरी निगुती वेदोक्तविधी ॥७६॥ पोटीं नाहीं कर्मावस्था । अथवा कर्मफळाची आस्था । तरी कर्म आचरे विधाता । लोकसंरक्षणार्था यमनियम ॥७७॥ निजप्रजांचिया निजस्वार्था । कर्म आचरोनी दावी धाता । स्वयें कर्म करोनि अकर्ता । लोकहितार्था यमनियम करी ॥७८॥ जें जें श्रेष्ठ आचरती । तें तें कर्म इतर करिती । यालागीं यमनियम

प्रजापती । आचरे अनहंकृती लोकसंग्रहार्थ ।।७९।। कुलालाचें वोसरे कर्म । पूर्वभ्रमें उरे चक्रभ्रम । तेवीं जीवन्मुक्तांचे देहकर्म । होतसे परमस्वभावें पैं ।।७८०।। नदेखोनी सकामावस्था । ब्रह्मा केवळ लोकसंग्रहार्था । सकळलोकहितार्था । होय आचरता स्वधर्मकर्म ।।८१।। सद्गुरु श्रीनारायण । त्याची आज्ञा कीं हे संपूर्ण । करावें लोकसंरक्षण । यालागीं ब्रह्मा जाण यमनियम चाळी ।।८२।। अनहंकृती स्वधर्मकर्म । ब्रह्मा आचरोनी नित्यनेम । येणें नारदाचा मनोधर्म । उत्कंठित पूर्ण परमार्थाविषयीं ।।८३।।

तं नारदः प्रियतमो रिक्थादानामनुव्रतः ।।
शुश्रूषमाणः शीलेन प्रश्रयेन दमेन च ।।४१।।

पितृसेवेनें नारद ज्ञानी झाले

तो नारद महापवित्र । ब्रह्माचा मानसपुत्र । परमार्थालागीं तत्पर । सर्वस्वें सादर पितृसेवेसी ।।८४।। तोचि आर्तीचा पूर्णचंद्र । विवेकाचा क्षीरसमुद्र । वैराग्याचा महारुद्र । आचरे नरेंद्र शमदमयुक्त ।।८५।। पितृसेवा तोचि स्वार्थ । मानुनी सेवेसी नित्यरत । सदा सेवेचें दृढव्रत । निजपरमार्थ साधावया ।।८६।। शमें ज्ञानेंद्रियां उपशम । दमें कर्मेंद्रियां नित्यकर्म । सेवा करोनी उत्तमोत्तम । नारद परमप्रिय जाहला ।।८७।। ज्ञानार्थी अतिउद्भट । अंतर्निग्रही एकनिष्ठ । आज्ञाधारी अतिश्रेष्ठ । परवरिष्ठ सुशीलभावें

मायां विविदिषन्विष्णोर्मायेशस्य महामुनिः ॥
महाभागवतो राजन्पितरं पर्यतोषयत् ॥४२॥

## मायानिरसनार्थ नारद ब्रह्मदेवाला उपाय विचारतात

मायानियंते म्हणती राया। त्या शिवादिकां मोहिलें माया। ते निजमाया निरसावया। नारद उपाया पुसो इच्छित ॥८९॥ माया निरसावया आपण। मायानियंता श्रीनारायण। त्यासी जाणावया संपूर्ण। अनन्यशरण निजजनकासी ॥७९०॥ पितामातागुरुत्वेंसी। ब्रह्मा पूज्य नारदासी। सद्भावें सेवितां अहर्निशीं। अति उल्हासेंसी तुष्टोनियां ॥९१॥ नारद महाभागवत। भगवंती नित्य निरत। त्यासी ब्रह्मा प्रसन्न होत। निजबोधयुक्त स्वानंदें ॥९२॥

तुष्टं निशाम्य पितरं लोकानां प्रपितामहम् ॥
देवर्षिः परिपप्रच्छ भवान्यन्माऽनुपृच्छति ॥४३॥

देखोनि नारदाची पूर्ण भक्ती। जाणोनी उत्तमोत्तमस्थिती। स्वानंदें तुष्टला प्रजापती। कृपामूर्ति निजबोधें ॥९३॥ नारदासी तुष्टला पिता। जो सकळ जगाचा प्रपिता। पूर्ण देखोनी प्रसन्नता। जाहला विनविता सप्रेमभावें ॥९४॥ तूं नातळोनि मायामोहासी। निजात्मबोधें विश्व सृजिसी। तुज प्रसन्न झाला हृषीकेशी। तो प्रसाद आम्हासी कृपेनें दीजे ॥९५॥ ऐसें बोलतां चालिलें स्फुंदन। अश्रुपूर्ण झाले नयन। रोमांचित कंपायमान। सर्वांगीं स्वेदकण टवटविले

॥९६॥ हर्षें बाष्प दाटलें कंठीं । पुढारीं न बोलवे गोष्टी । ते देखोनियां निजदृष्टी । स्रष्टा निजपोटीं निवाला थोर ॥९७॥ यासी पूर्णब्रह्म बोधितां । वचनें पावेल परमार्था । होय अधिकारी पुरता । ऐसें विधाता जाणों सरला ॥९८॥ मग नारदासी आपण । सद्भावें दिधलें आलिंगन । पुत्रसुखें निवाला पूर्ण । अधिकारीरत्न परमार्थी ॥९९॥ ऐक राया परीक्षिती । जें तुवां पुसिलें मजप्रती । तेंचि नारदें प्रजापती । निजज्ञानार्थी पुसियेलें ॥८००॥

तस्मादिदं भागवतं पुराणं दशलक्षणम् ॥
प्रोक्तं भगवता प्राह प्रीतः पुत्राय भूतकृत् ॥४४॥

भागवताचीं दहा लक्षणें सांगून ब्रह्मदेवानें नारदाला ज्ञानी केलें

निजपुत्रालागीं श्रीनारायण । कळवळोनी सांगे गुह्यज्ञान । तेंचि स्वपुत्रालागीं जाण । ब्रह्मा आपण मथितार्थ बोधी ॥१॥ ज्ञान विज्ञान भगवद्भक्ती । नारायणाची पूर्णस्थिती । कळवळोनी प्रजापती । निजपुत्राहातीं ओपिता झाला ॥२॥ तें दशलक्षण भागवत । विष्णुविरिंचीज्ञानमथित । तो ऐकतां ज्ञानमथितार्थ । ओपिला समस्त नारदोदरीं ॥३॥ तें न देखतां नयन । न माखतां निजकान । नातळतां अंतःकरणमन । ओपिलें गुह्यज्ञान नारदहृदयीं ॥४॥ सोडूनियां निज सुरबुद्धी । नातळतां आदिमध्यअवधीं । परिपूर्णत्वें करूनि बोधी । ज्ञानार्थसिद्धि ओपिली तया ॥५॥ जेवीं शिष्या विद्यातत्त्व देतां । गुरूसी ज्ञान वाढे अर्था । न्यूनत्व न घडे

प्रबोधितां । पूर्ण चढे माथा सच्छिष्याचिया ।।६।। तैसा उपदेश अलौलिक । उपदेशमात्रें तिन्ही लोक देख । गुरु-शिष्यही होती एक । तेथें न्यूनाधिक कोणाचें कोणा ।।७।। राया यापरी चतुरानन । उपदेशुनी गुह्यज्ञान । नारद केला ब्रह्मपूर्ण । चैतन्यघन समसाम्यरूप ।।८।। जेणें होइजे ब्रह्मपूर्ण । तें भागवत दशलक्षण । त्या लक्षणांचें निजलक्षण । होउनी सावधान अवधारीं तूं ।।९।।

## भागवताची दहा लक्षणें

इतर पुराणें जीं असतीं । त्यांची पांचलक्षण व्युत्पत्ति । श्रीमहाभागवताची स्थिती । जाण निश्चितीं दशलक्षणें ।।८१०।। मुख्य भागवताची व्युत्पत्ति । दशलक्षण त्याची स्थिती । ते मी सांगेन तुजप्रती । ऐके परीक्षिती नृपवर्या ।।११।। सर्ग, विसर्ग, स्थान, पोषण, । ऊती, मन्वंतरें, ईशानुकथन । निरोध, मुक्ती, आश्रय पूर्ण । एवं दशलक्षण भागवत ।।१२।। दशलक्षणांचें लक्षण । तुज मी सांगेन संपूर्ण । ऐक राया सावधान । लक्षणचिन्ह यथार्थ आतां ।।१३।।

## प्रत्येक लक्षणाची व्याख्या

सर्ग बोलिजे संसारातें । विसर्ग म्हणिजे संहारातें । स्थान म्हणिजे वैकुंठातें । पोषण तेथें भगवद्भजन ।।१४।। कर्म त्यानांव ऊती । चौदामनूंची व्यवस्थिती । यानांव मन्वंतरें म्हणती । दशावतारकीर्ती ईशचरित ।।१५।। सकळ इंद्रियांच्या वृत्ती । एकाग्र या नांव निरोधस्थिती । निःशेष जेथें विरे वृत्ती । त्या नांव मुक्ती महाराया ।।१६।। उत्पत्ति-

स्थितिप्रळयांत। ज्या स्वरूपावरी होतजात। स्वरूप अविकारी यथास्थित। त्या नांव निश्चित आश्रय राया ॥१७॥ दोराअंगीं सर्प उपजला। दोरावरी सर्प नांदला। दोरावरी सर्प निजला। तरी दोर स्पर्शला नाहीं सर्पा ॥१८॥ तेवीं वस्तूच्या ठायीं। प्रपंचाची वार्ता नाहीं। तो झाला गेला घडे कांहीं। आश्रय पाहीं या नांव बापा ॥१९॥ पावावया आश्रयप्राप्ती। भावें करावी भगवद्भक्ती। ते भक्तीची निजस्थिती। श्रीव्यासें भागवतीं विशद केली ॥८२०॥ ते भावें करितां भगवद्भक्ती। त्या भक्तीची निजस्थिती। भक्तां परमानंदप्राप्ती। परिपूर्णस्थिती ठसावे येथें ॥२१॥ ठसावली जी ब्रह्मस्थिती। ते पालटों नेणें कल्पांतीं। कर्मी अकर्तृत्वाची प्रतीती। नारद निश्चितीं उपदेशिला ॥२२॥

## नारद ब्रह्मज्ञानी झाल्यामुळें ब्रह्मदेवानें आनंदानें त्याला आपली ब्रह्मवीणा दिली

तेणें उपदेशें श्रीनारद। पावला तो परमानंद। निर्दळूनियां भेदाभेद। यापरी बोध प्रबोधिला तेणें ॥२३॥ ऐसें उपदेशितां प्रजापती। श्रीभगवंताची मुख्यभक्ति। आतुडली नारदाचिये हातीं। अव्ययस्थिती परमानंद होत ॥२४॥ यापरी उपदेशिला नारद। यालागी सर्वकर्मीं ब्रह्मानंद। कोंदाटला स्वानंदकंद। परमानंद परिपूर्णपणें ॥२५॥ बोध देखोनी चतुरानना। आल्हाद जाहला चौगुणा। तेणें आल्हादेंकरूनी जाणा। आपुला ब्रह्मवीणा वोपिला तया ॥२६॥

### पितृचरणांना वंदून नारद वीणेसह विश्वसंचारार्थ निघाले

नारदें करूनि प्रदक्षिणा। स्वानंदें लागलासे चरणां। मग वाहूनियां ब्रह्मवीणा। ब्रह्मानंदें जाणा निघाला तेसमयीं ॥२७॥ तो ब्रह्मवीणा वाजवीत। ब्रह्मपदें गीतीं गात। ब्रह्मपदीं डुल्लत डुल्लत। ब्रह्मसृष्टी विचरत ब्रह्मबोधें ॥२८॥ ब्रह्मचर्यातें पाळित। ब्रह्मबोध तिपाळित। ब्रह्मानंदें उन्मत्त। मही विचरत ब्रह्मत्वें तो ॥२९॥ तो ब्रह्मयासी संवादत। अधिकारियासी ब्रह्म देत। जग ब्रह्मरूपें देखत। यापरी विचरत त्रैलोक्य स्वयें ॥८३०॥

### अठरा पुराणें व वेदविभागांचे कर्ते असूनहि आत्मसमाधान न लाभलेले व्यासमुनि सरस्वती तीरावर नारदांना भेटले

ऐसा विचरत स्वइच्छेंसी। आला सरस्वतीतीरासी। तेथें देखिलें श्रीव्यासासी। निजमानसीं व्याकुळ असे ॥३१॥ ब्रह्मप्राप्तीलागीं जाण। घालूनि बैसला तो आसन। दृढ करितांही ध्यान। निजसमाधान न पावेंची ॥३२॥ श्रीव्यासें स्वयें आपण। केलें वेदविभागविवेचन। भारतादि अठरा पुराण। इतिहास सुलक्षण व्यासें केली ॥३३॥ स्वधर्मकर्माचे लागवेग। व्यासें विभागिले सांग। स्वर्गनरकादिभोगभाग। देहविभाग विभागले व्यासें ॥३४॥ जन्ममरणादिअवस्था। व्यासें वर्णिल्या यथार्थता। ज्ञातेपणाची समर्थता। परी अंगीं सर्वथा असेना त्याचे ॥३५॥ वेदविभागी मी सज्ञान।

ऐसा रावणासी अभिमान । त्यासी दिधलें निग्रहस्थान । श्रीव्यासें आपण ॐकारमात्रें ॥३६॥ ज्याचेनी दृष्टिस्पर्शें जाण । कौरवपांडववंशवर्धन । तो श्रीव्यासही आपण । आत्मसमाधान नपवेची ॥३७॥ ज्याचे करितां ग्रंथ पठण । ब्रह्महत्यादिदोषनिर्दळण । करितां भारतकथाकथन । निमाले ब्राह्मण उठविले अठरा ॥३८॥

## सद्गुरुकृपेविण सूक्ष्म अहंकार न गेलेले व्यास आत्मज्ञानी कसे होणार?

यापरी ज्ञानसंपन्न । श्रीवेदव्यास द्वैपायन । तोही सद्गुरुकृपेविण । आत्मसमाधान नपवेची ॥३९॥ मुख्य व्यासाची हे अवस्था । तेथें इतरांची कोण कथा । शाब्दिक ज्ञानाची योग्यता । तेथें अतवर्य अहंता स्वभावें असे ॥८४०॥ अनागतभाग्ययथार्थवक्ता । महाकवित्वें मी कविकर्ता । ऐशी अतिसूक्ष्म अहंता । नकळोनी स्वभावता व्यासासी असे ।४१।

## गुरुकृपेशिवाय इतर साधनें व्यर्थ

सद्गुरुकृपा न होतां पूर्ण । न तुटे सूक्ष्म ज्ञानाभिमान । न करितां गुरुसेवा अनन्य । शिष्य समाधान कदा नपवे ॥४२॥ न धरितां सद्गुरूचे चरण । नव्हतां अनन्यशरण । वृथा ज्ञान वृथा ध्यान । वृथा वाग्विलपन पांडित्य तें ॥४३॥ वृथा स्वधर्मकर्माचार । वृथा विवेक विचार । सद्गुरुकृपेविण जो नर । भूमिभार जडमूढ तो ॥४४॥ सद्गुरुकृपा न

होतां। व्यर्थ कविता व्यर्थ कथा। व्यर्थ सज्ञानश्लाघ्यता। देहअहंता तुटेना त्याची ॥४५॥ न करितां सद्‌गुरुभजन। शिष्यासी नोहे समाधान। सद्‌गुरु तोचि ब्रह्मपूर्ण। चैतन्यघन निजात्मा तो ॥४६॥ सद्‌गुरूचे चरणींची माती। अवचटें आतुडल्या स्वहातीं। पायां लागती चाऱ्ही मुक्ती। परमात्मप्राप्ती सच्छिष्या ॥४७॥ असो हें व्यासें करितां ध्यान। क्षणभरी स्थिर न राहे मन। अणुमात्र नपवे समाधान। तेणें उद्विग्नपणें अनुतापी ॥४८॥ मग म्हणे तो कटकटां। जळो जाणीवप्रतिष्ठा। ज्ञातेपणें ठकिलों मोठा। मज मी उफराटा वंचलों कीं ॥४९॥ जाणपणाचा पहिला भ्रम। ज्ञातेपणें मी मूर्ख परम। निजहिताचें चुकलों वर्म। झालें निद्यकर्म मज माझें ॥८५०॥ माझे देहीं देहस्थ मी कोण। त्या मीपणाचें मज नाहीं ज्ञान। केवीं पावेन मी समाधान। यापरी संपूर्ण अनुताप जाहला ॥५१॥ नरदेहींचें निजसाधन। साधावें निजात्मज्ञान। तें मी न साधितां सज्ञान। अतिअज्ञान ज्ञानांध केवळ ॥५२॥

### अशा अनुतापी व्यासांना नारदांचें दर्शन होतें

ऐसी व्यासासी अवस्था। ज्ञानार्थी होतां अनुतापता। तेथें निजभाग्यें स्वभावतां। आला अवचिता ब्रह्मपुत्र ॥५३॥ व्यास जंव उघडी नयन। तंव पुढें देखे ब्रह्मनंदन। हर्षें निर्भर झाला पूर्ण। धांवोनी लोटांगण सद्‌भावें घाली ॥५४॥ उपविष्ट होतां वरासन। हर्षें करी चरणवंदन। स्वानंदें

चरणक्षालन। केलें पूजन ज्ञानोपचारीं ॥५५॥ पुष्पांजुळी प्रदक्षिणा। तुळसीपत्रें वाहुनी चरणां। नारदीं भगवद्भावना। करुनी पूजना प्रार्थितसे ॥५६॥ व्यास म्हणे अहो स्वामी। जगीं परमभाग्याचा मी। स्वयें कृपा केली तुम्हीं। आजि सुखसंगमीं निवालों असें ॥५७॥ ऐसी विनंती प्रीती-करुनी। धांवोनि लागलासे चरणीं। त्यासी आदरें नारद-मुनी। सन्मानुनी उठवी अत्याल्हादें ॥५८॥

## नारदांची पूजा करून व्यासांनीं आपली मनोव्यथा त्यांना सांगितली

मग बैसोनियां सावचित्त। व्यास निवेदी मनोगत। म्यां स्वयें कथिले ज्ञानमथित। परी समाधान चित्त माझें नपवे ॥५९॥ जो मी लौकिकीं अतिसज्ञान। तो मी निज-स्वार्थी अतिअज्ञान। माझ्या ज्ञातेपणाचें भूषण। तेंचि दूषण मज माझें ॥८६०॥ भीतरीं मूर्ख बाहेरी ज्ञाता। हें ज्ञातेपण निजघाता। तें मी वेदशास्त्रपुराणकर्ता। निजस्वार्थी अति-अंध झालों ॥६१॥ अंतरीं नाहीं सुखसमाधान। जळो जळो तें ज्ञातेपण। ऐसें नारदासीं सांगोन पूर्ण। झाला अनन्य-शरण श्रीव्यास तो ॥६२॥

## "तुझ्या ग्रंथांतून भगवंताचे गुणसंकीर्तन नाहीं"— नारद

तंव नारद म्हणे व्यासासी। केलें अत्युत्तम ग्रंथासी। जेणें विश्रांति होय वक्तयासी। त्या ग्रंथार्थासी नोळखसी ॥६३॥ स्वधर्मकर्तव्यें व्यवहाररीती। हेंचि निरूपिलें तुवां ग्रंथीं। परी भगवंताची निजस्थिती। ती ग्रंथार्थी प्रति-

पादिली नसे ॥६४॥ सच्चिदानंदप्रभावासी । नाहीं वर्णिलें श्रीवासुदेवासी । तंव विश्रांति नव्हे वाचेसी । मां वक्तयासी सुख कैचें ॥६५॥ जो जगाचें निजजीवन । जो प्रतिपाद्य श्रीजनार्दन । नाहीं वर्णिला चैतन्यघन । तंव वक्तया संपूर्ण सुख कैचें ॥६६॥ ज्याचेनी जग होय सुखरूप । तो जनार्दन सुखस्वरूप । त्याचें न वर्णितां निजस्वरूप । वक्तयासी अल्प विश्रांती नुपजे ॥६७॥

"श्रोता-वक्ता यांना परमशांति देणारा ग्रंथ कोणता तो ऐक"-नारद

जें वक्तयासी होय निजसुख । त्रिलोकीं कोंदे हरिख । ऐसा अत्यंत अलौलिक । तुज मी अवश्यक सांगेन आतां ॥६८॥ श्रोते वक्ते सुखरूप होती । जगीं प्रगटे परमशांती । ऐसी भगवंताची निजस्थिती । ते मी तुजप्रती सांगेन पां ॥६९॥ ज्याचें स्मरतां एक नाम । निर्दाळी सकळ कर्माकर्म । त्या पुरुषोत्तमाचें निजवर्म । गुह्यज्ञान परम सांगेन व्यासा ॥८७०॥ जेथें शब्देंसी वक्ता निवे । श्रवणेंसी श्रोता विसांवे । सुखासही निजसुख फावे । अनुभवा निजानुभवें निघती दोंदें ॥७१॥ जेणें शिवाचें पुरे कोड । जें गोडाचें निजगोड । जेणें वोसरे संसारकाबाड । सुखसुरवाड सांगेन तें ॥७२॥ जेणें तुटे ज्ञानाभिमान । जेणें कोंदाटे चैतन्यघन । ऐसें जें गुह्याचें गुह्यज्ञान । तें तुज सांगेन परात्पर मी ॥७३॥ जें भावार्थें घेतां वचन । जन जनार्दना अभिन्न । श्रोता वक्ता होय आपण । तें गुह्यज्ञान अवधारी तूं ॥७४॥

कैसें व्यासाचें शुद्धमन । नारद ज्ञाता मी काय अज्ञान । ऐसा न धरीच ज्ञानाभिमान । यालागीं तुष्टमन नारद झाला ॥७५॥ जेणें जपतपाची श्रृंखळा तुटे । ध्येयध्यानाचें बिरडें फिटे । कर्माकर्माचें खत फाटे । तें वर्म गोमटें अवधारी पां ॥७६॥ जेणें अहंतेचें मूळ उपडे । अविद्येचें आयुष्य खंडे । अंगें ब्रह्म होइजे रोकडें । तें ज्ञान धडफुडें अवधारी पैं ॥७७॥

नारदः प्राह मुनये सरस्वत्यास्तटे नृप ।
ध्यायते ब्रह्म परमं व्यासायामिततेजसे ॥४५॥

## गुरुकृपेनें नारदाला लाभलेली योग्यता

निजकृपें श्रीनारद । परमप्रीती अतिआल्हाद । व्यासासी वचनानुबोध । परमानंदें निववीत असे ॥७८॥ श्रीनारायणें निजानंद । परमेष्ठीसी केला बोध । तेणें ब्रह्मा पावे परमानंद । स्वानंदकंद सदोदित ॥७९॥ ऐसिया निजानुभवासी । ब्रह्मा अर्पी निजपुत्रासी । तेणें तो नारददेवर्षी । सुखस्वानंदेंसी डुल्लत असे ॥८०॥ भुक्ति मुक्ति भगवद्भक्ती । नित्य नारदातें वोळंगती । येवढी स्वरूपाची प्राप्ती । अगाधस्थिती पावला ॥८१॥ भुक्ति नारदाचे पायीं घोळे । मुक्ति त्याचे चरणीं लोळे । भक्ति त्याचेनी धाकें पळे । करी सोवळें निजशिवातें ॥८२॥ काम नारदापुढें पळे । काळ त्याच्या तोडरीं रुळे । हरिहरांचेनी भावबळें । इंद्रादि पादकमळें वंदिती सदा ॥८३॥ सदा देवांचा

आवडता । नित्य दैत्यांचा पढियंता । ज्याचे मुखींची स्वभाववार्ता । नुल्लंघ्य सर्वथा हरिहरांसी ॥८४॥ शुक्र लागे ज्याचें चरणीं । बृहस्पति त्यातें मस्तकीं मानी । यापरी गा नारदमुनी । वंद्य त्रिभुवनीं सुरां असुरां ॥८५॥ नारदा रावणासी आप्तता । शेखीं रामाचा पढियंता । नारद शिवाचा आवडता । तो त्रिपुरासी तत्त्वतां एकांत चाळी ॥८६॥ श्रीकृष्णनारद एकांतविधी । त्यातें कालयवन पुसे बुद्धी । ज्यातें जरासंध नित्य वंदी । तो कृष्णसभेमधीं आत्मत्वें पूज्य ॥८७॥ जेथें अत्यंत विषमता । तेथें नारदासी नित्य समता । तेथें समसाम्यसमानता । व्यासासी तत्त्वतां निजबोधक ॥८८॥ तो पाराशर तपतेजस । सरस्वतीतीरींचा निजहंस । परब्रह्मध्यानीं ध्यानस्थ व्यास । त्यासी करी उपदेश श्रीनारद तो ॥८९॥ ध्यानध्यातृत्वभेद । फोडोनी जो सच्चिदानंद । तोचि श्लोकार्थीचा अर्थबोध । व्यासासी श्रीनारद बोध सांगे ॥९०॥

## नारदांच्या उपदेशानें व्यासांना आत्मज्ञान

कानावचना होतां भेटी । व्यास स्वबोधेंसी स्वयें उठी । श्रीनारदाचे गोष्टीसाठीं । पडली मिठी परब्रह्मीं ॥९१॥ ज्या दादुल्याचें वचन । निर्दळुनी ध्यातें मन । ध्याता केला चैतन्यघन । हा प्रताप पूर्ण सद्‌गुरुवचनीं ॥९२॥ तेंचि वाक्य इतर सांगती । परी तेथें नव्हे अर्थप्राप्ती । बाप सद्‌गुरुवाक्याची ख्याती । वचनींच प्राप्ती परब्रह्माची ॥९३॥

हो कां वचनामाजीं आईतें । ब्रह्म बांधोनी आलें होतें । हाही अर्थ न घडे येथें । गुरुवाक्यचि निश्चितें परिपूर्ण ब्रह्म ॥९४॥ वस्तुवेगळें वचन राहे । मां त्यामाजीं वस्तु बांधिली जाये । वस्तु वचनासी सबाह्य आहे । एवं गुरुवाक्य होय परिपूर्ण ब्रह्म ॥९५॥ गुरुवाक्याचें अक्षर । तें क्षराक्षरातीत परमपर । यालागीं गा साचार । ब्रह्मपरात्पर सद्गुरुवाक्य ॥९६॥ वचन वाक्य आणिक वक्ता । तिहींसी गुरुवाक्यें एकात्मता । यालागीं जाण पां तत्त्वतां । गुरुवाक्य वस्तुता परिपूर्ण ब्रह्म ॥९७॥ गुरुवाक्य चैतन्यघन । सद्गुरु तो ब्रह्म परिपूर्ण । हे श्रीव्यासासी बाणली खूण । आपणा आपण विसरला मग ॥९८॥ विसरला तो ध्येयध्यान । विसरला तो ज्ञेयज्ञान । विसरला तो मीतूंपण । देहींचें देहपण देहधर्म विसरे ॥९९॥ विसरला तो कर्मधर्म । विसरला तो नित्यनेम । विसरला तो जपहोम । पूर्ण परब्रह्म कोंदाटलें ॥९००॥ नाठवे सज्ञानमहती । नाठवे महाकवित्वाची व्युत्पत्ती । नाठवे विदेहदेहस्फूर्ती । चैतन्यस्थिती ठसावली तया ॥१॥ बाप गुरुवाक्याचा निजबोध । निःशेषें निरसला जीवभेद । पूर्ण कोंदला परमानंद । स्वानंदकंद निजबोधेंसी ॥२॥ ऐसा पावतां निजबोध । विसरला गुरुशिष्यत्वभेद । श्रीव्यास आणि श्रीनारद । झाले एकचित्तबोध निजात्मरूपें ॥३॥ यापरी श्रीभागवत । दशलक्षण अर्थयुक्त । नारदें व्यासासी यथोक्त । पूर्ण परमार्थ प्रबोधिला ॥४॥ कृपापूर्ण पौर्णिमा-द्वारें । सद्गुरुप्रबोधबोधचंद्रें । निजानंदें अमृतकरें । निव-

विलें पुरें निजशिष्यातें ॥५॥ निरसुनी अविद्याअंधार । दवडुनी अहंसोहंविकार । फेडिलें मुक्तीचें भुरर । सद्गुरुभास्करअरुणोदयीं ॥६॥ सूर्यकिरणांचे संघातें । अंधारचि प्रकाशाआतें । तेवीं गुरुवाक्यभास्वतें । संसार सुनिश्चितें परब्रह्म केला ॥७॥ इतर सूर्य अस्तमाना जाये । गुरुसूर्य तैसा नव्हे । जो उगवतांची पाहे । उदयास्त खाय निजांग-तेजें ॥८॥ जेवीं चंद्रकरअंगसंगें । चकोर निवाला डोलों-लागे । तेवीं गुरुवाक्यसंयोगें । श्रीव्यास सर्वांगें सुखरूप जाहला ॥९॥

## गुरुवाक्यानें ज्ञान प्रबुद्ध झालेल्या व्यासांनीं चतुःश्लोकीचें सार दहा लक्षणांत वर्णिलें

तेणें सुखाचेनि स्वानंदें । सद्गुरुकृपा पूर्ण बोधें । चतुः-श्लोकींचीं अगाध पदें । दशलक्षणशुद्धें वर्णिलीं व्यासें ॥९१०॥ प्रथमस्कंधीं आरंभभाव । द्वितीयस्कंधीं साधिला आव । तृतीयापासूनी नवलाव । लक्षणान्वयभाव लाविला असे ॥११॥ तृतीयस्कंधीं सर्गलक्षण । चतुर्थस्कंधीं विसर्ग जाण । पंचमस्कंधीं बोलिलें स्थान । षष्ठीं तें पोषण प्रति-पादिलें ॥१२॥ सप्तमस्कंधीं बोलिली ऊती । अष्टमीं मन्वं-तरांची गती । ईशानुकथनाची स्थिती । जाण निश्चितीं नवमामाजीं ॥१३॥ दशमीं बोलिला निरोध । एकादशी मोक्षपद । द्वादशीं आश्रय अतिशुद्ध । एवं लक्षणें विशद व्यासें केलीं ॥१४॥ जैसें वटबीज अणुमात्र । त्याचाचि होय

वृक्ष थोर । तैसा चतुःश्लोकींचा विचार । श्रीव्यासें साचार विस्तारला ॥१५॥ व्यास कवि हाचि माळी । भूमिका शोधोनि वैराग्यहुलीं । गुरुकृपाजीवनमेळीं । विवेकाचे आळीं वाढवी वृक्ष ॥१६॥ व्यासर्विदानिया बळी । चतुःश्लोकींच्या निजमेळी । वृक्ष वाढवी समूळीं । पुष्पपल्लवफळीं सफलित ॥१७॥ पदोपदीं अतिगोड । मोक्षसुखाचे लागले घड । समूळ सगळें झाड । नित्य नूतनगोड सुस्वाद लागे ॥१८॥ नित्य नूतन याची गोडी । अवीटें विटोंनेणें चोखडी । जे सेवूं जाणती आवडी । त्यांसी बाधेना वोढी सुधेंषणेची ॥१९॥ नवल या फळाची मात । त्वचा बीज नाहीं त्यांत । न माखतां जीवाहात। न लागतां दांत सेवावें हें ॥९२०॥ हें रसनेंविण रसस्वादन । सेवितां नव्हे उच्छिष्टवदन । परमानंदें तृप्त पूर्ण । गुरुभक्त सज्ञान पावती सदा ॥२१॥ एवं दशलक्षणविस्तार । द्वादश-स्कंध भागवततरुवर । श्रीव्यासऋषि वदला साचार । स्वानंद-निर्भर रस स्रवत ॥२२॥ समूळफळरूपें सदाफळ । अद्वितीय अतिरसाळ । समसाम्यसदा सरळ । समत्वें निर्मळ शाखोप-शाखा॥२३॥ शाखोपशाखाउत्पत्ति । निगमकोकिळा कूजती । आर्तभ्रमर परिभ्रमती । जिज्ञासु घालिती झेंपा फळीं ।२४।

## श्रीव्यासांनीं आपला पुत्र शुकयोगींद्र यांना आपल्यासारखेंच 'ज्ञानी' केले

जंव अर्थाअर्थीं चोखडी गोडी । तंव अतिशयें अति-आवडी । श्रीशुकाची पडली उडी । सर्वांगीं चोखडी चाखली

चवी ।।२५।। ऐसा देखोनी अधिकार । श्रीव्यासें निजकुमर । उपदेशिला शुकयोगींद्र । जो ज्ञाननरेंद्र योगियांचा ।।२६।। जो ब्रह्मचर्यशिरोमणी । जो भक्तांमाजीं अग्रगणी । जो योग्यांचा मुकुटमणी । सज्ञान चरणीं लागती ज्याचे ।।२७।। जो सुखरूपें रूपा आला । की शांतिरसाचा ओतिला । निखळ विज्ञानाचा घडला । स्वयें साकारला परब्रह्मरूप ।।२८।। त्याच्या देहाची पाहतां शोभ । ब्रह्मज्ञानी निघाले कोंब । तो ज्ञानाचा पूर्णबिंब । स्वयें स्वयंभ पूर्णब्रह्म ।।२९।। दशलक्षण श्रीव्यासोक्ती । चतुःश्लोकीचे अर्थप्राप्ती । श्रीशुकाची निजस्थिती । झाली निश्चितीं परब्रह्मरूप ।।३०।। यापरी श्रीशुक आपण । स्वयें झाला स्वानंदघन । त्या आनंदाचें समाधान । पाहोनि पूर्ण समाधिस्थ झाला ।।३१।। नाहीं वृत्तिधैर्यधारणा । आपेंआप सहजें जाणा । समाधी आली समाधाना । सुखरूपें पूर्णार्णवबोध झाला ।।३२।। समाधी आणि उत्थान । दोहीं अवस्था गिळूनी जाण । शुक आपणिया आपण । सुखरूपें पूर्ण प्रबोध पावे ।।३३।।

दहा हजार वर्षें श्रीशुक समाधि अवस्थेंत

ते समाधीचा अवबोध । शुकासी वाटे निमिषार्ध । बाहेर लौकिक प्रसिद्ध । दशसहस्राब्द पुराणगणना ।।३४।। दशसहस्रवर्षेंपर्यंत । श्रीशुक होता समाधिस्थ । ऐसी महापुराणें गर्जत । शुकासी वाटत निमिषार्ध पैं ।।३५।। यालागीं स्वरूपीं निर्वाही । सर्वथा रीघ मना नाहीं । मुख्य काळचि जेथें

नाहीं। काळगणना तेठायीं ठसावे कोणा ॥३६॥ लवनिमिषपळेंपळ। साधूनियां समाधि त्रिकाळ। हें मायामय मृगजळ। स्वरूपीं अळुमाळ स्पर्शलें नाहीं ॥३७॥ जो सूर्यापासीं स्वयें राहे। त्यासी उदयास्त भेटों नलाहे। तेवीं स्वरूपीं जो निमग्न होये। त्यासी काळाची सोये स्वप्नींहि नलगे ॥३८॥ काळगणनाप्रसिद्धी। हे लौकिकी जाण त्रिशुद्धी। स्वस्वरूपींचा संबंधी। काळाची अवधी निःशेष नपवे ॥३९॥ जें जें आकारासी आलें। तें तें जाण काळें ग्रासिलें। काळासी ज्यानें सबाह्य व्यापिलें। तेथें काळाचेंही गेले काळत्व सगळें ॥९४०॥ ते स्वरूपी निजनिर्वाही। शुक समाधिस्थ जाहला पाही। मां काळगणना तेठायीं। कैंची काई सांगावी पां ॥४१॥ यालागीं समाधि आणि उत्थान। हें अपक्वासीच घडे जाण। पूर्णाचिया अंगा लक्षण। अणुप्रमाण असेचिना ॥४२॥ पूर्णाचीं लक्षितां लक्षणें। थोटावलीं अवघीं पुराणें। वेद 'नेति नेति' म्हणे। तेथें माझें बोलणें सरे केवीं ॥४३॥ पूर्णयोगी प्रारब्धवशें। लौकिकीं जैसा तैसा दिसे। तेही पूर्णस्थिती तो असे। कांहीं अनारिसें करी ना करवी ॥४४॥

## ब्रह्मस्वरूप श्रीशुक व्युत्थानदशेंत येतांच परीक्षितीच्या घरीं आले

यापरी शुकाची समाधि जाणा। स्वयें आली समाधाना। तेंच परीक्षितीच्या सदना। विचरतां त्रिभुवना अवचट आला ॥४५॥ बाप भाग्य परीक्षिती। ब्रह्मनिधी लागला

हातीं । ब्रह्मज्ञानाची ऐसी ख्याती । घातली जगतीं ज्ञानपव्हे

## ब्राह्मणाचें सामर्थ्य

सभाग्य कोप ब्राह्मणाचा । शापें अधिकार ब्रह्माचा । मिथ्या नव्हे ब्राह्मणवाचा । पूर्ण दैवाचा परीक्षिती ॥४७॥ शमीकाचा ब्रह्मचारी पुत्र । पाठकें दिधलें शिखासूत्र । त्याचेनि शापें ब्रह्माधिकार । जाण ब्राह्मणमात्र ब्रह्मरूपी ॥४८॥ शाप देतील जरी ब्राह्मण । तरीं वंदावे त्यांचें चरण । कोपा चढल्याही ब्राह्मण । पूर्ण तरी आपण वंदावे ते ॥४९॥ ब्राह्मण करूं आलिया घाता । त्याचे चरणीं ठेवावा माथा । ब्राह्मणापरती पूज्यता । आन दैवता असेनाची ॥९५०॥ ब्रह्म ब्राह्मण समसमान । हेंही वचन दिसे गौण । ब्राह्मदाते स्वयें ब्राह्मण । यालागीं पूर्ण पूज्यत्वें श्रेष्ठ ॥५१॥ जें वस्तु असे ज्याअधीन । त्या वस्तूचे करितां दान । यालागीं ब्रह्मस्वामित्वें ब्राह्मण । पूज्यत्वें पूर्ण तिहीं लोकीं ॥५२॥ ब्राह्मण ब्रह्मातें प्रतिपादिते । तें ब्रह्म होते कोणी नव्हते । ब्रह्म ब्राह्मणाचेनी हातें । पूर्ण प्रतिष्ठेतें पावलें पैं ॥५३॥ यालागीं ब्रह्म ब्राह्मणाधीन । कदा नुल्लंघी ब्राह्मणवचन । त्यांचे मंत्रमात्रें जाण । पाषाणाही पूर्ण ब्रह्मत्व प्रगटे ॥५४॥ जैसा मातेचा मोहकोप । तैसा ब्राह्मणांचा शाप । शापें फेडूनि पराचें पाप । वस्तू चिद्रूप कोपुनी देती ॥५५॥ ब्राह्मण कोपल्या अतिक्षोभता । एवढा लाभ आतुडे हाता ।

त्या ब्राह्मणां सुखी करितां । त्या लाभाची वार्ता न बोलवे वेदा ॥५६॥ यालागीं भूदेव ब्राह्मण । चालतें बोलतें ब्रह्म पूर्ण । त्यांची निंदा आवज्ञा हेळण । विरुद्ध आपण नवदावें कदा ॥५७॥ त्या ब्राह्मणांच्या कोपबोला । राजा ब्रह्माधिकारी झाला । भाग्यें श्रीशुक पावला । भाग्यें आथिला परीक्षिती तो ॥५८॥

## राजा परीक्षितीची योग्यता

या परीक्षितीचा अधिकार । पाहतां दिसे अतिसुंदर । धर्माहोनी धैर्य थोर । वीर्यशौर्यधर विवेकी पैं ॥५९॥ कृष्ण असतां धर्म भ्याला । कलीभेणें पाठीं पळाला । हा कलीसी ग्रासुनी ठेला । धैर्यें आथिला अधिकारी ॥६०॥ चक्र घेऊनी निजहस्तीं । ज्यासी गर्भीं रक्षी श्रीपती । त्याचे अधिकाराची स्थिती । वानावी पां किती वाचाळता ॥६१॥ जेणें गर्भीं रक्षिलें निजस्थितीं । त्यातें परीक्षी सर्वांभूतीं । यालागी नांव परीक्षिती । येथवर प्रीती हरिचरणीं ॥६२॥ अर्जुनवीर्य निर्व्यंग । सुभद्रामहीचें गर्भलिंग । तो अधिकाररत्नउर्पालिग । उभयपक्षीं चांग जन्मला शुद्ध ॥६३॥ राजा आणि सविवेक । सत्त्ववृद्धि आणि सात्त्विक । ब्रह्मज्ञानालागीं त्यक्तोदक । असे अतिनेटक परमार्थी ॥६४॥

## परमार्थाचा योग्य अधिकारी म्हणून या राजाला श्रीशुकांनीं भागवत सांगितलें—उपदेशाची परंपरा

ऐसें देखोनी परीक्षितीसी । कृपा उपजली श्रीशुकासी ।

मग बैसवोनी सावकाशीं । श्रीभागवत त्यासी निरोपिलें ॥६५॥ दुजें दवडून दृश्य दृष्टी । अति गुप्ततेपरिपाठीं । हरिब्रह्मयांची गुह्यगोष्टी । बोले कर्णपुटीं अतिएकांतीं ॥६६॥ तेंचि ब्रह्मयानें नारदासी । बैसोनियां एकांतवासी । दुजें नपडतां दृष्टीसी । अतिगुप्ततेसी उपदेशिलें ॥६७॥ तेंचि नारदमहामुनीश्वरीं । अतिगुप्त सानें कुसरी । एकांतीं सरस्वतीचे तीरीं । व्यासासी करी निजबोध ॥६८॥ तेंचि श्रीव्यासें अतिनिगुती । बैसवूनियां एकांतीं । श्रीभागवत श्रीशुकाप्रती । यथार्थस्थिती उपदेशिलें ॥६९॥ एवं परंपरा उपदेशस्थिती । गुप्तरूपें जे आली होती । तेचि प्रगट जगाप्रती । शुक परीक्षिती परमार्थ सांगे ॥७०॥ हे त्यागाची निजवोज । सप्तरात्रें साधावया काज । ब्रह्मशापें ऋषिसमाज । मेळवूनियां सहज त्यक्तोदक जाहला ॥७१॥ ब्रह्मशापनियमावधी । अंतीं संकटविषयसंधी । तेथें पावला ब्रह्मनिधी । ज्ञानक्षीराब्धी शुकयोगींद्र ॥७२॥

## श्रीशुकमुखानें भागवत श्रवण करून परीक्षिति ब्रह्मज्ञानी झाला

मरतया अमृतपान । दुष्काळीं जेवीं मिष्टान्न । अवर्षणीं वर्षे घन । तेवीं आगमन श्रीशुकाचें ॥७३॥ भक्तिनवरत्नतारूं बुडतां । धर्मधैर्याचा स्तंभ पडतां । तो परीक्षिती शापें पीडितां । झाला रक्षिता शुकयोगींद्र ॥७४॥ तेणें बैसवुनी ऋषिवर्यपंक्ती । तारावयातें परीक्षिती । प्रगट परिसतां त्रिजगतीं । श्रीभागवतार्थी शुक वक्ता ॥७५॥ धन्य वक्ता

तो श्रीशुक । श्रवणें विसरवी तान्हभूक । त्यक्तोदका झालें पूर्णसुख । कथापीयूष परमामृतें ॥७६॥ ब्रह्मशापें सर्प दंशतां । मरणभयाची कथावार्ता । विसरवुनियां नरनाथा । पूर्णपरमार्थी त्यासी लावी ॥७७॥ तें हें श्रीभागवत संपूर्ण । दशलक्षणीं सुलक्षण । श्रीशुकें करवुनी श्रवण । परीक्षिती पूर्ण ब्रह्म केला ॥७८॥ जेवीं दोराचें सापपण । दोरीच मिथ्या होय जाण । तेवीं देहाचें देहपण । देहस्था मीपण जाणतां मिथ्या ॥७९॥ देह असो अथवा जावो । आम्ही पूर्णपरब्रह्म आहों । यापरी परीक्षिती पहाहो । केला निःसंदेहो श्रवणमात्रें ॥९८०॥

### श्रीएकनाथ म्हणतात मीं गुरुआज्ञेनें हा ग्रंथ मराठींत रचिला

श्रीशुकपरीक्षितीसंवाद । तोचि जगाला उद्बोध । जो गुरुकृपा पावे प्रबोध । पूर्ण ब्रह्मानंद स्वयें होय तो ॥८१॥ ऐसें फावलें ज्या श्रीभागवत । ते पावले ज्ञानमथितार्थ । परमानुभवीं श्रीमत्संत । संतोषावया ग्रंथ म्यां हा केला ॥८२॥ त्यांचिया चरणरजकृपा । हे बोल कळले मज पाहा पां । वांचुनी ज्ञानार्थसंकल्पा । आकळे वाग्जल्पा हें घडे केवीं ॥८३॥ माझे वाकुडेतिकुडे आर्षबोल । त्यामाजीं ब्रह्मज्ञान सखोल । नित्य नवी प्रेमाची ओल । हे कृपा केवळ त्या संतांची ॥८४॥

### या धाडसाबद्दल संताकडे क्षमायाचना

श्रीभागवत आणि भाषे मराठे । हें बोलणें नवल

१८७५८ कराव्या २।७।७१ १२२५७

वाटे । पूर्वीं नाहीं ऐकिलें कोठें । अभिनव मोठें धिटावा केला ॥८५॥ मुख्य संस्कृतचि मी नेणें । यावर प्राकृत ग्रंथ करणें । जें कांहीं बोलिलों धीटपणें । तें क्षमा करणें जनकत्वें संतीं ॥८६॥ बालकाची सरे बडबड । तेणें माउलीची निवे चाड । मज अपत्याचें तुम्हां कोड। प्राकृतही गोड मानिला ग्रंथ ॥८७॥ माझें आरुषवाणें बोलणें । कळाकुसरी कौतुक नेणें । जें बोलविलें जनार्दनें । तेंचि ग्रंथकथनें कथिलें येथें ॥८८॥ जें बळें ओढून नेइजे तैसे । तेंचि चालुनी आलें आपैसें । तेवीं मन हिरोन हृषीकेशें । बळात्कारें ऐसें बोलविले पैं ॥८९॥

## मी निमित्तमात्र आहे

१६८५८

येथें पराक्रम नाहीं माझा । हा ग्रंथ आवडला अधोक्षजा । तेणें बोलविलें ज्या निजगुजा । त्या यथार्थवोजा बोलिला ग्रंथ ॥९९०॥ तो करवी तैसा मी कर्ता । हें बोलणें अतिमूर्खता । वाच्यवाचक जनार्दन वक्ता । ग्रंथग्रंथार्था निजरूप दावी ॥९१॥ यालागीं पदपदार्थखोडी । प्रेमरहस्य ज्ञानगोडी । हे माझ्या अंगीं नलगे वोढी । ग्रंथार्थधडगोडी जनार्दन जाणे ॥९२॥ घाणा ऊस गाळिल्या जाणा । गुळाचा स्वामी नव्हे घाणा । तेवीं मज मुखीं गुह्यज्ञाना । वदला ज्ञातेपणा मीपण नलगे ॥९३॥ ऐसें सद्गुरूंनीं नवल केलें । माझें मीपण निःशेष नेलें । शेखीं माझे नांवें ग्रंथ बोलिले । प्रेम आथिलें ज्ञानार्थरसें ॥९४॥ म्हणावें सद्गुरु तूं माझा । कीं पूर्णब्रह्मसहजनिजा ।

तेथे मीपणाचा उपजे फुंजा। तुजमाजी तुझा निजवास पैं ॥९५॥ वस्त्र आणि घडीपालव। स्वरूप एक वेगळें नांव। परी घडी पालव अपूर्व। वस्त्रगौरव शोभेसि आणि ॥९६॥ तेवीं गुरुब्रह्महो एकचि घडे। परी गुरुदास्यें ब्रह्म आतुडे। गुरुवाक्यें निजनिवाडें। ब्रह्मासी जोडे प्रतिष्ठा पैं ॥९७॥ गुरु ब्रह्म अभिन्नत्वें पूर्ण। तेथे शिष्यासी नुरे भिन्नपण। तेव्हां जन तोचि जनार्दन। जनार्दनीं जन अभिन्नत्वें नांदे ॥९८॥ ऐसा निजात्मा श्रीजनार्दन। अनुभवितां नहोय आन। कायावाचामनबुद्धिप्राण। इंद्रियेंहि जाण जनार्दन झाला ॥९९॥ यालागीं माझें जें कां मीपण। तें माझे अंगीं नलगे जाण। माझें वाचें जें वचन। तें श्रीजनार्दन स्वयें झाला ॥१०००॥ यालागीं वाचा जे वावडे। तें जनार्दना अंगी जडे। सैर करतांही बडबडे। समाधीची नमोडे मौन मुद्रा ॥१॥

## जनार्दन माउलीची अकारण करुणा, तिचाच हा महिमा

सैराट धांवतां पाय। श्रीजनार्दन निजमाय। पदोंपदीं कडिये घेत जाय। रितें पाऊल पाहे पडोंनेदी ॥२॥ झणी कोणाची दृष्टि लागे। यालागीं मज पुढें मागें। सर्वदा तिष्ठे सर्वांगें। मीचि आचार्यसंगें निर्भय सदा ॥३॥ जनार्दनजननीअंगसंगें। भय तेंचि निर्भय होऊं लागे। कळिकाळ नित्य निजांगें। येऊनी पायां लागे अहर्निशीं ॥४॥ जनार्दन-जननीचा स्नेह मोठा। चित्प्रकाश केला दिवटा। मोडेल

अविद्येचा कांटा। म्हणुनी बोधखराटा भूमिका झाडी ।।५।। ऋद्धिसिद्धींची कुरवंडी। वोवाळुनी दुरी सांडी। निजानुभवाचें ताट मांडी। स्वानंदाचें तोंडीं ग्रास देत ।।६।। समाधीचे पालखीं सुये। अनुहताचा हल्लर गाये। यापरी जनार्दन निजमाये। निजीं निजविती होये निजदासा ।।७।। पुत्र शिष्य आणि सेवक। जनार्दनासी समान देख। परीं पुत्रापरिस विशेष देख। शिष्यासी निजसुख स्वानंद दिला ।।८।। तेथें जनार्दनीं एक। रंकाचेंही निजरंक। त्यांही माजीं कृपापूर्वक। निजात्मसुख सुखें दिधले ।।९।। त्या सुखाची निजगोडी। चतु:श्लोकींच्या पदमोडीं। श्रीसंतांलागीं घोंगडी। मराठी परवडी भावें केली ।।१०१०।। जेवीं सकळां लहानें। मिळोनी कणकीचें चाखणी करणें। तेवीं श्रीभागवत मूळ केणें। म्या वाखाणणें महाराष्ट्रीं ।।११।। नवल माउलीचें कोड। बाळक नासी तें लागे गोड। तेवीं मी संतांचें लडिवाळ बोबड। माझे मराठीचें कोड चौगुण करिती ।।१२।। बाळक स्वयें खेळगेपणें। मातेसी लावी आंवतणें। त्याचें परवडीं पडिले चणे। तरी माता तृप्त होणें चौगुणें प्रीती ।।१३।। तेवीं माझिया बोला प्राकृता। ग्रंथार्थ परिसतां साधुसंतां। सुख उपजेल सर्वथा। निजस्वभावता निजबोध ।।१४।। जेवीं बाळक बापाजवळी। त्याचेच ग्रास त्यासी घाली। कीं तो बाळकाच्या करतळीं। सुखावला तळीं मिटक्या देत ।।१५।। तेवीं चतु:श्लोकी भागवता। व्यासें काढिलें मथितार्था। तो शोधुनी म्यां आईता। वोपिला संता निजबाळकभावें ।।१६।।

## या चतुःश्लोकीची रचना कोठें व कशी झाली

तेवीं चतुःश्लोकीभागवत। कैसेनी झालें हस्तगत। प्रवर्तविया कारण येथ। ऐका सुनिश्चित सांगेन मी ॥१७॥ गोदावरीउत्तरतीरीं। चौ योजनीं चंद्रगिरी। श्रीजनार्दन तेथवरी। दैवयोगें फेरी स्वभावें गेलों ॥१८॥ तो अतिदीर्घ चंद्रगिरी। तळीं चंद्रावती नगरी। स्वयें चंद्रनाम द्विजवरी। वस्ती त्याचे घरीं सहज घडली ॥१९॥ तेणें चतुःश्लोकी-भागवत। वाखणिलें यथार्थ युक्त। तेणें श्रीजनार्दन अद्-भुत। झाला उत्पुलित स्वानंदें पैं ॥१०२०॥ तेणें स्वानंदें गर्जोन। श्रीमुखें स्वयें जनार्दन। बोलिला अतिसुखावून। हे वर्णी गुह्यज्ञान देशभाषा ॥२१॥ तें माझी मध्यम अवस्था। नेणें संस्कृत पदपदार्था। बाप आज्ञेची सामर्थ्यता। वचनें यथार्थ प्रबोध झाला ॥२२॥ वसिष्ठाचे वचनासाठीं। सूर्य-मंडळीं तपे छाटी। शिळा तरती सागरपोटीं। श्रीरामदृष्टि-प्रतापें ॥२३॥ विश्वामित्रवाक्यें जाण। कौलिका स्वतंत्र स्वर्गस्थान। तेवीं मी एकाजनार्दन। गुरुकृपा पूर्ण ज्ञानार्थ-करितां ॥२४॥

### गुरु आज्ञेमुळें ग्रंथार्थ स्वयमेवच प्रकट झाला

नवल आज्ञेची सामर्थ्यता। मी करूं न रिघें जरी ग्रंथा। तो ग्रंथार्थ मज आंतौता। बळेंचि ज्ञानार्थी दाटोनी दावी ॥२५॥ हें सांडूनिया ग्रंथकथन। मजकर्मांतरीं रिघतां जाण। त्या कर्मामाजीं गुह्यज्ञान। ग्रंथार्थ पूर्ण प्रकटे स्वयें

॥२६॥ गुरुआज्ञा अत्यंत लाठी। ग्रंथार्थ खेळे माझे दृष्टीं। आज्ञेनें पुरविली पाठी। फाकटगोष्टीमाजींही ज्ञान ॥२७॥ नित्यकर्म करितां जाण। ग्रंथींचें दिसे गुह्यज्ञान। मागें घालूनियां संध्यास्नान। ग्रंथार्थ पूर्ण प्रकटे पुढां ॥२८॥ जागृती दिसे ग्रंथार्थज्ञान। ग्रंथार्थमय जाहलें स्वप्न। सुषुप्तीमाजीं दुजेनवीण। हें गुह्यज्ञान कोंदाटे पैं ॥२९॥ शब्दापुढें ज्ञान धांवे। ओवीपुढें अर्थ पावे। जें जें जीवीं विवंचावें। तें तें आघवें ग्रंथार्थ होय ॥१०३०॥ सद्गुरुआज्ञा अतिशयगाढी। रितें अर्धक्षण नसोडी। तैं आज्ञा गौरव परवडी। ग्रंथार्थ जोडीजोडिला ऐसा ॥३१॥ यापरी श्रीभागवत। चतुःश्लोकीं ज्ञानमथित। तो हा रचितां प्राकृत ग्रंथ। गुरुआज्ञा समर्थ प्रतापतेजें ॥३२॥ एका जनार्दना शरण। भावें वंदितां सद्गुरुचरण। स्वप्नीं न दिसे जन्ममरण। ब्रह्म परिपूर्ण होइजे स्वयें ॥३३॥ स्वयें महाभागवत। चतुःश्लोकगुह्यज्ञानार्थ। परमार्थें आथिला ग्रंथ। हा निश्चितार्थ निजबोधें ॥३४॥ एवं भागवतींच्या मतितार्था। एकला एका नव्हे कर्ता। ग्रंथग्रंथार्थ अर्थविता। अंगें तत्त्वतां जनार्दन झाला ॥३५॥ एका आणि जनार्दन। नांवें भिन्न स्वरूपें अभिन्न। यालागीं ग्रंथाचे निरूपण। पूर्णत्वें पूर्ण संपूर्ण झालें ॥१०३६॥ श्लोक ॥४५॥

इतिश्रीभागवते द्वितीयस्कंधे श्रीशुकपरीक्षितिसंवादे
एकाकारटीकायां नवमोऽध्यायः। श्रीकृष्णार्पणमस्तु
श्लोक ॥४५॥ ओवीसंख्या ॥१०३६॥

॥ श्रीएकनाथ महाराजकृत चतुःश्लोकी भागवत समाप्त ॥

# श्रीएकनाथ महाराजकृत
# हस्तामलक टीका

## श्रीगणेश–शारदा–कुलदेवता–जगदंबावंदन

श्रीगणेशाय नमः । श्रीकृष्णपरमात्मने नमः । जें वस्तू प्रतिपाद्य । जें अनादित्वें जगदाद्य । जें वंद्याहि परमवंद्य । तो वंदिला सिद्धविनायकु ॥१॥ सुखाचें मस्तक प्रचंड । हारुषाचें वोतिलें तोंड । झेलित आनंदाची सोंड । एकत्वें अखंड एकदंतु झळके ॥२॥ ज्ञानतेजें सतेज फरशु । अखंड स्मरणाचा अंकुशु । अभयवरदें अतिविश्वासु । स्वानंदाचा सुरसु लाडू देशी ॥३॥ प्रकृति पुरुष चरण दोन्ही । तळीं घालिसी एकपणीं । तयावरी सहजासनीं । अगम्यगुणीं शोभसी ॥४॥ त्यामाजीं चराचर रहिवासु । जो सकळ गणांचा निजईशु । तो वंदिला श्रीगणेशु । परमार्थविलासु ग्रंथार्थी दावी ॥५॥ सारासार विभाग जनीं । जें विवेकें दावी प्रबोधुनी । ते वंदिली शारदा जननी । असार जिचेनी निजसार ॥६॥ शुक्लांबर सुवासी । चिदंबर झळके कासेसी । चिद्रत्नें सेवी अहर्निशीं । तये परमहंसीं आरूढ ॥७॥ स्वर-वर्णशब्दांत वीणा । वेदार्थाची पोथी जाणा । तुझिये कृपा-दृष्टीचा पान्हा । सबाह्य कविजनां निवविसी ॥८॥ वाच्य वाचक वचन । वाग्देवता जाली आपण । तिचे नमस्कारितां

चरण । ज्ञानविज्ञान प्रकाशे स्वयें ॥९॥ यापरी वाग्देवता । शब्दीं वदवी निःशब्दता । अक्षरीं दावी अक्षरार्था । साह्य परमार्था सर्वदा ॥१०॥ आतां वंदूं कुळदेवता । जे कां एकवीरा एकनाथा । तिचेनी नांवें मी ही कविता । अतिश्लाघ्यता जंव मानी ॥११॥ तंव नांव रूप गुण वार्ता । उरो नेदी कुळदेवता । निर्दाळूनि कवित्वअहंता । एकात्मता भजनें भजवी ॥१२॥ भजतां कुळदेवता केवळ । तंव कुळशीळ केलें अकुळ । भज्य भजनचि मूळ । केलें निर्मूळ मूळान्वयें ॥१३॥ यापरी एकनाथा । एकत्व दे निजभक्ता । अर्थ स्वार्थ परमार्था । मुख्यत्वें अद्वैतामाजीं मिरवी ॥१४॥ यापरी ते जगदंबा । अकुळें आणिली कुळासी शोभा । ते वंदिली ग्रंथारंभा । कवित्वकदंबा जीवन ॥१५॥

## संतवंदन व संतमहिमा

आतां वंदूं निजसज्जन । जे दीनदयाळ चातक घन । ज्यांसी जन वन विजन । समसमान समत्वें ॥१६॥ सर्वसमान समतें । हेंचि भांडवल संतांतें । तेणें भांडवलें जे पुरते । ते परब्रह्मातें आकळिती ॥१७॥ संत कृपा करिती जेथें । परमानंदु प्रकटे तेथें । यालागीं निज संतांतें । वित्तें जीवितें अनन्य ॥१८॥ संतांसी जो अनन्य शरण । त्यासी ओंविळें शिवपण । ऐसा होय परम पावन । संतभजन केलिया ॥१९॥ सेवितां संतचरणतीर्था । तीर्थें पायवण्या वोडविती माथा । चहूं मुक्तींतें हाणे लाथा । ते संत

कृपार्थी वंदिले ॥२०॥ आतां वंदू श्रीजनार्दन । त्याचें नाम निर्दळी नामाभिमान । जिवाचें नुरे जीवपण । सद्भावें आठवण करितांचि ॥२१॥ साचार जालिया आठवण । आठवा नाठवा बोळवण । कामक्रोधाचें निर्दळण । नामस्मरण केलिया ॥२२॥ अगाध श्रीजनार्दननाम । समूळ उडवी कर्माकर्म । लाजा लोपती धर्माधर्म । प्रपंचपरब्रह्म एकत्वें प्रकटे ॥२३॥ वंदिता श्रीजनार्दनचरण । जन्ममरणांसी ये मरण । ज्यासी ज्ञालिया अनन्यशरण । ब्रह्म परिपूर्ण स्वयें होती ॥२४॥ लिंगदेहाचें मर्दन । तेंचि जनासी अर्दन । यालागीं नांव जनार्दन । करी गणना वेदानुवादु ॥२५॥ यापरी श्रीजनार्दनु । करतळामळक करी विज्ञानु । त्या करतळामळाचें व्याख्यानु । करावया आपण प्रेरक ज्ञाला ॥२६॥ ग्रंथपीठिकेचें रूप । बारा श्लोकीं चित्स्वरूप । परमानंदें स्वरूप । अद्वैतदीप प्रकाशिला ॥२७॥ अनपत्या एक अपत्य । जन्मला सकळ शमांत । जैसा देहामाजीं दीप गुप्त । तैसा ब्रह्म सदोदित जन्मला ॥२८॥ ज्यासी बहुसाल अपत्यें । तो अखंड भोगी आपत्तीतें । यालागी नांव अपत्यें । जाणोनि वेदार्थें अभिधान केलें ॥२९॥

## सुपुत्र कोण

जे पितरातें तारिती । जे पूर्वजातें उद्धरिती । सुपुत्र त्यातें म्हणती । ते पुत्रसंपत्ति दुर्लभ ॥३०॥ शोकसंतापकारका घरोघरीं पुत्र देख । अनेकीं जन्मती अनेक । सुपुत्राचें मुख विरळा देखे ॥३१॥

## एका ब्राह्मणाला 'जीवन्मुक्त' पुत्राची प्राप्ति

कोणीएक ब्राह्मणाचे गृहीं । परमभाग्यास्तव पाही । जन्म पावला चरमदेहीं । त्याचे वैभव तेंही नेणिजे ॥३२॥ जेवीं शुक्तिकेमाजीं रत्न । कां लोहामाजीं गुप्तधन । तेवीं याचे हृदयींचें ज्ञान । इतर जन नेणती ॥३३॥ कोहंभावें करावें रुदन । सोहंभावें हास्यवदन । दोन्ही सांडुनी आपण । मुळींचें मौन अखंडत्वें ॥३४॥ तो जन्मोनिया जाण । 'जन्मलो' न म्हणे आपण । त्यासी नाही रडकेपण । मा कोहंभावें कोण टाहो फोडी ॥३५॥ टाहो न फोडी बाळक । तेथें मिळाले लोक । अवघे म्हणती अलौलिक । निश्चयो एक न करवे । ॥३६॥ प्रेत म्हणों तरी प्राण आहे । अंध म्हणों तरी पाहतें पाहे । हें ठाईचें रडों नेणे काय । अभिनव माये बाळक ॥३७॥ तेज अंगीं न समाये । देखतां तहानभूक जाय । केवळ वेडें नव्हे माय । या जन्माची सोय चोजवेना ॥३८॥ पालखीहूनि तळीं पडे । कां झोंबलिया मुंग्या माकोडे । तरी सर्वथा न रडे । द्वंद्व चरफडें चरफडीना ॥३९॥

## सामान्य बालकांच्या धर्माची उपेक्षा व मौन यामुळें माता-पिता दुःखी झाले

सर्वथा नकरी रुदन । मातेनें मुखीं घातल्या स्तन । चोखून नकरी स्तनपान । स्वानंदें पूर्ण नित्यतृप्त ॥४०॥ स्तनपान नकरी सर्वथा । यालागीं उदास जाली माता ।

कदा नकरी अहंममता । यालागीं पिता उपेक्षी ।।४१।। जाली अष्ट वरुषें पूर्ण । केवीं करूं उपनयन । जन्मूनिया यासी लागलें मौन । गायत्रीस्मरण करीना ।।४२।। गायत्री मंत्राचें पठण । एक वेळा करितां संपूर्ण । तें यासी येत ब्राह्मणपण । ऐसी चिंता पूर्ण पितयासी ।।४३।।

### आठ वर्षांच्या या 'मौनी' ला आईबापांनीं घराबाहेर घालविलें तरीं त्याच्या आत्मानंदस्थितीला भंग नाहीं

पुत्राचा निश्चयो पूर्ण । करितां गायत्री मंत्रपठण । अंगीं लागलें ब्राह्मणपण । मज चारीवर्ण विटाळू ।।४४।। नकरीं गायत्री स्मरण । पितेन घातला दवडून । जरी माता नेदी अन्नपान । तरी दीनवदन तो नव्हे ।।४५।। ऐसी त्या बालकाची स्थिती । तेचि समयीं सहजगती । शंकराचार्य भिक्षार्थी । त्या गृहाप्रती आपण आले ।।४६।।

### श्रीशंकराचार्यांचें त्या ब्राह्मणाच्या घरीं सहज आगमन व तो सहजावस्थेंतील बालक पाहून त्यांना परमानंद

व्यवहारें अतिसधन । अग्निहोत्री सुब्राह्मण । भिक्षार्थी आचार्यासी आपण । बहुसाल जाण प्रार्थितो ।।४७।। उपेक्षुनी त्याचे भिक्षेसी । साक्षेपें आले त्याचिया गृहासी । देखोनि स्थिति बाळकापासीं । झालें संतोषी आचार्य ।।४८।। देखोनियां त्याचें चिन्ह । जाणोनि त्याचें हृदयींचें ज्ञान । शंकराचार्य सुप्रसन्न । स्वयें संतोषोन सुखमय झाले ।।४९।। त्यासि देखतांचि दिठीं । आचार्यासि आनंद कोटी । त्याच्या

परमानंदगोठी । ऐकावया पोटीं प्रश्नादरू केला ॥५०॥ अतिशयेंसी श्रीशंकरू । करिता जाला प्रश्नादरू । ज्ञान विज्ञान निजनिर्धारू । आत्मसाक्षात्कारू प्रगटावया ॥५१॥

कस्त्वं शिशो, कस्य कुतोऽसि गन्ता ।
किन्नाम ते त्वं कुत आगतोऽसि ।
एतन्मयोक्तं वद चार्भकत्वं ।
मत्प्रीतये प्रीतिविवर्धनोऽसि ॥१॥

शिशो म्हणावया कारण । नेणे शब्दापशब्दज्ञान । परी बालत्वाचें अज्ञान । त्यामाजीं जाण असेना ॥५२॥ बाळपणीं अतिसज्ञान । यालागीं आचार्यें केला प्रश्न । जेवीं धुळीमाजीं रत्न । जाणते यत्न स्वयें करिती ॥५३॥ शिंपीमाजीं मोती होये । परी शिंपीसी कामा नये । तेंचि सज्ञानासि पाहे । भूषण होय निजांगीं ॥५४॥

### त्या पूर्णज्ञानी पुत्राची मातापित्यांना ओळख व्हावी म्हणून श्रीशंकराचार्यांनीं त्याला प्रश्न विचारले

तेवीं त्या बाळकाचें ज्ञान । माता पिता नेणती जाण । त्याचें प्रकाशावया ज्ञान विज्ञान । आचार्यें प्रश्न स्वयें केला ॥५५॥ तूं कैंचा ? कोणाचा ? कोठील ? कोण ? । काय नाम ? कोण वर्ण ? । तुझें कोठूनि आगमन ? । पुढारें गमन तुज कोठें ? ॥५६॥ माझिये प्रीतीचा प्रश्न । तुवां प्रीतीनें करावा परिपूर्ण । प्रीती सुखावे पूर्ण । तैसें प्रतिवचन मज देई ॥५७॥ प्रीतीनें प्रीति अतिशयें वाढे ॥

कदा नकरी अहंममता । यालागीं पिता उपेक्षी ।।४१।। जाली अष्ट वरुषें पूर्ण । केवीं करूं उपनयन । जन्मूनिया यासी लागलें मौन । गायत्रीस्मरण करीना ।।४२।। गायत्री मंत्राचें पठण । एक वेळा करितां संपूर्ण । तें यासी येत ब्राह्मणपण । ऐसी चिंता पूर्ण पितयासी ।।४३।।

आठ वर्षांच्या या 'मौनी' ला आईबापांनीं घराबाहेर घालविलें तरी त्याच्या आत्मानंदस्थितीला भंग नाहीं

पुत्राचा निश्चयो पूर्ण । करितां गायत्री मंत्रपठण । अंगीं लागलें ब्राह्मणपण । मज चारीवर्ण विटाळू ।।४४।। नकरीं गायत्री स्मरण । पितेन घातला दवडून । जरी माता नेदी अन्नपान । तरी दीनवदन तो नव्हे ।।४५।। ऐसी त्या बालकाची स्थिती । तेचि समयीं सहजगती । शंकराचार्य भिक्षार्थी । त्या गृहाप्रती आपण आले ।।४६।।

श्रीशंकराचार्यांचें त्या ब्राह्मणाच्या घरीं सहज आगमन व तो सहजावस्थेंतील बालक पाहून त्यांना परमानंद

व्यवहारें अतिसधन । अग्निहोत्री सुब्राह्मण । भिक्षार्थी आचार्यासी आपण । बहुसाल जाण प्रार्थितो ।।४७।। उपेक्षुनी त्याचे भिक्षेसी । साक्षेपें आले त्याचिया गृहासी । देखोनि स्थिति बाळकापासीं । झालें संतोषी आचार्य ।।४८।। देखोनियां त्याचें चिन्ह । जाणोनि त्याचें हृदयींचें ज्ञान । शंकराचार्य सुप्रसन्न । स्वयें संतोषोन सुखमय झाले ।।४९।। त्यासि देखतांचि दिठीं । आचार्यासि आनंद कोटी । त्याच्या

परमानंदगोठी । ऐकावया पोटीं प्रश्नादरू केला ॥५०॥ अतिशयेंसी श्रीशंकरू । करिता जाला प्रश्नादरू । ज्ञान विज्ञान निजनिर्धारू । आत्मसाक्षात्कारू प्रगटावया ॥५१॥

कस्त्वं शिशो, कस्य कुतोऽसि गन्ता ।
किन्नाम ते त्वं कुत आगतोऽसि ।
एतन्मयोक्तं वद चार्भकत्वं ।
मत्प्रीतये प्रीतिविवर्धनोऽसि ॥१॥

शिशो म्हणावया कारण । नेणे शब्दापशब्दज्ञान । परी बालत्वाचें अज्ञान । त्यामाजीं जाण असेना ॥५२॥ बाळपणीं अतिसज्ञान । यालागीं आचार्यें केला प्रश्न । जेवीं धुळीमाजीं रत्न । जाणते यत्न स्वयें करिती ॥५३॥ शिंपीमाजीं मोती होये । परी शिंपीसी कामा नये । तेंचि सज्ञानासि पाहे । भूषण होय निजांगीं ॥५४॥

त्या पूर्णज्ञानी पुत्राची मातापित्यांना ओळख व्हावी म्हणून
श्रीशंकराचार्यांनीं त्याला प्रश्न विचारले

तेवीं त्या बाळकाचें ज्ञान । माता पिता नेणती जाण । त्याचें प्रकाशावया ज्ञान विज्ञान । आचार्यें प्रश्न स्वयें केला ॥५५॥ तूं कैचा ? कोणाचा ? कोठील ? कोण ? । काय नाम ? कोण वर्ण ? । तुझें कोठूनि आगमन ? । पुढारें गमन तुज कोठें ? ॥५६॥ माझिये प्रीतीचा प्रश्न । तुवां प्रीतीनें करावा परिपूर्ण । प्रीती सुखावे पूर्ण । तैसें प्रतिवचन मज देई ॥५७॥ प्रीतीनें प्रीति अतिशयें वाढे ॥

प्रीतीनें परम प्रीती जोडे । प्रीति प्रीतीचें फेडी सांकडें । प्रीति पुढें पुढें प्रियकरा पढिये ॥५८॥ ऐसा आचार्यांचा प्रश्न । ऐकतां प्रकाशे निजज्ञान । जेवीं लागतां रविकिरण । सूर्यकांत संपूर्ण प्रभा दावी ॥५९॥ देखोनि पूर्णिमा पूर्ण चंद्र । भरितेनि खवळे क्षीरसागर । तेवीं देखोनि प्रश्नादर । ज्ञानाब्धि अपार उथळे भरितें ॥६०॥ होतां वसंताचें आगमन । कोकिळा सांडिती निज मौन । तेवीं आचार्याचें ऐकतां वचन । विसर्जी मौन यावज्जन्म ॥६१॥ कां देखोनियां नवघन । मयूर आनंदें करी गर्जन । तेवीं द्यावया प्रतिवचन । उल्हासे पूर्ण परिपूर्णत्वें ॥६२॥

आजवरचें मौन आचार्यांच्या प्रश्नामुळें त्या मुलानें सोडलें

ऐकोनि आचार्यांचें वचन । करतळामळक प्रकाशी ज्ञान ।

हातावर ठेवलेला आवळा जसा सहज पाहतां येतो, तसें अतर्क्य 'ज्ञान' त्या मुलानें सांगितलें म्हणून त्याला 'हस्तामलक' हें नांव मिळालें

यालागीं तेंचि अभिधान । हस्तामलक जाण या हेतू म्हणती ॥६३॥

हस्तामलक उवाच :-

नाहं मनुष्यो नच देवयक्षौ ।<br>
न ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्राः ।<br>
न ब्रह्मचारी न गृही वनस्थो ।<br>
भिक्षुर्नचाहं निजबोधरूपः ॥२॥

तो म्हणाला–मी कोणीहि नसून सकळसृष्टिकर्ता 'आत्मा' आहे.

हस्तामलक आपण। आपुलें स्वरूपाचें लक्षण। देहातीत पूर्णपण। स्वयें संपूर्ण सांगतु ॥६४॥ मज लोक मानिती माणुसपण। मी मनुष्य नव्हेगा आपण। मी मनुष्याचा आत्मा जाण। सबाह्य पूर्ण परमात्मा मी ॥६५॥ इंद्र चंद्र यम वरुण। मी नव्हें, देव देवी देवगण। माझेनि देवा देवपण। मी परमात्मा पूर्ण देवादिदेव ॥६६॥ विष्णु विरिंची महेश। हेहीं माझे अंशांश। मी परमात्मा परेश। जगदादि जगदीश मीचि स्वयें ॥६७॥ यक्ष राक्षस कां पिशाचक। तो मी नव्हें, त्याचा चाळक। सकळ भूतांचा मी पाळक। भूतां भूतत्व देख माझेनि अंगें ॥६८॥ मी नव्हेगा ब्राह्मणवर्ण। माझेनि ब्राह्मणां ब्राह्मणपण। मी ब्रह्मदेवों आपण। पूज्य ब्राह्मण माझेनि तेजें ॥६९॥ मी क्षत्रीय नव्हे आपण। क्षत्रियांचा प्रताप तो मी जाण। माझेनि क्षत्रियां क्षात्रपण। शौर्य धैर्य पूर्ण क्षत्रियांचें मी ॥७०॥ मज नाहीं वैश्यपण। मी वैश्यांचें निजधन। माझेनि वैश्यां वैश्यपण। मी निधिनिधान वैश्यांचें ॥७१॥ मी नव्हे गा नीचवर्ण। नीचां नीच मी आपण। मजहूनियां खालतेंपण। आनासी जाण असेना ॥७२॥ जे आतळतां भीती नारी। तो मी नव्हे ब्रह्मचारी। माझेनि ब्रह्मचर्याची थोरी। भोगुनी नरनारी नैष्ठिक तो मी ॥७३॥ जेवीं वोहरें लिहिलीं भितीवरी। तेथें मिथ्या नोवरानोवरी। तेवीं मुळीं नाहीं नरनारी। मी ब्रह्मचारी नैष्ठिक ॥७४॥

देहगेहद्रव्यदाराआसक्त । तैसा मी नव्हे गृहस्थ । देहद्रव्य-दाराअनासक्त । तो मी गृहस्थ त्रैलोक्यगृहीं ॥७५॥ वनी वसोनि वानप्रस्थ । तो मी जाण नव्हे येथ । माझेनि जनवन प्रशस्त । वनवासी विश्रांत मद्भावभावें ॥७६॥ वेदें लाविलें भिकेसी । तैसा मी नव्हें संन्यासी । नजाळूनि जाळिले सर्व कर्मांसी । नित्यसंन्यासी गृहदारीं ॥७७॥ देव मनुष्य यक्ष नव्हेसी । चारी वर्ण नव्हे म्हणसी । ब्रह्मचारी गृहस्थासी । तूं न मनिसी भिक्षुत्वें ॥७८॥

## मग माझें सांप्रतचें स्वरूप कोणतें ?

इतुकींही नहोनियां जाण । म्हणाल तूं येथ कवण । त्याही स्वरूपाचें लक्षण । ऐक संपूर्ण गुरुराया ॥७९॥ शुद्ध बुद्ध नित्य मुक्त । चिन्मात्रैक सदोदित । निजानंदें आनंदभरित । तो मी येथ निजबोधू ॥८०॥ जरी तूं निजबोध आपण । त्या निजबोधाचें लक्षण । विशद सांगावें संपूर्ण । हें मनोगत पूर्ण आचार्यांचें ॥८१॥

## श्रीएकनाथांची श्रोत्यांना प्रार्थना

त्या मनोगताचें महिमान । अतिगुह्य ब्रह्मज्ञान । साह्य सखा श्रीजनार्दन । एकाएकपणें ग्रंथार्थं आलें ॥८२॥ एका-शरण जनार्दनीं । जनार्दनचि वक्ता वदनीं । ग्रंथीं परमार्थ-भरणी । वदवी वाणी श्रीजनार्दन ॥८३॥ जनार्दनें नवल केलें । नांवासी अभंगीं ठेविलें । शेखीं नांवरूपेंसी भंगिलें । अभंग केलें अक्षर ॥८४॥

अवधानाचें महत्त्व

पुरुषेंवीण व्यर्थ वनिता। तेवीं श्रोतेनवीण जाण कथा। श्रोता जालया दुश्चिता। ग्रंथींची सुरसता विरस होय ॥८५॥ जेवीं नपुंसकाहातीं। दिधली पद्मिनी जाती। तेवीं कथेची उपहती। होय निश्चितीं श्रोतेनवीण ॥८६॥ कथेसी अवधान जीवन। तेणेंवीण ते कोरडी जाण। केवळ होय पाषाण। जें अनवधान श्रोतयांचें ॥८७॥ कथेसी अवधानाचें पेहें। तेणेंवीण तें बाळसें जाये। केवळ रोडेजली ठाये। तें पावलया होय दोंदिल ॥८८॥ दोंदिल होती पद-पदार्थ। अक्षरीं उथळे अक्षरार्थ। कथेसी वोसंडे परमार्थ। जैं सादरें संत परिसती ॥८९॥ संत केवळ ब्रह्ममूर्ती। नित्य सावधान त्यांची स्थिती। त्यासी ही म्यां केली विनंती। सावधानार्थी मुख्यत्वें ॥९०॥ संताचेनि मी ज्ञानसंपन्न। त्यासी मी म्हणें व्हावें सावधान। हें थोर माझें उद्धतपण। क्षमा पूर्ण करावी ॥९१॥ कृपेनें तुष्टले सज्जन। तुज सर्व-भूतीं जनार्दन। तेंथ परिहार आपण। वेगळेपण कां धरिसी ? ॥९२॥ जनार्दनचि स्वयें जन। हें ज्ञानाचें निजज्ञान। एका जनार्दना शरण। संत संपूर्ण तुष्टले ॥९३॥ पुढील कथा निरूपण। द्वादशश्लोकीं व्याख्यान। करतळामळक शुद्ध-ज्ञान। तें सावधान अवधारा ॥९४॥ आशंका ॥

प्रत्यक्ष देहसंबंध दिसत असल्यामुळें त्याच्या स्पष्टीकरणाची आचार्यांची अपेक्षा

प्रत्यक्ष दिसे देहसंबंधु। तो तूं म्हणविसी निजबोधु।

त्या निजबोधाचा प्रबोधु । करुनी विशदु सांगावा ।।९५।।
ऐकोनि आचार्यांचें वचन । खवळलें निजात्मगुह्यज्ञान ।
उल्हासें दे प्रतिवचन । स्वानंदें पूर्ण पूर्णत्वें दावी ।।९६।।

निमित्तं मनश्चक्षुरादिप्रवृत्तौ
निरस्ताखिलोपाधिराकाशकल्पः ।
रविर्लोकचेष्टानिमित्तं यथा यः
स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा ।।३।।

### हस्तामलकाचें आपण उपाधिरहित 'आत्मा' असल्याबद्दलचें सूर्याच्या दृष्टान्तानें निरूपण

चित्तचतुष्टय अंतःकरण । ग्रंथार्थी त्यासी म्हणती मन । श्रवण मनन त्वचा घ्राण । रसनेंसी जाण ज्ञानेंद्रियेंही ।।९७।। कर चरण गुद शिश्न । वाचेंसी कर्मेंद्रियें पूर्ण । मनश्चक्षुरादि भरण । याते विचक्षण बोलती ।।९८।। ज्ञानेंद्रियीं बुद्धीची वस्ती । कर्मेंद्रियीं क्रियांची स्थिती । उभययोगें कर्मप्रवृत्ती । देह वर्तती निजकर्मी ।।९९।। इंद्रियांतें चेतवी प्राण । मी आत्मत्वें प्राणाचा प्राण । यालागी मज नित्यत्व जाण । वेदु आपण स्वयें बोले ।।१००।। वेदु बोले वेदार्थु । त्यामाजी गूढ परमार्थु । मजमाजीं मृषा इंद्रियमातु । मा इंद्रियार्थु तेथें कैंचा ।।१।। प्रवृत्तीमाजील परमार्थू । इंद्रियप्रवृत्तीसि मुख्य मी हेतू । तदर्थी रविदृष्टांतु । स्वयें सांगतु अलिप्तत्वें ।।२।। रवि निजांगें लोक समस्त । नुठवूनि स्वयें उठवीत । त्या लोकव्यव-

हारा अलिप्त । स्वयें भासत साक्षित्वें ॥३॥ होतां लोकक्रियाचरण । क्रियेसी व्याप्त रविकिरण । त्या किरणासी कर्मबंधन। सर्वथा जाण लागेना ॥४॥ सूर्यकिरण कर्मी अलिप्त । मा सूर्य केवीं होय लिप्त । त्या भास्वताचा मी भास्वत । कर्म कर्मार्थ मज मिथ्या ॥५॥ 'सर्वं खल्विदं ब्रह्म'। । तेथें कोठें राहे कर्माकर्म । कर्म म्हणणें परम भ्रम । पूर्णत्वें परम परमात्मा स्वयें ॥६॥ सूर्यापासोनि आंधारा जन्म । हें बोलणें काय पावन परम । तेवीं निष्कर्म आत्मा करी कर्म । हे भ्रांती परम सत्य म्हणती ॥७॥ प्रत्यक्ष नभीं निळिमा दिसे । परी तेथे निळिमेचा लेश नसे । तेवीं आत्मत्वीं कर्म भासे । शोधीं तेथें नसे स्वधर्मकर्म ॥८॥ मी तंव केवळ आत्माराम । कर्म म्हणतां मुख्यत्वें भ्रम । मी प्रवर्तवी भ्रमात्मक कर्म । हे बोल परम काय पावन ? ॥९॥ नभ सर्वी सर्वत्र व्याप्त । व्याप्त होऊनियां अति अलिप्त । त्या नभासी मी नभातीत । शून्यत्वें तेथें शून्य कैंचे ? ॥११०॥ वस्तु वस्तुत्वें समसमान । चिन्मात्रैक चैतन्यघन । तेथें आकाश हें कल्पक वचन । शून्यत्व जाण निरासी ॥११॥

## आत्मा केवळ निष्कलंकच आहे

आत्मा चैतन्य जाण निष्कळ । त्यासी शून्यत्वाचा जाण विटाळ । नाहीं जाला अळुमाळ । शून्याचा गोंदळ देखिलाचि नाहीं ॥१२॥ वस्तू वस्तुत्वें परिपूर्ण पाही । शून्य

जन्मलें भ्रांतीच्याठायीं । क्रियाकर्म त्यामाजीं पाही । इंद्रियें तींही तेथेंचि रमती ॥१३॥ नभ इंद्रियें क्रियाकर्म । त्यांचें मूळ मुख्यत्वें भ्रम । मी तंव केवळ आत्माराम । स्वानंदें परम परिपूर्ण ॥१४॥ यालागीं निरस्तोपाधि । स्वयें बोलिले वेदविधी । त्या वेदार्थाची निजसिद्धी । ऐक त्रिशुद्धी ते ऐसी ॥१५॥ प्रपंचु येक जाला होता । हे समूळ मिथ्या वार्ता । पुढें होईल मागुता । कदा कल्पांता घडेना ॥१६॥

## देहीं असून विदेही कोण ?

प्रपंचु मुळीं जाला नाहीं । हें कळलें ज्याच्या ठायीं । जोचि देहीं विदेही । निरुपाधि पाही तो येकू ॥१७॥ ऐसी जे निजात्मसिद्धि । या नांव निरस्त उपाधी । हेंचि वेदांत वेदविधी । हेंचि उपनिषदीं निजमर्यादा ॥१८॥ स नित्योपलब्धि मी आत्मा । हेही अत्यंत स्थूल प्रमा । ब्रह्मीं ब्रह्मत्व नुरेचि ब्रह्मा । मी पूर्ण परमात्मा परिपूर्णत्वें ॥१९॥ येथ मुक्त म्हणति तेचि वेडे । ऐसें मुक्तीचें मूळ खुडे । सच्चिदानंदत्रिपुटी बुडे । सुखाचें उघडे सोलींव सुख ॥१२०॥ येणें जीवाचा जीव गेला । शब्दाच्या सेने ठाव पुसिला । रात्रीदिवसेंसि रवि निमाला । बोधाचा पाहला निजात्मबोधु ॥२१॥

## त्या बालकानें ब्रह्मज्ञान सहजपणें विशद केल्यामुळें आचार्यांना परमानंद

या परीचा मी निजबोधु । बोलिला तो केला विशदु ।

तेणें आचार्यासी परमानंदु । थोर विनोदु बाळकाचा ॥२२॥ ब्रह्मज्ञान निजप्रांजळ । बाळभाषित अतिकोमळ । तेणें आचार्यासी सुखकल्लोळ । तें देखोनि बाळ सुखमय झाला ॥२३॥ त्या आचार्यांचे स्वलीलें । पुढारें ज्ञान येणें बाळें । बोलावें अतिप्रांजळें । हें मनोगत कळलें हस्तामलका ॥२४॥ तोचि धरूनि आवांका । पुढील लावावया लापनिका । स्वयें घेऊनि आशंका । श्लोकार्थी श्लोकान्वयो लावी ॥२५॥

## आत्मा व इंद्रियें यांचा संबंध

इंद्रियांसी आत्मेन प्रवृत्ती । हें बोलावें कवणे अर्थी । स्वयें इंद्रियें निजशक्ती । कर्मप्रवृत्ति कां नव्हे ? ॥२६॥ ऐसी असतां आशंका । तेहिंविशीं उत्तर ऐका । जडत्व इंद्रियांसी देखा । आत्मा प्रकाशकां प्रकाशक स्वयें ॥२७॥ इंद्रियअधिष्ठात्री देवता । आत्मा प्रकाशे प्रकाशविता । तेथ इंद्रियांसी निजसत्ता । प्रकाशकता ते कैंची ॥२८॥

यमग्न्युष्णवन्नित्यबोधस्वरूपं
मनश्चक्षुरादीन्यबोधात्मकानि ।
प्रवर्तन्त आश्रित्य निष्कंपमेकं
स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा ॥४॥

## अग्नि व लोह यांच्या दृष्टान्तानें आत्मा 'असंग' कसा हें सांगितलें

अग्नीचें निजलक्षण । स्वस्वरूपें स्वयें उष्ण । तो त्यासी अवांतर नव्हे गुण । स्वयें आपण तेजस्वी ॥२९॥ त्या

अग्निसंगें लोहगोळ । सतेज होय अग्नि कल्लोळ । अबळा वाटे अग्नि केवळ । परि तो अग्नि जडत्वें भिन्न ॥१३०॥ तेणें लोहें लागे आगी । तें तेज नाहीं लोहाचें आंगीं । तें सामर्थ्य अग्निसंगीं । तैसीं कर्मप्रयोगी इंद्रियें ॥३१॥ तेवीं आत्मा मी ज्ञानघन । माझें स्वरूप शुद्धज्ञान । इंद्रियां केवळ जडपण । स्वतां चलन त्यां नाहीं ॥३२॥ आत्मेनि इंद्रियां चलन । तें आत्मा पावे कर्मबंधन । हें सर्वथा नघडे जाण । तें इंद्रियांचें आपण इंद्रियें भोगिती ॥३३॥ अग्निसंगें घणाचे घाये । लोहाचे केवळ लोह साहे । तेवीं सुखदु:खांचे अपाये । इंद्रियांचे स्वयें इंद्रियें सोशिती ॥३४॥ अंत:करण मनात्मक । मन तें इंद्रिय अवश्यक । त्या इंद्रियाचें सुखदु:ख । मनपणें देख मन भोगी ॥३५॥ अग्निसंगेंवीण लोह नघडे । आत्मसंगेंवीण इंद्रियें जडें । आत्मप्रभा सुख सुरवाडें । निजकर्मीं निवाडें वर्तती इंद्रियें ॥३६॥ लोह घडऊनि अग्नि न घडता । कर्में करूनि आत्मा अकर्ता । हे आत्मस्थिती स्वभावता । जाण तत्त्वतां गुरुवर्या ॥३७॥ इंद्रियें देव इंद्रियवृत्ति । आत्मप्रभा प्रकाशती । यस्य भासा सर्वमिदं विभाति । विश्वाची स्फूर्ती चित्सत्ता स्फुरे ॥३८॥ इंद्रियें प्रकाशरूप होतीं । तरी प्रेतदेहीं प्रकाशती । इंद्रियें चित्सत्ता प्रकाशती । तो मी चिन्मूर्ती चिदात्मा ॥३९॥ हें इतुकेंही व्याख्यान । साधकवृत्तीचें साधन । मजसी इंद्रियां सत्यपण । कल्पांतीं जाण असेना ॥१४०॥ जेवीं घृताचिया कणिका । घृतेंसी नव्हती आणिका । तेवीं इंद्रियां आणि

व्यापका । वेगळीक देखा असेना ॥४१॥ जैसी प्रभेची दीपकळा । दीपु प्रभेसी जिव्हाळा । तैसा इंद्रियांचा सोहळा । शोभे स्वलीळा आत्मत्वें ॥४२॥ जैसे जळीचे जळतरंग । जळीं वर्तती अनेग । तेवीं इंद्रियांचे विभाग । चित्सत्ता सांग चैतन्यें क्रीडती ॥४३॥ इंद्रियें ज्ञानें नित्य वर्तती । तें ज्ञान ज्ञाते न मनिती । अहेवा रांडवापण भोगिती । तेवीं ज्ञाते होती अज्ञान ॥४४॥ भ्रतारशेजे निजोनि नारी । स्वप्नवैधव्यें शंख करी । भ्रतार तिसी पुसें जरी । सांगे ते तरी मी रांडेलें ॥४५॥ पतिसन्मुख बैसोनि जाण । म्हणे आजि चुडियासि पडलें खान । बापु भ्रमाचें महिमान । ऐसेचि सज्ञान जल्पती ॥४६॥ मी अज्ञान म्हणवितां । म्हणे तो जाला निखळ ज्ञाता । तेचि न मनिती तत्वतां । विकल्पता विटंबु ॥४७॥ जे न मनिती इंद्रियज्ञान । त्यांसी जन मानिती सज्ञान । बापु विकल्पाचें विंदान । ज्ञातें अज्ञान दृढ केलें ॥४८॥ उंसाचे सेंडा येईल फळ । जो म्हणे तो नाडला केवळ । उंस सर्वांगें सफळ । तेवीं इंद्रियीं सकळ निजज्ञान नांदे ॥४९॥ यालागीं इंद्रियप्रवृत्तीं । माझी डंडळीना आत्मस्थिती । इंद्रियें आलिया निवृत्ती । माझिये निजस्थिती लाभ काय ॥१५०॥ मृगजळ जेथें आटलें । तेथें केवळ कोरडें जालें । मा होतें जेव्हां भरलें । तेव्हां तरी वोलें करूं शकतें कां ? ॥५१॥ तेवीं इंद्रिय प्रवृत्ती निवृत्ती । हे भ्रांताची मुख्य भ्रांती । मी निष्कंप निजमूर्ती । भ्रांती विश्रांती मज नाहीं ॥५२॥ निष्कंप पदाचें

निरूपण । त्याचें हें निज व्याख्यान । प्रपंच परमार्थी स्थिती समान । हे मुख्य ज्ञान सज्ञानाचें ॥५३॥ सनित्योपलब्धि मी आत्मा । ये भूमिके हें गौण प्रमा । मीं परमात्म्याचा निजात्मा । परापर महिमा मजमाजीं नाहीं ॥५४॥ येथें मीतूंपणा बोळवण । ज्ञानाज्ञानाची उजवण । परापराचें विसर्जन । तें मी परिपूर्ण गुरुवर्या ॥५५॥ ऐकोनी बाळकाची वदंती । आचार्यासी परम प्रीति । सुखावोनि पुढत पुढती । त्याची ज्ञानोक्ति परिसोनि पाहे ॥५६॥ हें जाणोनि बाळक । जेणें आचार्य पावे सुख । तें वदावया ज्ञानार्थ चोख । लापनिका देख स्वयें बोलवी ॥५७॥ आत्मा निष्कंप अवघा एक । ऐसें बोलिले निज निष्टंक । तेथें एका सुख एका दुःख । विषम कां लोक भोगिती ॥५८॥

'आत्मा' जर निष्कंप आहे, एकच आहे तर सर्व लोक सुखीच असावयास पाहिजेत; परंतु तसें दिसत नाहीं असें का ?

आत्मा स्वयें सुखसंपन्न । तैं सुखी असावे सकळ जन । आत्मा आत्मत्वें ज्ञानघन । तैं ज्ञानसंपन्न व्हावे सकळ ॥५९॥ ऐसा आशंकेचा भावो । यालागीं तेणें बाळकें पहाहो । निजज्ञानाचा निर्वाहो । निःसंदेहो श्लोकार्थें बोले ॥१६०॥

मुखा भासको दर्पणे दृश्यमानो
मुखत्वात्पृथक्त्वेन नैवास्ति वस्तु ।
चिदाभासको धीषु जीवोपि तद्वत्
स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा ॥५॥

## आरशाचा दृष्टांत

आरिसा न पाहतां पहिलें। मुख काय होतें हरपलें। मग आरिसियांत सांपडलें। तैसें नव्हे, संचले मुखीं मुख ॥६१॥ निजमुखाचें वैभव। पाहो, ऐसी बांधे हाव। ते हावेनें केलें अपूर्व। मिथ्या द्वैतभाव प्रकट दावी ॥६२॥ मज म्यां देखावें आपण। ऐसी आत्मत्वीं इच्छा पूर्ण। तेचि मुख्यत्वें माया जाण। तेंचि अंतःकरण गुणभागें ॥६३॥ तेवीं सहज आत्मस्थिती। तें आत्मत्वें स्फुरे आत्मस्फूर्ती। ते स्फूर्तीची नवल ख्याती। जीवशिवप्राप्ति नसतीचि दावी ॥६४॥ मज म्यां देखावें आपण। ऐशी आत्मत्वीं इच्छा पूर्ण। तेचि मुख्यत्वें माया जाण। तेचि अंतःकरण गुणभोगें ॥६५॥ 'एकाकी न रमते' या श्रुती। अद्वैतीं द्वैत स्फूर्ती। तेचि माया वेदोक्ति। तेचि प्रकृती शास्त्रार्थें ॥६६॥ अविद्या संत ना असंत। शेखीं नव्हे सदसंत। निजकल्पना उत्पात। अविद्या निश्चित ती नांव ॥६७॥ भलता पुसे अविद्या कोण। अविद्या मुख्यत्वें अंतःकरण। तेथें बिंबलें जें चैतन्य। 'जीव' अभिधान ये त्यासी ॥६८॥ हो कां गगनींच्या सूर्यासी। थिल्लर आणी अधोगतीसी। तेवीं नित्यमुक्त आत्म-यासी। आणि जीवत्वासी निजकल्पना ॥६९॥ जेवी अर्ध-नारी नटेश्वरीं। जो पुरुष तोचि नारी। तेवीं प्रकृती पुरुष संसारीं। एकात्मतेवरी मृषा द्वैत ॥१७०॥ आत्मा आत्मी मुळीं नाहीं। तें प्रकृती पुरुष कैंचा काई। हें नसतां आभासे

पाही। कल्पनेच्या ठायीं नटनाटच ॥७१॥ पुरुषदशा जें लपवी। तें प्रकृतीचें अंग नाचवी। प्रकृतीभागु जें लपवी। तें पुरुषाची पदवी प्रकटे स्वयें ॥७२॥ जें सोडिजे भ्रांती पडदा। तें प्रकृती पुरुषाचा धांदा। सहजें यें ऐक्यपदा। द्वैताची बाधा समूळ मिथ्या ॥७३॥ आरिसां प्रतिमुख पाहिलें। हें मज मुख दुसरें जालें। पाहात्या नाहीं ऐसें गमलें। दुजेनिसि एकलें निजमुखीं मुख ॥७४॥ मुख आरिसां नाहीं रिघाले। आरिसेनि दुजें नाहीं केलें। मुख मुखत्वें असे एकलें। येणेंही बोलें द्वैत मिथ्या ॥७५॥ आरिसां द्वैत पाहतां दृष्टीं। नमोडे अद्वैताची गोठी। तेवीं देखतां सकळ सृष्टी। अद्वैतपुष्टि अभंगु ॥७६॥ अद्वैत आत्मा अवघा एक। तरी कां दिसे सुखदु:ख। तें केवळ कल्पनात्मक। तोही ऐक विनियोगु ॥७७॥ आरिसां दिसे वर्तुळ वदन। शस्त्री भासे सलंबपण। तेंचि जळीं कंपायमान। हें त्रिविध लक्षण मुखीं नाहीं ॥७८॥ मुखीं मुख आहे निश्चळ। पदार्थभेदें त्रिविध कल्लोळ। तेवीं आत्माआत्मत्वें केवळ। सुखदु:ख सबळ गुणवृत्तिभेदें ॥७९॥ यालागी आत्म्याच्या ठायीं। सुखदु:खाचा लेश नाहीं। हें कल्पनेच्याचि ठायीं। आभासे, नाहीं जीवत्वें जीवा ॥१८०॥

## रविकिरणांचा दृष्टांत

धृत क्षीर गंगाजळ। मूत्र मद्य थिल्लर समळ। तेथें प्रतिबिंबें रविमंडळ। सकळीं सकळ आभासे ॥८१॥ रवि-

किरण पदार्थ प्रकाशी । तेणेंचि देखिजे प्रतिबिंबासी । शेखीं त्यातेंच म्हणती दोषी । पदार्थाभासीं प्रतिबिंब ॥८२॥ सुखी श्रीमंत पुण्यशील । अधम नष्ट अमंगळ । ऐसे आहाती लोक सकळ । तऱ्ही ते निर्मळ प्रतिबिंबा बिंब ॥८३॥ त्या त्या पदार्थ रसमेळें । मुख्य बिंब नाहीं भिजलें । शेखीं प्रतिबिंब नव्हेचि वोलें । मध्येचि लेपिलें पदार्थमात्रें ॥८४॥ तेवीं सुखदुःख पापपुण्य । जीवासि न लगे जाण । तें स्वयें भोगी अंतःकरण । आपुलें आपण परिकल्पित ॥८५॥ आत्मत्वाच्चिया निजलाभा । देवों न शके पुण्य शोभा । महापापाचा कदंबा । पळे उभा हरिनामें ॥८६॥ सकळ पापातें संहरी । यालागीं बोलिजे नामें हरी । पुण्यपाप तिळभरी । आत्मसाक्षात्कारीं उरेना ॥८७॥ रात्री नाहीं सूर्यासी । मा काय दिवसु उगवे त्यासी । तेवीं पापपुण्य आत्मयासी । रिगमु त्यासी असेना ॥८८॥

## आत्मा केवळ सच्चिदानंदस्वरूप

सुखदुःखातीत शुद्ध । नाहीं पुण्यपाप संबंध । तो मी केवळ निजबोध । सच्चिदानंदस्वरूप ॥८९॥ सन्निधी उपलब्धी मी आत्मा । हेंही लघुत्वाची प्रमा । जेथें ठावों नाहीं कर्मब्रह्मा । तो मी परमात्मा परात्पर ॥१९०॥ येथें वोसरे ध्येयध्यान । समरसे साध्य साधन । हरपे ज्ञाता ज्ञान । तें मी जाण गुरुवर्या ॥९१॥ ऐकतां बालकाचे बोल । आचार्यासी सुखाचे डोल । पेलती आनंदाचे पेल । ज्ञान

सखोल परिसोनी ॥९२॥ बाळपणीं ज्ञानाचा वक्ता । पुढारी याची ऐकावी कथा । आवडे आचार्यांचे चित्ता । हें जाणूनि बोलता बाळकु झाला ॥९३॥ आत्मत्वीं सुखदुःख नाहीं । तेथें बद्धता कैंची काई । बद्धतेवीण पाही । मोक्ष तोही पैं मिथ्या ॥९४॥ जेव्हां मोक्षचि जाला मिथ्या । तेव्हां मोक्षशास्त्र तेही वृथा । ते मर्यादा वेदवेदांता । होय बोलता श्लोकार्थ ॥९५॥

यथा दर्पणाभाव आभासहानौ
मुखं विद्यते कल्पनाहीनमेकं ।
तथा धीवियोगे निराभासको यः
स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा ॥६॥

दर्पण दृष्टांतें पैं मागें । जीवत्व बुद्धि कल्पनायोगें । ते बुद्धि कल्पनात्यागें । जीवत्व वियोगें ब्रह्म नित्य ॥९६॥ आरिसेनि प्रतिमुख दाविलें । तें आरिसाचें आरिसेनि नेलें । पाहतया ऐसें नाहीं जालें । कटकटा गेलें मुख माझें ॥९७॥ आरिसा येतां मुख नाहीं आलें । तो जातां मुख नाहीं गेलें । आरिसापूर्वीं जें आपलें । असें संचलें मुखीं मुख ॥९८॥ जीवत्व यावया बुद्धि कल्पना । ते जातां नेलें जीवपणा । येत्या जात्याचा जो देखणा । तो आत्मा जाणा निज नित्य ॥९९॥ जो जाणें जीवाचें आगमन । जो जाणे जीवाचें निर्गमन । जो जीवाचा जीव आपण । ज्यासी जीवपण स्पर्शलें नाहीं ॥२००॥ आपुलें मुख आहे नाहीं । हा संशयो नुपजे कांहीं । तेवीं ज्ञानाज्ञानेवीण पाही । आत्मत्व ठायीं

सदोदित ॥१॥ आपलें आपण सुख । नव्हे सन्मुख विमुख । बंधमोक्षेवीण देख । आत्मत्व चोख आत्मत्वीं वसे ॥२॥ निजसुखाची आठवण । दे ऐसें नाहीं स्मरण । निजसुखा विसरवी पूर्ण । तैसें विस्मरण जन्मलेंचि नाहीं ॥३॥ तेंवी आत्मयाच्या ठायीं । ज्ञानाज्ञान जन्मलेंचि नाहीं । तो मी आत्मा आत्मत्वें पाही । परिपूर्ण देहीं पूर्णत्वें ॥४॥ जेथें बद्धतेचें खत फाटे । मुक्ततेचें लाहणें फिटे । जीवा जीवत्व जीवींचि आटे । भेटीवीण भेटे आत्मत्व स्वयें ॥५॥ तो मी नित्योपलब्धि आत्मा । हेंही येथ सामान्य प्रमा । जेथ आटणीं कर्म ब्रह्मा । तो मी निजात्मा निजरूपें ॥६॥ जेथें मावळती गुणागुण । हारपे जीवशिवपण । तें मी ब्रह्म परिपूर्ण । सत्य जाण गुरुवर्या ॥७॥ ऐकोनि बाळकाचें ज्ञान । आचार्य सुखैकघन । पुढारें याचें बाळभाषण । कौतुकें ज्ञान ऐकावें ॥८॥ हे आचार्यांची पूर्ण बुद्धि । जाणोनियां त्रिशुद्धी । निरसावया देहात्मवादी । स्वयें उपपादी आशंका ॥९॥ बंध मोक्ष दोनी नाहीं । तें देहात्मवादु आला पाही । स्वयें निरसावया तोही । श्लोकार्थें पाही मत उच्छेदी ॥२१०॥

> मनश्चक्षुरादेर्वियुक्तः स्वयं यो
> मनश्चक्षुरादेर्मनश्चक्षुरादिः ।
> मनश्चक्षुरादेरगम्यस्वरूपः
> स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा ॥७॥

मन शब्दें अंतःकरण । चक्षु शब्दें इंद्रियें जाण । यासि

आत्मा नित्य भिन्न । तेंही लक्षण अवधारी ॥११॥ जें मनादि इंद्रियें नाहीं । तंव आत्मा आत्मत्वें पूर्ण ठायीं । मनइंद्रियें कल्पित पाही । आत्मा कहीं ते नव्हती ॥१२॥ इंद्रियातीत आत्मा पाही । हें अनुभवा ये सुषुप्तीच्या ठायीं । ते जाणती सर्व देही । आत्मा विदेही मुख्यत्वें ॥१३॥ इंद्रियें जीं कामनादि । यांची मुख्यत्वें अविद्या आदी । ते आदीची आत्मा अनादि आदी । इंद्रियोपाधी तेथ नाहीं ॥१४॥ स्वयें बोलियली श्रुती । नेह नानास्ति किंचन इति । तेथ इंद्रियें इंद्रियवृत्ति । यांची स्फूर्ती असेना ॥१५॥ इंद्रियातीत आत्मस्थिती । हा निश्चयो केला श्रुत्यर्थी । तैं इंद्रियांची जडप्राप्ती । कर्मप्रवृत्ती म्हणाल केवीं ? ॥१६॥ इंद्रियां आत्मा अधिष्ठान । आत्मेनि इंद्रियां चळण । यालागीं अंतर्यामी जाण । बृहदारण्य स्वयें बोले ॥१७॥ देहासी चाळक प्राण । आत्मा प्राणाचाही प्राण । यालागीं इंद्रियचळण । आत्मसत्तां जाण होतसे ॥१८॥ प्राण चाळक इंद्रिय पुष्टी । यालागीं तो लक्षे स्थूलदृष्टी । आत्मा प्राणाच्याही पोटीं । तो इंद्रिया दृष्टीं लक्षेना ॥१९॥ जड चुंबकसन्निधान । लोह करी सचेतन । तेवीं आत्माही जड जाण । इंद्रियें आपण सन्निधीं चळती ॥२०॥ जड चुंबकाची प्राप्तता । लोहे पावती स्वभावता । तेवीं इंद्रियांचे निजसत्ता । आत्मा तत्त्वतां पावेना ॥२१॥ आत्मा जड नव्हे निरुपम । ज्ञानघन पूर्ण ब्रह्म । मनश्चक्षुरादिकां अगम्य । आत्माराम आत्मत्वें ॥२२॥ आत्मा अंतर्यामी

पूर्ण । तैं त्यांचे देहीं अवसान । तेव्हां तो जाला परिच्छिन्न । व्यापकपण असेना ॥२३॥ आत्म्याचे देहीं अवसान । हें बोलणें स्थूळ जाण । आत्मा देहीं सबाह्यपूर्ण । हें निरोपण बृहदारण्यीं ॥२४॥ निवारावया आशंकेचा भावो । मनश्चक्षुरादेर्वियुक्तः स्वयं यो । हाचि धरूनि पदान्वयो । स्वात्मत्व पहाहो पूर्ण दावी ॥२५॥ आत्म्याचें निजनित्यत्व । व्याप्य भेदेंवीण व्यापकत्व । देहीं असोनी अलिप्तत्व । हें अतिगुप्तत्व प्रतिपादी ॥२६॥ चाळूनिया इंद्रियवृत्ती । आत्मा अलिप्त देहस्थिती । हें बृहदारण्यक श्रुती । तेहि उपपत्तीं विशद ऐका ॥२७॥ डोळ्यांमाजीं मी अभंग । डोळा तोहि माझें अंग । डोळा माझेनि देखणा चांग । डोळ्यासि मी सांग न दिसे तो आत्मा ॥२८॥ श्रवणीं माझें अधिष्ठान । श्रवण माझें शरीर जाण । माझेनि श्रवण सावधान । श्रवणें मी पूर्ण जाणवेना ॥२९॥ घ्राणामाजीं मी आपण । घ्राण माझें शरीर जाण । माझेनि घ्राणा गंध ग्रहण । घ्राण आपण मज नेणे ॥२३०॥ रसनेमाजीं मी परिपूर्ण । रसना माझें सर्वांग जाण । माझेनि रसना सज्ञान । माझें गोडपणा रसना नेणे ॥३१॥ रसना फळरसु सुखें खाये । हृदयीं गोडी जे जडली ठाये । ते रसना जैं चाखों लाहे । तैं विरक्तीं होय रसविषयीं ॥३२॥ त्वचे सबाह्य मी परिपूर्ण । त्वचेची त्वचा मी आपण । माझेनि त्वचेसी स्पर्शज्ञान । माझें स्पर्शन त्वचा नेणे ॥३३॥ माझेनि सदा सार्थक होत । हस्तक्रिया

मी समस्त । हाताचे मी निजहात । हातीं इत्थंभूत न धरवे मज ॥३४॥ मी असें मनुष्याचे हातीं । तेचि मज हातीं न धरिती । आयुष्य गेलें हातोहातीं । हेंहि नेणती देहलोभें ॥३५॥ चरणा अचरणा निर्गती । चालीची चाली मी निश्चितीं । चरणचालीं माझी प्राप्ती । नव्हे कल्पांतीं परिभ्रमतां ॥३६॥ जे स्वयें गतीची निजगती । तेचि पावती अवगती । आपली आपण न पाहे गती । यालागीं भोगिती जन्ममरण ॥३७॥ वाचा माझेनि सदा सधर । वाचेमाजीं मी अक्षर । अक्षरचि म्हणती क्षर । ज्ञानगर्वित नर देहाभिमानें ॥३८॥ करूनियां पत्रावलंबन । परीक्षा म्हणती माझें ज्ञान । हें ज्ञान कीं ज्ञानाभिमान । अतर्क्य चिन्ह लक्षेना ॥३९॥ धरूनियां शब्दज्ञान गोडी । जो ज्ञानगर्वाची उभवी गुढी । तो ज्ञानें घेतला तोंडीच्या तोंडी । जो जीविका मांडी ज्ञातेपणें ॥२४०॥ बापु बळी देहाभिमान । वृथा केले सज्ञान । ज्ञातेचि केले अज्ञान । आम्ही सज्ञान ज्ञानविक्रयी ॥४१॥ मी शब्दाआंतु बाहेरी । शब्दशोभा माझेनि खरी । तो मी नातुडें शब्दांतरीं । वेद-शास्त्रीं शिणतांही ॥४२॥ लिंग माझें निजलिंग । लिंग तेंहीं माझें निजांग । माझेनि लिंगा सुखभोग । लिंगभोगें सांग मी नातुडें ॥४३॥ गुह्यीं अक्षरत्व अक्षरस्थिती । गुह्यीं गुह्याची निजवस्ती । गुह्यीं निजगुह्य नेणती । त्यां नरक प्राप्ति नीच नवी ॥४४॥ मनाचें मी अमन मन । मना माझेनि शीघ्र गमन । माझेनि मन सुखसंपन्न । मजमाजीं मन मृगजळप्राय

॥४५॥ मी मनामाजीं असें सांग । मन तें माझें निजांग । माझेनि मना चळण चांग । मना माझेनि योगें योग्यता ॥४६॥ चित्ता सबाह्य माझी वस्ती । चित्त चिंतना माझेनि स्फूर्ती । चित्ताचे चिंतन स्थिती । माझिये प्राप्ति अप्राप्ति चित्त ॥४७॥ मी अभिमानाचा अभिमान । अभिमान माझें निजज्ञान । अभिमानाचें जें ज्ञान । तें तें अज्ञान मत्प्राप्तीं ॥४८॥ जेवीं जळाची जळगार । कठिण दिसे परी तें नीर । तेवि मजमाजीं अहंकार । जाण चिन्मात्र सोहंभावें ॥४९॥ बुद्धीची मी अनादिबुद्धी । बुद्धीसी मी निश्चयसिद्धी । माझेनि बुद्धीसी शुद्धी । बुद्धी निश्चयविधीं नातुडें मी ॥२५०॥ बुद्धी निश्चय प्रमाण प्रमा । करिजे ऐसा नव्हे आत्मा । तो प्रकृतिपर आत्मा । अतीत रूपनामा अद्वयत्वें ॥५१॥ मनश्चक्षुरादेर्वियुक्तः स्वयं यो । हाचि धरूनि अन्वयो । इंद्रिय कर्माचा निर्वाहो । अंतरात्मा पाहाहो करूनि अकर्ता ॥५२॥ ऐकें अंतरात्मलक्षण । तो इंद्रियां-सबाह्य परिपूर्ण । करूनि इंद्रियाचरण । अलिप्त आपण कर्माकर्मीं ॥५३॥ ऐसा अलिप्त कर्माकर्मा । जो नातळे देह-धर्मा । तो मी नित्योपलब्धि आत्मा । श्रुती उपरमा पावती जेथें ॥५४॥ येथें अहमात्मा पुसे कोण । ब्रह्मीं नाठवे ब्रह्म-पण । जेथें दर्शना बुझावण । तो मी पूर्ण परमात्मा ॥५५॥ सुटंक ज्ञानाची ज्ञानोक्ती । बाळपणीं अनुभवख्याती । देखोन आचार्य चित्तीं । सुखस्थितीं सुखावे ॥५६॥ पढियंत्याची गोड कथा । कां बंदीजन शौर्य वर्णितां । ऐकिलें पुनः पुनः

ऐकतां। ऊबग चित्ता उपजेना ।।५७।। तेवीं बाळकाची ज्ञान-
कथा। ऐकिलीची ऐकतां। धणी नपुरे आचार्याचे चित्ता।
पुढेंही तत्त्वतां ऐकों इच्छी ।।५८।। तें जाणोनि मनोगत।
पुढील कथा श्लोकार्थ। बाळकें योजिला अर्थयुक्त। अन्वयार्थ
साधुनी ।।५९।। मनश्चक्षुरादेरगम्य। इंद्रियां आत्मा दुर्गम।
येणें नास्तिकाचा मनोधर्म। आत्मत्वीं परम अभवो ह्मणती
।।२६०।। आत्मा दृष्टीं नाहीं देखिला। श्रवणीं नवचे ऐकिला।
रसनें नाहीं चाखिला। त्वचेनें स्पर्शला नवचे आत्मा ।।६१।।
घ्राणें नाहीं अवघ्राणिला। वाचेसि नाहीं बोलवला। हातें
नाहीं धरवला। बुद्धीं नेमिला नवचे आत्मा ।।६२।। आत्मा
मनें नाहीं कल्पिला। चित्तेन नाहीं चिंतवला। अहंकारें नवचे
बांधला। बुद्धीनें नेमिला नवचे आत्मा ।।६३।। विवेकें पाहतां
पाही। आहे ह्मणे, परी नेणें तोही। आत्म्यासी गांव ठाव
कोठेंही। परिसिला नाहीं नेमस्त ।।६४।। नाहीं देहादि आवेव।
नाहीं गुण कर्म रूप नांव। आत्म्यासी नाहीं जीवभाव। तेव्हां
आला भाव वेदांतमतें ।।६५।। आत्म्याचें असतेपण। शोधितां
नलभे आन प्रमाण। यालागीं आत्माचि नाहीं जाण। मिथ्या
पूर्णपण स्थापिती त्यासी ।।६६।। आत्मा जरी सत्य असता।
तरी कोठेंतरी कांहीं दिसता। हे समूळ मिथ्या वार्ता। आत्मा
तत्त्वतां असेना ।।६७।। त्रिभुवनाच्या ठायीं। वंध्यापुत्र न भेटे
कहीं। आत्माही तैसाचि नाहीं। मतवादी पाही बोलती
।।६८।। ऐसें नास्तिकवादियांचें मत। तें खंडावया समस्त।
दृढ स्थापावया वेदांत। स्वयें श्लोकार्थ बाळक बोले ।।६९।।

य एको विभाति स्वतःशुद्ध चेताः ।
प्रकाशस्वरूपोऽपि नानेव धीषु ।
शरावोदकस्थो यथा भानुरेकः ।
स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा ॥८॥

## आत्मा स्वप्रकाशमान आहे

आत्मा येकु येकपणेंविण । येकु म्हणावया म्हणतें कोण । अद्वैतीं ये परिपूर्ण । स्वप्रकाशघन निजतेजें ॥२७०॥ सूर्य जगाची वर्तवी स्थिती । आत्मप्रभा सूर्याची गती । यालागीं स्वप्रकाशमूर्ती । जाण निश्चतीं परमात्मा ॥७१॥ एवं आत्मा स्वप्रकाशमान । चिन्मात्रैक चैतन्यघन । तो न देखिती नास्तिकजन । नास्तिकें पूर्ण निजांध ॥७२॥

## विषयासक्त, अज्ञानी व नास्तिक यांना आत्मदर्शन होत नाहीं

गर्भांध जन्मलें जिच्या कुशीं । अखंड प्रतिपाळिलें त्यासी । तरी तें न देखे मातेसी । तेवीं अज्ञानासी निजात्मा ॥७३॥ नास्तिक निंदक दुर्जन । ज्ञानगर्वी विकल्पी जन । त्यांचे अंगीं देहाभिमान । त्यांसी आत्मदर्शन कदा न घडे ॥७४॥ ज्यांसी अति ममता चित्तीं । ज्यांची द्रव्यदारा आसक्ती । त्यांसी निजात्मप्राप्ती । नव्हे कल्पांतीं निश्चित ॥७५॥ आरिसां उपलब्धि तवां मसी । एकी जाती तय्याआरिशासी । तेवीं चित्तशुद्धि परमार्थासी । विकल्पवंतासी अभावो ॥७६॥

## चित्तशुद्धीची अत्यावश्यकता

याचिलागीं चित्तशुद्धी । वेद मुख्यत्वें प्रतिपादी । चित्तशुद्धीवीण त्रिशुद्धी । निजात्मसिद्धी नपविजे ॥७७॥ नित्यानित्यविवेकव्युत्पत्ती । इहामुत्रफळ भोगविरक्ती । शमदमादि संपत्ती । अढळ चित्तीं दृढ होआवी ॥७८॥ येही अवस्थांवरुती । निश्चयें वांछी निजमुक्ती । ती नांव मुमुक्षा म्हणती । चित्तशुद्धी चित्तीं मुमुक्षत्वें हे ॥७९॥ हे अटक वाटे भलत्यातें । याहोनि सोपारी येथें । चित्तशुद्धी परमार्थें । सुलभ सर्वार्थें कत्यीसी सांगे ॥२८०॥ द्रव्यदारा आसक्ती । निःशेष नाहीं ज्याचे चित्तीं । हेंचि चित्तशुद्धी निश्चितीं । निजात्मप्राप्ती येणें सिद्ध ॥८१॥ चित्तशुद्धीस कारण । रिघावें सद्‌गुरूसी शरण । त्या सद्‌गुरूचेंही लक्षण ऐक संपूर्ण सांगेन ॥८२॥

## सद्‌गुरूचें लक्षण

घरोघरीं गुरु आइते । सर्वी आहेत सर्वार्थें । परी सद्‌गुरु म्हणणें ज्यातें । ऐक निश्चितें सांगेन ॥८३॥ ज्यासी गुरुत्वाची नाहीं चाड । ज्यासी ज्ञानगर्व नाहीं वाड । ज्यासी लौकिकाचें नाहीं कोड । सद्‌गुरु दृढ तो एकू ॥८४॥ ज्यासी अपेक्षेची नाहीं हांव । जो निरपेक्ष नित्यभरीव । जो गुरुत्वाचे न साहे नांव । तो स्वयमेव सद्‌गुरु ॥८५॥ जो आपुलें न देखे श्रेष्ठपण । शिष्य कनिष्ठ न मनी आपण ।

जो शिष्यासी मानी ब्रह्म पूर्ण। तो सद्‌गुरु जाण सत्यत्वें ॥८६॥ जो पुत्राहूनि अधिकता। शिष्यासी मानी निजात्मता। ज्यासी शिष्यापेक्षेची नाहीं ममता। सद्‌गुरु तत्त्वतां तो एकू ॥८७॥ आपला शिष्य आपणा देखतां। जाला अन्योपदेश घेता। तरी द्वेषीना उभयतां। मुख्य परमार्थी सद्‌गुरु तो ॥८८॥ जो शिष्याची न धरी चाड। शेखीं शिष्यही करी निचाड। ज्याचें बोलणें अति गोड। ते गोडी करी दुधड गुरुशिष्यत्वा ॥८९॥ ज्यासी जीवत्व नाहीं शरीरीं। शेखीं शिष्यातेंही जिवें मारी। जो एकत्वें देखे नरनारी। तोची संसारीं सद्‌गुरु ॥२९०॥ जो भेटतांच शिष्या सुखी करी। शेखीं सद्‌गुरुत्व नेघे शिरीं। ज्यासी बळेंचि गुरुत्वें वरी। सद्‌गुरु संसारीं तो एकू ॥९१॥ शोभवितां क्षोभका स्थिती। क्षोभेना ज्याची चित्तवृत्ती। ज्याच्या अंगीं अढळ शांती। सद्‌गुरु निश्चितीं तो जाण ॥९२॥

## सद्‌गुरूच्या ठिकाणीं देहबुद्धीनें पहाणें म्हणजे अज्ञान व्यक्त करण्यासारखेंच आहे

ऐसें सद्‌गुरूचें लक्षण। जैं शिष्य मानी माणुसपण। तैं परमार्थाचें जन्म जाण। सटवलें पूर्ण देहबुद्धीं ॥९३॥ साधकें आपुल्याठायीं। देहबुद्धी धरूं नये कहीं। तें जं देखे सद्‌गुरूच्या ठायीं। तैं पडिला अपायीं परमार्थ ॥९४॥ सर्वभूतीं भगवद्भावो। हा ज्ञानाचा निज निर्वाहो। तेथें सद्‌गुरुदेहीं अभावो। धरी तो पहाहो अति अभाग्य ॥९५॥ 'शिवो भूत्वा

शिवं यजेत्' । ये श्रुतीचा हाचि अर्थ । स्वयें भाविता ब्रह्मभूत । ब्रह्मत्व प्राप्त स्वत:सिद्ध ॥९६॥ ब्रह्म स्वयें आपण आहाती । शेखीं ब्रह्म ह्मणतां बिहिती । बापु विकल्पनेची ख्याती । संशयें जाती अध:पाता ॥९७॥ वोसरोनी मुसें मेण । जेवीं रसु वोती संपूर्ण । तेवीं सद्गुरूचा देह जाण । ब्रह्मरस परिपूर्ण वोतीव ॥९८॥ सुवर्णाचें पेंडुकें केलें । तें दगडपणा नाहीं आलें । तेवीं सद्गुरुस्वरूप साकारलें । नाहीं भंगलें परब्रह्म ॥९९॥ जेवीं जळाची जळगार । गोठोनि दिसे साकार । परी ते केवळ नीर । तेवीं सद्गुरुशरीर परब्रह्म ॥३००॥ सद्गुरु तोचि परब्रह्म । ऐसा ज्याचा भावो परम । त्याचेनि कर्म होय निष्कर्म । तो अक्षर नि:सीम क्षरत्वेंसी॥१॥

## गुरूवांचून साधन व्यर्थ आहे

'आचार्यवान् पुरुषो वेद' । हें वेदवचन प्रसिद्ध । गुरुवांचोनि चित्तशुद्ध । निजात्मबोध कदां नव्हे ॥२॥ गुरुवांचोनि तत्त्वतां । न करी व्रता तपा तीर्था । गुरूवांचोनि सर्वथा । देवादेवता भजेना ॥३॥ जो गुरु आज्ञा नित्यविरक्त । जो गुरुनाम नित्य स्मरत । ज्यासी गुरुसेवा नित्य व्रत । तो नित्यमुक्त निजदेहीं ॥४॥ भागवतीं मुख्य महिमा । शिष्यें भजावें गुरुदेवतात्मा । येणेंचि निर्मुक्ती कर्माकर्मा । गुरु गरिमा अगाध ॥५॥

आशंका वेदोक्त--

यज्ञेन दानेन तपसा सिद्ध्यंति अनाशकेन यजन्ति ॥

सद्‌गुरु कर्मबंधवांत टाकीत नाहीं

यज्ञदान तपादि पदवी । सद्‌गुरु न भेटतां पूर्वी । गुरू सर्वथा कर्मी न गोंवी । सद्‌गुरु स्वभावी निष्कर्मदाता ॥६॥ बुडत्याचे माथां पाषाण । दिधल्या तारक म्हणे कोण । तेवीं कर्माकर्मी जो निमग्न । त्यासी कर्मबंधन गुरु न लवी ॥७॥ जेणें कर्में कर्मबंध छेदी । ऐसी युक्ती गुरु प्रबोधी । परी कर्मवंता जडबुद्धी । गुरु त्रिशुद्धी बोधीना ॥८॥ कर्माकर्माची अत्यंत खंती । येणें संतापे अनुतापवृत्ती । तेचि सद्‌गुरूसी शरण येती । गुरुकृपा प्राप्ती निष्कर्मसिद्धी ॥९॥ नैष्कर्म्यसिद्धी परम । गीतार्थ बोधी पुरुषोत्तम । येथ कैंचें कर्माकर्म । जें मरणजन्मदायक ॥३१०॥

सद्‌गुरु कर्मभ्रम दूर करतो

सद्‌गुरूसी रिघतां शरण । जन्मेंसी मरणा ये मरण । कर्मचि ब्रह्म होय पूर्ण । संसारु आपण परब्रह्मचि होय ॥११॥ जे दिवशीं देह जन्मलें । तेंचि कर्माकर्म भागा आलें । तेव्हां कर्माचें मूळ देह जालें । तें गुरूनें केलें अतिमिथ्या ॥१२॥ ब्रह्मीं कर्म न रिघे कहीं । वेगळें असावया ठाव नाहीं । तें रज्जुसर्पन्यायीं । समूळ पाही अतिमिथ्या ॥१३॥ केवळ जें परब्रह्म । त्यासी भ्रांतिभ्रमें म्हणती कर्म । जेवीं दोरातें परम । सर्प दुर्गम मानिती ॥१४॥ एवं इत्यादि कर्मभ्रम । त्याचें उरों नेदी रूप नाम । हे सद्‌गुरुकृपा परम । स्वयें पुरुषोत्तम बोलिला ॥१५॥

या संबंधीचा श्लोक –

भिद्यते हृदयग्रंथिश्छिद्यंते सर्वसंशयाः।
क्षीयंते चास्य कर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे ।।

एवं सद्‌गुरूच्या निजबोधीं । लिंगदेहाची ग्रंथी छेदी । सकळ संशयांतें उच्छेदी । कर्माची अवधी समूळ उमळी ।।१६।। कर्माचें मूळ मुख्य देह । सद्‌गुरु देह करी विदेह । तेथ नाहीं कर्माकर्म संदेह । निसंदेह निजदेहीं।।१७।।वांझेचे पुत्राचा विवाहो । नेणा साच जाणा वावो । यापरी कर्माचा निर्वाहो मुक्तासी पहाहो अतिमिथ्या ।।१८।। यापरी जीवन्मुक्त । इंद्रियकर्मीं क्रियायुक्त । देह गेहीं नित्य वर्तत । देहगेहातीत निष्कर्म धर्म ।।१९।। त्यासिही स्त्रीपुत्र असतां । माझें तुझेंही म्हणतां । साधक बाधक स्फुरे स्फूर्तता । तेणेंसी वर्तता नित्यमुक्त ।।२०।। देहीं वर्तती जीवें जीवत्व । इंद्रियकर्मीं क्रियायुक्त । ते नव्हती जीवन्मुक्त । मेल्या निश्चित मुक्त होती ।।२१।। ऐसा आशंकेचा भावो । हा मूर्खाचा मूर्खान्वयो । मुक्तांचा निजानुभावो । लोकदृष्टीं पहाहो लक्षेना ।।२२।। परमात्मा स्वयें स्वसंवेद्य । बाह्या उभउनी गर्जे वेद । एकात्मता निजबोध । परमानंद अद्वयत्वें ।।२३।। आत्मानुभव डोळां दिसे । तें चित्तशुद्धी कोण पुसे । गुरु-शिष्यत्वाचें पिसें । अति आक्रोशें कोण सोसी ।।२४।।

### आत्मानुभव सहजसाध्य नाहीं

आत्मानुभव जाला ज्यासी । तो लोभें न देववे स्त्री-पुत्रांसी । ठेऊं न शकवे मित्रापासीं । मायबापांसी न सांगवे

॥२५॥ आत्मानुभव नव्हे मिरासी । जे वाटां लाभे गोत्रजांसी । हा लाहाणा विरक्तासी । जे देहलोभासी सांडिती ॥२६॥ वाळुवंटीं सांडिली साखर। तेथ झारे सोवनी सोनार। निवडूं आल्याही चतुर। अणुमात्र निवडेना ॥२७॥ तेवीं साधावया ब्रह्म पर। वेदशास्त्रीं शाब्दिक नर। उहापुह निज विचार। करितां चिन्मात्र लक्षेना ॥२८॥ वाळुवंटींची साखर। निवडावया मुंगी चतुर । तेवीं नैराश्य विरक्त नर। ब्रह्म परात्पर स्वयें होती ॥२९॥ मुँगी लहान जगा–माझारीं। ते मुळींहूनि चढे वृक्षपर्णाग्रीं। तेवीं अकिंचन जन संसारीं। ब्रह्म साक्षात्कारीं परब्रह्म ॥३३०॥ पिपीलिकागती म्हणती दुरी। विहंगमगती ते झडकरी। पिपीलिका चढे पर्णाग्रीं। विहंगु त्यावरी राहोंही नशके ॥३१॥ मुंगीहोनि होती सान। ते स्वयें होती ब्रह्मपूर्ण। येर जे शब्द पांडित्य सज्ञान। त्यास हें स्थान ठाकेना ॥३२॥

## सर्वांभूतीं विनम्रता असेल तरच आत्मानुभव शक्य आहे

अवघ्यातळीं राहिजे। जगाधाकुटें होइजे। नीचाचे टोले सुखें साहिजे। तैं लाहिजे आत्मत्व ॥३३॥ ऐसी जिता नव्हे प्राप्ती। मेल्या मागें होय मुक्ती। तैं श्वानसूकरादि मरती। त्यांसिही मुक्ती कां न मना ॥३४॥ मेल्या मागें ब्रह्मप्राप्ती। हे जैं सत्य मानावी युक्ती। तैं जे जे प्राणी मरती। ते ते मुक्त होती अनायासें ॥३५॥ येणेंचि देहें जिता आपण। ब्रह्मसुखें सुखीं नव्हा पूर्ण। तैं भोगत्याग निर्द्वंद्वबाण।

वृथाचि कोण सोशील ॥३६॥ सांडूनियां राज्य संपत्ती येणेंचि देहें जीवन्मुक्ती । पृथुपुरूरवादि चक्रवर्ती । नेणों किती पावले ॥३७॥ शुक आंबरीष प्रल्हाद । जीवन्मुक्त मुनी नारद । ज्यासी कलहामाजीं आल्हाद । परमानंद भंगेना ॥३८॥ उत्तानचरणाचें तान्हें बाळ । बाळपणीं अतित्यागशीळ । पावला भक्तीचे कल्लोळ । ध्रुव जाला अढळ अढळपदीं ॥३९॥ वसिष्ठमुनी ब्रह्मऋषी । जो रामातें उपदेशी । तोचि कुलगुरु सूर्यवंशीं । जीवन्मुक्तीसी उपदेष्टा ॥३४०॥ तो म्हणे वर्ततां देहस्थितीं । इंद्रियें वर्तता विषयार्थी । कदा भंगेना जीवन्मुक्ती । हें बोलिला ग्रंथीं वासिष्ठीं ॥४१॥

वसिष्ठ उवाच–

येन शब्दं रसं रूपं गंधं जानासि राघव ।
तमात्मानं परंब्रह्म जानीहि परमेश्वर ॥१॥

## आत्म्याचें व्यापकत्व

आत्मा शब्दीं शब्दार्थता । तोचि जाणा वाचेचा वक्ता । तोचि अक्षरीं अक्षरता । हे नित्यमुक्तता वचनाची ॥४२॥ आत्मा रसीं रसस्वादता । तोचि रसनें रसज्ञता । तोचि भोक्तयाचा निजभोक्ता । यापरी मुक्तता रसभोगीं ॥४३॥ आत्मा दृष्टीचा निजदेखणा । तोचि दृश्य प्रकाशी जाणा । दृष्टिदृश्य अभेदपणा । हे मुक्तता जाणा दृष्टीची ॥४४॥ आत्मा गंधाचा निजगंध । तोचि घ्राणीं गंधोद्बोध । भोक्ता आत्मेन भोगी सुगंध । एवं मुक्त सुगंधग्रहणीं ॥४५॥

आत्मेनी श्रवणीं श्रवणता । तोचि वक्त्याचें ठायीं वक्ता । शब्दीं जाणोनि शब्दता । हा जीवन्मुक्ता निजभोगू ॥४६॥ आत्मा व्यापकू कायेसी । तोचि स्पर्शातें प्रकाशी । आत्मत्वें दोहींतें समरसी । यापरी मुक्ता निजात्मस्पर्शू ॥४७॥

### आत्मौपम्यबुद्धीमुळें जीवन्मुक्तानें बाह्यतः विषयोपभोग घेतले तरी त्याची जीवन्मुक्तस्थिति बदलत नाहीं

स्त्रीदेहीं पाहतां पाही । आत्मावांचूनि आत्मी नाहीं । तोचि सबाह्य पुरुष देहीं । येर तिच्या ठाईं रतिसुख लेपे ॥४८॥ या प्रतीति प्रिया आलिंगिती । तेणें आलिंगें चिदात्मशक्ती । दैवें जाल्या संतती । तयेंही प्रतीति निजात्मता ॥४९॥ 'आत्मावैपुत्रनामासी'। हे श्रुती सत्य जीवनमुक्तासी । भंगु नव्हे ब्रह्मचर्यासी । यावज्जन्मेंसी नैष्ठिक ॥३५०॥ यापरी विषयासक्ती । करितां न भंगे जीवन्मुक्ती । हे वसिष्ठाची परमख्याती । श्रीरामाप्रती उपदेश ॥५१॥ जेणें सुखावे विषयधर्म । जेणें कळे कर्माकर्म । जेणें जाणिजें तें परब्रह्म । हें जाणे वर्म रघुवीर ॥५२॥ हे वसिष्ठाची निजस्थिती । देहीं वर्तता नित्यमुक्ती । येथ आणिकाची एक युक्ती । जीवन्मुक्ती तटस्थ ॥५३॥ जीवन्मुक्तत्व तटस्थस्थिती । वृक्ष कां पां मुक्त नव्हती । पाषाण कां जड म्हणती । त्यांचीही मुक्ती कां न म्हणा ? ॥५४॥

### याला अर्जुनाचें उदाहरण

अर्जुना बोधुनी ब्रह्मबुद्धी । सर्वेंचि घातला निर्वाणयुद्धीं ।

परी कृष्णकृपानिधी । तटस्थ त्रिशुद्धी न करीच ॥५५॥ नाहीं स्थानशुद्धी चोखट । सैंघ रथांचे घडघडाट । थोर युद्धाचा कडकडाट । परी ब्रह्मनिर्दिष्ट प्रबोधी कृष्ण ॥५६॥ बाप सद्गुरु कृपापूर्ण । युद्धीं डंडळीना ब्रह्मज्ञान । हें गुरुकृपेचें महिमान । संतसज्जन जाणती ॥५७॥ हरिखाच्या लवलाह्या । श्रीकृष्ण उभउनी बाह्या । बोले मास्थिता जनकादयः । देहीं विदेहा वर्तता मुक्ती ॥५८॥ येचि अर्थीं वेदींची श्रुती । ब्रह्मविद् ब्रह्म आप्नोति । तें सत्य केलें अर्जुनाप्रती । स्वयें श्रीपती वेदार्थें ॥५९॥ जेणें जाणितलें ब्रह्मज्ञान । तो देहइंद्रियांसी ब्रह्म पूर्ण । हें जनकादिकीं प्रमाण । गीतेसी श्रीकृष्ण बोलोनि दावी ॥३६०॥ ब्रह्मज्ञान नवें उपजत । हे बोलणें अतिअयुक्त । ज्ञान अज्ञानातें निरसित । ब्रह्म सदोदित स्वतःसिद्ध ॥६१॥ वायु आभाळातें दवडी । परी सूर्य नवा न घडीं । तेंवि ज्ञान अज्ञानातें तोडी । आत्मा निवडी स्वतःसिद्ध ॥६२॥ सूर्यें जगाचा कवडसा उडे । तमनिरासे दृष्टी उघडे । अभ्रादिकीं छाया पडे । तेणें न घडे दृष्टिरोधू ॥६३॥ ज्ञानें अज्ञान मात्र झडे । आत्मतत्त्व तें रोकडे । इंद्रियकर्म करितां रोकडें । अज्ञान उडे अविद्येंसी ॥६४॥

आशंका :

जेथ अविद्या नासोनि जाय । देह तेंहि तिचेंचि कार्य । कारण नासल्या कार्य राहे । मा मुक्त वर्तताहे ते केवीं ॥६५॥ ऊंस मोडिजे आपण । मोडितां न वचे वाळोन । त्याचे अंगीं रसगोडी पूर्ण । शर्करादि जाण परिपाकु होय ॥६६॥

## देहप्रारब्ध म्हणून लोकोद्धाराकरितां मुक्त वावरत असतो

तेवीं अविद्या नासे देह उरे। तेणें प्रारब्धें मुक्त वावरे। त्या देहाचेनि परिचारें। जन उद्धरे भावार्थी ॥६७॥ गुरु-आज्ञा अतिभावार्थी। जन्ममृत्यु तात्काळ तरती। संदेहो नाहीं येअर्थी। वेदार्थ श्रुति प्रमाणें ॥६८॥ वेदींची श्रुति ॥ तमेव विदित्वातिमृत्युमेति। अपूर्व अर्थ बोले श्रुती। भावोत्पत्ति पूर्वस्थिती। संसारू निश्चितीं जन्मला नाहीं ॥६९॥ जेथ जन्मासी ठावो नाहीं। तेथें मृत्यू कैंचा काई। 'अतिमृत्यु' या नांव पाही। पावले निजदेहीं गुरुभक्त ज्ञानी ॥३७०॥ प्रपंचु एक जाला होता। हे समूळ मिथ्यावार्ता। पुढें होईल मागुता। कदा कल्पांता घडेना ॥७१॥

## नित्यमुक्ताचें लक्षण

एवं ज्ञानियाच्या ठायीं। जन्ममृत्यूची वार्ता नाहीं। हें श्रुत्यर्थें ठेविलें ठायीं। वर्ततां देहीं नित्यमुक्त ॥७२॥ मुक्तासी जगदात्मा अवघा एक। त्याची प्रवृत्ती पाहतां देख। वेव्हारीं भासती अनेक। एकासी अनेक घडे कसें ॥७३॥ ऐसें आशंकिती लोक। तेचि अर्थीं दृष्टांतु देख। शरावोदकस्थो भानुरेक। एक अनेक विभागी॥७४॥नानापात्रीं भरलें उदक। तेथ भानुबिंबें अनेक। तोचि गगनीं पाहतां देख। सूर्यो एक एकला ॥७५॥ ज्या देहात्मबुद्धी दृढदृष्टी। त्या एकत्व लोपे अनेकत्व उठी। ज्ञाननिश्चयों ज्याच्या पोटीं। त्या अनेकीं

दृष्टी एकत्वें ॥७६॥ प्रतिबिंबें देखतां अनेक। सूर्यो जैसा एकला एक। तेवीं ज्ञानियासी सर्व लोक। चिन्मात्रैक चिदात्मा ॥७७॥ चित्रांमाजील जे जे व्यक्ती। तै ते पाहतां निखळ भिंती। तेवीं देखतां त्रिजगतीं। चैतन्यस्थिती अविकार ॥७८॥ पाहतां चित्रींची चित्राकृती। देहआवेव इंद्रिय भिंती। तेवीं जे जे दिसे दृश्य व्यक्ती। तें इंद्रियस्थिती परब्रह्म ॥७९॥ चैतन्य क्रीडे त्रिजगती। असतेनी चित्रें केवळ भिंती। जेवीं भिंतीनें चित्राची विचित्र गती। तेवीं चिन्मूर्ती जग सकळ ॥३८०॥ नाना इंद्रियें अलंकार। नानाकारीं एक भांगार। तेवीं नांदतां चराचर। केवळ चिन्मात्र त्रिजगतीं ॥८१॥ एवं अनेकत्वें प्रतीति। एकत्व नांदे या रीतीं। हे मुक्ताची निजस्थिती। जे जाणती तें मुक्त ॥८२॥ कुल्लाळचक्रीं बैसली माशी। भंवतां दिसे चक्रासरसी। परी ते न हालत असे जैसी। जीवन्मुक्ता तैसीं देहकर्में ॥८३॥ कर्मसंस्कारें देह चंचळ। मुक्त चंचळी अति निश्चळ। मुक्तासी कर्माचा कर्ममळ। अळुमाळ स्पर्शेना ॥८४॥ देहसंस्कारीं वर्ते कर्म। मुक्तासी नाहीं कर्मभ्रम। मुक्त स्वदेहां आत्माराम। हे दशा परम परमार्थी ॥८५॥

आशंका :

मुक्त वर्ते कर्मसंस्कारीं। तरी तो जाला कर्माधिकारी। कर्म ब्रह्मेसी होय साहाकारी। तें मुक्त वरी मुक्तीतें ॥८६॥ कर्माचेनि साहाकारीपणें। जगीं ब्रह्माचें दाटुगें जिणें। हें कर्मसमुच्चय लक्षणें। मीमांसक म्हणे तें मिथ्या ॥८७॥ येचि

अर्थी बाह्य देख । मीमांसक मंत्राचा श्लोक । तेणें वचनें भ्रमले लोक । तोहि एक मतवादू ।।८८।।

मीमांसकांचा श्लोकः–

उभाभ्यामेव पक्षाभ्यां यथा खे पक्षिणो गतिः ।
तथैव ज्ञानकर्माभ्यां परं सिद्धयंति योगिनः ।।

कर्मसाह्य ब्रह्माप्रती । ऐसी बोलती कर्मख्याती । साक्ष कर्मठा कर्मश्रुती । अग्निहोत्र जुहोति यावज्जन्म ।।८९।। जे योनी देहजन्म जाण । तो देहाचे माथां पडे वर्ण । वर्णाचे माथां कर्म पूर्ण । कर्माचरण आश्रमाधारें ।।३९०।। देहाचे खोळे कर्माचे खेळ । आश्रमाधारें चाले बेंबळ । जेथींचा तेथें जाय विकळ । कर्मी निर्बळ स्वयमेव।।९१।।देहाचे माथां कर्म पूर्ण । देहजडत्वें कर्म जड जाण । करितां कर्मठां कर्माचरण । कर्मबंधन बाधक ।।९२।। कर्मबंधं प्रहास्यसि । हेंचि निरूपण गीतेसी । स्वमुखें बोलिला हृषीकेशी । कर्मपाशीं बंधन ।।९३।। क्षीयंते चास्य कर्माणि । हेंहि बोलिला शारंगपाणी । कर्म निर्दळे ब्रह्मार्पणीं । तें ब्रह्मालागोनि साह्य केवीं ।।९४।। कर्म जडत्वें निर्बळ पाहे । यालागीं तें विकळ जाण । तेंही ब्रह्मासी साह्य होय । हें बोलणें निर्वाहे कर्मजडाचें ।।९५।। कर्म जडत्वें अचेतन । त्यासी चेतवी चैतन्य । तें ब्रह्मासी साह्य म्हणे कोण । म्हणे तो विलक्षण अज्ञानज्ञाता ।।९६।। जेवीं तमीं लखलखी खद्योत। तेवीं अविद्येमाजीं ते ज्ञानवंत । सूर्योदयीं मावळे खद्योत । तेवीं कर्म हरपत ब्रह्म-

त्वामाजीं ॥९७॥ जेथें स्फुरे कर्मस्फुरण । तेथ ब्रह्मासी लागे जीवपण । जेथ नलगे कर्मबंधन । तो ब्रह्मपूर्ण स्वदेहीं ॥९८॥ कर्म ब्रह्मसमुच्चयता । कदां न घडे तत्त्वतां । ब्रह्मीं कर्म नुरें स्वभावतां । ते एकत्रता वसे केवीं ॥९९॥ जैं कापूर अग्नि-संगेंसी । नांदों लाहे वरुषमासीं । तैं कर्म साह्य ब्रह्मासी । यथा-सुखेंसि मानूं ये ॥४००॥ कापूर अग्नि होऊनि ठाये । शेखीं अग्नित्वही उडोनि जाये । तेवीं कर्मचि ब्रह्म होये । शेखीं ब्रह्मत्व जाय विरोनि ब्रह्मीं ॥१॥ एवं कर्मातीत परब्रह्म । जेथें स्पर्शों न शके कर्माकर्म । तो मी आत्मा आत्मत्वें परम । निरुपम परमार्थता॥२॥माझ्या स्वरूपसिद्धीचे वर्म । कर्मचि स्वयें होय ब्रह्म । प्रपंचू होय पुरुषोत्तम । तो मी आत्माराम आत्मत्वीं ॥३॥ मी स नित्योपलब्धि आत्मा । हे शब्दाची शाब्दिक प्रमा । जेथें शब्द पावे उपरमा । तो मी आत्मा गुरुवर्या ॥४॥ येथ तर्का अतर्क्य गेला प्राण । विकल्पा विकल्पें आलें मरण । संकल्प निमाला संपूर्ण । मनचि परिपूर्ण परब्रह्म ॥५॥ हे ऐकोनि बाळकाची गोष्टी । आचार्यासी आनंद-कोटी । मर्यादा जाहली उफराटी । शिष्याचिये भेटीं गुरु सुखावे ॥६॥ हेंचि सद्गुरूचें निजलक्षण । शिष्याचे ठायीं उत्तम गुण । देखोनि सुखावे संपूर्ण । मीतूंपण त्या नाहीं ॥७॥ त्या बाळज्ञानाची ज्ञानकथा । ऐकिलीचि ऐकतां । धणी नपुरे सद्गुरुचित्ता । जेवीं सेविली सेवितां शर्करा मधुर ॥८॥ कां बाळकाचा गोजिरा लाड । मायबापां नीच नवा गोड । गुरु शिष्याचें त्याहोनि कोड । आचार्यासीं चाड तत्कथा-

श्रवणीं ॥९॥ हें जाणोनि तत्त्वतां । बाळकु जाला बोलता । पुढारी चालावया कथा । श्लोकु श्लोकार्थी उपपादी ॥४१०॥

लापनिका –

एकाचा एक सारथी । बैसोनियां अनेकां रथीं । एके काळें त्याची गती । जेवी निश्चितीं न करवे ॥११॥ तेवीं एक आत्मा अनेकबुद्धी । एकेकाळें केवीं प्रबोधी । हें न घडे म्हणाल त्रिशुद्धी । श्लोक उपपादी तदन्वयें ॥१२॥

यथाऽनेकचक्षुः प्रकाशो रविर्न क्रमेण प्रकाशीकरोति प्रकाश्यं । अनेका धियो यस्तथैकः प्रबोधः स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा ॥९॥

## आत्म्याचा अलिप्तपणा

रवी उगवोनि आकाशीं । तम निरसी दृष्टी प्रकाशी । एकचि काळें समयेंसी । कोटी कमळांसी प्रकाशकु ॥१३॥ तोचि प्रकाशी सूर्यकांत । खद्योत सनक्षत्रेंसी लोपित । चक्रवाकां योग करित । करोनि अलिप्त आकाशीं ॥१४॥ क्रमें एकेक प्रकाशणें । हें सूर्यासी नाहीं करणें । स्फुरतांचि प्रकाश स्फुरणें । एकेचि क्षणें प्रकाशी ॥१५॥ तेवीं सुबुद्धि दुर्बुद्धी विषयीं । निंदक वादक आग्रही । विवेकीं विरक्त निर्विषयीं । आत्मा पाही प्रकाशी बुद्धी ॥१६॥ प्रकाशुनी नानाबुद्धीतें । तो तो व्यवहार वर्तवी तेथें । तरी पापपुण्य सुखदुःखातें । आत्मा निश्चितें अलिप्त ॥१७॥ जेवीं खारवणी गोडवणी । कां अन्नाचें अन्नोजवणी । वोला नव्हतां बिंबे तरणी । सोखून ने किरणीं न चाखतां रसु ॥१८॥ तेवीं बुद्धि

बोधी विविध। सुखदु:खादि नाना बोध। आत्मा भोगीना तो निर्द्वंद्व। परमानंदस्वरूप ॥१९॥ आरिसां बैसले दुष्ट डाग। ते मुखावरी दिसती सांग। तरी माखलें नाहीं आंग। ते आरिसाचे भोग आरिसा भागी ॥४२०॥ आरिशाचा डाग फेडणें। तै आरिसा साहणें तोडणें। परी बिंबला तो साहणें। नलगें धरणें सर्वथा ॥२१॥ पापाभिमानें अधोगती। पुण्याभिमानें स्वर्गप्राप्ती। निरभिमानें होय मुक्ती। जाण निश्चितीं साधका ॥२२॥ पापपुण्य सुखदु:खराशी। यांची वस्ती अंत:करणेसी। संबंधू नाहीं जीवशिवांसी। तें स्वयें सोसी अभिमानु ॥२३॥ म्हणती जीवासी लागे पाप। हें मूर्खाचें मूर्ख जल्प। शिवासी पाप नलगे अल्प। पापादि संकल्प अभिमान भोगी ॥२४॥

आशंका –

अभिमानु केवळ जड। त्यासी दु:खादि भोग दुर्वाड। भोक्तेपणा नाहीं पवाड। विकल्प दृढ मानिला ॥२५॥ तरी अग्नीस्तव जेवीं लोहे। तापोनि अग्निप्राय होये। तेथें लागतां घणाचें घाये। लोहाचे साहे लोह जेवीं ॥२६॥ अग्निसंगेवीण लोह न घडे। तेवीं आत्मेवीण इंद्रियें जडे। त्यांसी कर्म कर्तव्यता पुढें। निज निवाडें घडेना ॥२७॥ तेवीं चित्सत्ता अभिमान। स्वयें कल्पी पापपुण्य। तेथील सुखदु:ख जाण। आपुलें आपण स्वयें भोगी ॥२८॥

आशंका –

सूर्य असे एक देशीं । तो अलिप्त मानूं ये आकाशीं । आत्मा सर्वेंद्रिय समरसीं । अलिप्तता त्यासी घडे केवीं ॥२९॥ सिद्ध द्वंद्वें देखोनि दुरी गेला । तेव्हां तो प्रपंचासी भ्याला । द्वंद्वीं निर्द्वंद्व जो ठेला । तोचि बोलिला नित्यमुक्त ॥४३०॥ त्यागू बोलिला साधकासी । प्रपंचु मिथ्या सिद्धासी । तो सकळ द्वंद्व समरसीं । अहर्निशीं अलिप्त ॥३१॥ जेवीं घटीं जळ भरिलें । तेणें घटाकाश दिसे बुडविलें । तें जळींचि असोनी नव्हे वोलें । तेवीं आत्मत्व संचलें अलिप्त ॥३२॥ जैसें घटजळीं आकाश । दिसे जळेंसी समरस । परी भिजेना अंशांश । तेवीं चिदाभास प्रपंचीं ॥३३॥ जो अलिप्त पापपुण्यासी । जो अलिप्त सुखदु:खासी । जो अलिप्त प्रबोधूनि बुद्धीसी । तो मी चिदंशीं चिदात्मा ॥३४॥ बुद्धी बोधूनि अलिप्तता । इंद्रियें भोगोनि अभोक्ता । देहीं असोनि विदेहता । तो मी तत्त्वतां निजात्मा ॥३५॥ तो नित्योपलब्धि आत्मा । हे बाळत्वाची बाळप्रमा । जेथें व्योमत्वें ठावो नाहीं व्योमा । तो मी निजात्मा गुरुवर्या ॥३६॥ जंव जंव ज्ञान बोलें बालक । तंव तंव आचार्यासी हरिख । पुढारें ऐकावया देख । अधिकाधिक उल्हासे ॥३७॥ येथें संकल्प कल्पितेनिसी सांडे । विकल्पाचे मूळचि खांडे । जीवाचे जीवत्वहि उलंडे । अखंड नखंड परब्रह्म ॥३८॥ तेचि लावावया लापनिका । युक्ती स्फुरलीसे बाळका । पुढील लावावया श्लोका । स्वयें आशंका उपपादी ॥३९॥ सूर्य प्रकाशी दृष्टीसी । तोचि प्रकाशी बुद्धीसी । संबंध काय

आत्म्यासी । तोचि बुद्धीसी प्रकाशक ॥४४०॥ दृष्टी सूर्याचेनि प्रकाशे । त्यासी बुद्धी कां पां न प्रकाशे । सूर्य जगाचा आत्मा असे । श्रुति सौरसें निश्चितार्थु ॥४१॥

श्रुतिः– सूर्य आत्मा जगतः तस्थुषश्च ।

सूर्यचि आत्मा सकळ लोकां । ऐसी श्रुत्युक्त आशंका । तेहि अर्थीचा पैं देखा । निरासु नेटका श्लोकार्थें सांगे ॥४२॥

विवस्वत्प्रभातं यथारूपमक्षं
प्रगृण्हाणाति नाभातमेवं विवस्वान् ।
यदाभात आभासयत्यक्षमेकः
स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा ॥१०॥

आत्म्याचें सर्वश्रेष्ठत्व

सूर्याची जगामध्यें स्थिती । त्यासी मुख्यत्वें आत्मा म्हणे श्रुती । सूर्यासी ज्याचेनि प्रभा दीप्ती । तोचि निश्चितीं जगदात्मा ॥४३॥ सूर्य उदो अस्तूचा आवर्ती । त्यासीं आत्मा न म्हणे श्रुती । जो सूर्याचे गतीची गती । तो निश्चितीं जगदात्मा ॥४४॥

श्रुतिसंमति :–येन सूर्यस्तपति तेजसेद्धः ।
गीतासंमति :–यदादित्यगतं तेजो ।

जो सूर्यातें प्रकाशिता । तोचि जगदात्मा तत्त्वतां । स्वयें बोले भगवद्गीता । स्वमुखें वक्ता श्रीकृष्ण ॥४५॥ सूर्य जगाची प्रकाशी दृष्टी । घटपळेंसी करी भेटी । बुद्धी प्रकाशाची गोष्टी । रवितेजनिष्ठीं असेना ॥४६॥ रवि प्रभा बाह्यधर्मीं । बुद्धी प्रकाशी अंतर्यामीं । तोचि आत्मा ज्ञाना-

गर्मीं । बोलिला निगर्मीं याज्ञवल्कयीं ॥४७॥ सूर्य दृश्यातें प्रकाशी । आत्मा दृश्यातें निरासी । आत्मत्व सूर्यासी । सद्भावेंसि घडेना ॥४८॥ रवि गेलिया अस्तमानासी । बुद्धी देखे त्याच्या अस्तासी । बुद्धी प्रकाशत्व सूर्यासी । कदा-काळेंसी घडेना ॥४९॥ प्रत्यक्ष सूर्यातें राहो ग्रासी । आत्मत्वीं ठावो नाहीं राहूसी । बुद्धी देखे रविग्रहणासी । ते बुद्धी प्रकाशी रवि केवीं ॥४५०॥ एवं बुद्धीचा जो द्योतेकू । तो अर्काचाहि आदिअर्कू । जो विश्वीं विश्वप्रकाशकू । तोचि निष्टंकु निजात्मा ॥५१॥ जेवीं साखर आणि गोडी । दोनांवीं गोडीचि चोखडी । तेवीं विश्व विश्वात्मा निरवडी । चित्सत्ता रोकडी येकत्वें नांदे ॥५२॥ तो मी नित्योपलब्धि आत्मा । हे मुख्यत्वा श्रुती बोलाची प्रमा । ते अतर्क्य आगमानिगमा । तो मी परमात्मा परब्रह्म ॥५३॥ येथ वेदाची बोबडी वळे । सदृष्टांत वाचा पळे । जें कळणेंयाहि नाकळे । तें मी प्रांजळें परावर ब्रह्म ॥५४॥ सैंधव सिंधूचा थावो । रिघोनियां गेलें घेवों । तेंचि विरोनियां जालें वावो । जळाभिप्रावो कोण सांगे ॥५५॥ तेवीं कळणें कळतें जेथ विरे । तेथ मीतूंपण समूळ नुरे । प्रपंचु परब्रह्मीं मुरे । तें मी खरें निजरूप ॥५६॥ बोधु बाळकाचा ऐकिला । तेणें आचार्य चकित झाला । हर्षाचा पूर आला । उल्हासला स्वानंदें ॥५७॥ पुढेंही त्याच्या गुह्य गोष्टी । ऐकावया आवडी मोठी । पर-मानंदीं पडिली मिठी । कथा कसवटी अनुपम्य ॥५८॥ हा आचार्याचा आवांका । कळों सरला त्या बाळका । पुढील

लावावया लापनिका । स्वयें आशंका उपपादी ।।५९।। स्वप्रकाशें प्रकाश बहळ । आत्मा पूर्णत्वें नित्य निश्चळ । तें लोक लोकांतर फळ । भोगार्थ केवळ जातां दिसे ।।६०।। पुण्यभोगीं उत्तमगती । पापें पावे अधोगती । ऐशा वेदींच्या वेद श्रुती । वृथा वेदोक्ती म्हणों नये ।।६१।।

श्रुतिवाक्य :—उपर्युपरिगच्छंति सत्येन ब्राह्मणाजनाः ।।

ऐसी आशंका वेदविहितीं । ते निवारावया निश्चितीं । पुढील श्लोकाची श्लोकोक्ती । वेदशास्त्रार्थीं अविरुद्ध ।।६२।।

यथा सूर्य एकोऽप्स्वनेकश्चलासु
स्थिरास्वप्यनन्यद्विभाव्यस्वरूपः ।
चलासु प्रभिन्नाः सुधीष्वेक एव
स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा ।।११।।

आत्मा पुण्य व पाप यांपासून अलिप्त

आड विहिरीं तळां थिल्लरीं । कां पात्र जळांतरीं । रवि प्रतिबिंबे निर्धारीं । अनेका पात्रीं एकत्वें ।।६३।। जळचांचल्यें दिसे चंचळ । जळनिश्चळें अचंचळ । जळ बिंबापूर्वीं जें निश्चळ । तें चळाचळ अतीत ।।६४।। जळ प्रतिभासवी अनेक । गगनीं पाहतां अवघा येक । जळीं नरिघतांहि देख । आभासे अर्क एक अनेकत्वें ।।६५।। जळ अनुलक्षी आपण । रवि प्रतिबिंबें संपूर्ण । अनण्वग्निभाव्यलक्षण । यानांव जाण तत्त्वतां ।।६६।। रवि जळीं नाहीं रिघाला । जळरसें नाहीं

माखला। जळीं दिसतांहि बिंबला। असे संचला अलिप्तत्वें ॥६७॥ याचि परी आत्मा पाहीं। प्रति अंतःकरणाच्या ठायीं। प्रतिबिंबला दिसे देहीं। तो विदेही अलिप्तत्वें ॥६८॥ प्रतिशरीरीं प्रतिबिंबित। तें प्रत्यक्ष चैतन्य म्हणत। त्यातें पापपुण्यकर्मग्रस्त। मूर्ख कल्पित कल्पना ॥६९॥ सूर्य थिल्लरीं नाहीं रिघाला। तऱ्ही तेथ दिसे प्रतिबिंबला। तेवीं आत्मा नाहीं जन्मला। दिसे उपजला चेतनत्वें ॥४७०॥ थिल्लरीं कालविल्या शेण। बिंब प्रतिबिंब न माखे जाण। तेवीं देहींचें पापाचरण। अलिप्त पूर्ण जीवशिवां ॥७१॥ कस्तूरी मर्दिल्या थिल्लरीं। बिंब प्रतिबिंब सुवासु न धरी। तेवीं पुण्यफळाची थोरी। जीवशिवांवरी पावेना ॥७२॥ पापपुण्य भोग कथा। हे केवळ भोगी देहअहंता। हे जीवशिवांचें माथां। कदां कल्पांतां स्पर्शेना ॥७३॥ मी देहो, मी पापकर्ता। ते कल्पना भोगी निरयावस्था। मी पुण्यशील, अतिधर्मंता। हे पुण्यावस्था स्वर्ग भोगी ॥७४॥ आत्मा सर्वत्र अवघा एक। तेथ कैंचा स्वर्ग कैंचा नर्क। निजकल्पना कल्पुनी देख। मिथ्या सुखदुःख सत्यत्वें सोसी ॥७५॥ आत्मा पापें पावे अधोगती। कां पुण्यें पावे उत्तम प्राप्ती। हे मूर्खाची मूर्ख वदंती। जे कर्मभ्रांति अतिभ्रांता ॥७६॥ नामें नारकी उद्धरती। तो आत्मा पावे अधोगती। हे भ्रांताची अतिभ्रांती। निजभ्रमें जाती अधःपाता ॥७७॥ पापभ्रमें अधोगती। पुण्यभ्रमें स्वर्गप्राप्ती। देहभ्रमें बद्ध म्हणती। मुक्त म्हणविती तो अतिभ्रमु ॥७८॥ आकाश सर्वकर्मीं

व्याप्त। परी पापपुण्यें नव्हे लिप्त। आत्मा आकाशा अलिप्त। तोहि कर्मग्रस्त कर्मठीं केला ॥७९॥ ये घरींचें। आकाश। त्या घरा नेवो सावकाश। तेवीं गत्यंतर आत्म्यास मूर्ख मानस कल्पना ॥४८०॥ कल्पांतींचे उदकाशी। ठाव नाहीं प्रवाहासी। तेवीं आत्मा परिपूर्ण पूर्णतेंसी। गत्यंतरासी अभावो ॥८१॥ एवं मिथ्या गमनागमन। मिथ्या कर्मधर्माचरण। मिथ्या जीवशिवपण। तेवीं परिपूर्ण परब्रह्म ॥८२॥ माझें पाहतां मीपण। मीतूंपणा ये मरण। गुरूची गुरुगुरु उडे जाण। शिष्यु परिपूर्ण ब्रह्म होय ॥८३॥ ऐसें जें परम परिपूर्ण। तें मी आचार्या सत्य जाण। ऐकोनी बाळकाचें वचन। शंकर परिपूर्ण सुखाचा जाला ॥८४॥ या बाळकाचेनि अनुभवें। शंकरु सुखावे जीवें भावें। परम आवडीं चाटूं धांवे। जें तो देहभाव अतिगोड ॥८५॥ ते गोडी स्वादितां कवतिकें। अमृतही झालें फिकें। यापरी तान्हें बाळकें। शंकरू अतिसुखें सुखावला ॥८६॥ त्या बाळकाची मुक्तकथा। स्वयें ऐकावी सर्वथा। धणी न पुरे तत्वतां। अधिकावस्था दुणावे ॥८७॥ हे जाणोनि तेणें बाळकें। कथा आदरिली हरिखें। पीयूष पैजेंसि जिंके। तैसें श्लोकश्लोकें उपपादी ॥८८॥ आत्मा अनादी सदोदित। स्वप्रकाशें नित्यमुक्त। अद्वयत्वें गुणातीत। हा निश्चितार्थ नेमिला ॥८९॥

लापनिका –

शुको मुक्त वामदेवोवा ॥ शुकवामदेवादि महंत। यातें म्हणती नित्य मुक्त। येर लोक बद्ध म्हणत। हा श्रुतिशास्त्रार्थ

व्यर्थ कैसा ॥४९०॥ येचि अर्थी तो बाळकु । बद्धमुक्ताचा विवेकु । विभागावया अति नेटकु । तदर्थी श्लोकु प्रतिपादी ९१

घनच्छन्नदृष्टिर्घनच्छन्नमर्कं
यथानिष्प्रभं मन्यते चातिमूढः।
तथा बद्धवद्भाति यो मूढदृष्टेः
स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा ॥१२॥

## आत्म्याचें सर्वव्यापकत्व

दृष्टीआड आभाळ आलें । तेणें जननयन आच्छादिले । जनें विपरीत भाविलें । म्हणती आच्छादिलें रविबिंब ॥९२॥ आजिचा सूर्य प्रभाहीन । सामर्थ्य नाहीं अतिदीन । सुदिन तो म्हणती दुर्दिन । हे भावना पूर्ण जनाची ॥९३॥ शेखीं अभ्रा अकाशी । भेटी नाहीं कल्पांतेंसी । अर्क अभ्रातें प्रकाशी । त्यातें अभ्र ग्रासी, घडे केवीं ॥९४॥ बारा योजनें उंच आभाळा । लक्ष योजनें रविमंडळा । तो सूर्यो अभ्रें ग्रासी ग्रासीला । सत्यत्व या बोला मानिती मूर्ख ॥९५॥ तेवीं आत्मा नित्यत्वें विदेही । कल्पना नांदे देहाच्या ठायीं । ते कल्पनेनें आत्मा कहीं । देखिला नाहीं सत्यत्वें ॥९६॥ आत्मा सांगतां मागें पुढें । कोंदला आहे चहूंकडे । पाहतां कल्पनेसी कहीं नातुडे । भांबावले वेडे कल्पक होय ॥९७॥

## आत्मज्ञानासंबंधी वृथा कल्पना

आत्मा आहे हे प्रतीती नाहीं । नाहीं म्हणतां नांदवी देहीं । आहे नाहीं हें नकळे कहीं । पडिले संदेहीं कल्पनीक

॥९८॥ त्या संदेहाच्या पोटीं । बद्धमुक्ततेच्या गोठी । सदा करिती कपाळपिटी । वृथा चावटी ते ऐका ॥९९॥ धोतरा खाऊन जो भुले । शकुन मानिती त्याचेनि बोलें । तेवीं ज्ञानगर्वें जे गर्वाथिले । ते मुक्त मानिले सत्यत्वें ॥५००॥ आम्ही उपदेशूं निजात्मशुद्ध । पैलाचा उपदेशू अबद्ध । ऐसे शिष्यासी करिती बोध । ते मुक्त शुद्ध मानिती ॥१॥ ज्ञान नांदे आमुच्याठायीं । हा मार्ग जगीं कोठेंचि नाहीं । ऐसें उपदेशिती जे कांहीं । ते मुक्त पाही मानिती ॥२॥ मीचि एकू ज्ञाता सृष्टीं । आमुच्या ठायीं मुक्त दृष्टी । आणिकांची वृथा भेटी । आणिकांच्या गोष्टी त्या मिथ्या ॥३॥ जेथें भेदाचे अति कुतर्क । मिरविती सोंवळें स्वयंपाक । ते ते मुक्त मानिती लोक । बाप कवतिक कल्पनेचें ॥४॥ स्वयें त्यागिती स्वकर्म । जो यथेष्ट आचरे अकर्म । त्यातें म्हणती हा निष्कर्म । मुक्त परम मानिती ॥५॥ इंद्रियीं नांदे निज-ज्ञान । त्यातें म्हणती अज्ञान । ते ते मानिती सज्ञान । मुक्ता-भिमानें वाचाळता ॥६॥ एवं ज्ञानगर्वानुक्रमें । मुक्ततेचेनि अक्रमें । बहुतां गिळिलें मोह भ्रमें । पुन्हां सृष्टीतें ते करूं सकते ॥७॥ जाज्वल्य ऋषींची तपख्याती । देहीं व्याघ्र सर्प पक्षी वितीं । तेही ज्ञानगर्वाहातीं । निजात्मप्राप्ती दुऱ्हावले ॥८॥ जनकाच्या ब्रह्मसत्राप्रती । याज्ञवल्क्यादि ऐसे नेणों किती । ऋषीश्वर वाद करिती । ज्ञानगर्वोक्ती प्रतिपादी ॥९॥ माझें ज्ञान अतिशय मोठें । तुझें ज्ञान केवळ खोटें ।

येणें ज्ञानगर्वें हटेतटें। ठकले मोठमोठे तपस्वी ।।५१०।। यापरी गा मुक्तीसाठीं। नाना युक्तीच्या चावटी। वृथा करिती कपाळपिटी। मुक्ती शेवटीं दुर्लभ ।।११।। अभ्र न रिघे सूर्याच्या ठायीं। तेवीं आत्मत्वा बद्धता नाहीं। नसती वाढे मूर्खाच्या देहीं। स्वकल्पना पाही अतिबद्ध ।।१२।। स्वकल्पना अतिबद्धता। तेथें कल्पनीक मुक्तता। निजात्मस्थिती पाहों जातां। बद्धता मुक्ता असेना ।।१३।। अभ्र सूर्यातें जैं गिळी। तैं रात्री असावी काळी। दिवस उगवला भूतळीं। हे केवीं सकळीं जाणिजे ।।१४।। तेवीं माया आत्मया करी बंध। तैं पडावें जगदांध्य। जेणें जग प्रकाशे प्रसिद्ध। तें आत्मत्व सिद्ध न मानिती ।।१५।। जैं आत्म्यातें गिळी अज्ञान। तैं मी अज्ञान म्हणे कोण। अज्ञानद्रष्टा जो आपण। तो होऊनि अज्ञाना बद्धत्व मानी ।।१६।।

## मुक्त कोण?

जग भासे जें सकळ। तो जगदात्माचि निखळ। ऐसा निश्चयो ज्याचा प्रबळ। मुक्त केवळ तो एकु ।।१७।। मी देही नव्हे निश्चितें। अनात्मा न म्हणे कोणातें। विश्व मीचि परमार्थें। मुक्ती तयातें वोळगणी ।।१८।। ज्याची निःशेष आस तुटली। त्याचीचि अविद्या निवटली। त्यासीचि शांती निःशेष जाली। स्थिति वंदिली सदाशिवें ।।१९।। ज्यासी नाठवे जन्मलेंपण। देहत्वें देह न भेटे जाण। तो स्वप्नींहि न देखे निजमरण। हे स्थिती संपूर्ण हरिहरां वंद्य ।।५२०।।

काम क्रोध लोभ चाली । ज्याचेनि अंगें हरपली । ज्याचेनि भुलीसी पडे भुली । ते स्थिती वंदिली श्रीरामें ॥२१॥ जो स्वदेहो देखे ब्रह्मभूत । प्रपंचू देखे परमार्थ । जो विषयसेवनी समाधिस्थ । तो स्वयें स्वयें अतीत बंधमोक्षांसी ॥२२॥ जेथ बद्धतेसी बद्धता । नाहीं मुक्तींसी मुक्तता । बंध मोक्षाचा वेदु वक्ता । तोहि तत्त्वतां असेना ॥२३॥ वेद तितुका शब्द-संमत । शब्दीं वेदार्थ अतिगुप्त । तो शब्दातें निषेधीत । नानुध्यायात् बहून्शब्दान् ॥२४॥

संमत श्रुति –

नानुध्यायाद्बहून् शब्दान् वाचो विग्लापनहि तत् ॥

ब्रह्मज्ञान शब्दातीत आहे

एवं वेदीचें शब्दज्ञान । वेद निषेधी आपण । शब्दातीत ब्रह्म पूर्ण । तें शब्दांसी जाण जाणवेना ॥२५॥ शब्दें नव्हे वस्तुप्राप्ती । हेंचि एकादशीं उद्धवाप्रती । स्वमुखें बोलिला श्रीपती । ते श्लोकोक्ती अवधारा ॥२६॥

श्लोक एकादश स्कंधांतील –

शब्दोऽपि बोधकनिषेधतयाऽऽत्ममूल –
मर्थोक्तमाह यदृतेन निषेधसिद्धिः ॥

जेथ शब्द निमे संपूर्ण । तेचि ब्रह्मप्राप्ती पूर्ण । शब्दासी असतां शब्दपण । तें ज्ञानचि अज्ञान वेदार्थु बोले ॥२७॥ जो साखरें रेसेवू मागता । त्यासी साखरेचें नांव लिहूनि देतां । ते तंव नांव नये खातां । मा मधुरता तेथें कैंची ॥२८॥ तेवीं

शब्दाची अतियोग्यता । असता अनुभव नये होता । तेवीं वस्तुचा अनुभव होतां । नामरूपता अति मिथ्या ॥२९॥ वेदाची वाचाळता । मिथ्या प्रतिपादी बंधमुक्तता । येचि अर्थी श्रीकृष्ण वक्ता । श्रीभागवतामाझारीं ॥५३०॥

श्लोक एकादश स्कंधांतील –

बद्धो मुक्त इति व्याख्या गुणतो मे न वस्तुतः ।
गुणस्य मायामूलत्वान्न मे मोक्षो न बंधनम् ॥

मिथ्या बंध आणि मुक्ती । हे वेदींची परमार्थ उक्ती । जे वेदार्थी निमग्न होती । ते पावती हा गुह्यार्थ ॥३१॥ मुक्तीचे निजजिव्हार । गुह्याचें गुह्य भांडार । परमार्थाचें सोलीव सार । तें मी साचार गुरुवर्या ॥३२॥ तो मी नित्योपलब्धि आत्मा । हेंहि बोलणें धोंगडी प्रमा । जेंथ विश्रांती ये विश्रामा । तो मी परमात्मा प्रत्यक्ष ॥३३॥ येथें निद्रेसी आलें मरण । स्वप्न निमालें आपण । सुषुप्ति सोलूनियां जाण । काढिलें संपूर्ण सुखसार ॥३४॥ तेणें सुखें पाहतां देहीं । देहीं देह होय विदेही । जीवचा परब्रह्म पाही । ठाईंच्या-ठाईं ठसावे ॥३५॥ ऐकोनि बाळकाची वाणी । आचार्य विस्मित जाला मनीं । बाळपणीं निपुणज्ञानी । पुढारी श्रवणीं श्रद्धा अधिक ॥३६॥ ऐसें जाणोनियां देखा । स्वयें उपपादी आशंका । पुढील श्लोकाची लापनिका । अपूर्व नेटका अन्वयो लावी ॥३७॥ बंधमोक्षातीत आत्मा मी एक । तो व्यापक कीं अव्यापक । या दोहींचा निश्चयो देख । साधितां

अटक सज्ञाना ॥३८॥ आत्मयासी अव्यापकपण । बोलतां झाला परिच्छिन्न । तेव्हां भंगलें आत्मपण । एकदेशी पूर्ण तो जाला ॥३९॥ आत्मा व्यापक म्हणतां । तैं जाह्ली सर्वसंगता । तेणें मोडिली निःसंगता । आत्मत्व तत्त्वतां घडे कैसें ॥५४०॥ आत्मयाचें व्यापकपण । निःसंगत्वें निर्लेप पूर्ण येचि अर्थीचें निरूपण । श्लोकार्थे आपण पूर्णत्व स्थापी ।४१।

समस्तेषु वस्तुष्वनुस्यूतमेकं
समस्तानि वस्तूनि यन्न स्पृशंति ।
वियद्वत्सदा शुद्धमच्छस्वरूपः
स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा ॥१३॥

आत्मा आकाशाप्रमाणें निर्लेप आहे

पाहे पां आकाश जैसें येथे। सर्वपदार्थी सदा व्याप्त । व्याप्त होतसातें अलिप्त । निर्मळ नित्य स्वभावें ॥४२॥ तें माखिता न माखे काजळें। जाळितां न जळे अग्निज्वाळें । भिजवितां न भिजे जळें। नित्य निर्मळ तें स्वभावें ॥४३॥ यापरी आकाश येथ। आत्मा आकाशीं अलिप्त ।तोचि मनबुद्ध्यादिकां व्याप्त। इंद्रियें समस्त स्वयें चाळी ॥४४॥ आकाश न माखे काजळें । आत्मा न माखे मोहमेळे । आकाश न जळे अग्निज्वाळें । आत्मा क्रोधानळें संतापेना ॥४५॥ नभ न भिजे पाउसें । आत्मा न माखे विषयरसें। नभ शून्यत्वें व्यापक असे । आत्मा चिदंशें स्वानंदपूर्ण ॥४६॥ आकाशासी विषयभोग । भोगशून्यत्वें अलिप्त आंग । आत्मा भोग भोगी सांग । भोगितांचि चांग अभोक्ता तो ॥४७॥ नाना नक्षत्रें लेउनी माथां ।

आकाश मिरवे असंगता । आत्मा स्वयें अलिप्तता । प्रपंच तत्त्वतां प्रकाशी ॥४८॥ त्रैलोक्य आकाशाचे पोटीं। आत्म्यामाजीं ब्रह्मांड कोटी । आकाशाची अभावें भेटी । स्वानंदपुष्टी आत्मत्वीं ॥४९॥ आकाश पंचभूतांमधी । आत्मा भूतभौतिकां निरवधी । आकाशासी प्रळयसिद्धि । आत्मा त्रिशुद्धी प्रळयातीत ॥५५०॥ नभीं निबिड दाटे धुई। तेवीं माया आत्मयाच्या ठायीं । आकाशासी लक्षण नाहीं । लक्षालक्ष पाही परमात्मा ॥५१॥ लौकिक दृष्टी पाहतां पाही । आत्मा अनुस्यूत सर्वां देहीं । तो परमार्थें ठेवितां ठायीं । आत्म्यावेगळा नाहीं पदार्थु ॥५२॥ आत्म्या वेगळें व्याप्य असे । मा आत्मा त्यातें व्यापुनी वसे । हे शाब्दिक बोलती आवेशें । अतिगर्व पिसे ज्ञानपदाचे ॥५३॥ तंतुकोटी पटान्वयीं । अनुस्यूत म्हणती पाही । तो परमार्थें लक्षितां ठायीं । पटु भिन्न नाहीं तंतुत्वासीं ॥५४॥ आत्मा सर्वपदार्थी व्याप्त । हा पूर्व दृष्टीचा वृत्तांत । दृढ लक्षितां परमार्थ । व्याप्यव्यापकार्थ असेना ॥५५॥ आत्मा आत्मत्वें अवघा एक । तेथें कैंचें व्याप्य व्यापक । बुद्धिभेदें मानिती लोक । एकीं अनेक कल्पना ॥५६॥ आत्मा सर्व पदार्थी व्याप्त । हा जीवदृष्टीचा वृत्तांत । परम पाहतां परमार्थ । आत्मा पदार्थ स्पर्शेना ॥५७॥ जेवी चित्रींच्या नाना व्यक्ती । देखणा देखे निखळ भिंती । तेवीं ज्ञानिया ब्रह्म त्रिजगतीं । भ्रांत भ्रमती विचित्राकारीं ॥५८॥ जेवीं घृताचिया कणिका ।

घृतेंसी नव्हती आणिका । तेवीं भूतें भौतिकें देखा । स्वदेही एका आत्मत्वें होतीं ॥५९॥ आत्मेनि दृश्य नाहीं देखिलें। आत्मेनि दृश्य नाहीं ऐकिलें। आत्मेनि दृश्य नाहीं स्पर्शिलें। हें असे बोलिलें उपनिषद्भागीं ॥६०॥

श्रुती बृहदारण्यींची

जगत्सर्वं आत्मैवाभूत् । तत् केन किं पश्येत् तत् केन किमभिवदेत् ।३।

आत्मा सामरस्यमुखें । कोण कोणातें तेथ ऐके। कोण कोणातें चाखें। विषयविशेषें अभावो ॥६१॥ जेवीं दोरें सर्पु नाहीं देखिला। दोरें सर्पु नाहीं ऐकिला। दोरें सर्पु नाहीं स्पर्शिला। मिथ्या आभासला भ्रम भुजंग ॥६२॥ तेवीं स्वतःसिद्ध असे ब्रह्म। ते ब्रह्मीं जग नांदे विभ्रम। त्या भ्रमामाजीं जडलें कर्म। अति दुर्गम सुरनर ॥६३॥ एवं भ्रम-मूळ जग जाण। त्या जगामाजील ज्ञानाज्ञान। तें आत्म्यासी नव्हे बंधन। आत्मा चिद्घन उभयातीत ॥६४॥ जें ज्ञानाज्ञानातीत निर्मळ। जें द्वैताद्वैतातीत निश्चळ। जें जीव-शिवातीत केवळ। तें मीं प्रांजळ परब्रह्म ॥६५॥ ऐकें आचार्य-शिरोमणी। येथिच्या ये निरोपणीं। ठावो नुरे मीतूंपणीं। गुरु शिष्य दोन्ही परब्रह्म होती ॥६६॥ ऐकोनी बाळकाची ज्ञानोक्ती। आचार्यासी सुखाची स्फूर्ती। एकला न समाय त्रिजगती। एवढी सुखप्राप्ति अनावर जाली ॥६७॥ त्या सुखाचेनि लवलाहे। बाळकातें चाटूं पाहे। व्याली धेनु बापुडी काय। त्या स्नेहाची सोय कूर्मि नेणे ॥६८॥ चंद्रा-मृत निवविते होय। तें विश्रांतीची नेणें सोय। माता जे नव-

मास वाहे । तेंहि येणें स्नेहें सुखावों नेणे ॥६९॥ चंद्रामृत निववीत आहे । सबाह्य ताप तेणें न जाये । सद्‌गुरुअवलोकनें पाहे । सबाह्य होय सुखरूप ॥५७०॥ शिष्यासी लाभे बोध सधरू । तेणें उल्हासे सद्‌गुरू । होय सुखाचा महामेरू । आनंद निर्भरू शिष्यावबोधें ॥७१॥ माता बाळकाचा पुरवी लळा । त्याहोनि गुरूसी कळवळा । शिष्य जिवाहूनि आगळा । मानी स्वलीला निजात्मता ॥७२॥ माता ममतेचें सुख पावे । सद्‌गुरु परमानंदें सुखावें । शिष्याचेनि निजानुभवें । गुरु थोरावे सुखानुकोटी ॥७३॥ ऐसा सुखावला शंकरू । हें जाणोनि तें लेंकरू । कथासमाप्ती प्रकारू । उपसंहारू उपपादी ॥७४॥ परमार्थ अनादि त्रिशुद्धी । प्रपंच प्रवाहरूपें अनादि । दोहींची अभेदें अर्थसिद्धि । तेचि प्रतिपादी ग्रंथावसानीं ॥७५॥ प्रपंच परमार्थी समाधान । अभेदें करी तो अतिसज्ञान । तेचि दशा गा परिपूर्ण । ते पूर्णता आपण ग्रंथार्थी दावी ॥७६॥ प्रपंचु खाणोनि सांडावा । मग परमार्थु मांडावा । हा संदेही नलगे करावा । प्रपंचूचि आघवा परमार्थू होय ॥७७॥ प्रपंच करितां प्रपंचोक्ती । अखंड स्फुरे ब्रह्मस्फूर्ती । ते पूर्णत्वाची पूर्णस्थिती । स्वयें ग्रंथार्थी विशद दावी ॥७८॥ परमार्थाची अखंड स्थिती । तेथेंचि प्रपंचाची वस्ती । दोहींची विशद प्रतीती । ग्रंथाचे प्रांतीं प्रकट दावी ॥७९॥

उपाधौ यथा भेदता सन्मणीनां
तथा भेदता बुद्धिभेदेषु तेऽपि ।

यथा चंद्रिकाणां जले चंचलत्वं ।
तथा चंचलत्वं तवापीह विष्णो ॥१४॥

## परमार्थ व प्रपंच यांचें स्पष्टिकरण

प्रपंच तो उपाधीकृत । उपाधीकत्वें मिथ्याभूत । ब्रह्मपूर्णत्वें नित्य सत्य । स्फटिक दृष्टांतु तदर्थी दावी ॥५८०॥ स्फटिक काजळीं दिसे काळा । आरक्तीं आरक्त किळा । नीळ वर्णी भासे निळा । तऱ्ही तो वेगळा अतिशुद्धत्वें ॥८१॥ आत्मा रजोगुणीं राजस । दिसे तमोगुणीं तामस । सात्विकीं भासे सत्त्वांश । तरी तो गुणदोष स्पर्शला नाहीं ॥८२॥ सत्त्वरजतमादिगुण । हे वृत्तिभेदाचें लक्षण । आत्मा आत्मत्वें परिपूर्ण । गुणागुण तेथें कैंचे ॥८३॥ भिंती भिंतीपणें अखंड असे । चित्रोपाधि कल्पनावशें । आत्मा आत्मत्वें परिपूर्ण असे । भेद भासे तो सोपाधिकु ॥८४॥ गंगावन चवरीवरी । स्फटिकशीळ ठेविली शिरीं । तें फुटि गेली दिसे बाहेरी । पाहतां निर्धारीं भेदीं अभेद ॥८५॥ भेद तो उपाधिसंबंधू । आत्मा अभेदीं निजभेदू । ऐसा ज्यासी निश्चयें बोधु । तो परमसाधु सिद्धत्वें ॥८६॥ जेवीं एक जाती लोहा सांखळ । तिसी स्वभावें नित्य खळखळ । तेवीं आकार विकार प्रबळ । असतां खळखळ शमेना ॥८७॥ पाहार आणि सांखळ । दोहींची एकी जाती केवळ । पाहरेपाशीं नाहीं खळखळ । सदा खळखळ कडोंविकडीपाशीं ॥८८॥ तैसी उपाधी विकारता । असतां न ये निजशांतता । आत्मा उपाधी निरुपा-

धिता । त्यासी विषमता असेना ॥८९॥ बिंब प्रतिबिंब निश्चळ । मध्यें कांपे थिल्लर जळ । तेणें चंद्रमा केवळ । कांपे चळचळ मानिती ॥५९०॥ आत्मा नित्यत्वें निज निश्चळ । उपाधिप्रवाहें अतिचंचल । तेणें आत्माचि चंचळ । लोक सकळ मानिती ॥९१॥ ज्याचे अंगीं भवंडी भरे । तो म्हणे सपर्वत धरा फिरे । तेवीं गमनागमन पामरें । संकल्प संस्कारे आत्म्यासी म्हणती ॥९२॥ सवेग वेगें आभाळ चळे । बाळें म्हणती चंद्रमा पळे । तेवीं निजदेह निर्याणमेळें । आत्माचि अबळें गेला म्हणती ॥९३॥ दैवें जळघट फुटला । तो काय घटचंद्र निमाला । तेवीं देहासी नाश जाला । म्हणती नासला निजात्मा ॥९४॥ रज्जु सर्प पळोनि गेला । ना तो जीत जिवें धरिला । ऐसा आत्मा बद्धमुक्त जाला । सत्यत्व या बोला मानिती मूर्ख ॥९५॥ मृगजळीं वाडें कोडे । ससैन्य राजा छत्रेंसीं बुडे । तो न मरतचि निघाला कडे । तें भाग्य पुढें पुढें मानिती मूर्ख ॥९६॥ तेवीं बद्धता मुळीं नाहीं । तेथ मुक्तता कैंची काई । तेहि भ्रांताच्या ठायीं । उल्हासे पाही मी मुक्त म्हणोनि ॥९७॥ काळा, पुंडा, सधर कांठा । हा उंसाचें जातीचा ताठा । परी रसस्वादियां चेष्टा । त्रिविध वाटा न चलती ॥९८॥ तेवीं दृश्य द्रष्टा दर्शन । ध्येय ध्याता आणि ध्यान । ज्ञेय ज्ञाता निजज्ञान । आत्मत्वीं जाण असेना ॥९९॥ आत्मा म्हणती सच्चिदानंदु । हाही अविद्यक संबंधु । या संबंधाचा सूक्ष्म भेदु । सांगेन विशदु तो ऐका ॥६००॥ करितां नश्वराची निवृत्ती । नासेना तें संत

म्हणती । जडाची त्यागिला स्तब्ध स्थिती । जाणत्यातें श्रुती चिद्रूप म्हणे ॥१॥ निरसितां दुःखबाधु । सुखरूपा नांव आनंदु । हा अतद्व्यावृत्तीचा बोधू । वेदानुवादु तन्निष्ठ ॥२॥ वस्तु असद् ना नव्हे सद् । अचिद् ना नव्हे चिद् । आनंदु ना निरानंद । परमानंद स्वरूपें ॥३॥ गोड मऊ आणि शुभ्र । त्रिविध नांवीं एक साखर । तेवीं सच्चिदानंद साचार । वस्तु एकाकार एकत्वें ॥४॥ एथें नामाची बोळवण । सवेंचि रूपाची उजवण । खुंटे कर्माकर्माचें बंधन । समूळ साधन उडे येणें ॥५॥ येणें वोस पडे प्रपंचु । जीवभावा निर्वंचु । देहसंचा पडे विसंचु । निमाला विंचु विषयवेदनेचा ॥६॥ येणें जीवाचें जीवत्व बुडे । शिवाचें शिवत्व उडे । इंद्रियांचा पांग मोडे । निद्रेचें बिरडें समूळ तुटे ॥७॥ येथ ईश्वरत्वा लिंगभेद । वासनेचा तुटे संग । पंचभूतांचा वोरंगे रंग । फिटे पांग काळभयाचा ॥८॥ येथिच्या ओलांडितां अर्थु । आपेआप विरे हेतु । दृष्टांतासी जाला अंतु । आला पैं प्रांतु विधिवादवेदां ॥९॥ अवकळा निमाली घेउनी कळा । समाधि व्युत्थाना निमट लागला । दशे अवदशेंचा सोहळा । उपरमला वैभवेंसी ॥६१०॥ भगवंतीं हरपे भगवंतता । प्रणवाचा बुडाला माथा । ब्रह्मसायुज्याची कथा । तेहि तत्त्वतां निमाली ॥११॥ प्रमाणें जालीं अप्रमाण । कारणही जालें अकारण । संसारें वाहिली आण । सत्यत्व जाण मज नाहीं ॥१२॥ जैसी जळाची जळगार । क्षणेक भासे साकार । सवेंचि विरोनि होय नीर । तेवीं संसार क्षणाभिभास ॥१३॥

संसाराचें मुख्य विदान। जेथें दृश्यद्रष्टा दर्शन। तेंचि संसाराचें नाहींपण। असतांचि जाण अतिमिथ्या ॥१४॥ जेथ मी दृश्य तेथें तूं द्रष्टा। तूं दृश्य द्रष्टत्वें माझा वांटा। तेथें कोण दृश्य कोण द्रष्टा। उभयनिष्ठा असेना ॥१५॥ ज्यासी दृश्य ऐसें म्हणणें। तेंचि उठी द्रष्टेपणें। तेव्हां दृश्यद्रष्टा यांचें जिणें। सत्यपणें असेना ॥१६॥ दृश्यद्रष्टा यांचा खटपटा। या देहबुद्धीचिया चेष्टा। पाहतां निजात्मनिष्ठा। दृश्य द्रष्टा असेना ॥१७॥ मन तेंचि देह पाही। निःकल्पित देह देही। यथानुभवें सांगेन तोही। सहजान्वयीं विलासू ॥१८॥ पाहे पां सुषुप्ताच्या ठायीं। मन मनपणें नाहीं। येथ दृश्यद्रष्टादि कांहीं। संसारू नाहीं सुखदुःखेंसी ॥१९॥ जेव्हां मन मनपणें उठी। तेव्हांचि संसारींची दटें दाटी। कर्माकर्म सुखदुःख त्रिपुटी। मनाच्या पोटीं संसारू ॥६२०॥ मनाच्या पोटीं जन्ममरण। मनाच्या पोटीं कर्माचरण। मनाच्या पोटीं सुखदुःख जाण। मन तें संपूर्ण संसारू ॥२१॥ त्या मनाचें निजलक्षण। दृश्य द्रष्टा आणि दर्शन। सकळ त्रिपुटीचें विदान। मनचि जाण निश्चित ॥२२॥ तें मन मनपणें असतां। परमार्थ नव्हेगा सर्वथा। तेंचि मन विपरीत होतां। जीवन्मुक्तता अनिवार्य ॥२३॥ जेथ विपरीत होय मन। तेथ पालटे संसाराचें भान। तेव्हां प्रकृतिपुरुषाचें चिन्ह। आलेआन पैं होय ॥२४॥ चिदंबरीं वधुवरें। दोघीजणीं वाहिलीं शिरें। उठवितां प्रसन्नस्वरें। धडे परस्परें पालटलीं ॥२५॥ तेथ पुरुषत्व आलें स्त्रीभागा।

स्त्रीत्व जडलें पुरुषाच्या अंगा। तेंचि ठसावली स्थितीं पें गा। अद्यापि जगामाजीं वर्ते ॥२६॥ पुरुषसत्ता पावोनि पूर्ण। प्रकृतीचें सर्वही लक्षण। पुरुषासि जें पुरुषपण। तें मुख्य लक्षण प्रकृतीचें ॥२७॥ पुरुषत्व आलें प्रकृती। तेथ प्रकृति पावली पुरुषस्थिती। तेव्हां भ्रांती तेचि जाली मुक्ती। विषयासक्ती परब्रह्म ॥२८॥ दृश्य तोचि महाबोध। प्रपंच तोचि परमानंद। विवादु तोचि निजसंवाद। ऐक्यतेशी भेद स्वेच्छा नांदे ॥२९॥ स्वेच्छा चालतां पदोपदीं। पाऊल पाउला समाधी। लोकांच्या जल्पवादी। उपनिषदीं रहिवासु ॥६३०॥ होतां चराचर दरुशन। तेंचि मुख्य ब्रह्मज्ञान। निजदेहाचें जें स्फुरण। तेंचि ब्रह्म पूर्ण पूर्णत्वें ॥३१॥ येथें सूर्यासि उगवला दिवस। रात्री जाली स्वप्रकाश। नाश झाला अविनाश। जगचि जगदीश स्वयें जाला ॥३२॥ पाषाण जालें चैतन्य। शून्य जालें चिद्घन। पृथ्वी जाली ज्ञानघन। इंद्रियाचरण निजानंदू ॥३३॥ यापरी करतळामळक। ज्ञान बोलिला तो बाळक। तेणें आचार्यासीं परम सुख। श्लोकें श्लोक संपला ॥३४॥ संपलें ज्ञान निरूपण। कोंदाटलें ब्रह्म पूर्ण। तेणें आचार्यें आपण। बाळक पूर्ण आलिंगिला ॥३५॥ दोनी श्लोक पूर्वप्रश्न। बारा श्लोक गुह्यज्ञान। त्याचें केलें निजव्याख्यान। ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥३६॥

### या चौदा श्लोकांचें महत्त्व

हे चौदा श्लोक जाण। चौदा विद्यांचें निजजीवन। जीवीं जीवा समाधान। तें हें निरूपण हस्तामलक ॥३७॥

हे चौदाही श्लोक जाण। चौदा भुवनां अधिष्ठान। आधार आधेया समाधान। तें हें निरूपण हस्तामलक ॥३८॥ हे चौदाही श्लोक जाण। चौदा इंद्रांचें इंद्र पूर्ण। इंद्रादिदेवां समाधान। तें हें निरूपण हस्तामलक ॥३९॥ हे चौदाही श्लोक जाण। चौदा पदें गयावर्जन। पदीं पिंडा समाधान। तें हें निरूपण हस्तामलक ॥६४०॥ हे चौदाही श्लोक जाण। चौदा कांड वेदवचन। वेदानुवादा समाधान। तें हें निरूपण हस्तामलक ॥४१॥ त्या हस्तामलकाचें लक्षण। सर्वांपरीं श्रेष्ठपण। तेंहि सांगेन निरूपण। श्रोतां अवधान मज द्यावें ॥४२॥ या बाळकाचे सुहृज्जन। त्यांसी आचार्य पुसे आपण। हा प्रपंचींचा वेडा पूर्ण। कार्यकारण जाणेना ॥४३॥

## तो मुलगा (हस्तामलक) आचार्यांनीं ब्राह्मणाकडून मागून घेतला

हा प्रवृत्तांसी नये कामा। परमार्थ दान द्यावें आम्हा। हे आचार्यांची वचन-गरिमा। त्या ब्राह्मणोत्तमा मानली ॥४४॥ केवळ अबोलणें लेंकरू। त्यासी विज्ञान बोलवी श्रीशंकरू। हा त्यासीच द्यावा संप्रसारू। ऐसा निज निर्धारू दृढ केला ॥४५॥ त्याचें करवूनि उपनयन। सवेंचि शंकरू करी मुंडण। पूर्ण संन्यास देउनी जाण। घेउनी आपण निघाला ॥४६॥ अद्यापि व्यासपूजेसी। पूज्यत्व हस्तामलकासी। पाहतां संन्यास पद्धतीसी। श्रेष्ठत्व त्यासी आचार्यत्वें ॥४७॥

## गुरुपरंपरा

गुरुपरंपरा पद्धती । समूळ सांगावी लागेल ग्रंथीं । संपतां ग्रंथाचे अंतीं । गुरुस्तुती वदावी ॥४८॥ मुळीं मुख्य श्रीगुरुनारायण । त्याचा शिष्य चतुरानन । तेणें उपदेशिला आपण । श्रीनारद जाण महामुनी ॥४९॥ नारदें उपदेशिला श्रीव्यास । व्यासें उपदेशिलें शुकास । शुकोपदेश गौडपादास । तेथूनि संन्यासपद्धती ॥६५०॥ संन्यासगुरु गौडपादाचार्य । तत्शिष्य गोविंदपाद पूज्यवर्य । तेणें केलें शिष्यद्वय । विवर्णाचार्य आणि शंकरू ॥५१॥ प्रबोध धैर्य अतिवीर्य । ज्ञानगुणें गुणगांभीर्य । निजात्मदानें अति औदार्य । तो शंकराचार्य चिन्मूर्ती ॥५२॥ दशाचार्य दश संन्यासी । जे बोलिले व्यासपूजेसी । त्यांचे सांगेन विभागासी । यथान्वयेंसी पद्धती ॥५३॥

## दहा आचार्य

दशाचार्यांची अति थोरी । पूर्वाचार्य श्रेष्ठ चयाऱ्ही । शंकरापासोनि ज्ञानगजरीं । आचार्यत्व वरी साहीजणां॥५४॥ पूर्वाचार्य चौंचा विभाग । आदौ गौडपादाचार्य । दुसरा गोविंद भगवत्पादवर्य । त्या पासोनी विवर्णाचार्य । मुख्य आचार्य श्रीशंकरू ॥५५॥ (शंकरापासोनि षडाचार्य) विश्वरूपाचार्य एक । पृथ्वीधराचार्य दुसरा देख । सहजाचार्य हस्तामलक । श्रीधराचार्य निष्टंक श्रीभागवत व्याख्या ॥५६॥ पद्मपादाचार्य त्रोटकाचार्य । इतुकेन संपलें दशाचार्य ।

संन्याशामाजीं हे अतिवर्य। परम सूर्य ज्ञानाचे ॥५७॥ आश्रमधर्मीं अतिवीर्य। ज्ञानदानें श्रेष्ठ शौर्य। ते चौघे जाले मठाचार्य। मठपर्याय ते ऐक ॥५८॥ शंकराचार्य उपदेशी। त्यापासोनि दशसंन्यासी। सांगेन त्याचिये नांवांसी। ग्रथान्वयेसी विभाग ॥५९॥ तीर्थ, आश्रम, वसन, अरण्य। गिरी, पर्वत, सागर जाण। सरस्वती, भारती, नामाभिधान। पुरि, हे परिपूर्ण दाहीजणे ॥६०॥

## चार दिशांचे आचार्यांचे मठ व तेथील मठाधिपति

मठविभाग

द्वारकामठ पश्चिम समुद्रीं। तेथ विश्वरुप आचार्यत्व करीं। तीर्थ आश्रम तेथिचे अधिकारी। त्या मठामाझारीं ते वसती ॥६१॥ बद्रिकाश्रमीं जोशीमठ। त्रोटकाचार्य तेथ वरिष्ठ। गिरी पर्वत सागर श्रेष्ठ। मठीं उद्भट वसती त्यांचीं ॥६२॥ जगन्नाथमठ पूर्वसमुद्रीं। तेथ ब्रह्मपादाचार्य अधिकारी। वसनारण्य ते तो अधिकारी। मठीं निरंतरी ते वसती ॥६३॥ श्रृंगिरी मठ दक्षिणेमाझारीं। तेथ पृथ्वीधराचार्य आज्ञाकारी। सरस्वती भारती आणि पुरी। तेथ निरंतरी ते वसती ॥६४॥ हस्तामलकाचार्य परम। त्यासी सहजीं सहज विश्राम। नकरीचि मठ मठिका आश्रम। आत्माराम परिपूर्णत्वें ॥६५॥ उरला जो श्रीधराचार्य। त्यासी नाहीं मठीं तात्पर्य। भागवतव्याख्या अतिवर्य। परमचातुर्य भावार्थदीपिका ॥६६॥ जैसा तळहातींचा

आंवळा । तैसा ग्रंथीं अर्थु दिसे प्रांजळा । निवे मुमुक्षाचा जिव्हाळा । परम सोहळा साधूसी ॥६७॥ हस्तामलकाची टीका । एकला कर्ता नव्हे एका । साह्य जनार्दन निजसखा । ग्रंथार्थ नेटका अर्थिला तेणें ॥६८॥ एका जनार्दना शरण । जनार्दना प्रिय एकपण । जनार्दनकृपेस्तव जाण । ग्रंथ संपूर्ण पूर्णत्वा आला ॥६९॥ पूर्ण जालें निरूपण । पूर्ण म्हणावया म्हणतें कोण । खुंटला बोल तुटलें मौन । आनंदघन अद्वयात्मा ॥६७०॥ दर्पणें प्रतिमुख दाविलें । दर्पण जातां तें तेणें नेलें । परी देखतें मुख नाहीं गेलें । तें असे संचलें निजांगा ॥७१॥ तेवीं अज्ञानें आत्मत्व न्यावें । का ज्ञानें आणूनि द्यावें । ऐसें वस्तूसी न संभवें । तें असे स्वभावें सदोदीत ॥७२॥ हेंचि येथीचें निरूपण । जी ज्ञानाज्ञानाची बोळवण । एका जनार्दनीं जन विजन । वस्तु परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ७३ ॥ पूर्णत्वाचें पूर्णपण । सद्गुरूचेंचि चरण । एका जनार्दना शरण । एकपण नुरऊनी ॥७४॥ इति श्रीमच्छङ्कराचार्यहस्तामलकसंवादः संपूर्णः । श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥

हस्तामलक टीका समाप्त

— ०:० —

# श्रीएकनाथ महाराजकृत

# स्वात्मसुख

श्रीगणेशायनमः ।। श्रीकृष्णपरमात्मने नमः ।। श्रीगुरुभ्यो नमः ।। ॐ नमोजी सच्चिदानंदा । जय जय जगदादि आनंदकंदा । निजांगें अभयवरदा । श्रीगुरुराया ।। १ ।। जयाचेनि अवलोकनें । हारपे एका एकपणें । केलें सर्वांगचि देखणें । अनंगें देवें ।।२ ।। एकपणीं अनेक । अनेकीं दावी एक । नकळे कैसें कवतुक । दुजेनविण ।।३।। जेथें दुजेंचि नाहीं । तेथें स्तुतिस्तव्य तें काई । शब्दासीचि ठाव नाहीं । मा स्तवन तें काईसें ।।४।। पहातां रूपाचा दुकाळ । नामाचा विटाळ । तेथें स्तवनाचा गोंधळ । रिघेल कोठें ।।५।। तेथें एकपणेंवीण एका । जो कां जनार्दन निजसखा । स्तवावया देखा । निःशंक ऐसा ।।६।। जैसे वेदें आपुलें आपण । सामर्थ्य कीजे निरूपण । ते स्तवनीं दुजेपण । लागेल कैचें ।।७।। नातरी शब्दाची पदवी । शब्देंचि लागे बोलावी । कां जीवाची एकोपजीवीं । जीवचि जाण ।।८।। आतां गुरुशिष्य दोन्ही । आणोनि एकपणीं । रिघालों जी स्तवनीं । स्तवावया ।।९।। तरी देऊनी आपुली पुष्टी । मज सामाविलें आपुला पोटीं । याहीवरी कृपादृष्टी । याचिलागीं करी ।।१०।।

## स्वस्वरूपाच्या वर्णनासाठीं या ग्रंथाची निर्मिती

जे आपुली स्वरूपस्थिती। ते वानावी अभिनव कीर्ती। जेणें संतसज्जन होती। संतुष्ट सदा ॥११॥ आतां संतांच्या मनोगती। तेंचि बोलावें प्रस्तुती। तरी सांगो स्वरूपस्थिती। सुनिश्चित ॥१२॥ तरी कठिणांशु करूनि वेगळ। पहातां जैशी स्फटिकशीळ। तैसें जाण सकळ। स्वरूप असे ॥१३॥ सांडूनी आर्द्रतेचा रोहो। नाडळत भरला डोहो। तैसी ते वस्तु पहाहो सर्वत्र असे ॥१४॥ जडत्व सांडूनि निश्चळ। वसुधा जैसी पुष्कळ। तैसें ज्ञेय सकळ। सकळिक असे ॥१५॥ गगन सर्वांसी स्पर्शे। परी स्पर्शिलें हें न दिसें। आत्मा तैसा सन्निध असे। आडळेविण ॥१६॥ शून्यत्व सांडूनि गगनें। सर्वत्र जेवीं असणें। आत्मा तैसा पूर्णपणें। सर्वदा सर्वी ॥१७॥ जें नाडळें स्पर्शनीं। घसवटेंनां जनघसणीं। शून्या शून्यत्व करोनी। संवितीं असे ॥१८॥ जेवीं वर्तताही जगीं। नाडळत आडळे आंगीं। अंगा अंगत्व संयोगी। नुरऊनि असे ॥१॥

## सद्रूपाची उपपत्ति

सद्रूपाची निजात्मगती। सांगितली स्वरूपस्थिती। आतां चिद्रूपाची उपपत्ति। सहज दृष्टांतें सांगेन ॥२०॥ सांडूनि ज्वाळा काजळां। दीप प्रकाश उजाळा। असे, तैसी आत्मकळा। कळातीत ॥२१॥ कां रविबिंब अस्ता जायें। आणि प्रभा तैशींची राहे। तैसी आत्मप्रभा पाहे। उष्णातीत

॥२२॥ नातरी आंधारें सूनि पोटीं। उष्ण चांदणें दोन्ही घोटी। तयावरी जे दशा उठी। ते आत्मप्रभा ॥२३॥ कां डोळां सांडोनि मागें। दिसते दवडूनि वेगें। माजीं देखणेंपण सर्वांगें। सर्वत्र वस्तू ॥२४॥ अक्षर घालुनी माघारी। शब्द न निघतां बाहेरी। माजीं अर्थु असे जयापरी। तैसी ते वस्तू ॥२५॥ आडळ सांडोनि आरसा। सन्मुख गगनाएवढा जैसा। तो असतचि नाहीं होय जैसा। आत्मा तैसा पैं असे ॥२६॥ सद्रूप चिद्रूप दोन्ही। निरोपिली उपलक्षुनी। आतां स्वानंद सांगेन चिन्हीं। जें आयकतां मन निवे ॥२७॥ साखर करूनि वेगळी। गोडीचि कीजे निराळी। माजीं स्वादु सर्वांगीं सकळीं। तैसा स्वानंदु जाणा ॥२८॥ नातरीं रतींच्या अंतीं। जे होय सुखप्राप्ती। ते सर्वदा सर्वांगें भोगिती। सांडुनी रतिसंबंधू ॥२९॥ कां रसनेवीण फुडी। ते सदां सर्वांगें गोडी। भोगीं जेवीं आवडी। तेवीं स्वानंद सुख ॥३०॥ कां कामिनीवीण कामसुख। वीर्य सबळवीण देख। उपजे तोषेंवीण संतोष। तैसें स्वात्मसुख जाणा ॥३१॥ सत् चित् आनंद। हा अद्वय वृत्तीचा भेद। वस्तु नव्हे त्रिविध। एकविध एकली ॥३२॥ मृदु तिख आणि पिवळी। तीं नावें एक चापेकळी। तेवीं सच्चिदानंद बोलीं। वस्तु एकली एकत्वें ॥३३॥ जैसें आपलेंच मुख। तें नव्हें आपणां सन्मुख विन्मुख। तैसें नहोनी सुखदुःख। सहजें सुख सदोदित॥३४॥ सद तेंचि चिद। चिद तेंचि आनंद। वस्तु नव्हे त्रिविध। ते एकपद एकत्वें॥३५॥ जेथें दुजेवीण जाण। नुपजतां एकपण।

सुख सुखत्वें संपूर्ण । तें स्वसंवेद्य ॥३६॥ जेथें ध्यान अवघें सरे । ध्येयपण वेगळें नुरे । ध्याता सर्वांगें विरे । विरालेपणेंसी ॥३७॥ दृश्य द्रष्टेनसि मिळे । तेथें द्रष्टेपण तत्काळ गळे । दर्शन एकलेपणें मावळे । निर्विशेषीं ॥३८॥ ज्ञाता ज्ञेयीं ज्ञेयत्वें जडे । तेथें ज्ञान लाजिलें फुडें । वस्तु वस्तुत्वें अंगा जडे । वेदनेवीण ॥३९॥ प्रमाता प्रमाण । दोन्ही जाहलीं अप्रमाण । प्रमेयेंसि कारण । अकारण जालें ॥४०॥

## स्वस्वरूपप्राप्तीचा उपाय

ऐसें सिद्ध स्वरूप असतां । तें जेणें प्रकारें ये हाता । तें साधनही तत्त्वतां । सांगेन आइका ॥४१॥ सुमनें सांडूनि सकळें । गुणेंवीण गुंफिजे परिमळें । तैसें आत्मसाधन केवळें । स्वात्मसिद्धीचें ॥४२॥ लहरिया लहरी आलिंगिजे । तें आलिंगनीं नाडळे दुजें । तैसें आत्मसाधन जाणिजे । स्वात्मसिद्धीचें ॥४३॥ अलंकार सोनिया मिळे । तेथें मिळणीं दुजें नाडळे । ऐसी वृत्ती अखंड फळे । आत्मसाधनीं ॥४४॥ जेथें आतळों न शके ज्ञान । तेथें कैचें ध्येय ध्याता ध्यान । येथ वस्तूचें साधन । वस्तूचि होय ॥४५॥ सुवर्ण धन । कां धनें सुवर्ण । तैसें वस्तूचें साधन । वस्तूचि होय ॥४६॥ लोहकाम लोहखडें घडे । तैसी वस्तू वस्तुत्वें जोडे । जैसें सूर्याचेनि उजियेडें । सूर्यचि दिसे ॥४७॥ बाहूंवीण खेंव । प्राणेंवीण धांव । मनेंवीण भाव । भावना जेथ ॥४८॥

वीण बोली । चरणेंवीण चाली । दृष्टीवीण आली । दर्शन शोभा ॥४९॥ क्रियेंवीण कर्म । दानेंवीण धर्म । धारणेवीण उपशम । मांडला दिसे ॥५०॥ जेवीं एकपणें तंतू । अनेक पटू तोचि होतू । तैशीं एकात्मता जगा आंतू । लक्षिजे तें आत्मसाधन ॥५१॥ वृत्तीसी अखंडता न घडे । तंव साधनीं साध्य कैंचें जोडे । जैसें भंगलें पात्र कोरडें । भरितांही तोय ॥५२॥ घटाकाशींचेंनि आकाशें । सदा महदाकाशीं वसे । घटभंगीं अभंग असे । जेथिचें तेथें ॥५३॥ तो घट जैं दैव-वशें फुटे । मग घटाकाश लागे नीट वाटे । तैंच महदाकाश भेटे । ये-हवीं चुके ? ॥५४॥ तैसी आकार निराकारीं । वृत्ति अखंडत्व धारणा धरी । तैं साध्याच्याही साक्षात्कारीं । कार्यसिध्दि ॥५५॥ तया नांव साधन । आत्मसाक्षात्कारींचें अंजन । जें हात बसलिया निधान । होइजें स्वयें ॥५६॥ सूर्यें केला दिवसू । जळबिंदू करी पावसु । पृथ्वी करी पांशू । स्वात्मत्वाचा ॥५७॥ तैसें साध्यचि साधना । जंव नये अनु-संधाना । तंव वांचूनि मना । सद्भाव नाहीं ॥५८॥ जेथें स्वस्वरूपाची नास्तिक । ते येणें साधनें देख । तेथेंचि आणिली आस्तिक्य । आत्मत्वाची ॥५९॥ जेथें जग हें ब्रह्म नव्हे । तेंचि ब्रह्मत्वें उभें राहे । तरी कवण पां न पाहे । सर्वार्थ भावें ॥६०॥ चिंतामणीचा हिरा । जरी तेजरूप खरा । मिनलिया अलंकारा । न मने कवणा ॥६१॥ आका-शाचा दर्पण । सन्मुख जोडला संपूर्ण । तरी स्वस्वरूपा

कवण। पाहों विसरे ॥६२॥ तेथें पाहतां स्वरूप भासे। विस्मरणामाजीं तेंचि दिसे। कर्मक्रियेंही सरिसें। लागलें सदा ॥६३॥ तें सांडितां सांडिलें न जाये। डोळे झांकितां अधिक होये। देहाचा भ्रम निःशेष जाये। सहजान्वयें स्वभावें ॥६४॥ कां मुक्ताफळाचा परिसू। जोडलिया स्वप्रकाशू। तरी मुकुटीं बाणितां उल्हासू। न करी कवण ॥६५॥ कां कल्पतरूचें झाड। सुवास सुंदर आणि गोड। मीनलिया इंद्रियांचें कोड। न पुरवी कवण ॥६६॥ तैसा परमात्मा परेश। सर्वरूपें रूपस। जोडलियां कां डोळस। डोळे झांकी ॥६७॥ यापरी जे जे प्रतिमा। तेथें प्रगटे परमात्मा। हे गोडी आत्मयारामा। निर्मनें रमवी ॥६८॥ जैसें सूर्याचीं किरणें। सूर्यापुढें धांवती जाण। तेणें प्रकाशें सूर्यपण। अधिकाधिक ॥६९॥ कां रत्नाची कीळ। रत्नावरी वाढे प्रबळ। तेणें रत्नासीचि केवळ। प्रबळता आणी ॥७०॥ कां चंदनाचा वासू। चंदनाहुनी चौपसू। धावे तेणें अतिसुवासु। चंदना आणी ॥७१॥ कां अग्निच्या ज्वाळा। अग्नीवरी वाढती प्रबळा। तिनें अतिरूप अनळा। आणिलें जैसें ॥७२॥ तेसे विश्वप्रकाशितया गभस्ती। त्याचें किरणें नानाव्यक्ति। तेथें नास्तिकता जे देखती। ते मूर्ख मृगतृष्णिका ॥७३॥ हो कां चिद्रत्नाची कळा। तें हें चराचर सकळा। ऐसी कळा न दिसे तें समळा। पडळ दृष्टी ॥७४॥ असो हें सुवर्ण खोटी। करूनि घातली वधूच्या कंठीं। तेणें ते गोमटी। दिसेल काई ? ॥७५॥ मा त्याचें करूनि

भूषण । अंग प्रत्यंगीं जाण । बाणिलया सुंदरपण । शोभेसी ये ॥७६॥ तैसें स्वस्वरूपें निर्विकार । त्याचें सर्वांग भूषण मनोहर । तेणेंसि अलंकारिलें चराचर । स्वरूपचि भासे ॥७७॥ चंदनाचेनि संनिधीं झाडें । न मोडतां चंदनत्व घडे । तैसा वस्तूचेंनि अंगें प्रपंच वाढे । तद्रूपतेंसी ॥७८॥ सुवर्ण आणि भूषण । तेथ काई असे दोनीपण । प्रगट पहातां कांकण । सोनेंचि असे ॥७९॥ स्वयंभ पट पाहातांचि दिठीं । तंतूसीचि होय भेटी । तैसी अवलोकितां सकळ सृष्टी । स्वरूपचि भासे ॥८०॥ सागरीं भरितें दाटे । तेथें सागरत्व चढे कीं ओहटे । तेवीं जगदाकारें प्रगटे । ईश्वरशोभा ॥८१॥ ऐशिया संविती । इंद्रिय कर्माची प्रवृत्ति । प्रवर्तता आपुलाले स्थिती । बाधूं न पवे ॥८२॥ चंद्र कायें चांदिणेन हारपे । सागर लहरियांस्तव लोपे । तैसा इंद्रियकर्मीं आत्मा लोपे । कीं प्रकटे स्वयें ॥८३॥ यालागीं उघडिया दृष्टी । पाहतां दृश्येंसी नव्हे भेटी । नामा रूपाची सृष्टी । देखतांही ॥८४॥ सुवर्णाचे म्हणती नग । तें नग नव्हे सोनेंचि चांग । तैसें दृश्याचें देखणें आंग । द्रष्टाचि दिसे ॥८५॥ म्हणे म्यां सोनेंचि पहावें दिठीं । तरी पुढें ठेविजेल खोटी । परी खोटी वेगळी भेटी । सुवर्णीं न घडे ॥८६॥ तैसें जग हें परतें न्यावें । मग आत्मत्व म्यां पहावें । कांकण आटूनी म्हणावें । सुवर्ण आतां ॥८७॥ तरी आटावें हे आटाटी । संकल्प संनिपात उठी । ये-हवीं आटितां नाटितां दिठीं । सोनेंचि असे ॥८८॥ तरंगा लहरी मिळे । तेथें विजातीय नाडळे । तेवीं

सकळीं सकळ फळें । स्वात्मभाव ॥८९॥ छायामंडपीं विचित्र सेना । दीपेंवीण दिसो कां नयना । तैसी प्रकृतीकर्मगणना । स्वात्मभावेंचि आभासे ॥९०॥ ते मंडपीमाजीं जें जें दिसे । तद्रूपें दीपप्रभा आभासे । तैसा जगदाकारें प्रकाशे । निर्विकार आत्मा ॥९१॥ तेथ देवाचें देवपण सरे । भक्ताचें भक्तपण विरे । तऱ्ही भजन उरे । निर्विशेषीं ॥९२॥ उदकाचें मोती होये । तेथ उदकपण निःशेष जाये । तरी म्हणती पाणी आहे । अतिदीप्ति प्रभा ॥९३॥ काशीहुनी परते कावडी । तो गांवासि ये घेऊनि गुढी । तरी यात्रा श्रेय न सांडी । क्षेत्रत्यागें ॥९४॥ कां अमृत सेविजे नरें । तें सेवितां तत्काळ सरे । परी अंगीं अमरत्व उरे । अमृतेंवीण ॥९५॥ तैसी आत्मसिध्दीसी देऊनि भेंटी । सर्व साधन तत्काळ घोटी । तें आत्मसिध्दीवरी उठी । सद्‌गुरुभजन ॥९६॥ हें अद्वैत भजन चोखडें । अनुभवी जाणती फुडें । येरां परिसतांचि कानडें । मंदभाग्या ॥९७॥ पहा पां चंद्रकिरणींचें अमृत । तेणें चकोरें होती तृप्त । परी वायस काय तेथ । श्रध्दा धरिती ॥९८॥ चंद्र चकोरां तृप्ती करी । येरां आण देउनी काय वारी । जो जैशी श्रध्दा करी । तो तैशापरी संतृप्त ॥९९॥ वानर सकळ फळें खाय । परी नारळातें अव्हेरूनी जाय । त्याचें अभ्यंतर नोहे । ठाउकें तया ॥१००॥

### आत्मसाक्षात्काराचें मूळ अधिष्ठान सद्‌गुरुकृपा

तैसी आत्मसाक्षात्काराची । सद्‌गुरु अधिष्ठात्री तेची ।

म्हणोनी साध्याही वरी तयाची । सेवा घडे ॥१॥ ब्रह्माहूनि अधिकत्व गुरूसि आलें। ब्रह्मा ब्रह्मत्व याचेनि बोलें। यालागीं भजन वहिलें। सायुज्यता माथां ॥२॥ जें काळासीही नाकळे। जें देखूं न शके बुद्धयादि सकळें। जेथ विवेकाचे मंद डोळे। गुरूअंजनेवीण ॥३॥ जें न प्रकाशी तरणी। जें न बोलवे वेदवचनीं। येवढिया वस्तूचा गुरु दानी। दयाळुत्वें ॥४॥ जया सूर्याचेनि प्रकाशें। न दिसती काळगर्जना भासे। जया सूर्याचेनि दिवसें। उत्पत्ती प्रळयो ॥५॥ जया सूर्याचेनि योगें। जगीं कर्म होय दाटुगें। हरिहरांचें वेगें। आयुष्य हरी ॥६॥ जेणें गमनागमन वेगेंसी। चिरंजीवियाचें वय ग्रासी। मग तेंही काळापासीं। बांधोनि घाली ॥७॥ जया सूर्याचेनि अंगें। स्वाहा स्वधा चाले वेगें। यालागीं सुरनर पितर पांगे। पावले तृप्ती ॥८॥ जया सूर्याचेनि संगें। दिसों लागती सकळ जगें। बालाग्रीचें सवेगें। दुविळें दिसे ॥९॥ गवाक्षद्वारींचें परिमाण। जेणें सूर्यें दिसती जाण। येवढें प्रकाशाचें महिमान। जयाचे अंगीं ॥११०॥ परी त्रैलोक्यव्यापिनी वस्तु पाहीं। दाखवावया कांहींच नाहीं। कोण्हेतरी कांहीं। दाखविता का ॥११॥ जें सर्वत्र सदा असे। तें कोण्हेही तरी काळीं दिसे। ऐसें न करवेंचि प्रकाशें। जयाचेनि ॥१२॥ ऐशी वस्तू सूर्यें न प्रकाशे। ते सद्गुरुकृपालेशें। आपणासगट भासे। तद्रूप जग ॥१३॥ जयाचिये कृपे पोटीं। हारपती सूर्याच्या कोटी। न दिसे तें दावी दिठी। कृपाळू जो ॥१४॥

वेदविहिताचेनि बोलें। वेदवचनें जग धरिलें। वर्णाश्रमांचे वहिले। मार्ग वेदें ॥१५॥ वेदें द्योतिलें कर्म। वेदें प्रतिष्ठिला धर्म। वेदवचनें नेम। जगातें नेमी ॥१६॥ वेद शब्दसृष्टीचा अर्कू। वेदें तिखट केला तर्कू। वेदबळें लोकू। तोंडाळ जाला ॥१७॥ प्रपंच परमार्थ जाण। वेदेंचि केलें अभिधान। वेदास्तव अज्ञान। सज्ञान जाले ॥१८॥ येवढी जाणिवेची हांव। धरून घेवों गेला वस्तूचें नांव। तंव उलथोनि टाकिली शिव। अविद्येची ॥१९॥ आत्मा सच्चिदानंद। हाही आविद्यक बोध। आत्मा नामाचा अनुवाद। करितां वेद थोटावला ॥१२०॥ नित्यानित्याची खटपटा। करितां नामाची प्रतिष्ठा। नव्हेचि मग उफराटा। लाजला वेदू ॥२१॥ म्हणोनि वस्तूचिया पाठा। न चलवी वेदवचन वाटा। यालागीं 'नेतिनेति' या निष्ठा। परतला तो ॥२२॥

## गुरुकृपेचें असाधारण सामर्थ्य

ऐसें वेदा न बोलवेचि शब्दें। तें सद्गुरुपादप्रसादें। निःशब्दचि वाचा वदे। मौनेंवीण ॥२३॥ नवल गुरुकृपेची करणी। मौनवी बोलवी वचनीं। जें आदिमध्यअवसानीं तेणेंशी शब्दू ॥२४॥ वस्तुवांचूनि कहीं। दोस तंव उरलें नाहीं। मागुता शब्दू कवणे ठायीं। उपजेल सांगा ॥२५॥ सागरू अवघाचि परता सारी। मग काशावरी चाले लहरी। तैसी वस्तूवीण शब्दकुसरी। शोभती कोठें ॥२६॥ प्राण निःशेष जाये। तेथ निमिषोन्मिमिष कोठें राहे।

तैसी वस्तूवीण केवीं होये । शब्दशोभा ॥२७॥ यालागीं वेदासि जें कानडें । तें सद्‌गुरुकृपाउजियेडें । वाचेसि ये गांठीं पडे । वस्तु सबळ ॥२८॥ मन देखलिया वाटां जाये । नदेखिलें श्रवणीं पाहे । मना कल्पिलिया राहे । पदार्थ कवणू ? ॥२९॥ तया मनासी परमार्थता । वस्तु सर्वत्र सांगतां । परी न कळेचि सर्वथा । अंशमात्र ॥१३०॥ मनासि वस्तूची सोये । धरितां गजबजिलें ठाये । कांहीं न लभोनि राहे । थोटावलें मन ॥३१॥ वस्तु सांगतां मागें पुढें । पाहतां कांहींचि नातुडे । मग भांबावले चेडें । मनचि होय ॥३२॥ ऐसे मनाचिया आस्तां । नाना हेतु कल्पितां । परी वस्तूचा वारा सर्वथा । न लभेचि मन ॥३३॥ तया सद्‌गुरुकृपातुषारें । प्रतीतीचा प्रत्ययो स्फुरे । मग मन मना विसरे । विनटलेपणें ॥३४॥ जया स्वरूपाची गोडी । लागलिया मन न सोडी । अधिकाधिक दे बुडी । स्वानंदडोहीं ॥३५॥

एकदां स्वस्वरूपाची गोडी लागली की कशांतहि गोडी वाटत नाहीं

तेथुनी मन मागुतें उठी । परी तद्रूपतेची न सुटे मिठी । अवलोकितां सकळसृष्टी । स्वरूपचि भासे ॥३६॥ जैसा बुडाला घटू सागरीं । तोचि रिघालिया बाहेरी । रिता कैशापरीं । निघों लाहे ॥३७॥ जळ एक देशी असे । तरी घटु बाहेरी निघो उमसे । वस्तु एकार्णवें पूर्ण असे । मन निघो केवीं लाहे ॥३८॥ इळा परिसातें झगटी । तो सोनेंचि होऊनि उठी । मग इळेपण पहातां दिठीं । काई लोखंड होईल

॥३९॥ तैसी गुरुकृपा मनासि होये । मग वस्तुत्वेंचि होऊनि राहे । तेथोनि चराचरहि पाहे । परी मनपणा नये ॥१४०॥ यापरी चंचळ मना । सद्‌गुरुकृपा समाधाना । आणी ते विवंचना । ऐसी आहे ॥४१॥

## काळसुध्दां गुरूचा दास होतो

काळ सुरनरां क्षय करी । काळ श्रेष्ठातें संहारी । काळ हरिहरांतें मारी । मारकपणें ॥४२॥ काळ अमरातें गिळी । काळ अंतकातें छळी । काळ प्रलयरुद्राची होळी । सकाळें करी ॥४३॥ काळ ब्रह्मांडातें खाये । तेथ रुद्रादिक विधाता कैंचा राहे । ब्रह्मांडआवर्ती जें होये । तें काळाचें खाजें ॥४४॥ ऐशि ऐशिया प्रौढी । काळ अमरपदें मोडी । मग शून्याचीचि नरडी । मुरडूनि खाये ॥४५॥ या परी काळ दुर्धरू । कोण्ही न शके आंवरूं । तो काळूही होय आज्ञाधारू । गुरुकृपेचा ॥४६॥ गुरुकृपेचिया सद्‌भावा । काळ करूं लागे सेवा । अनित्य नासोनि तेव्हां । जगनित्यत्व दावी ॥४७॥ ऐसी सेवा करितां संतोषें । उतराई म्हणे हरिखें । तंव काळ काळपणा मुके । अनित्य नासुनी ॥४८॥ नवल गुरुकृपा कीजे। काळेंचि काळू निवारिजे । मग अनकळित उरिजे । आपण स्वयें ॥४९॥ म्हणोनी काळाचिया माथां । आहे गुरुकृपेची सत्ता । यालागीं काळाचा नियंता । सद्‌गुरु स्वामी ॥१५०॥ काळ करूं लागे सेवा । ऐसा गुरुचरणीं भाव द्यावा । यालागीं भक्तवैष्णवा । प्रार्थित असे ॥५१॥ जालियाही कार्य-

सिद्धि। सेवेसि नपडे अवधी। स्वाभावीक भजनविधी। भजवित असे ॥५२॥ जेथ दुजें ना एक। तेथ काय सेवेचें सुख। म्हणाल तरी कवतिक। ऐसें आहे ॥५३॥ वरा वरपणाचा सोहळा। वोसरूनि जाय तेचि काळा। परी भोगिलेपण वेळवेळां। सोहळेवीण भोगीं ॥५४॥ रणीं शूराची ख्याती। होय रणभूमी समाप्ती। तरी विजयश्रीयेची कीर्ति। रणेवीण भोगीं ॥५५॥ पुरुषसंयोगें संगप्राप्ती। कामिनी लाहे गर्भसंभूती। नित्य संगावीण गर्भाची कीर्ति। मिरवी जगीं ॥५६॥ सतरावियेचें अमृतपान। करी तोचि जाणे हे खूण। तेथ आपुली गोडी आपण। भोगिजे जैसी ॥५७॥ तैसें भज्य भजक भजन। कां पूज्य पूजक पूजन। नुरोनियां गुरुचरण–। भजन आहे ॥५८॥ जैशी चोराची माये। प्रगट रडों न लाहे। परी आंतुच्या आंतु होये। उकसाबुकशी ॥५९॥ कां स्वैरिणी गर्भाची ठी। बाहेरी उमसों नेदी गोठी। परी संभवलें आहे पोटीं। हें तेचि जाणें ॥१६०॥ विषाचें मारकत्व जैसें। विषाआंगीं बाहेरीं न दिसे। परी त्याभाजीं तें असे। तद्रूपतेंसी ॥६१॥ तैसी गुरुयुक्त भावना। आतळों नेदी मना। अखंड पैं भजना। भजतचि असे ॥६२॥

## गुरुकृपेनें मायेचा प्रभाव पडत नाहीं

अगा जियेतें म्हणती माया। जे कासेंनि नये आया। पाहो जातां विधातया। व्यक्ति नये ॥६३॥ संत म्हणों

तरी न दिसे । असंत म्हणों तरी आभासे । नामरूपाचें पिसें । लाविलें जगा ॥६४॥ संभ्रमाचें दारुण । दोराआंगीं सापपण । कां नसताचि दिसे जाण । छाया पुरुष बगनीं ॥६५॥ जैसी जडलीचि व्योमा । नसती भासे निळिमा । कां सूर्यबिंबीं काळिमा । नाथिली दिसे ॥६६॥ तैसी नाथिलीचि अविद्या । नासावया प्रबुद्धा । धिवसा नव्हे सदां । शिणताती योगी ॥६७॥ आपुली देहाभिमानता । तें मायेचें स्वरूप मुख्यता । हेचि जीवाची बद्धता । निश्चयेंसी ॥६८॥ माया निरशीन मी साचार । म्हणे तो मायां मोहिला नर । तो छायेचें छेदावया शिर । शस्त्र घडवी ॥६९॥ शस्त्र घेवोनि छेदावें वेगें । ऐशी माया हातीं न लगे । नाहीं म्हणतां लागे । हरिहरांदिकां ॥१७०॥ दैवी गुणमयी गुणकार्या । श्रीकृष्ण म्हणे मम माया । अतिदुस्तर तरावया । ब्रह्मादिकांसी ॥७१॥ ब्रह्मा करितां सृष्टिक्रम । स्वकन्या देखोनि उत्तम । सरस्वतीसीं अकर्म । करूं धावे ॥७२॥ जो कां श्रेष्ठ योगियां । त्या शिवासि मोहिलें मायां । मोहिनीरूपें विलया । तत्काळ नेला ॥७३॥ जो कां विष्णू त्रिकालज्ञानी । तोही मायां व्यापुनी । वृंदेच्या स्मशानीं । विषयत्वें वसवी ॥७४॥ ऐसी हरिहरां माया । दुर्जयत्वें न ये आया । तेचि गुरुकृपा जालिया । उभीच विरे ॥७५॥ गुरूचें साचार धरलिया पाये । माया मुखचि दाऊं न लाहे । विमुख तरी उरों लाहे । हेंही नघडे ॥७६॥ याचिया

वचनप्रतीति माया। उरी नुरतां गेली विलया। जैसा वंध्यापुत्र राया। पहातां न पाहतां नाहीं ॥७७॥ माया नामरूपाचा बडंबा। आणूनि करिती पुढां उभा। तरी सद्‌गुरूकृपेची प्रभा। सद्रूपचि दावी ॥७८॥ रात्री आपुलिया प्रौढी। अंधाराचे दुर्ग घडी। परी सूर्यासमोर अर्ध घडी। राहोंचि न शके ॥७९॥ कां मृगजळाचें जळ। भरलें दिसे प्रबळ। परी साचाराचा तीळ। तिंबू न शके ॥१८०॥ शुक्तिकेचा रजताकारू। प्रत्यक्ष दिसताहे गोचरू। परी एक तरी अळंकारू। अघटमान कीं ॥८१॥ तैसी दिसतांही माया पुढें। सद्‌गुरुकृपेचेनि उजियेडें। पाहों जातां तत्काळ उडें। अभावपणें ॥८२॥ अविद्या इहीं शब्दीं। आपुलें नाहींपण प्रतिपादीं। परी नास्तिकां नास्तिकसिद्धी। सद्‌गुरुकृपां ॥८३॥ ऐशी नाशिलियाही माया। अधिक भजवी गुरुराया। ते प्रतीतीच्या भजनठाया। स्वभावें आणी ॥८४॥ ज्याची प्रतीती लाहिजे। तया उपेक्षिजे कीं भजिजे। हें अनुभवीचि जाणिजे। येरां अघटमान ॥८५॥ सिद्धि जालिया साधन। सहज वोहट पडे जाण। तैसें नव्हे गुरुभजन। प्रतीतिस्तव ॥८६॥ कां स्तन्यसेवन अवस्था। सरलिया ते माता। भजावी कीं सर्वथा। दवडूनि दीजे ॥८७॥ देव प्रसन्न होय तंव पूजावा। मग काय नेउनी विकावा। नदी उतरूनि फोडावा। परळू कैसा ॥८८॥ मुंज बांधी तंव तो मुंज। मग काय म्हणावा नव्हे द्विज। रणीं विभांडी तंव तो गज। मग काय कोल्हा म्हणावा ॥८९॥ मा

जो देहाचें मरण सोडवी। त्यासी वेदू पितृत्वें मानवी। मा जो जन्ममरण चुकवी। त्यासि काय न भजावें ॥१९०॥ जीव अमरचि असे। त्याचें मरण नाशिलें कैसें। जीवासि जीवत्व नुमसे। या नांव मरणनिरास ॥९१॥ जयासि दिग्भ्रमु चढे। तो वाट सोडूनि अव्हाटा पडे। तयासी उमजऊनी रोकडें। मार्गस्थ कीजे ॥९२॥ कनकबीज सेविलिया। भुलिजे आपण आपणिया। तो सावधू कीजे प्राणिया। स्वस्थिती जेवीं ॥९३॥ तैसा मायामोहभ्रमें। नाथिलींचि मानी जन्मकर्मे। तो जयाचेनि वचनधर्में। स्वात्मत्व पावे ॥९४॥ यालागीं देवा दुर्जय जी माया। ती जगड्व्याळेंसी गेली विलया। सद्गुरुप्रसादें पाया-। चेनि बळें ॥९५॥ जेथ सद्गुरुकृपा पाहे। तेथ माया ममता कैंची राहे। यालागीं गुरुसेवनें होये। सर्वार्थसिद्धि ॥९६॥ जया स्वरूपाची गोडी। इंद्रियें नेणतीं बापुडीं। जें विषयकर्दमीं बुडी। देऊनि ठाती ॥९७॥ जें स्वरूपसुख कहीं। इंद्रियीं चाखिलें नाहीं। तें गुरुसेवनीं पाही। स्वसुख सेविती ॥९८॥ जेथ इंद्रियां रिघतां सांकडें। तें इंद्रियद्वारां सुख जोडे। ऐसा सद्गुरुकृपा उजियेडें। अलभ्य लाभू ॥९९॥ तरी पृथक् पृथक् इंद्रियवृत्ति। प्रवर्ततां आपुलाल्या अर्थी। आत्मसुखाची प्राप्ती। अखंड लाभे ॥२००॥ दृष्टि स्वभावें घे रूप। तंव रूपचि होय स्वरूप। जें सद्गुरुकृपेचा दीप। दृष्टीतें वरी ॥१॥ दृश्य देखोंजाय दृष्टी। तंव दृश्य लोपे द्रष्टाचि उठी। ऐशी निर्विशेष त्रिपुटी। गिळूनि पाहे ॥२॥ श्रोत्रावधानी शब्दू।

तंव शब्दा सर्वांगीं निःशब्दू । यापरी परमानंदू । श्रवणार्थ सिद्धि ॥३॥ सुमना न येता जो वासू । परममकरंद सुवासू । तो घ्राणद्वारें निर्विशेषू । भोगमिसें भोगवी ॥४॥ रसना रातली आवडी । ते मिथ्या विषयत्वाची त्वचा काढी । मग अभ्यंतरील गोडी । स्वसुखें सेवी ॥५॥ ताट भोक्ता परवडी । अवघें निर्विशेष वाढी । मग जिव्हे चोरूनि गोडी । रसना सेवी ॥६॥ जें जें आडळें आंगीं । तें आंगचि होय वेगीं । ऐसेनि स्पर्श सर्वांगीं । सदानंद दाटे ॥७॥ वाचा उठोनि चौकटें । परी मौनाची मिठी न सुटे । शब्द चपळते- सवें प्रकटे । निःशब्द वस्तु ॥८॥ करावे क्रिया करणी । निपजती सचित्र चिंतामणी । तेणें अकर्तेपणाची खाणी । खवळली उठी ॥९॥ जें जें उपजे चरणीं । तें अकर्तेपणेंचि परणी । मग अद्वैताचिये भरणीं । सुखवासें वसती ॥२१०॥ निश्चळाच्या अंगावरी । चपळ पाउलांच्या हारी । चाळवी जैशा लहरी । क्षीराब्धिमाजी ॥११॥ शयना अवसरीं । शेज परेचे उपरी । जाणपण घालोनि बाहेरी । स्वसुखें निजे ॥१२॥ आकाशाच्या अंगावरी । वायु नाना क्रीडा करी । परी कहीं गगनाबाहेरी । पाऊल न घाली ॥१३॥ तैसी इंद्रियकर्माची प्रवृत्ति । निपजतांही हातोपातीं । परी निःसं- गाची संगती । सोडिली नाहीं ॥१४॥ तेणेंसीच क्रिया उपजे । तेणेंसीच कर्म निपजे । तेणेंवीण काजें । काज करूं विसरे ॥१५॥ श्वासोच्छ्वासाचे परिचार । ते निर्व्यापारेंचि व्यापार । निमिषोन्मिषाचे विकार । निर्विकारें विचरती

॥१६॥ जैं सद्‌गुरुकृपा घडफुडी । तैं अतींद्रिय जे गोडी । तें इंद्रियकर्मीं उघडी । उदास रहाटे ॥१७॥

## सद्‌गुरुकृपेनें असाध्य तें साध्य

या कारणें सद्‌गुरूची कृपा पाहे । तरी असाध्य तेंचि साध्य होये । यालागीं धरावे त्याचे पाये । निजात्मभावें ॥१८॥ तो काळाचा आकळिता । मायेचा निर्दळिता । मनाचा नियंता । तोचि एक ॥१९॥ तो वेदाचा वाचकू । अर्कांचा आदिअर्कू । इंद्रियांचा द्योतकू । असे प्रभापणें ॥२०॥ यालागीं कार्यसिद्धीचे माथां । भजावें वेगीं गुरुनाथा । बोलिलों ते अवस्था । ऐसी आहे ॥२१॥ सकळसाधनां गुरुभजन । साध्यावरही गुरुसेवन । गुरुवांचूनियां ज्ञान । विज्ञान न घडे ॥२२॥ गुरुनिःशेष परब्रह्म । गुरु आज्ञा सकळकर्म । गुरुसेवा तो स्वधर्म । सर्वार्थसिद्धि ॥२३॥ ते गुरुकृपेची गोडी । जरी वेगळेपणें आणी जोडी । तरी नागवणचि रोकडी । आणिली जाण ॥२४॥ जैसा गुळामाजी दगडू । सर्वांग झाला गोडू । तरी परिपाकीं दावी निवाडू । वेगळेपण ॥२५॥ कां आंबयाच्या पोटीं । असती रसाचिया खोटी । परी त्याहीमाजीं असे गांठी । तें वेगळीचि पडे ॥२६॥ कां सोज्ज्वळ हिरा शुद्ध । माजीं अवलक्षणाचा बिंद । तो अमोल परी मंद । होऊनि ठेला ॥२७॥ घृतामाजीं घातलें काश्मीरलिंग । तें तद्रूपचि दिसे चांग । परी वेगळेपणाचें आंग । अनसुट असे ॥२८॥ निद्रित निद्रा-

सुख । आंगें नव्हेचि निःशेष । यालागीं वेगळेपणचि संतोष । सांगों लाहे ॥२९॥ तैसा आत्मसुखें मी सुखी आहे । ऐसा सुखत्वें फुंजों लाहे । तरी वेगळेपणचि राहे । सुखवेदनें ॥२३०॥ लवण म्हणे मी गोड पाणी । तरी नाहीं मिळालें मिळणीं । तेणें स्वादें वेगळेपणीं । द्योतिला ठावो ॥३१॥ चंद्र तोष देखोनि कळा । तरी तो चंद्रपणा वेगळा । चंदन तोषे देखोनि परिमळा । तें चंदनत्वा मुके ॥३२॥ हिंगु म्हणे मी दुर्गंधू । तरी तो वेगळेपणें शुद्धू । तैसा आनंद म्हणे मी आनंदू । तें आनंदा वेगळा ॥३३॥ तैसें सात्त्विकाचें भरितें । कां सुख सुखपणें दावी सुखातें । तरी जाण अज्ञान तेथें । ज्ञानरूप असे ॥३४॥ जैसें काष्ठ अवघें जळे । होय काष्ठपणावेगळें । परी लखलखिजे इंगळें । तो काष्ठलेश कीं ॥३५॥ लवण जळीं मुरे । परी स्वादू जळत्वें थावरे । तें लवण जळाकारें । उरलें दिसे ॥३६॥ कापूर आगीं मिळे । तरी कापुरत्व न मावळे । तो अति दीप्त उजाळें । उरला दिसे ॥३७॥ तैसें सुख एक आहे । ते जेथें प्रगट हो लाहे । तेथ अज्ञान दिसत आहे । ज्ञानरूपें ॥३८॥ अज्ञान ज्ञानता नव्हे । तरी सुख दुःख कवणा होत आहे । तेथ सात्त्विकाचेनि फुंजें लाहे । अज्ञान ज्ञानें ॥३९॥ तरी ज्ञान ऐसा ठसा । ते अज्ञानाची उत्तरदशा । जैशी कडूसेंद परिपाक वयसा । गोडीतें ये जेवीं ॥२४०॥ मुग्ध वयसेचें बाळ । तेंचि वयत्वें चतुर चपळ । होय तेवीं केवळ । अज्ञान ज्ञानें ॥४१॥ लोखंड केवळ कृष्णवर्ण । त्याचें सोज्ज्वळ होय दर्पण । तैसें अज्ञान तें ज्ञानपण । परिपाकें

राहे ॥४२॥ तैसा आत्मा सुखित्वें सुखाचा भोग । तें अज्ञान निघालें ज्ञानाचें अंग । तेंही वोसंडी तें चांग । साचार मिळणी ॥४३॥ अज्ञान तत्काळ जाये । परी ज्ञान अति सबळ राहे । जळगार जळीं विरोनि जाये । परी मोती न विरे ।४४।

## अभिमान आहे तेथें विकास नाहीं, त्याला स्वस्वरूपाची ओळख होणें नाहीं

उदकाचें मोती मोला चढलें । तें वनितावदनीं फांसा पडिलें । तैसें ज्ञातेपण सज्ञान झालें । तें पडिलें अभिमानीं ॥४५॥ मृद्‌भांडें हिरवें केलें । तें तत्काळ मृत्तिके मिळालें । भाजिलें तें अतिकाळें । मृत्तिका नव्हे ॥४६॥ निखळ मी शुद्ध ज्ञान । ऐसा वृत्तिरूपें अभिमान । स्फुरे तें भवमूळ जाण । ज्ञानरूप ॥४७॥ जहालेनि ज्ञानें । मी मुक्त मानिजे मनें । तो ज्ञानबंध म्हणे । उपनिषद्मार्गें ॥४८॥ लोखंडाची बेडी तोडिली । मां आवडी सोन्याची जोडिली । तरी बाधा तंव रोकडी । जैशीतैशी ॥४९॥ खैराचा सूळ मारी । मा चंदनाचा काय तारी । तैसी ज्ञान अज्ञान दोन्ही परी । बाधकचि ॥२५०॥ जळीं प्रतिबिंब बुडालें साचें । तें बाहेरी निघालें दैवाचें । म्हणती या मूर्खाचें । मुक्तिपद हें ॥५१॥ आधीं बंधचि तंव साच नाहीं । मा मुक्तता मानावी कवणे ठायीं । हें न घडतें मानें जेथ पाही । तो ज्ञानबंध होये ॥५२॥ तरी शुद्ध जें स्वरूपज्ञान । तें वृत्तिरूपें घे अभिमान । तैं वरिष्ठाचेंही वचन । न मनी ज्ञानें ॥५३॥ येथ आपुली

जे विषयावस्था। ज्ञान प्रतिपादी सर्वथा। भोग भोगुनी म्हणे अभोक्ता। हा ज्ञानबंधु ज्ञानी ॥५४॥ हा अभिमान ऐसाचि फुडा। मुक्तपणें घाली खोडा। काय करील प्राणीया बापुडा। नकळे अतिसूक्ष्मपणें ॥५५॥ शुद्ध स्वरूपीं मीपण उठी। तत्काळ भासती ब्रह्मांड कोटी। जें मीपण जीवाचें पोटीं। तें मुक्तता कैंची ॥५६॥ मीपण ईश्वरा बाधी। तोही शबल कीजे सोपाधी। शुद्धासी जीवपदीं। मीपण आणी ॥५७॥ जेथ सूक्ष्मत्वें अभिमानू असे। तेथ सूक्ष्मत्वेंचि विषयो वसे। तेणें अभिमानें लाविलें पिसें। मी मुक्त म्हणोनी ॥५८॥ जेथें स्वरूपप्राप्ती न घडे। तेथ मी बद्ध सत्यत्व पडे। तेणें नाथिलेंच उघडे। मिथ्या मुक्ती ॥५९॥ ते जेथ स्वरूपप्राप्ती काची। तेथ मुक्ती मानी साची। येऱ्हवीं निजीं बंधमोक्षाची। वार्ताही नाहीं ॥२६०॥ अभिमानाचेनि लेशें। मुक्तवासना उल्हासे। यालागीं अभिमानाचेनि निःशेष नाशें। निर्विशेषप्राप्ती ॥६१॥ जेथ अभिमान समूळ तुटे। तेथ चिन्मात्र पहाट फुटे। समाधी नेटेंपाटें। म्हणती त्यातें ॥६२॥ निरभिमान निरवधी। तेचि अखंड समाधी। परी काष्ठा ते त्रिशुद्धी। समाधी नव्हे ॥६३॥ ताटस्थ्या समाधी साचे। मानितां त्या स्वरूपाचें। ज्ञान नाहीं निश्चयाचें। अनुमानसिद्धी ॥६४॥ आघातें मूर्च्छा आली। तेणें काया पडोनि ठेली। तरी काय तेथ झाली। समाधी साच ॥६५॥ बहुरूपी सोंग संपादितां।

वायु स्तब्धला अवचिता। तेणें सर्वांगीं ताटस्थ्यता। बहु-काळ झाली ॥६६॥ परी वासना जेथ न तुटे। तेथ समाधी कैंची भेटे। सावध होतांचि प्रगटे। उचित जी राया॥६७॥ सर्वसंकल्पा अवधी। ते निर्विकल्प समाधी। सकळ शास्त्र प्रतिपादी। समाधी तेची ॥६८॥ स्वरूप देखोनि तत्त्वता। आश्चर्यें जाली तटस्थता। तरी जाण तेथ सर्वथा। वृत्ति आहे ॥६९॥ स्वरूप देखोनि विस्मयो उठी। तोही जिरवूनि पोटीं। तयावरी जे दशा उठी। ते समाधी साचार ॥२७०॥ जेथ निःशेष वृत्ति विरे। तेथ विस्मयो कवणासी स्फुरे। सूक्ष्म कल्पना थावरें। तैं विस्मयो प्रगटे ॥७१॥ जेथ निर्विशेष प्राप्ती होये। तेथ देहचि स्फुरों न लाहे। तेव्हां तटस्थ कीं चालताहे। हे अपरदृष्टी ॥७२॥ ऐसे देहचि मिथ्यापणें। त्याचीं कवण लक्षी लक्षणें। मृगजळीचेनि नहाणें। निविजे जैसें ॥७३॥ मिथ्या देहासि तटस्थता। जालिया म्हणावा ज्ञाता। ऐसीं लक्षणें लक्षितां। निरंतर ठकती ॥७४॥ होकां स्वप्नींचिया नरा। लागती ताटस्थ-मुद्रा। तरी काय तो खरा। जागृती आला ॥७५॥ ते स्वप्नींचिया लोकाप्रती। ज्ञातेपणाची ख्याती। परी नाहीं आला निश्चितीं। जागेपणा ॥७६॥ जो साच जागृती आला। त्यासि स्वप्नदेह मिथ्या झाला। हें साच कीं या बोला। अनुमान आहे ॥७७॥ जो जागा होऊनि म्हणे। लाऊं स्वप्नदेहा लक्षणें। हें अधिक दशा कीं लाजिरवाणें। ज्याचें त्यासी ॥७८॥ तो जागा होऊनि स्वप्न सांगे। तें

त्याच्या पोटीं लटिकेपण अवघें। परी स्वप्न देहासी आंगें। आतळला नाहीं ॥७९॥ तैसी साचार वस्तुप्राप्ती। जो नातळे देहस्थिति। तरी देहो वर्ते कवणे रीतीं। तें प्रारब्धशेषें ॥२८०॥ वारा वाजोनि सरे। रुखीं हेलावा थावरे। कां लक्ष्य भेदोनि तीरें। चालिजें पुढें ॥८१॥ निशाणा घावो वाजोनि जाये। परी ध्वनीशेष उरला राहे। अर्क तपोनि अस्ता जाये। तरी उबारा उरे ॥८२॥ मेघ वोळोनि वोसरे। जळ अवघेंचि जिरे। परी भूमीं वोल थावरे। तेणें पिकती शेतें ॥८३॥

अविद्येचा निरास झाला तरी प्रारब्धभोग हा ज्ञानी देहानें भोगत असतो

तैशी अविद्या नासोनि जाये। परी प्रारब्धभोग शेष राहे। तेणें शेषें देह वर्तताहे। ज्ञानियांचा ॥८४॥ जेवीं कां पूर्व संस्कारीं। मद्यप वस्त्र खांद्यावरी। आहे नाहीं आठवो न धरी। तैसें देह मुक्तासीं ॥८५॥ सर्प कांचोळी सोडोनि जाये। तें वारेन हालों लाहे। मुक्तांचें देह तैसें पाहे। कर्मी वर्ते ॥८६॥ जैसे गळित पत्र वारेनि चळे। तैसें देह वर्ते प्राचीनमेळें। परी संकल्पाचेनि विटाळें। नातळे मन ॥८७॥ अविद्या जेथ नासोनि जाये। देह तेंही अविद्याकार्य। कारण नाशलिया कार्य राहे। हें केवीं घडे ॥८८॥वृक्ष मुळीं छेदिला जाये। आर्द्रता तत्काळ न जाये। तेवीं अविद्यानाशें देह राहे। प्रारब्धअवधीं ॥८९॥ तया

प्रारब्धाच्या पोटीं। सांगे सकळ जगासी गोठी। अथवा दरेदरकुटीं। माजीं पडो ॥२९०॥ कां आचरो सकळकर्में। कां तटस्थ राहोनि भ्रमें। तें प्राचीनचि परिणमे। तदनुरूपें ॥९१॥ जेथ बाध्य बाधकता फिटली। समूळ अविद्या तुटली। तेथेंचि निर्विकल्प जाली। समाधी सैरा ॥९२॥ ऐसी ज्यास समाधी अवस्था। भोग भोगुनी अभोक्ता। सकळ कर्मीं अकर्ता। तोचि होय ॥९३॥ तो इंद्रियांचेनि योगें। दिसे विषयावरी लोटें निजांगें। परी निःसंगता संयोगें। भंगों नेदी ॥९४॥ पहातां जळामाजीं झाली। आणि जळावरी वेलि गेली। परी जळेंसी अलिप्त ठेली। पद्मिणीपत्रें ॥९५॥ कां फुंकितां लखलखिला। जो फुंकास्तव प्रकटला। तो फुंक न साहतां ठेला। दीप जैसा ॥९६॥ तैसी कर्मास्तव उत्पत्ती। आणि कर्मीचीं जाली परम प्राप्ती। त्या कर्मामाजीं वर्तती। निष्कर्म होवोनी ॥९७॥ तो वेव्हारी होवोनि। ताटस्थ राहोनि जनीं। परिस्थिती अधिक उणी। बोलोंचि नये ॥९८॥ रावो उपरिये निजीला। तरी राजपदा अधिक आला। कां बाहेरी व्याहाळिये निघाला। तरी राज्यत्वा मुके ॥९९॥

## पूर्णत्वाला पोचलेल्या ज्ञानी पुरुषाला समाधि व व्युत्थान संभवत नाहीं

यालागीं समाधी आणि व्युत्थान। या दोहींचें लक्षण। अपक्वासींचि घडे जाण। पूर्णासि नाहीं ॥३००॥ चाली चौपदी। त्या पूर्णाची परिपूर्ण कहाणी। वेद सांगे निज-

निष्ठा मौनी। जो मौन बोलणें ग्रासोनि दोन्ही। मुक्ती वाहे तयाचे घरीं पाणी ॥१॥ मुळीं ठेऊनि फुटकी हुंडी। ब्रह्मरसाची रांधिली गोडी। वेदवादाची सांडोनि वोढी। चवी चाखे त्यासि समाधि गाढी ॥२॥ राउतावरी बैसे घोडे। रायाची छाया छत्रीं पडे। समूळ शून्य ज्याचेनि उडे। चिन्मय दुर्गी तो नर चढे ॥३॥ प्रणवधनुष्य निर्धारें काढी। एकेवेळें दोन्ही शर सोडी। मनोमृगातें घायेंवीण पाडी। त्याची त्वचा शस्त्रेंवीण काढी ॥४॥ ते मृगाजिन साधोनि पाहे। त्यावरी ज्याचें आसन राहे। निजमायेतें न मरूनि खाये। समाधि त्याचे वंदी पाये ॥५॥

## अशा परिपूर्ण पुरुषोत्तमाचें वर्णन

निजतेजीं जो स्वयें माये। तेजाचें निज तेज स्वयें होये। नयनीं नयन जो होऊनि राहे। समाधि वंदी त्याचे पाये ॥६॥ अहं सोहं सांडोनि वोझें। हें सुख जेणें अनुभविजे। निजेतें मारूनि निजीं निजें। सहज सुखें तो सहजीं सहजें ॥७॥ सहज सुखें तो अति संतोषें। देहादि ममता मिथ्या देखे। रसनेंवीण जो रसू चाखे। नित्य निमग्न तो निजसुखें ॥८॥ एका जनार्दनाचो बोवी। ब्रह्मसुखातें सहजें गोवी। सहज भावार्थी तो सद्भावी। ब्रह्मसुखाचा तो अनुभवी ॥९॥ समाधि सुख जें नेटेंपाटें। जें योगमुद्रा योग्या भेटे। एका जनार्दनीं हाटें वाटें। तेणें सुखेंसी सहज रहाटे ॥३१०॥

## त्याचें अगाध सामर्थ्य

तो देखे तेंचि परब्रह्म। तो करी तेंचि सत्कर्म। त्याची लीला तो परम धर्म। धार्मिकांचा ॥११॥ तो जल्पे तें वेदशास्त्र। तो वोसणायें तो महामंत्र। तो अनादीचें आदिसूत्र। अव्यक्ततत्वें ॥१२॥ तो पुरुषोत्तमा पुरुषोत्तम। तें विश्रांतीचें विश्रामधाम। तो निष्कामाचा काम। कामनाशून्य ॥१३॥ त्याच्या श्वासोच्छ्वासाचे परिचार। तें आनंदाचें माहेर। त्याच्या निमिषोन्मिषामाजीं घर। निजसुखें केलें ॥१४॥ जो निर्गुण निःशब्दाचा। तो बोले आपुलिया वाचा। हा चाले तेथें समाधीचा। संतोष तोषे ॥१५॥ तो बैसला दिसे एकदेशीं। परी तो सर्वदेशनिवासी। देह हिंडतां दिगंतासी। चलन त्यासी असेना ॥१६॥ तो असे वसे जिये देशीं। तेथ चाऱ्ही मुक्ती होती दासी। तो साचार भेटे त्यासी। परब्रह्मचि भेटलें ॥१७॥ ईश्वर जो जगाचा। तो अज्ञाधारकू तयाचा। आनंद वोळगणा अंगाचा। आठै प्रहर ॥१८॥ शम त्याचेंनि समत्वा आला। संतोषू त्याचेनि संतोषला। अनुभवा अनुभवू जाला। याचेनि अंगें ॥१९॥ त्याच्चिये निद्रेपाशीं। समाधि ये विश्रांतीसी। शिणली माहेरा जैसी विसावों धावो ॥२०॥ ज्ञान ज्ञातेपणें संतापलें। तें याच्चिये दृष्टीं जिवों आलें। वेद वोसंगा निवाले। वाचेच्चिये ॥२१॥ हरि विरंच्यादि देव आले। ते याचेनि देवत्वा मुकले। शून्य शून्यपणा उबगलें। याच्चिये भेटीं ॥२२॥ वैकुंठींचे मुक्तवासी। नवस नवसिती

अहर्निशीं । ऐशियाची भेटी आम्हासी । होईल केव्हां ॥२३॥ जें जगा वंद्य महामाये । जें हरिहरां वश नोहे । ते यांचिये पायीं समाये । नाहींपणें ॥२४॥ जग जगपणें संतापलें । तें याचिये छायें निवों आलें । कीं छायेमायेसी मुकलें । जगत्वा जग ॥२५॥ अधिष्ठान परदेशी जालें । ते याचिया वोसंगा विसावों आलें । कीं खेंव देऊनि सुरवाडलें । न सुटेचि मिठी ॥२६॥ येवढिये प्रतीतीच्या अंगीं । निष्ठा काष्ठा गेली भंगीं । मग गुरुशिष्य दोन्ही भागीं । आपणपे स्वयें ॥२७॥ कागा दोन्ही डोळे म्हणणें । परी एकें बुबुळें दोन्ही देखणें । कां दोदांतीं चाखणें । एकी वस्तु ॥२८॥ वाम सव्य दोन्ही भाग । दो नांवीं एक अंग । तैसे गुरुशिष्य विभाग । एकत्वें दिसती ॥२९॥ जरी गुरुशिष्य दोन्ही एक । तरी कां दिसे न्यून आधिक । आणि निवृत्तिशास्त्र देख । याचिया बोधा ॥३०॥ तरी हें अवघेंचि वावो । ऐसा अवगमताहे भावो । हा मायामय निर्वाहो । मृगजळत्वें ॥३१॥ जीव शिवाचा जो भेद । तो केवळ मायिक संबंध । ते मायेचा विनोद । सादर ऐके ॥३२॥

## मायेचा उपकार

माया अवघे म्हणती कुडी । परी ते मायेची उत्तम खोडी । स्वरूप आच्छादुनी गाढी । वाढवी श्रद्धा ॥३३॥ माया ब्रह्म राखे गुप्तता । यालागीं आवडे समस्तां । मुमुक्षु अति अवस्था । वैराग्यता श्रद्धाळू ॥३४॥ तेंचि ब्रह्म प्रगट असतें । तरी कोणीच त्यातें न पुसते । अवघेंचि उपेक्षितें ।

हेळणा करूनीं ॥३५॥ सूर्य परब्रह्म प्रत्यक्ष दिसे । त्यासि उपेक्षिती लोक जैसे । नमस्कारीं श्रद्धा नसे । ब्रह्मासि पैं तैसें होतें ॥३६॥ अग्नि देवाचें निजमुख । त्यावरी पाय देऊनि घेती शेक । आळशी तेथ थुंकी थुंक । ब्रह्मासिही देख तैसें होतें ॥३७॥ मनकर्णिका ब्रह्मजळ । तेथें करिती मूत्रमळ । एवं प्रत्यक्षासि केवळ । उपेक्षा होतसे ॥३८॥ तैसी परब्रह्माच्या अभक्तीं । अवघ्यां होती अधोगती । हे चुकविली निश्चितीं । माया देवी ॥३९॥ हा मायेचा उपकारू । अवघ्यांहूनी परम थोरू । आम्हीं तव साचारू । मानिला जीवें ॥३४०॥ माता पित्याचा विकल्प धरिती । जे गुरूसी विकल्पिती । ते प्रगटस्वरूपीं श्रद्धा धरिती । हें न घडे ॥४१॥ यालागीं मायाचि सज्ञान । ब्रह्म आच्छादुनी जाण । श्रद्धायुक्त जन । अतिशयें केलें ॥४२॥ हो कां डोळ्याची बाहुली । कधीं वेगळी नाहीं जाली । परी ज्याची त्यावरी बिंबली । दिसे जैसी ॥४३॥ कां सागराची लहरी । स्वभावें चपळ सागरीं । तैसें पूर्णाच्या अंगावरी । मिथ्या जीवित्व भासे ॥४४॥ आंबा परिपाकता पावें । तैं परिमळ फळापुढें धावें । तैसें चिन्मात्राचे हेलावे । जीवत्वें दिसती ॥४५॥ जैसा शब्द आणि शब्दार्थ । दोन्ही एकत्वेंचि वर्तत । तैसें जीव चैतन्या आंत । नसोनि असती ॥४६॥ जैशा घृताचिया कणिका । घृतेंसीं नव्हेति आणिका । तैसें जीव परब्रह्मीं देखा । कल्पनामात्र ॥४७॥ जो अलिप्तपणें उभा । जो थिल्लरीं बिंबला प्रतिबिंबा । तरी मिथ्या द्वैत शोभा । देखणा

तोचि ॥४८॥ जरी बिंब सजीव नसे । तरी प्रतिबिंब कवणा आभासे । यालागीं द्वैतभावें आभासे । अद्वैतप्रभा ॥४९॥ तरी एक अविद्या बहु विद्या । नाना मत मर्यादा । एकत्वीं विरुद्धा । अर्थातें जनिती ॥३५०॥ हा पूर्वपक्ष गाढा । न कळोनि शास्त्रज्ञमूढा । मानितानी सदृढा । विरुद्धा अर्थातें ॥५१॥

## मुक्तात्मा इतरांना मुक्त करीत नाहीं, कारण त्याला सर्व चराचरच मुक्त भासत असते. तो अभिमानच नसतो

तरी अविद्या एकचि निश्चितीं । परी बोधका अनंता शक्ती । जैशी एके दावणीं बांधिती । अनेक पशू ॥५२॥ तेथ पशुप्रती बिरडें । वेगळालें आगरडें । येणें बाधकत्व घडे । एकानेकविधा ॥५३॥ तेथ ज्याचें बिरडें तुटलें । तें दोर दावणीहून सुटलें । तैसें अविद्या आवरण फिटलें । तो मुक्त झाला ॥५४॥ एकाचेनि अविद्यानाशें । जगचि मुक्त व्हावें ऐसें । मानिती त्या मतपिसें । मताभिमानें ॥५५॥ पैं एकें ढोरें दावणी उपडिली । तरी अवघींचि कैसेनि सुटलीं । ते अधिकाधिक गुंफलीं । परस्परानुमिळणीं ॥५६॥ तरी एकाच्या अनुष्ठानसिद्धी । जो जगाची मुक्ती प्रतिपादी । तो जाण पां त्रिशुद्धी । अधिक गुंफे ॥५७॥ एकाचेनि भोजनें । केवीं तृप्ती होईजे सकळजनें । कीं एकाचेनि अमृतपानें । जग अमर होईजे ॥५८॥ तैसी एकाची परप्राप्ती । कैसी सकळांसी निवृत्ती । हे बाळसाची वदंती । परी सिद्धार्थ नव्हे ॥५९॥ ज्याची अविद्या निरसे । त्यासि जगचि मुक्त

दिसे। तेथ मुक्त म्यां करावें ऐसें। अभिमानत्व नुरे ॥३६०॥ फिटली अविद्येची बाधा। तोचि प्राप्त मुक्तिपदा। हे वसिष्ठादिमत मर्यादा। ज्ञानियांची ॥६१॥ केवळ दोराचा व्याळ। हा काळया नाव शंखपाळ। म्हणतां होय बरळ। सांगतांचि ॥६२॥ कां गंधर्व नगरीचे हुडे। मागां बहू पुढें थोडे। म्हणती ते शहाणे कीं वेडे। विचारीजोपां ॥६३॥ आकाशाचीं सुमनें। सुवासें कीं वासहीनें। विवंचिती ते देखणे। निर्धाराचे ॥६४॥ तैसी अविद्याची तंव वावो। तेथ कैंचा एकानेकभावो। हा वाढविती जो निर्वाहो। ते काय निपुण ज्ञानी ॥६५॥ डोळियामाजीं बाहुली असे। हें म्हणे तोचि प्रतिबिंबला दिसे। तेवीं आपुलेनि संकल्पवशें। अविद्या सृष्टी ॥६६॥ जैशीं आपुलींचि उत्तरें। होती पडिसादा प्रत्युत्तरें। तेवीं स्वसंकल्पाचेनि आधारें। मायादिसृष्टी ॥६७॥ स्वसंकल्पें अविद्या बाधू। स्वसंकल्पें मानी बद्धू। स्वसंकल्पें अनुवादू। मी मुक्त म्हणउनी ॥६८॥ आरिसा काये प्रतिबिंब असे। परी जो पाहे तोचि अभासे। तेवीं आपुलेनि संकल्पवशें। वसविल्या सृष्टी ॥६९॥ स्वसंकल्पावांचूनि पाही। जगीं अविद्याचि नाहीं। ते कल्पना निमे ठाईं। तैं यातायात कैंचीं ॥३७०॥ म्हणोनि कल्पनेच्या नाशीं। अविद्या पडे मनाचे ग्रासीं। तैं अज्ञानाची निशा निरसी। अविद्या भावें ॥७१॥

## अविद्येचा निरास झाल्यानंतरची अवस्था

अविद्या निरसूनि मन । उरे त्याचें ऐसें चिन्ह । जैसा चित्रींचा हुताशन । दिसे परी बाधीना ॥७२॥ कां दग्ध-वस्त्राची घडी । भासे परी ते अवघें कुडी । तेथ कर्माकर्माची परवडी । बोलोंचि नये ॥७३॥ बाधित दृश्याचें भान । तेथ मनपणें नाहीं मन । हे अनुभवींची खुण । अनुमाना नये ।७४। काष्ठ अवघें जळोनि जाये । परी अग्नी काष्ठाकारें राहे । काष्ठचि अग्नी होये । तैसें तें मन॥७५॥ तेथ पदें पदग्रासू । मनें मनाचा नाशू । अविद्येचा निरासु । अविद्यकत्वें ॥७६॥ तेथ प्राणेवीण परिचार । क्रियेंवीण आचार । मनेंवीण विचार । विचारीं विरे ॥७७॥ तें नाठवितांचि आठवे । विसरवितां न विसरवे । जें भुलवितां न भुलवे । प्रमदामोहें ॥७८॥ तें निजे-लियाहि जागे । जागलिया निजेंसि वागे । जें सर्व करूनि उगें । सर्वदा असे ॥७९॥ तेथ शब्देवीण बोली । चरणेंवीण चाली । दृष्टीवीण आली । दर्शनशोभा ॥३८०॥ तंव उपशमा जाला शमू । नेमातें मुकला नेमू । ठकोनि ठेला निकामू । सका-मेंसी ॥८१॥ तेथ धैर्या मुकली धृती । वार्धक्या आली शांती । जे सगुणाची मूर्ति । अगुणत्वा आली ॥८२॥ जाला दिवसाचा उगाणा । रात्रि मुकली रात्रपणा । संध्याकाळाची गणना बुडोनि गेली ॥८३॥ फिटला वेदाचा भ्रम । लाजोनि लोपलें कर्म । शिगें चढला धर्म । धार्मिकेंविण ॥८४॥ तेथ मोक्षा मुक्ति जाली । बोधाची भुली गेली । साधनाचीं फिटलीं ।

सांकडीं अवघीं ॥८५॥ अहिंसा सामावली अंगीं । समाधी सांठविली सर्वांगीं । धारिष्ट रंगलें रंगीं । चैतन्याचे ॥८६॥ निद्रा निःशेष गेली । जागृती नाहीं जागली । स्वप्नाची मोडली । समूळ वाट ॥८७॥ दवडूनि अभ्रघन । आकाश सोलिलें मौन । तिये आरिसा पहातां उन्मन । बिंब प्रतिबिंब न दिसे ॥८८॥ तेथ अभ्यास लाजिला । विस्मयो वेडावला । अनुभव बुडाला । अवघेनि आंगें ॥८९॥आनंदु गिळिला बोधें । बोध गिळिला आनंदें । दोन्ही नाहीं नुसधें । सुखचि नांदे ॥३९०॥ तेव्हां सुख ऐसें म्हणतें । सुखा वेगळें नुरेचि तेथें । यालागीं सुखपणातें । सुख सुखत्वा विसरे ॥९१॥ सुख सुखत्व जेथ नाहीं । तरी शून्यवाद आला पाहीं । शून्य जाणवले जिये ठायीं । तें तंव शून्य नव्हे कीं ॥९२॥ हो कां चंद्रमा तिये अवसें । स्वयें प्रगटे ना कोणा दिसे । मी चंद्रमा आहें ऐसें । तो तंव जाणे ॥९३॥ राय विनोदें जाला संन्यासी । स्वयें संपादूं जाणे तया वेषासी । सत्यत्व मानलें लोकांसी । परी तो आपणापें जाणे ॥९४॥ सर्वग्रस्तोदय ग्रहणीं । स्वयें प्रगटी तरणी । पहातां न देखेचि कोणी । तरी काय सूर्य नाहीं ? ॥९५॥ तैसें शून्य जेणें जाणितलें । त्यासि शून्य जाय केवीं केलें । आंख गणितां शून्य आलें । परी गणकू शून्य नव्हे कीं ॥९६॥ यालागीं शून्यसंमतवादा । माथा नुधवेचि शब्दा । शून्यसाक्षित्व शून्यवादा ।नास्तिक्य आली ॥९७॥ म्हणोनि आणिक विशो नोहे । ना सुख सुखपणें सुखा नये । ऐसें कोणी एक सुख आहे । सदोदित॥९८॥ऐशिया निजसु-

त्याच्या पोटीं । दुर्जेनवीण ग्रंथ गोठी । वाचेवीण जगजेठी । जनार्दन वदवी॥९९॥अवघा जनार्दनचि देखा । तेथ आडनांवें मीनला एका । तेणें नांवें ग्रंथलेखा । अलक्ष लक्षी ॥४००॥

## सद्गुरु जनार्दनकृपेनें औपनिषदिक तत्त्वज्ञान मराठींत सहजी आलें

जेथ जनार्दन कृपा प्राप्त । तेथ उपनिषदाचा मथितार्थ । देशभाषेमाजीं ग्रंथार्थ । लोटांगणीं येती ॥१॥ ते गुरुकृपावैभवें । आत्मसुख येणें नांवें । ग्रंथ निर्मिला देवें । येहि अक्षरीं अक्षर ॥२॥ जैशी खांबसूत्रींची बाहुली । सूत्राधीन उगली । तैसा जे जे बोल बोलवी बोलीं । ते वाचा वदे ॥३॥ पहिलें अणुमात्र आरंभवी सहज । परी आरंभिलें नकळे मज । पाठी येकायेक ग्रंथबोज । बोडवला दावी ॥४॥ निरूपण कायें चालवावें । प्रमेय कैसें आकळावें । हें कांहीं सर्वथा जीवें । म्यां विवरिलें नाहीं ॥५॥ माझे मनीं रिघाला जनार्दन । माझी जिव्हा तो झाला आपण । माझा हात धरूनियां जाण । ग्रंथलेखन तो करवी ॥६॥ नाहीं श्रोतयांचा साक्षेप । नकळे ग्रंथ पीठिकेचें रूप । परी एकसरें स्वरूप । ग्रंथार्था आलें ॥७॥ निरसावी विकल्प बाधा । राखावी वेदमर्यादा । हें कांहींचि मी कदा । उपलवूं नेणें॥८॥परी नेणों काय श्रीअनंता । आवडली हे ग्रंथकथा । तो निजभाविकतां अर्था । वदोनि ठेला ॥९॥ आतां मजमुखें वदला देवो । ऐसा घ्यावा अहंभावो । तंव विश्वमुखें पहाहो । देवचि वदे ॥४१०॥ त्या अद्वैतपरपवित्रा । विकल्पनिरसनीं विचित्रा ।

वोविया नव्हे हे अर्धमात्रा । प्रणवपीठींची ॥११॥

## स्वात्मसुखाचें महत्त्व

स्वात्मसुख येणें नांवें । हा केवळ ग्रंथ नव्हे । येणें रहस्य अनुभवावें । निजात्मसुख ॥१२॥ जें आत्मसुखें सुरत । त्यांसी पढियंता हा ग्रंथ । जे आत्मसुखा आर्तिवंत । तेहीं ग्रंथार्थ घ्यावा ॥१३॥ हो कां पतिसुखालागीं गोरटी । सासूसासऱ्यासी मानी सोठी । तैसे प्रमेय सुनी दिठी । पहावा ग्रंथ ॥१४॥जैसी द्राक्षीच्या घडीं । गोडीयेहूनि अधिक गोडी । तैसी वोवीयेहूनि चढी । वोवी आहे ॥१५॥ जैसें चंद्रकिरणीं अमृत भरलें । तें चकोरासीचि भागा गेलें । तैसें आत्मसुख उपाइलें । निर्मत्सरासी ॥१६॥ पहाहो तें आत्मसुख कैसें । हें वारंवार मज पुसें । तरी करतलामलकविन्यासें । सांगेन आइका ॥१७॥ जैसा मर्दण्याला विकळ । कळे प्राप्तिसुख कल्लोळ । तैसें सुख सदा केवळ । कळेवीण साधूसी ॥१८॥

## आत्मसुखप्राप्तीसाठीं सद्गुरूचे पाय धरणें ह्याच एकमात्र मार्ग

अहो तें आत्मसुख सकळां आहे । परी ठाउकें नव्हे कीजे काये । यालागीं धरावे सद्गुरूचे पाये । तैं भावार्थें प्राप्ती ॥१९॥ सद्गुरु तोचि ब्रह्ममूर्ति । भावार्थें करितां अनन्यभक्ती । शिष्या स्वात्मसुखाची प्राप्ती । होय निश्चितीं तत्काळ॥४२०॥आतां ब्रह्मज्ञानाची किल्ली । सांगेन एक्याचि बोलीं । जयांची कल्पना निमाली । ते प्राप्त पुरुष ॥२१॥

## सर्व साधना स्वात्मसुखार्थच आहे

याचिलागीं आचारू । याचिलागीं विचारू । याचिलागीं शास्त्रसंभारू । शोधिजे सदा ॥२२॥ याचिलागीं ज्ञान । याचिलागीं ध्यान । योग अष्टांग साधन । याचिलागीं॥२३॥ याचिलागीं तपसायास । याचिलागीं जप संन्यास । एकाएकीं वनवास । याचिलागीं॥२४॥याचिलागीं दिगंबर । याचिलागीं वल्कलधर । याचिलागीं चर्मांबर । मृगव्याघ्राजिनादि॥२५॥ याचिलागीं निराहार । याचिलागीं फळाहार । याचिलागीं जटाधर । काषाय वास ॥२६॥ याचिलागीं वीतराग । याचिलागीं योगयाग । याचिलागीं निःसंग । संवाद कीजे ॥२७॥याचिलागीं वेद । याचिलागीं बोध । याचिलागीं भेद । सांडिजे सदा ॥२८॥ याचिलागीं संतांचे । माथां वाहिजती मोचें । महिमा सांडोनि रंकाचें । रंकत्व यालागीं ॥२९॥ यालागीं सद्‌गुरु । यालागीं तत्त्वविचारू । याचिलागीं धैर्य निर्धारू । धरविला जेणें ॥४३०॥ तो हा भवगजपंचानन । जो अनाम्य नामें जनार्दन । तेणें एकपणेंवीण एक होऊन । कवित्व करवी ॥३१॥

## शुद्ध भावाचा महिमा

येथ भावार्थ तें निज स्वार्थू । भावार्थ तें कृतकृत्यार्थू।भावार्थ तें परमार्थू।पाषाणीं पविजे॥३२॥येथ भावार्थ,तें भ्रांति फिटे। भावार्थ, तें विकल्प तुटे । भावार्थ तें देव भेटे । भाविला ठायीं ॥३३॥ भावार्थ तरी सत्यवादू । भावार्थ तरी सत्य

साधु । भावार्थ तरी सत्य बोधु । चिन्मात्रें ॥३४॥ भावार्थ तैं संकल्प तुटे । भावार्थ तैं देव भेटे । भावार्थ नाही तैं कष्टे । दैवहता ॥३५॥ भावार्थ तरी तीर्थ फळे । भावार्थ तैं तत्व कळें । वैकुंठींचे भावबळें । पाहुणे येती ॥३६॥ भावो, तैं भज्य भजना । भावें तुटे विकल्प कल्पना । भाव तैं भावना । तत्काळ फळे ॥३७॥ भावो तैं श्रेष्ठ भाग्य । भावो तैं वरिष्ठ वैराग्य । भावो तैं आरोग्य । भवरोगाचें ॥३८॥ भक्त भावार्थी निजाचा । तैं देव सेवकू होय सेलेचा । बोल बोले जे वाचा । ते तत्काळ करी ॥३९॥ द्रौपदीचे भावासाठीं । अंबर अंबराच्या पोटीं । करूनियां जगजेठी । राखिली लाज ॥४४०॥ प्रल्हाद पुत्र शत्रूचा । परी भाव फळला त्यासि त्याचा । द्वंद्व निरासी सर्वांगाचा । वोळगणा देवो ॥४१॥ यालागीं भावो,तैंचि जयवृत्ती । भावो तैं परमप्राप्ती । भावो तैं ख्याती । परमार्थाची ॥४२॥ भावार्थी सत्य गुरु । भावार्थें निजनिर्धारु । भावो नाहीं तैं भूमिभारू । जन्म होये ॥४३॥ गुरु शिष्याचिया बोला । भावार्थचि मोला आला । तो भाव जैं पालटला । तैं बुडाला परमार्थू ॥४४॥यालागीं चाड जैं परमार्था । तैं मळो न द्यावें भावार्था । भावेंवीण सर्वथा । परमार्थ न घडे ॥४५॥ जरी मळका होय भावार्थ । तैं मळकाचि मिळे परमार्थ । मग भावानुसार स्वार्थ । सकळ लाभे ॥४६॥ दृढ भावें भावना । जैं उद्भट उपजे मना । तैं जनीं जनार्दना । देखिजे साचें ॥४७॥ तो गुरु म्हणावा जनार्दन । माझिये नयनींचें अंजन । जेणें

स्वसुखाचें निधान। दाविलें डोळां ॥४८॥ त्यासि नाहीं गुरुत्वाची गोडी। परी गुरुत्व त्याचे पाय न सोडी। त्याचें चरणरज दैन्य फेडी। दावी निजस्वरूप ॥४९॥ यालागीं भावार्थेसी पाये। धरिल्या अविद्या निःशेष जाये। हे स्तुती अर्थवादू नव्हे। प्रतीति माझी ॥४५०॥

## सद्गुरुचरणाचें माहात्म्य

म्यां नाहीं केलें उग्र तप। नाहीं जपिन्नलों मंत्रजप। योगयाग खटाटोप। नाहीं तीर्थादि भ्रमण ॥५१॥ आम्हा सकळ साधनांचें साधन। हे सद्गुरूचें श्रीचरण। तेणें दाविली हे खूण। जग गुरुत्वें नांदे ॥५२॥ आम्हा गुरू तोही गुरू। शिष्य तोही सद्गुरू। निपराध तो परमगुरू। याचेनि पाये ॥५३॥ ऐशियाचे सांडूनि पाये। कोण कोणा तीर्था जाये। जाऊनि काय प्राप्ती लाहे। हें नकळे मज ॥५४॥ एका एकपणाची नाथिली दिठी। या एकपणाची सोडिली पेटी। मुक्त मुक्ताफळाची मोकळी गांठी। मिरवे जनार्दन चरणीं॥५५॥आतां सज्जनीं उपसहावें। हेंही नलगे प्रार्थावें। तेही सद्गुरूचि स्वभावें। झाले आम्हा ॥५६॥

## सद्गुरूंकडे या ग्रंथासाठीं श्रीनाथांची वरयाचना

ऐशिया जी गुरुनाथा। एका एकत्व चरणीं माथा। म्हणे वरद जी या ग्रंथा। द्यावा मज ॥५७॥ अज्ञान्याचें

अज्ञान फिटे। ज्ञानियांचा ज्ञानाभिमान तुटे। जनीं जनार्दन भेटे। सर्वत्र सदा ॥५८॥ येणें वरप्रसाददानें। भक्ताचेनि भाववचनें। आपणपेया जनार्दनें। दिधलें देख ॥५९॥ आतां एकपणाचेंनि नांवें। जन जनार्दनचि आघवें। आणि जनार्दनाचेंनि जीवें। जितुसे एका ॥४६०॥ एका एकपणेंवीण आतां। केला यापरी कवी कर्ता। विनवणी संतश्रोता। अवधान द्यावें ॥६१॥

## श्रोत्यांशीं सलगीचें बोलणें

तुमच्या लळेयाचे लळिवाडें। निःशब्दवादें बोलीगडें। केलें तें तुम्हापुढें। पढिन्नलों स्वामी ॥६२॥ बाळक बोले बोबडें। तेणें मातेसी प्रीती वाढे। तेवीं येंहि बोलीं वाडें कोडें। रिझाल तुम्ही ॥६३॥ संतीं अवधान द्यावें। सज्जनीं सन्मुख व्हावें। ग्रंथू केला येणें भावें। भावार्थेंसी ॥६४॥ हा ग्रंथू येणें भावें। जे संतीं सदा संतोषावें। संतोषोनिया म्हणावें। आपुलें मज ॥६५॥ समर्थ ज्याकडे पाहे। त्याचें दरिद्र विच्छिन्न होये। तेवीं संतकृपा जें होये। तें सनाथ जो मी ॥६६॥

## या ग्रंथाची उपयुक्तता

जें सिद्धांचें सिद्धस्थान। जें साधकाचें साधन। ये ग्रंथींचें संरक्षण। ऐसेंचि आहे ॥६७॥ यालागीं सिद्धां आणि साधकां। ये ग्रंथीं लाभे अवांका। हा दोहींचिया निजसुखा।

सुखसंतोष ॥६८॥ म्हणोनी मुक्त आणि मुमुक्षा । हा अर्थ लाभे निजापेक्षां । साध्यसाधनलक्षा । साधिकारें दावी ॥६९॥ जैसें आपुलिया भावना । भजन पाववी त्या त्या स्थाना । तैसा हा ग्रंथ जाणा । स्वाधिकारें निववी ॥४७०॥ हो कां आपुलेनि संकल्पवशें । देवदेवित्वें वस्तु भासे । तेवीं ग्रंथू हा अधिकारवशें । फळोनि दावी ॥७१॥

## ग्रंथाची अमृतोपम गोडी व त्याचें महिमान

ये ग्रंथींचें निरूपण । वरिवरि पहातां कठिण । परि अभ्यंतरीं गोडी जाण । अमृता ऐसी ॥७२॥ परी हेही उपमा थोडी । अमृतपानें अमर कोडी । मरणार्णवीं बुडी । देऊनि मरती ॥७३॥ तैसें नव्हे हें अमृत । जीवेंवीण जीववित । शिवेंवीण सामर्थ्य । समर्थून दावी ॥७४॥ हें पानेंवीण अमृतपान । कीं विदेहा तृप्तीचें भोजन । संतभ्रमराचें निजसुमन । सदा आमोद बहळ ॥७५॥ हा निर्गुणाचा शृंगारू । देहातीताचा अळंकारू । हा अवेवावीण सनागरू । स्वरूप तें हें ॥७६॥ हें डोळेंवीण देखतें । श्रोत्रेंवीण ऐकतें । रसनेंवीण चाखतें । स्वादासि हें ॥७७॥ हे चरणेंवीण चालतें । वदनेंवीण बोलतें । क्रियेवीण कर्तें । अकर्तेपणें ॥७८॥ हें अमृतातें जीववितें । कीं कल्पतरू याचें मागतें । चिंतामणीचे पुरविते । मनोरथ हें ॥७९॥ हें परिसाची काळिमा फेडी । दशेचें दैन्य दवडी । लक्ष्मीची अवकळा काढी । करी कळायुक्त ॥४८०॥ हें श्रुतीतें पढवितें । सकळशास्त्रां बुद्धिदातें । कीं

नानामतें बुझावितें। स्वरूप तें हें ॥८१॥ हें देवाचें देवार्चन। हें जीवाचें जीवस्थान। सकळ साध्याचें साधन। हेंचि एक ॥८२॥ हें अव्ययाचें आयुष्य। हें अद्वयाचें रहस्य। हें सामरस्याचें सामरस्य। सहजान्वयें ॥८३॥ हें अजन्माचें जन्मपत्र। हें क्षेत्रविहीनाचें सुक्षेत्र। हें अनादीचें आदिसूत्र। अभंगत्वें ॥८४॥ दया येणें दयालुत्व। कृपा येणें कृपालुत्व। साम्यासि सत्यत्व। येणें एकें ॥८५॥ येणें प्रकाशें प्रकाश भासे। येणें देखणें नित्यत्व दिसे। येणें सुखें सुख उल्हासे। उचंबळत ॥८६॥ येणें नाठवे देह गेह। येणें तुटती संदेह। हे देहीं देह विदेह। याचेनि होये ॥८७॥ हे निजांगाची गोडी। गुरुकृपा उपलब्धी फुडी। तेथ नीच्च नवी गोडी। होय तैं कळे ॥८८॥ हो कां वत्साचे मनीं। आवडी जैशी स्तनपानीं। कां दुकळलें भोजनीं। सादर जैसें ॥८९॥ नातरी निराळींच्या पाउसा। झेलूं जाणे चातक जैसा। गुरुवचनालागीं तैसा। स्वानंदें सादरू ॥४९०॥ नवघनगर्जनेसरिसा। उल्हास न धरवे मयूरा जैसा। परमार्थालागीं तैसा। उत्सावो असे ॥९१॥ धनदायें बद्धक। कां कामलाभें कामिक। तैसा नित्यनवा हरिख। सद्‌गुरुभजनीं ॥९२॥

## सद्‌गुरुभजनी साधकाला हा ग्रंथ म्हणजे पुरुषोत्तमाचे साक्षात् निजधामच आहे

ऐसें गुरुचरणीं ज्याचें प्रेम। तेणेंचि केले सकळ नेम। परमार्थाचें वर्म। फावलें त्यासी ॥९३॥ त्यासीच योग

आकळे। त्यासीच तत्त्व कळे। सकळ साधनांची फळें। त्यासीच फळतीं ॥९४॥ यापरी जो साधक। गुरुवचनचातक। त्यासी हा ग्रंथ विवेक। सफळित फळे ॥९५॥ नवल या फळाचें निज। वरि त्वचा ना आंत बीज। नुसतिया रसाचेंचि रसपुंज। फळरूपें फळलें ॥९६॥ तें हें कवित्व सुद्रेचीं फळें। चिन्मात्रैक निर्मळें। घमघमितांति परिमळें। स्वानंदबोधें ॥९७॥ दुरूनि येतांचि वास। धांवती विवेकराजहंस। मुमुक्षु सारंगाचे बहुवस। रुंजी करिती समुदायें ॥९८॥ तेथ शुकादि संतृप्त झाले। सुभाषित बोलती ते बोलें। तेहि वचनीं संतोषले। श्रीमंत साधू ॥९९॥ शुकमुखींचीं गळित फळें। प्राप्ती प्राप्त भावबळें। ते गोडियेचीं रसाळें। अक्षरें लिहिलीं ॥५००॥ अक्षरीं अक्षर अक्षरांतर। अक्षरीं अक्षर अपरांपर। अक्षरीं अक्षर निर्धार। धरितां हा ग्रंथ ॥१॥ स्वात्मसुख ग्रंथाक्षर। तें क्षराक्षरातीत पर। पुरुषोत्तमाचें साचार। निजधाम हें ॥२॥ मूळ डाळ शाखा प्रवाळ। वन उद्यान द्रुम सकळ। अवघी वाढी एकचि फळ। सुखरूपें स्वादिष्ट ॥३॥ हे जीवा आंतुली गोडी। अनिर्वाच्य चोखडी। ते लाविली कवित्व वाढी। वाचेच्या आळां ॥४॥ तेथ जनार्दन कृपाघन। वर्षताहे स्वानंद जीवन। तेणें एकाकी कविता वन। सफळित सदा ॥५॥

## श्रीएकनाथांचे धन्योद्गार

हें भानुदासकवित्व कुळवल्ली। निजात्ममंडपा वेली

गेली। एका जनार्दन पुष्पीं फळीं। संतसुखीये होतू ॥६॥ हें स्वात्मसुख निजकथा। विवेकवैराग्ययुक्त श्रोता। श्रवणें श्रवण करितां। ये समाधि अवस्था लोटांगणीं ॥७॥ एक एक तूं जनार्दना। म्हणउनी नुरविसी एकपणा। यालागीं ग्रंथगणना। संपूर्ण झाली ॥८॥ एका जनार्दन परिपूर्ण। जनजनार्दन अभिन्न। हे ज्यासी आकळे खूण। स्वात्मसुख जाण तो लाभे ॥९॥ एका जनार्दना शरण। स्वात्मसुख ग्रंथ संपूर्ण। आत्महितार्थ केला जाण। श्रवणमात्रे सुख होय ॥५१०॥ इति श्रीस्वात्मसुख। ग्रंथ संपतें पीयूष। श्रोते वक्तें एकमुख। सदा संतुष्ट होतू ॥५११॥

इति श्रीएकनाथ महाराजकृत

स्वात्मसुख समाप्त

--०॰०--

# श्रीएकनाथ महाराजकृत
# आनंदलहरी

## मंगलाचरण

श्रीगणेशाय नम: ॥ ॐ नमो सच्चिदानंदघना । ॐ नमो सकळ सुखांचिया निधाना । ॐ नमो परात्पर निर्गुणा । जगज्जीवना मूळबीजा ॥१॥ ॐ नमो सकळ व्यापका । आनंदा आनंद तुझेनि देखा । सकळातें तूंची प्रतिपाळिता । तो तूं लोकां प्रत्यक्ष ॥२॥ ॐ नमो अव्यक्त परब्रह्मा । सर्व सुखांचिया धामा । ॐ नमो भक्तांचया कल्पद्रुमा । तुज उपमा आनु नाहीं ॥२॥ ॐ नमो आदिपुरुषा आदिदेवता । ॐ नमो उत्पत्ति प्रळय रहिता । पाहतां तूं सकळांचा नियंता । सकळभूतां सत्ता तुझी ॥४॥ ॐ नमो ज्ञानसागरा । ॐ नमो त्रैमूर्ती अवतारा । ॐ नमो मोक्षाचिया निजघरा । विश्वंभरा तुज नमो ॥५॥ तुझें निजरूप पाहतां दृष्टीं । निजानंद न समाये दृष्टी । तुटल्या जन्ममरणाच्या गांठी । निर्भय पोटीं मी जालों ॥६॥ बंधमुक्तीचो अटाअटी । संचरली होती माझ्या पोटीं । होतां तुझी कृपादृष्टी । उठाउठी पळाली ॥७॥ तुझें निजरूप पाहतां कांहीं । बद्धमुक्त दोन्ही नाहीं । व्यापक तूं सर्वां देहीं । आनंदडोहीं जेवीं तरंग ॥८॥ बंधमुक्तीची कहाणी । ऐकिली होती जेवीं स्वप्नीं । जागृतीमाजीं येउनी । साच मानी कोण तीतें ॥९॥

## सद्‌गुरुकृपेनेंच भ्रांतीचा निरास

स्वर्गनर्क दोन्ही बंध । हा अज्ञानाचा अनुवाद । सद्‌गुरु-कृपा जालिया बोध । जालें सर्व चैतन्य ॥१०॥ सगुण आणि निर्गुण । हें शब्दाचेंचि लाघव जाण । जेथ शब्दा पडिलें मौन । गुणागुण उरले कोठें ॥११॥ तुझी इच्छा जे मायाशक्ति । जाली अनंत ब्रह्मांडें रचिती । करी पंचभूतांची व्यक्ति । संतति जैसी वांझेची ॥१२॥ जैसा कल्पनेचा विस्तारू । हृदयीं करितु अपारू । पाहतां न दिसे साचारू । तैसा विचारू मायेचा ॥१३॥ अहर्निशीं तुझ्या स्वरूपीं असती । तयांसी कळली मायेची स्थिती । सकळ मिथ्यात्वें देखती । अज्ञान भ्रांती तयां नाहीं ॥१४॥ बंधमुक्तीचा वळसा । तेचि अज्ञानाची दशा । निद्रिस्त वोसणाये जैसा । भ्रांतीचा फांसा पडिलासे ॥१५॥ ज्यातें तुझी कृपा झाली । त्याची भ्रांति निरसली । कल्पना विरोनि गेली । वृत्ती बुडाली तुझ्या रूपीं ॥१६॥ परिस लागलियां लोहातें । दुरी केलें काळीमेतें । श्रेष्ठत्व आणिलें नीचातें । परी अळंकारातें न मुके ॥१७॥ पूर्वकर्म जें घडलें । तेणें तें नांव पावलें । लोहो-पणासीं मुकलें । न मोडतां झालें सुवर्ण ॥१८॥ तैसें त्वां कृपावंतें । निरसिलें भ्रांति काळिमेतें । निरसूनि ज्ञाना-अज्ञानातें । निजसुखातें मेळविलें ॥१९॥ वरी देहाचिये माथां । आहे कर्मरेखेची सत्ता । तें न चुकेगा गुरुनाथा । सुख-दुःख भोगवी ॥२०॥ पूर्वीं कर्म जें घडलें । तें अळंकारातें

आटिलें। तें नांवपणासी मुकलें। केवळ जालें सुवर्ण ॥२१॥ जैसा वृक्ष छेदिलिया समूळ। आर्द्रता न तुटे तात्काळ। आंगीं असोनि अल्पकाळ। मग केवळ काष्ठ होय ॥२२॥ घालुनी आशेचा पाश। हिंडवी नाना देश। हिंपुटी करूनी देहास। संचित तैसें भोगवी ॥२३॥ पत्रें आणि पुष्पें फळ। सहित वाळला समूळ। अग्निसंगें केवळ। भस्म होय ॥२४॥ तैसी सद्गुरुकृपा होय। तोडी विवेकाचेनि घायें। देहे वृक्ष पाडिला पाहे। अर्द्रता राहे संचिताची ॥२५॥ जैसा अनुभवें तो वाळतु। संचित क्रियमाणासहितु। वृक्षाची खुंटली मातु। पावलिया देहांतु शून्य होये ॥२६॥ भस्म जालिया नंतरें। वृक्षाचाही ठाव नुरे। तैसा देह अनुभवें विरे। पुढें वोसरे जन्ममरण ॥२७॥ तैसें देह पावलिया लय। पूर्वकर्म सहजेंचि जाय। संचितासि नुरे ठाय। सहजें होय सुखरूप ॥२८॥ पूर्वकर्मांचिये ऐशी परी। गुरुभक्त नेघे आपणावरी। राहोनि आनंदाभीतरीं। साक्षित्वें व्यवहारीं वर्तत ॥२९॥ जैसें जळामाजीं पद्मपत्र। जळीं असोनि अलिप्त। तैसा मुक्त व्यवहारीं वर्तत। सुखें भोगित स्वानंदें ॥३०॥ भवभ्रमातें निरसिलें। जन्ममरणातें चुकविलें। देहीं असतां मुक्त केलें। स्वरूपीं मेळविलें आपुलिया ॥३१॥ तुझिया स्वरूपाचा अनुभव। जाणती संत सज्जन प्रभव। निरसूनि देहाचा देहभाव। स्वानुभव भोगिती॥३२॥ जो अमृताचे सागरीं अहर्निशीं क्रीडा करी। जन्ममरणाचें भय धरी। हें कैशापरी घडेल ॥३३॥ जेथ जन्ममरण

जालें वावो । तेथें बद्धमुक्ता कैचा ठावो । जीव गिळूनि आपुला उगवो । विसरला पहाहो दुजेपण ॥३४॥ ऐसी तुझे कृपेची करणी । भवभ्रम निरसिला तत्क्षणीं । निद्रिस्त वोसणावे स्वप्नीं । तया उठवूनी सावध केलें ॥३५॥ पुरुषोत्तम नाम पंचाक्षर । जो भावें भजे निरंतर ।तेथें कैचें भवभय संचार ।न चले व्यापार पंचभूतांचा ॥३६॥

## सद्गुरुचरणाश्रित बद्ध कधींच होत नाहीं

सद्गुरुचरणीं जयाचा भावो । तया बंधमुक्तता जाल्या वावो । त्यातें काळ विसरला पाहाहो । तया ठावो ब्रह्मपदीं ॥३७॥भावार्थी जे निज गडे। तयां बद्धमुक्तता केवीं घडे । यमपुरी वोस पडे । म्हणोनी रडे प्रेतनाथ ॥३८॥ जैं पतंग भक्षी वाडवानळासी । दर्दुरीं गिळिजे शेषासी । जैं खद्योतें गिळिजे रविबिंबासी । तैं गुरुभक्तांसी बद्धता ॥३९॥ जैं वायसें युद्ध कीजे खगपतींसी । पिपिलिका सप्तसागर शोषी कीं मुर्कुटें गिळिजे ब्रह्मांडासी । तैं गुरुभक्तांसी बद्धता ॥४०॥ जैं चित्रींचिया हुताशनें । दग्ध होती महावनें । कीं रज्जूसर्पाचिया पानें । मृत्य पावे कृतांतू ॥४१॥ किं मक्षिकाचेनि थडकें । महागिरी पडों शके। किंवा प्रेताचेनि धाकें । झडपों शके महाकाळ ॥४२॥ किंवा वांझेचेनि सुतें । रणीं जिंकीजे इंद्रातें । किंवा कांसवीचेनि घृतें । कुंभकर्णासीं तरळ होय ॥४३॥हेंहि ईश्वर इच्छा घडे। परी गुरुभक्तांसी बद्धता न घडे। जन्ममरणाचें फिटलें कोडें। तुटलें बिरडें मायेचें ।४४।

## मायेची करणी

जे माया त्रिभुवनें व्यापिलीं । निमिष्यमात्रें ब्रह्मांडें रचिली । सगुणत्वें विस्तारिली । सृष्टी केली स्वइच्छा ॥४५॥ तयेचा नेणती पारू । ब्रह्मादी हरिहरू । उत्पत्ति स्थिति संहारू । हा व्यापारू मायेचा ॥४६॥ त्रिमूर्तींची जे सत्ता । जे मूळमायेचे प्रतापता । शक्तीवीण कार्य कर्ता । हें सर्वथा न घडेचि ॥४७॥ अगाध मायेचें करणें । रचूनि नाना विंदानें । करूनि अवघेंचि विसर्जनें । अदृश्यपणें वर्तत ॥४८॥ जैं स्वरूपीं इच्छा जाली । तैं हे माया नांव पावली । सकळ भूतांतें प्रसवली । सृष्टी निर्मिली पळमात्रें ॥४९॥ शिवा आणुनी जीवपण । तयासी लाविलें जन्ममरण । सुखदु:खादि भोग दारुण । करूनि आपण निराळी॥५०॥

## सद्गुरुभक्तापुढें माया म्हणजे मृगजळ

ऐसी ये माया सबळ । एवढें रचिलें जगड्वाळ । तें गुरुभक्तापुढें केवळ । मिथ्या मृगजळ होऊनि ठेली ॥५१॥ शिव विरंची नारायण । आणि साधूसंत योगीजन । हे स्वरूपीं जाले निमग्न । यांतें माया वदन दाऊं न शके ॥५२॥ जेथ अज्ञानाचा सुकाळ । तेथें मायेचा गोंधळ । जो ज्ञाता अनुभवी केवळ । तेथ विटाळ मायेचा ॥५३॥ जरी म्हणाल मायेचा विटाळ । तरी कां देह धरिला स्थूळ । ऐसें म्हणती ते केवळ । आज्ञानी समूळ जाणावे ॥५४॥

## मायेचा सूत्रचालक नारायण

मायेसी नाहीं स्वतां चळण । इसी चाळिता आदिनारायण । मायापटळ आड लावून । भूतातें आपण चेष्टवी ॥५५॥ जैसा छायामंडपाभीतरीं । एकला बैसोनि सूत्रधारी । वस्त्र लावूनि माझारी । प्रभा अंतरीं दीपाची ॥५६॥ नाना अचेतन पुतळियां । स्वइच्छा नाचवी तयां । हावभाव दाऊनिया । जन भुलवावया खेळतु ॥५७॥ एक एकातें मारवित । आपणचि शंखध्वनी करित । काय जालें म्हणोनि पुसत । आणि हांसत आपणचि ॥५८॥ भंडउभंडातें दावी । नाना पातकें करवी । गाईपाठीं व्याघ्र लावी । आणि मारवी तयेतें ॥५९॥ अनंत पुतळीयांतें दावित । संहार स्वइच्छा करीत । अज्ञानातें साच दिसत । नसे मेले जीत ते ठाईं ॥६०॥ दाखवी नाना सुखदुःखातें । हें होय कवण कवणातें । एकाविण दुजें नाहीं तेथें । पापपुण्या ठाव कैचा ॥६१॥ तैसा भगवंत लीलावतारी । चिदाकाशींच्या मंडपाभीतरीं । माया पट लाउनी माझारीं । प्रभा अंतरीं स्वरूपाची ॥६२॥ नानायाती नानावर्ण । नानाकर्में पापपुण्य । सुखदुःखादि भोग दारुण । करूनि आपण निराळा ॥६३॥ तो जैसें जैसें चेष्टवित । तैसीं तैसीं भुतें नाचत । सर्वही करविता भगवंत । पापपुण्य हें कवणासी ॥६४॥ पापपुण्य बोलणें । जैसें शेतामाजीं बुजवणें । तेथें नसे साचपणें । वृथा भिणें वनचरीं ॥६५॥ तैसे ते अज्ञानी जन । तयांसी दिसे पाप पुण्य । जे

जीवन्मुक्त सज्ञान । तयांसी त्रिभुवन मुक्त दिसे ॥६६॥ जो केवळ जाणता । तो मायेचा नेणता । साधु भगवंताच्या ये समता । ह्मणोनि बद्धता न घडे त्यासी ॥६७॥ त्यासी माया मिथ्या कळली पाही । तो देहीं असोनी विदेही । जन्ममरणाचें भय नाहीं । सच्चिदानंदडोहीं क्रीडतु ॥६८॥ जयासी नाहीं आत्मज्ञान । तयासी देहाचें बंधन । नाना दुःखें भोग दारुण । जन्ममरण भोगवी ॥६९॥ जे सद्गुरूचे अंकित । तयांसी देह दुर्लभ बहुत । स्वरूपीं होऊनियां रत । सुखें भोगित स्वानंद ॥७०॥ जैसे द्रव्याचेनि गुणें । एकीं विष घेऊनी भक्षणें । एकीं उपभोग भोगणें । एक दानधर्म करिती ॥७१॥ तेथ द्रव्यासी नाहीं दूषणें । आपुलें संचित भोगणें । तैसें देहाचेनि गुणें । बद्धमुक्तपण भोगिजे ॥७२॥ जे नाना पातकें करित । त्यांसी देह काय करा म्हणत? कां जो श्रीहरीसी शरणागत । तयासी सांगत देह काई ॥७३॥ देह पाहतां अचेतन । देहासी कैचें दूषण । जो देहासी चेष्टवी जाण । सुखदुःख भोग त्यालागीं ॥७४॥ जैसी काष्ठाची पुतळी केली । सर्व इंद्रियें निर्मिलीं । परी चाळितेविण जाली । प्रेतरूप ॥७५॥ चाळिता बैसे अंतरीं । वोढी इंद्रियाची दोरी । मग प्रवर्ते व्यापारीं । सूत्रानुक्रमें ॥७६॥ तेथ सुखदुःख अवस्था । कैसी घडे पुतळ्यांच्या माथां । जो अंतरीं चेष्टविता । तोचि कर्ता सर्वही ॥७७॥ तैसे देह अचेतन । त्यातें चालवितें मन । सर्वइंद्रियें त्याचे आधीन । स्वामी जाण तयांचा ॥७८॥ पापपुण्याची कल्पना । संकल्पविकल्प उठती मना ।

विसरोनि आत्मज्ञाना । जन्ममरण भोगिती ॥७९॥

## सद्‌गुरुकृपेनें मनाचें मनपण विरून जातें

ज्यासी सद्‌गुरुकृपा होय । त्याचें मनपण विरोनि जाय । संकल्पविकल्पां नुरे ठाय । मिरासी होय मोक्षाचा ॥८०॥ सद्‌गुरूचे कृपेवीण । नव्हे मोक्षाचें साधन । जन्ममरणाचें बंधन । नचुके जाण सर्वथा ॥८१॥ एक गुरुभक्तांतें निंदिती । एक गुरु म्हणजे काय म्हणती । जे जे गुरूतें सेविती । तयांसी प्राप्ती काय जाली ॥८२॥ सद्‌गुरुभजनीं लाधलें सुख । तें नेणती अज्ञान मूर्ख । विषयसुखें मातले देख । जन्ममरणाचें दु:ख भोगिती ॥८३॥जैसी नपुंसकासी पद्मिणी । आलिया सुख नुपजे अंत:करणीं । किंवा उलूकास दिनमणी । देखतां नयनीं सुख काय ? ॥८४॥ गर्भांधासी लावण्यता । गर्दभासी सुगंधता । सुकरू मिष्टान्न भोक्ता । हें सर्वथा नघडेचि ॥८५॥ श्वानासी शेज सुमनाची । बधिरासी गोडी कीर्तनाची । रोगियासी मिष्टान्नाची । लागे रुची हें न घडेचि ॥८६॥

## गांठीं पुण्यसंपत्ति असल्याशिवाय गुरुभजनाची गोडी लागत नाहीं

तैसी अभक्तांसी गुरुभक्ती । हें नघडे हो कल्पांतीं । अनंता जन्माचीं पुण्यें फळतीं । तरीच प्राप्ती सद्‌गुरुभजन ॥८७॥ मूर्खासी सद्‌गुरुभजन । हे सर्वथा नघडे जाण । जन्ममरणाचें अधिष्ठान । संचितस्थान पापाचें ॥८८॥ मुके

शब्दाची चातुर्यता । म्हैसा होईल पुराणवक्ता । किंवा पांगुळ जाईल तीर्था । हें सर्वथा न घडेचि ॥८९॥ मर्कटासी सिंहासन । किंवा कागासी अमृतपान । वांझेसी वरमायपण । सर्वथा जाण न घडेचि ॥९०॥ जे जीव तदंश होती । तेचि पावती सद्‌गुरुभक्ती । निजसुखातें भोगिती । इतरा भ्रांती जन मूढां ॥९१॥ श्रोतीं न मानवा खेद । म्यां आपुल्या मनासी केला बोध । भावें भजावा आनंदकंद । मोक्षाचें पद पावावया ॥९२॥ सुख धरोनी प्रपंचाचें । संचित होतसें पापाचें । भरतें दाटे भवसिंधूचें । जन्ममरणाचें भय थोर ॥९३॥ प्रपंचीं जरी सुख जोडे । तरी कां सेविती गिरीकडे । राज्य टाकुनी गेले थोडे । ते काय वेडे म्हणावे ? ॥९४॥ भर्तृहरीनें राज्य टाकिलें । तेणें श्रीगोरखातें पुसिलें । राज्य टाकुनी मुंडित जालें । कितेक गेले भूपती ॥९५॥ मग श्रीगोरक्षनाथ बोलती । नव्याणव कोटी भूपती । इतरांची नाहीं गणती । योगाप्रती निघाले ॥९६॥ भवसिंधूच्या डोहीं । विषयाचा गळ घातला पाहीं । काळ लक्षी दिशा दाही । जीव सर्वही भक्षावया ॥९७॥

## सद्‌गुरुशरणागताला इतर योगयागादि साधनांची आवश्यकता नाहीं

जो सद्‌गुरूसी शरण जाये । तो काळाचाही काळ होये । काळ तयासी शरण जाये । ऐसें बोलताहे वेदांत ॥९८॥ नलगे योगयाग साधन । नलगे व्रत तीर्थ अनुष्ठान । नलगे वैराग्य तपदान । एक सद्‌गुरुभजन करावें ॥९९॥ अनेक

कर्मे केलीं पाहे। तपें राज्य प्राप्त होये। राज्यांतीं नर्क होय। ऐसें बोलताहे वेदशास्त्र ॥१००॥ स्वर्गीं काय सांगो सुख। पुण्य सरलियां लोटिती देख। मागुती पाहावया मृत्युलोक। स्वर्गनर्क भोगावया ॥१०१॥ नर्क म्हणजे गर्भवास। गर्भीं पचावें नवमास। नाना दुःखें होती जिवास। त्याहूनि विशेष दुःख काय ॥१०२॥ जेणें मृत्यूचें मूळ तुटे। जन्म मरणाचें खत फाटे। पापपुण्याची वाढी खुंटे। धरणे उठे काळाचें ॥३॥ ऐसा होवावया एक उपावो। भावें भजावा सद्गुरुरावो। जन्ममरणा पुसी ठावो। स्वरूपीं जीव मेळवी ॥४॥ येथून नाहीं जीव नेला। आणि स्वरूपीं मेळविला। देहीं असतां मुक्त केला। उगव दाविला जीवासी ॥५॥ जीव आपुला उगव पाहे। इंद्रियांसहित तल्लीन होय। तेथें काळ करील काय। जन्ममरण अपाय खुंटले ॥६॥ जैसे भूपतिचिया बाळें। अनिवार अन्याय केले। तें मातेपुढें जाऊनि बैसलें। मग काय चाले कोणाचें ॥७॥ तैसा जीव स्वरूपींचा असे। नाना कर्मे केलीं बहुवसें। तो स्वरूपीं जालिया समरसें। तेथें काळासी रीघ कैचा ॥८॥ स्वरूप अखंडदंडायमान। सर्वां ठाईं परिपूर्ण। तेथें जिवासी कैचें जीवपण। समरसोनि एक जालें ॥९॥ जैसें सागरीहुनी लवण। जळापासूनि निर्माण। सगुणत्वें जालें कठीण। म्हणोनि भिन्न न घडे त्यासी ॥११०॥ तेंचि जळामाजीं घालितां। जळचि होय तत्त्वतां। तें परतोन येईल हाता। हें सर्वथा न घडेचि ॥११॥

## रामकृष्णादि अवतारी पुरुषहि सद्गुरूलाच शरण गेले

याలागीं सद्गुरूचें भजन। सर्वांहूनि वरिष्ठ जाण। अवतारादिक आपण। सद्गुरूसी शरण रिघावें ॥१२॥ रामराम स्मरतां घोष। तेणें तुटती भवपाश। तोहि शरण श्रीवसिष्ठास। गुरुभक्तीस सादर ॥१३॥ पूर्णब्रह्म श्रीकृष्णनाथ। तोहि म्हणवी गुरुभक्त। दुर्वास ऋषीची सेवा करित। नित्यमुक्तीलागीं ॥१४॥ मुक्तपद आलें हातां। भय न धरी कर्म करितां। भोग भोगोनि अभोक्ता। कर्म करुनि अलिप्तता यालागीं ॥१५॥ ब्रह्मपदाचा अधिकारी। म्हणोनि विश्वातें उद्धरी। स्मरणमात्रें दुरितें हरी। तो श्रीहरी गुरुभक्त ॥१६॥ जैसी कासवीची उत्पत्ती। गर्भांध जाली संतती। ते चक्षुविण वाढती। हें कल्पांतीं घडेना ॥१७॥ तैसें सद्गुरुकृपेवीण। पावले मोक्षाचें सदन। भूत भविष्य वर्तमान। ऐकिलें नाहीं जनीं कोठें ॥१८॥

## नामदेवांचें उदाहरण

नामया शरण भगवंतासी। भगवंत तरी प्रत्यक्ष त्यासी। हरी शिकवी नामयासी। सद्गुरुविण सुखासी न पाविजे ॥१९॥ तेणें मानूनियां वचन। रिघाला सद्गुरूसी शरण। रूप पाहावया निर्गुण पंढरीनाथाचे ॥१२०॥ तेणें खेचरविसा केला गुरू। तेव्हां जाला साक्षात्कारू। तेणें केला ब्रह्म-

पूर्णपरु । निजसुखाचें घरू पावला ॥२१॥ एक सद्‌गुरुकृपेवीण । न तुटे जिवाचें बंधन । सद्‌भावी जे भाविक जन । तयांसी हें वचन मानलें ॥२२॥ जे या वचनातें मानिती । भावें सद्‌गुरूतें वंदिती । त्यांचे घरीं चारी मुक्ती । दास्य करिती अनायासीं ॥२३॥ बहुत बोलोनियां काय । ज्याचे पदरीं पुण्य होय । तोचि सद्‌गुरूसी शरण जाय । मुक्ती लाहे येचि देहीं ॥२४॥ याचि देहीं याच डोळां । भोगिजे मुक्तीचा सोहळा । ऐसा कोणीएक विरळा । तोचि जिव्हाळा स्वरूपाचा ॥२५॥ त्यासी देखिल्या दृष्टीं । मुक्ती लाहिजे उठाउठीं । मा त्यासी पडल्या गांठी । आनंद सृष्टीं न समाये ॥२६॥ तो म्यां देखिला जनार्दन । देखतांच गेला भवभ्रम । सुख जालें अनुपम्य घन । पावलों सदन मोक्षाचें ॥२७॥

## गुरुस्वरूपाची अगम्यता

मस्तकीं लागतां तयाचा करू । न मोडतां सृष्टीचा वेव्हारू । सर्व जालें शून्याकारू । तेजें अंबर दाटलें ॥२८॥ तया तेजाचा पारू । नेणती ब्रह्मा हरि हरू । वेद राहिले मौन्याकारू । श्रुतीसी विचारू पडिलासे ॥२९॥ तयातें काय वाणावें । कवणा उपमेतें आणावें । त्यावीण दुजें देखावें । तरी सांगावें साक्षित्वें ॥१३०॥ जो निर्गुण निराकार । निरुपम्य निराधार । परब्रह्म निर्विकार । विश्वंभर अव्यक्त ॥३१॥ अखंडतेजें सदोदित । उत्पत्तिप्रळया विरहित । व्यापुनी सर्वांसी अलिप्त । त्यावीण रिता ठाव नाहीं

॥३२॥ जो कां वस्तु परात्पर। सगुण निर्गुणाचें उदर। वेदां नकळे जयाचा पार। शब्दाचा विचार खुंटला ॥३३॥ मनें जयातें देखिजे। तयातें शब्दें वानिजे। जेथें मनें मनपणा मुकिजे। तो शब्दें बोलिजे कवणे परी ॥३४॥ मन सकळांतें चाळितें। तेथें ठाव नाहीं मनातें। यावरी कैंचे इंद्रियातें। देखतां स्वरूपातें पावतील ॥३५॥ जरी म्हणाल स्वरूप निराकार। तरी कोठूनि जाला विस्तार। या शब्दाचा विचार। श्रोतीं सादर परिसावा ॥३६॥ जरी उपसाहित्यें सांगावें। तरी साहित्य कवणातें द्यावें। त्याचिया समता दुजें देखावें। तरी बोलावें साहित्य ॥३७॥ परी बोलतों अल्पमती। भावें परिसावें सज्जन श्रोतीं। रविकिरणापुढें काडवाती। तैसें मतीं बोलतों ॥३८॥ जैसें पाहतां वटबिजासी। सूक्ष्मत्वें नये दृष्टीसी। निराकार असतां तयासी। तेथें द्रुमासी ठाव कैंचा ॥३९॥ बिजामाजीं असतां अंकुर। बिजीं होता बीजाकार। सूक्ष्मत्वें निघाला बाहेर। मग अपार वाढला ॥४०॥ त्वचा काष्ठें फळें पत्रें। बिजीं होते बीजाकारें। तोचि महावृक्ष विस्तारे। मग पसरें स्वइच्छा ॥४१॥ नाहीं म्हणतां विस्तारला। आहे म्हणों तरी नाहीं देखिला। बीजामाजीं होता संचला। तोचि विस्तारला सगुणत्वें॥४२॥तैसें निर्गुण स्वरूपा माझारीं। अनंत ब्रह्मांडाची भरोवरी। स्वरूपाकार असतां अंतरीं। तेंचि बाहेरीं निघालें ।४३।बीजें व्यापिलें वृक्षासी। तैसें निर्गुणें व्यापिलें सगुणासी। शब्दें आणिलें भिन्नपणासी। जैसें कनकासी अलंकारनामें

॥४४॥ माया स्वरूपीं तदंश होती। ते इच्छेगुणें आणिलें व्यक्ती। सर्व गुणातें जाली प्रसवती। करी मूर्ती त्रिगुणाची ॥४५॥ करी नाना रचनेतें। परी भिन्नत्व नाहीं स्वरूपातें। स्वरूपें व्यापिलें सर्वातें। जैसें अलंकारातें सुवर्ण ॥४६॥ ऐसा स्वरूपाचा विस्तारू। होऊनि उरला अपारू। तया स्वरूपाचा विस्तारू। ब्रह्मादिहरिहरू वेडावले॥४७॥ त्यातें मौन्येंचि पाहिजे। रसनेवीण गोडी घेईजे। भाग्येंवीण सुख भोगिजे। पद पाविजे गुरुखुणें ॥४८॥ आतां बोलणें खुंटलें। शब्दाचें चातुर्य राहिलें। दृष्टीचें देखणें उरलें। तेंहि निमालें शेवटीं ॥४९॥ सद्गुरूचे निजदास। तेचि पावती ये खुणेस। परिसतां कानडे येरास। जैसें पक्षियासी नारेळ ॥१५०॥

## म्हणून तुम्हीं सद्गुरूंना शरण जाऊन जन्ममरण चुकवून मोक्षाधिकारी व्हावें

सकळां साष्टांग नमन। तुम्ही जावें सद्गुरूसी शरण। चुकवावें जन्ममरण। पावावें सुख मोक्षाचें ॥५१॥ सद्गुरुमंत्रउपदेश तत्त्वतां। मोक्ष तत्काळ पावे त्वरिता। ऐसें असे यथार्थता। सद्गुरूसमान नाहीं सत्यत्वें ॥५२॥ मन असतां आनंदाभीतरीं। उठती सुखाचिया लहरी। म्हणोनि वदली वैखरी। प्रेम आनंदलहरी या नांव ॥५३॥ एकाजनार्दनी

एकनाथ । एक म्हणती विश्वभरित । तो होउनी कृपावंत । प्रेमें आनंदलहरी वदविली ॥१५४॥ इतिश्री आनंदलहरी समाप्ता ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

श्रीएकनाथ महाराजकृत

आनंदलहरी समाप्त

—०ॐ०—

# श्रीएकनाथ महाराजकृत

# शुकाष्टक

श्रीगणेशाय नमः ॥

चिन्मयानंदरूपाय जनार्दनस्वरूपिणे ॥
स्वप्रकाशाय शुद्धाय आचार्याय नमोऽस्तु ते ॥१॥
मायातीताय नित्याय मायागुणप्रकाशिने ।
व्यक्ताव्यक्तस्वरूपाय आचार्याय नमोऽस्तु ते ॥२॥

## सद्गुरुवंदन

ॐ नमो जी जगद्गुरू । न दिसोनी जगदाकारू । देखिला तरी संहारू । न मोडितां करिसी ॥१॥ परी घडमोडी दोन्ही । नाहीं करणें तुजलागुनी । यालागीं नमुनी । रहावें स्थिर ॥२॥ तंव नमू हें विचारितां । वेगळा पडे थिता । तरी नमावया आतां । कवण हेतु ॥३॥ उथळलिया भरतें । स्वयें भरी तरीयातें । त्या सिंधूच्या ऐसें अद्वैतें । नमावया द्वैत म्यां केलें ॥४॥ सिंधूच्या बोहटचढीं । तरीयाची वाढी-मोडी । तैसी नमावया परवडी । तुझीचि तूंतें ॥५॥ तैसें तुझ्या पूर्णपणीं । असोनि न बाणे धणी । म्हणोनी गावया तुझ्या गुणीं । लांचावलों मी ॥६॥ छंद पडे वाचा । तैं तूं भेटसी साचा । भेटुनी कीर्तनाचा । लाविसी चाळा ॥७॥ तुझी भेटी होये अव्यंग । तैं मौन पडे अभंग । तैं गोडीचा

बोध । वैखरी स्रवे ॥८॥ चंद्रें स्पर्शलियां चंद्रकांत । जेवीं चंद्रामृत स्रवत । तेवीं तुझ्या पूर्णत्वाचा पूर्णार्थ । वैखरी वदे ॥९॥

## सद्‌गुरूकृपेनें शुकाष्टकाचें विवरण

तें अपूर्व शुकोच्छिष्ट । फळ देखिलें श्रेष्ठ । जें नित्यतेंसी अवीट । तें शुक सेवी ॥१०॥ तें शुकमुखींचें अष्टक । जें गुह्यज्ञान निष्टंक । वदवीतसे व्यापक । जनार्दन वाचें ॥११॥ तो जनार्दनू वाचेसरिसा । गोडियेमाजीं स्वादू जैसा । का न दिसोनी असे कैसा । सुमनीं वासु ॥१२॥ तो एक नाममिसें । आपण आपणिया गातुसे । तें निवृत्तीच्यानि सौरसें । परिसतु श्रोते ॥१३॥ जेआत्मअनुभवीचे दिवे । सोहंसिद्धीचे ठेवे । ते सद्‌गुरुरूपें भेटावे । नित्योक्त श्रोते ॥१४॥ मग या अष्टकमिसें । त्यांचे वोसंगा समरसें । बैसोनि बोले ऐसें । जेणें जनमन निवे ॥१५॥ यालागीं जी सद्‌गुरू देवा । पेलीं कृपेचा हेलावा । त्या स्वानंदोदधी सदैवां । प्रार्थणेंही न लगे ॥१६॥ ये विनवणीयेसवें । अवलोकिलें गुरु कृपावैभवें । तंव सबाह्यींसी आघवें । विवळलें ऐक्य ॥१७॥ जेवीं लागतां सूर्यकर । सूर्यकांतीं वैश्वानर । तेवीं गुरुकृपा उद्‌गार । ज्ञान प्रकटे ॥१८॥ तोचि आह्निक्यज्ञान विवेकू । पदपदार्थी श्रीशुकू । बोलिला ज्ञानटिळकू । योगियांचा ॥१९॥

श्रीशुक उवाचः–

भेदाभेदौ सपदि गलितौ पुण्यपापे विशीर्णे<br>
मायामोहौ क्षयमधिगतौ नष्टसंदेहवृत्तिः ।

शब्दातीतं त्रिगुणरहितं प्राप्य तत्त्वावबोधं
निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः ॥१॥

जो पोखाब्धीचा पूर्णचंद्र । जो ज्ञानियांचा नरेंद्र । तो शुक नरेंद्र । आपुलिया स्थिती बोलिला ॥२०॥ ब्रह्म-स्थितीची नव्हाळी । तेणें स्वस्वरूप न्याहाळी । त्या अनु-भवाची उकळी । नसंठेचि श्रीशुका ॥२१॥ धालेंपणाचे ढेंकर । जेवीं देती जेवणार । तेवीं आनंदाचे उद्गार । अनिर्वाच्य वदवी ॥२२॥ म्हणे भेदाभेद दोन्ही । हारपले जयापासूनी । मार्गु अमार्गु मनीं नयनीं । न संपडे दोहींचा ॥२३॥ तरी अखंड भेदू कैसा । अभेदाचा कवण ठसा । दोहींवेगळी दशा । कीं लक्षण तें ॥२४॥ तंतू एक शेवटवरी । पटीं दिसे वेगळाल्या हारी । गणितां येती लक्षावरी । तो पटत्वभेदू ॥२५॥ दिपू येकू कळिके असे । तिमिर दृष्टीं अनेक दिसे । ऐसें नसतेंचि जें भासे । वस्तूच्या ठायीं ॥२६॥ गुळाची गौरी । गुळचि आवेवांभीतरीं । हें नेणोनी न्याहारीं । गुळचि देखा ॥२७॥ जैसें मिथ्या मृगांभ जनीं । भासे प्रत्यक्ष नयनीं । तें साच मानलें मनीं । म्हणोनि दुर्भेदू ॥२८॥ तरावया मृगजळाचे गंगेसी । जो नाव करूं धांवे दांगासी । तो तरणोपाव त्यासी । कीं वृथा श्रमू ॥२९॥ ऐसें अखंडाचे ठायीं । भ्रांतीं मन भ्रमलें पाही । मग देखे भिन्नाभिन्न कांहीं । तोचि भेदू ॥३०॥ आपुलिया एकपणा विसरे । स्वप्नींचिया निद्राभरें । देखे अनेकत्वाचें मोहिरें । भोगी जीव ॥३१॥

आपुला नित्य स्वभावो। नेणोनि जो वर्ते भावो। तोचि या निर्वाहो। भेदवाक्या ॥३२॥ दृश्य प्रभव आघवा। मावळोनि ये प्रकृतिस्वभावा। जैसे काश्मिराचिया देवा। घृतमार्जन ॥३३॥ घृतामार्जी काश्मीरलिंग। घृतीं घृतरूप दिसे चांग। तऱ्ही तें कोरडें आंग। खडखडित ॥३४॥ ऐशिये प्रकृतीचिये खोपें। जऱ्ही भूतक्रिया लोपे। परी भेदाचें जाउपें। तैसा जीवचि ॥३५॥ ऐसे नासती भूतक्रिया भेद। तें तंव नव्हे अभेद। आतां मावळले जेथें भेदाभेद। तेहि ऐका ॥३६॥ 'समस्त ब्रह्म' हे ज्ञप्ति। सोहं या अभेदवृत्ती। तेहि मावळोनी स्फूर्ती। मग जें उरे ॥३७॥ अविद्याभेद सबळ। विद्याभेद सकळ। दोन्ही जाउनी केवळ। भेदातीत ॥३८॥ जेव्हां भेदुचि नाहीं। तेव्हां अभेद तें कायी। परी चिन्मात्र जें कांहीं। तें उभयातीत ॥३९॥ ज्ञानाचिया परिपाठीं। 'सोहं' म्हणे ज्ञानदृष्टीं। तेंही गेलिया पाठीं। अभेदातीत ॥४०॥ ऐसे गेलियां भेदाभेद। केवळ उरे शुद्ध। तेंचि पैं विशद। रूप करूं ॥४१॥ परमात्मा परंज्योति। परब्रह्म परंज्ञप्ति। परात्पर प्रकृती। परावर जो ॥४२॥ अज्ञु आद्य अचळू। अरूप अक्षय अढळू। अजरामर अमळु। अनादि जो ॥४३॥ निर्विकार नित्य। निःप्रपंच निर्मथ्य। निष्कर्म निज सत्य। सत्यमूर्ती ॥४४॥ निःशब्द निष्काम। निर्गुण निरुपम। निःसंग निर्व्योम। निजानंद ॥४५॥ स्वात्मा स्वयंज्योति। स्वलीळा स्वशक्ती। स्वकळा स्वात्मप्रतीति। आत्मत्वाची ॥४६॥ ऐसा अद्वय एकला। एकेकपणें संचला।

यापरी आंगें हा जाला। भेदातीत ॥४७॥ तरी नांदतेन भेदें। तो भेद न देखत नांदे। आपुलेनि स्वात्मपदें। उल्हासतु ॥४८॥ तो आकारु निराकारें। आकारुनाशीं न सरे। अधिष्ठान प्रतितीभरें। अखंड झाला ॥४९॥ महदादी घडमोडी। हें त्या नलगे वोढी। जैसी मृगजळाची सांकडी। नपडे सूर्यासी तरतां ॥५०॥ ऐसे भेदाभेदाचे लाग। न शिवती जयाचें आंग। हे दोनी तेथें मार्ग। हारपोनि गेले ॥५१॥ म्हणोनी तेणें एकले। सपदि भेदाभेद गिळिलें। आपणयें निर्वाळिलें। चिन्मय नित्य ॥५२॥ यालागीं पापपुण्य दोनी। न देखे नायके कानीं। स्वप्नींचें रविग्रहण नयनीं। जागतां नाहीं ॥५३॥ खद्योत तेज नयनीं। कां ताराप्रकाश गगनीं। हे हारपती दोन्हीं। अर्कप्रकाशें ॥५४॥ तैसा पापपुण्याचा कळंभा। कां पुण्यफळ शोभा। माळती स्वयंभा। देखोनी दोन्ही ॥५५॥ अनादि आदि विद्या पाहो। जीपासोनि जाला मोहो। जिणें मिथ्याचि संदेहो। भवबंध केला ॥५६॥ प्रतिबिंब आभासे। काय रवि जळीं बुडतसे। कीं लहरींचेनि कासाविसें। शतखंड होईल ॥५७॥ घृत मद्य गंगाजळ। त्यांत बिंबे रविमंडळ। सृष्ट नष्ट धर्मशीळ। मानिती लोक ॥५८॥ तैसें साक्षित्वें असोनि त्यासी। मायामोहातें प्रकाशी। जैसी माळा सापपणासी। प्रकाशक जाली ॥५९॥ यापरी मोहोमाया। स्पर्शिली नाहीं त्याची तया। हेंचि दृष्टांतें पाहावया। सौरसु करूं ॥६०॥ जैसी रूपाची छाया। वेगळी नव्हे त्याची तया। तैसी असोनि

माया । स्पर्शली नाहीं ॥६१॥ रूपाचेनि योगें । छायाकर्म दिसे वेगें । तैसी असंगाचेनि संगें । मायाचेष्टा ॥६२॥ ऐसी मिथ्याचि माया । नासूं, म्हणोनि धरिली छाया । ते कष्ट जाती वायां । भ्रांताचे ते ॥६३॥ छाया शस्त्रें तोडितां न तुटे । पर्वतभारें न दपटे । साबळादिकीं न कुटे । बळवंतासी ॥६४॥ छाया तोडणीं जैं आणिजे पुढें । त्यावरी स्वयें छाया पडे । एवं छाया तोडणें न घडे । तेवीं माया न झडे साधनीं ॥६५॥ नासावी मिथ्याचि माया । तरीं जाणावें चेष्टवी तया । यालागीं आचार्या । सतत सेविजे ॥६६॥ त्या गुरुवाक्यस्थितीं । स्वस्वरूपाची प्राप्ती । निखळ स्वयें प्रतीति । आत्मत्वाची ॥६७॥ तेव्हां जगेंसी माया । न दिसे कोठें दिसावया । जैसें व्याळत्व हरावया । नातळत गेले ॥६८॥ आणि मीपणा मोहो । त्या मीपणासी नाहीं ठावो । यालागीं मोहाचा निर्वाहो । सकुटुंब देशधडी ॥६९॥ ऐसीं मायामोहो दोन्ही । होतीं अधिकत्वें होउनी । तें गेलीं मावळोनी । जागृतीं स्वप्न जैसें ॥७०॥ जेथें स्वरूपाचा संदेहो । त्याचें आंगीं आदळे देहो । यालागीं संदेह तोचि देहो । निश्चितार्थेंसी ॥७१॥ आणि संदेहाचें केलें । त्याचि नांव देह जालें । त्या संदेहा आलें । नष्टत्व कैसें ॥७२॥ होये नव्हे ऐसी भ्रांती । हे भ्रांती गर्भींची दस्ती । ते सगर्भित भ्रांती । सती जाली ॥७३॥ शुद्धसत्त्वाची अरणी । गुरुवाक्यें दृढ मथुनी । प्रदीप्त जाला ज्ञानाग्नी । निर्धूम जो ॥७४॥ तेथ पंचभूतांचीं काष्ठें । रजतम घृतेंसी सगटें ।

पेटविलें गोमटें । विश्वकुंड ॥७५॥ तया कुंडावांचुनी भ्रांती। ठावो नाहीं, मग जाली शांती। तेथें संदेहदेह स्थिती। निःशेष नासे ॥७६॥ गळाली संदेहवृत्ती। जाली निःसंदेह प्राप्ती। मग वोतली देहस्थिती। अक्षररसें ॥७४॥ जेवीं मेण मुसें निःशेष जाय। मग धातूचि कोंदली राहे। तेवीं नश्वरलोपें देह होये। परब्रह्मरूप ॥७८॥ जें नव्हे शब्दा-सांगडें। देखिलें परी न संगवे फुडें। जें वेदासीही कुवाडें। बोलतां पडलें ॥७९॥ जें जाणितलें विशद। परी न संगवें एवंविध। तेंचि शब्दातीत शुद्ध। केवळ पैं ॥८०॥ वेद काय नेणता परतला। जाणोनि नसंगवे बोला। यालागीं ठेला। 'नेति' म्हणउनी ॥८१॥ जें ऱ्हस्व ना वर्तुळ। कृश ना स्थूळ। स्थिर ना चंचळ। वर्णरहित॥८२॥मूर्त ना अमूर्त। प्रकट ना गुप्त। भोक्ते ना अभोक्त। सर्वद्रष्टे ॥८३॥ समीप ना दूरी। सबाह्य ना अंतरीं। निर्धारा निर्धारीं। धीरू नव्हे ॥८४॥ आदि ना अंतू। मन बुद्धि अचिंत्यू। सर्वी सर्वा-तीतू। अनंतु नांदे ॥८५॥ जो क्षण नव्हे वेगळा। नांदत आहे स्वलीळा। जगचि एक डोळा। स्वरूप ज्याचें ॥८६॥ जो नाकळे तेजाचे दिव्यदीप्ती। देखतांचि मन मूर्च्छित। म्हणोनी शब्दातीत। 'नेति' श्रुति ॥८७॥ जो नाकळे संकल्पा। तो केवीं आकळे वाग्जल्पा। म्हणोनी शब्दातीत रूपा। नयेचि बोलीं ॥८८॥ अबळा पुसे युवतीसी। कांत-सुख सांगे मजपासीं। तें शब्दें नये व्यक्तीसी। भोगि-ल्याविणे ॥८९॥ तैसी शब्दातीत बोली। हे अनुभावाची ठी

केली। वांचूनी बोलावें बोलीं। तैसें नव्हें ॥९०॥ पाहता साखर दिसे। गोडी वेगळी न दिसे। चाखतां गोडीच्च असे साखररूपें ॥९१॥ गोडी पाहतां साखर न दिसे। तेवीं अनुभवीं जग नाना भासे। शब्दार्थाचें पिसें। तेथें कैचें ॥९२॥ ज्यामाजीं गगन विरे। तेथें शब्द कोठें सरे। परी केवळ जें उरे। तें शब्दातीत ॥९३॥ आणि दोघां येकू खाये। तोही जेथें विरोनी जाये। याहिवरी जें होये। तें गुणातीत ॥९४॥ दो काष्ठांचे घसणीं। माजीं उठी अग्नी। तो दोहींतें जाळुनी। आपणहि शमे ॥९५॥ मग काष्ठ ना वन्ही। भस्महो जाये उडोनी। तेव्हां निर्विकार होउनी। राहे नभ ॥९६॥ तैसे रज तम मागें पुढें। जाळूनी शुद्ध सत्त्व वाढे। त्याचीही वाढी मोडे। आपेआप ॥९७॥ मग गुण ना कर्म। कुळ ना धर्म। स्वयें परब्रह्म। होउनी ठाके ॥९८॥ मग आपुलिया सत्ता। होये गुणकर्मीं वर्तविता। वर्तवूनी अलिप्तता। नभाच्या ऐसी ॥९९॥ सर्व पदार्थीं व्याप्त। असोनी नभ अलिप्त। तैसें गुणकर्मा वर्तवित। गुणातीत होउनी ॥१००॥ एवं गुणातीत सद्भावा। याचेनि प्रकाशें प्रकाश तत्त्वां। परी त्या नित्या सदैवा। घेपवेना ॥१॥ जो इंद्रजाळ खेळवी। तो समस्तांतें मोहवी। परी ते विद्या न भुलवी। खेळवी तया ॥२॥ तैसा तत्त्वांचा मेळा। ज्याचेनि प्रकाशें सोज्ज्वळा। मां त्या केवीं केवळा। जाणितलें जाये ॥३॥ ऐसें तत्त्वाद्वय शुद्ध। स्वयेंचि जालें विशुद्ध। प्राप्ततत्त्वावबोध। ऐसा जो जाला ॥४॥ होत्या त्रिगुणाच्या तीन वाटा। एकी उजु दोनी अव्हाटा।

तेथ विधिनिषेधाचा चोहाटा। घालिजे घाला ॥५॥ त्या तत्त्वावबोध सपाटा। मोडूनि केल्या राजवाटा। मग राम-राज्याचे चोहाटा। धेंडा पिटे ॥६॥ तेव्हां विधिनिषेध दोन्ही। पाहतां न दिसे मनीं नयनीं। जेउतें पाहे अवलोकुनी। तेउतें निरवधि ब्रह्म ॥७॥ मीनलीयां सप्तउदधीं। वारी भरे निरवधी। तैशीये समपदीं। विलासतु असे ॥८॥ तेथ सन्मुख पाठीमोरें। फिटलें सोहंतेचें भुररें। मग देखणें होउनी उरे। सर्वत्र सर्व द्रष्टे ॥९॥ तेथें निद्रा ना जागणें। बैसणें ना उठणें। सहज स्वभावें असणें। सदोदित ॥११०॥ तयासी विधि तो कैसा आहे। निषेधीं त्यजावें काय। जें पाहावें तें आहे। तोचि एकू ॥११॥ विधिलागीं घेणें। कां निषेधीं त्यजणें। हें नुरेचि ब्रह्मपणें। ब्रह्मवेत्त्यासी ॥१२॥ सांडुनी त्रिगुणाची मागी। विचरिजे एक ब्रह्ममार्गीं। तरी विधिनिषेधालागीं। नुरेचि वस्तूवेगळें ॥१३॥ वस्तुत्वेंचि अभेदें। एकपणें केवीं नांदे। तें प्रतितीचेनि प्रबोधें। कीजेल विशद ॥१५॥ परी कुळींचे कुळवंत। कीं पंचायतनींचें दैवत। त्या सद्गुरूचें मनोगत। मनामाजीं वसे ॥१५॥ त्याचेनि पादप्रसादें। श्रोते आप्त होतु आत्मबोधें। तिहीं अधिष्ठिलीया वदें। विवेकरत्नें ॥१५॥ जें सुखाचे निखळ। वोतीव नित्य निर्मळ। ते श्रोते मजलागीं प्रबळ। अवधान देतु ॥१७॥ ज्यांचिया अवधानासवें। परब्रह्म भेटीसी धांवें। तेणें दिधलेंनि खेवें। नवरसें बोले ॥१८॥ श्रोतयाचें मन निवे। ऐसें वक्तृत्व कैंचें स्वभावें। परी गोड करूनी परि-

सावें। संतजनीं माझें ॥१९॥ बाळक आणि बोबडें। तें परिसतां मातेसी प्रीती वाढे। यालागीं माझिये बडबडे। प्रिये जाली ॥१२०॥ वांचूनि पदपदार्थींचा अर्थू। मी बोलावया केवीं समर्थू। परी वाचेसी कृष्णनाथू। बोलउनि बोली पैसे ॥२१॥ तें संताचेनि सौरसें। जनार्दनु कृपावोरसें। एकाकीं प्रवेशे। चिदानंदरसीं ॥२२॥ यालागीं पदपदार्थींचे बोल। सप्रेमाची वोल। उथळ कीं सखोल। जाणती श्रोते ॥२३॥ तव संत म्हणती उगा। नसुचि झाडा पैगा। निरूपण चालवी वेगा। एकरसाचें ॥२४॥ मागिलेनि श्लोकार्थें। लगट जाली चित्तें। तें सांडूनी परिहारातें। सोचूं नको ॥२५॥ यालागीं श्लोक पदार्थेंसी। वाखाणितां चाड आम्हासी। म्हणोनि निरूपणासी। चालवी वेगीं ॥२६॥ या संताचेनि बोलें। चौगुणें प्रेम जालें। जैसें रंका पद आलें। राणिवेचें ॥२७॥ स्वामी जी नावेक। अवधान करावें एकमुख। कैसें बोलिला श्रीशुक। वस्तुविस्तार ॥२८॥ वस्तूसी एकपण। सर्वत्रैक नांदणें। तेंचि पैं निरोपण। निरोपिजेल ॥२९॥

यद्वात्मानं सकलवपुषामेकमन्तर्बहिस्थं
दृष्ट्वा पूर्णं खमिव सततं सर्वभांडस्थमेकं।
नान्यत्कार्यं किमपि च ततः कारणाद्भिन्नरूपं
निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः ॥ २ ॥

आत्मा सकळ देहीं। सबाह्यअभ्यंतर पाही। त्यांवांचुनी

रितें नाहीं। चराचर सूक्ष्मीं ॥१३०॥ तिन्ही काळ साही ऋतु। कोणें ठाईं रिता नव्हतु। परिपूर्ण संततु। स्वप्रकाशें ॥३१॥ व्यक्तीमाजीं असणें। परी व्यक्तीसवें नाहीं होणें। व्यक्तिनाशीं नराहणें। नश्वर म्हणोनी ॥३२॥ घट संगती आभासे। गगन घटाकारें दिसे। परी घटा सबाह्यें असे। घटाहूनि पूर्वी ॥३३॥ निर्विकार एक गगन। मठीं दिसे चतुष्कोण। घटीं वर्तुळ वदन। आकार विकारें ॥३४॥ ते घटमठ नासती। परी आकाश सहज स्थिती। तैशा भंगल्या नानाव्यक्ती। परी आत्मस्थिती संचली ॥३५॥ या आत्मदृष्टी पाही। तरी कार्यमात्र वेगळें नाहीं। किरीट कुंडलें कांकणें पाही। जैसें हेम ॥३६॥ कीं खल्लाळ चंचळ निश्चळ। परी तें केवळ जळ। अंचांध धूम्रज्वाळ। परी अग्निचि तो ॥३७॥ तरंग लहरी भोंवरे। हें तोयचि भासे तदाकारें। तैसा सर्व व्यक्तीं आकारें। भासे निर्विकार आत्मा ॥३८॥ याची अनुस्यूती पाहतां। पदार्थी नाहीं स्वतंत्रता। हे घडमोडीची व्यवस्था। मिथ्यत्वें त्यावरी ॥३९॥ ऐशा अखंड आत्मया। न्यून्यत्व केलें स्वमाया। ते देहअहंता प्राणियां। लागली म्हणोनी ॥१४०॥ जैसें सोनियाच्या देवां। सोनेंचि नखकेश अवेवा। तैसें कार्याकारण प्रभावा। तोचि एकू ॥४१॥ यापरी अभेदभेद भेदेंसी। तोचि भासे भेदाकारेंसी। व्यापका एकदेशीं। माजीं उणीव नाहीं ॥४२॥ जे गोडी रसासी। तेचि साखरेचे रासी। कांचा आणि अग्नीसी। उष्मा एकु ॥४३॥ कां सहस्रदीप

कळिका। प्रकाशा नाहीं वेगळिका। तैसी एकदेशी व्यापका। अनुस्यूतता येकीची ॥४४॥ एवं कारणाचेनि भिन्नरूपें। असिजे येके अमुपें। हें मनाचेनि संकल्पें। घेपवेना ॥४५॥ या अनुस्यूतीं असमासा। नासली संकल्पविकल्पदशा। जया त्रिगुणाचा वळसा। नलगतु गेला ॥४६॥ या लोक सृष्टीची नदी। तेथें विधिनिषेध पारधीं। त्रिगुणाच्या जाळबंधीं। बांधे जीव मीनू ॥४७॥ ते नदीच्या उगमीं। अवर्षण पडिलें संकल्पभूमीं। म्हणोनी कोरडा पाउलीं आम्ही। उतरोनी आलों ॥४८॥ ते कोरडें नदी आंतौता। अत्यंत प्रळयींचा अवचितां। चिन्मेघ जाला वरुषता। स्वानंदधारीं ॥४९॥ तेव्हां एकाकी पुरें। सबाह्य तेणें जळ भरे। तेथें त्रिगुण-जाळेंसी खरे। विधिनिषेध पारधी ॥ १५० ॥ जया जळा आंतौता। तरंगु फेणु फोडितां। विधिनिषेधाची कथा। वदे परिसे कवणू ॥५१॥ तेचि पूर्ण भोक्तें बोधें। काय त्यजावें निषेधें। आप्त म्हणोनि विधिवादें। द्यावें तेथें काय ॥५२॥ यालागीं विधिनिषेध दोन्ही। त्रिगुणेंसी समरसोनी। गेली तेथें विरोनी। ते पदीं बैसे ॥ ५३ ॥ चराचर ठसा। केवीं आला एकरसा। तेचि दृष्टांत द्राष्टांतें सौरसा। आणिजेल ॥ ५४ ॥ सांडुनी तर्कवितर्कू। निर्वाळिला मार्ग एकू। जेथें वक्ता श्रीशुकू। तें सादर परियेसा ॥ ५५ ॥

हेम्नः कार्यं हुतवहगतं हेममेवेति यद्वत्।
क्षीरे क्षीरं समरसगतं तोयमेवांबुमध्ये।

एवं सर्वं समरसतया त्वंपदं तत्पदार्थे ।
निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः ॥३॥

एवं सर्व भूतव्यक्तीं । आत्मपदीं ऐक्या येती । तेंचि दृढ श्लोकार्थी । बोलेल शुक ॥५६॥ हेमअळंकारठसा । घातलिया हुताशा । नामरूप मोडुनी जैसा । हेमचि हेम ॥५७॥ तरी अळंकार रूपें असतां । काय हारपेली होती हेमता । कीं अग्निसंगें असतां । गोचर जाली।५८।तरी आटावें हें आटाटी । संकल्प सन्निपात उठी । एऱ्हवीं आटितां नाटितां दिठी । सोनेंचि असे ॥५९॥ तैसे अवेव आकारीं । आत्मेन परणीत चराचरीं । तें नामरूपावरी। चोरिलें म्हणती ॥१६०॥ जैसें हेम अळंकारकृती । तैसीं भतें अद्वैतीं । येउनी आत्मस्थिती । एकरसें होतीं ॥६१॥ नातरी श्वेत कृष्ण गाई । दोहोनी क्षीर मेळवितां एके ठायीं । केलें, तेथें भेदु नाहीं । वर्णावर्णाचा ॥६२॥तैसे अद्वितीयेचा गांवीं । वर्णावर्ण पदवी । नसोनियां अनुभवी । सुखवस्ती वासु ॥६३॥ जैशा जळबळें सरितां । उदधी आलिया ठाकितां । ठाकिलियां समरसता । होउनी वसती ॥६४॥ त्या अंबुनिधी परुता । ठाकिलियां मार्गु नाहीं सरिता । तैसी पावोनी पूर्ण ऐक्यता । उपरमु नाहीं ॥६५॥ ऐसे सर्वही समरसें । आत्मपदींच असे । हें त्वंपद तत्पद सौरसें । बोलिलें निगमीं ॥६६॥ किंबहुना आपणासी । परिच्छिन्न एकदेशी । कर्ता भोक्ता मानसीं । सुखदुःख बहु ॥६७॥ नाना विषय चित्ता । अखंड वाहे चिंता । विदेही परी सर्वथा । 'देह मी' म्हणे ॥६८॥ त्या त्वंपदाचा

सोहळा। येऊन पडिला गळा।. आणि उत्तम तो वेगळा। म्हणती तत्त्वातीतु ॥६९॥ जो निर्गुण निःसंगु। निर्मळ निर्व्यंगु। निंदारहित अभंगु। निरुपाधिकु ॥१७०॥ जो सनातन शुद्ध। संत प्रबोध बुध। शाश्वत सिद्ध। सिद्धि-रहितु ॥७१॥ जो आद्य अव्ययो। अलक्ष अद्वितीयो। अरूप अभिभवो। भावविहीनु ॥७२॥ जो अगम्य वेदवाचे। अगोचर सत्य साचें। ऐसें त्या तत्पदाचें। रूप म्हणती ॥ ७३ ॥ तोचि तूं आलासी। त्वंपदीं पाहे त्यासी। तरी तत्पदाचिये रासी। वरील सीग ॥७४॥ त्या त्वंपदाचा गोळा। सांग कोठें जाला वेगळा। चुकोनी व्यापका सकळा। याची खाणी के आहे ॥७५॥ अनादिप्रवाहयोगें तन्मात्रविषयसंगें। मनाचेनि संकल्प वेगें। वेगळें मानिलें ॥७६॥ तरी विषयांचिये रसवृत्ती। रसस्वाद तोचि संभूती। भोग स्वादाचिये संभूती। निश्चित जाणता तोचि ॥७७॥ तोचि दृष्टीचा विवेकी। विषयरसातें पारखी। जो बुद्धीचा पूर्व कीं। पूर्वज असे ॥७८॥ आणि पार्थिवांचा उभारा। जाला पंचभूतविकारा। तो विचारितां विचारा। परिवसान आत्मा ॥७९॥ तरी जीवन हे बोली। प्रति-बिंबाचिये भुली। बिंबवितथा विसरली। म्हणोनियां ॥१८०॥ प्रतिबिंबा मळिवट। चंदन लावणें चोखट। तरी दर्पणासी बरवंट। केलिया काय प्रतिबिंब चर्चे ॥८१॥ प्रतिबिंबा जेणें बिंबविजे। त्यासी सौरभ्यें जें चर्चिजें। तें भोगिलें देखिजे। स्वभोग प्रतिमीं ॥ ८२ ॥ तैसे सर्व भोग

आत्मा भोगी। अविद्या बिंबे जीवाचे आंगीं। म्हणोनियां जगीं। भोक्ता मी म्हणे ॥८३॥ तेथें आशंका उठी झणी। जें सुखदुःख भोग दोन्ही। भोगावया लागुनी। काय आत्मा जाला ॥ ८४ ॥ तरी उपाधीचेनि बिंबें। तेथ महदादि हें प्रतिबिंबे। तेथ उपाधी द्वंद्वभांबे। काय बिंबविता भोगी ॥८५॥ आदर्शा आंगीं अडळे मळ। निबिड बैसले सबळ। ते प्रतिबिंबाआंगीं केवळ। क्षेपले दिसती ॥८६॥ तो मळ जैं फेडावा। तैं आरिसा साहाणें जोडावा। परी बिंबला तो धरावा। काये लागेल साहाणें ॥८७॥ म्हणोनी नाना साधनें। तें चित्तशुद्धीसी कारणें। जीवशिव तो ब्रह्मरूपपणें। स्वतःसिद्ध ज्ञाता ॥८८॥ यालागीं सुखदुःख दोन्ही। उपाधीसि लपोनी। गेली ज्या देखोनी। तोचि तूं आहेसीं ॥८९॥ ऐक त्वंपदाचें शोधन। तेणें तत्पदीं समाधान। जेणें होय ऐक्यज्ञान। सर्वार्थी दृढ ॥१९०॥ एवं जें तत्पदार्थी। तें ये त्वंपदीं प्रतीति। म्हणोनी तत्त्वमस्यादि अर्थी। गर्जे वेद ॥९१॥ ऐसे तत्पदप्राप्त श्रेष्ठ। त्यांसी त्रिगुणमाया—पट। जो विधिनिषेधरगट। विचित्र होता ॥९२॥ ज्या रंगाचिया बरवा। ब्रह्मा आणिला रजोगांवा। त्रिगुणाच्या वैभवा। घडमोडीलागीं ॥९३॥ त्या त्रिगुणतांथुवाची पल्हे। त्याचेनि तेजें भूमी जळे। आणि विचित्रपटत्व सगळें। भस्म जालें ॥९४॥ तेधवां उघडवाघड ब्रह्म। निस्त्रिगुण उत्तम। त्याचिये दृष्टी सुगम। ठसावले लोक ॥९५॥ तेव्हां वाती लाउनी पाहतां। विधिनिषेध नलगे

होता। त्या राजयोग आत्मवंता। आपुलेपणा वेगळा ॥९६॥ त्यासी विधी कवणे ठाईं। निषेध कैंचा काई। जें आत्मराम स्वदेहीं। विश्वेंसी जाला ॥९७॥

यस्मिन्विश्वं सकलभुवनं सामरस्यैकभूतं
उर्वी ह्यापोनलमनिलखं कालजीवक्रमेण।
यत् क्षीराब्धौ समरसतया सैंधवं वैकभूतं
निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः ॥४॥

विश्वेसी विश्वदेही। आत्माराम जाला पाही। सकळ भूतें ज्याच्या ठाईं। समरसां आलीं ॥९८॥ पृथ्वी आप तेज वायो। गगनेंसहित विरोनि जाये। तेथ सकळ भुवनें काये। भौतिकेंसी राहाती ॥९९॥ पृथ्वी सलिल परिमाण सिद्ध। तेव्हां पृथ्वीचा जळीं ये गंध। मग जळचि एकविध। वोतप्रोत ॥२००॥ त्या जळाचा रसु। प्राशूं निघे हुताशु। तेव्हां जळाचा हारासु। तेजगर्भीं ॥१॥ मग तेजाचें रूप। वायोनें शोषिलें अमुप। मग वायोचि एकरूप। सैरा वाढे ॥२॥ त्या वायोच्या स्पर्शातें। गगनें नेलें आंतौतें। तैं वायो पावे लयातें। गगनोदरीं ॥३॥ तें शून्यही सगळें। अहंकारीं मावळे। तो अहंकारू जाउनी मिळे। कारणामाजीं ॥४॥ एवं महद्भूत भौतिकेंसी। माया प्रवेशे आदि पुरुषीं। ते गेली नलगत कोणे वेसी। हे शुद्धिही नलभे ॥५॥ जेवीं दोराचें सापपण। दोरींचि हारपे पूर्ण। तेवीं मायेचें निदान। चैतन्यघनीं ॥६॥ माया वेष्टित चैतन्या। 'जीव' या अभिधाना। तेंचि

गेलिया जीवपणा। सहजेंचि विलयो ॥७॥ पंचभूतां ऐक्यता। मायेसकट समरसता। जाली तेथें जीविता। तोचि भावो ॥८॥ क्षारसिंधूमाजीं रवा। घातलिया सैंधवा। तेणें विरणें तेवीं जिवा। प्रकृतीसकट ॥९॥ त्या सैंधवाचा खडा। जाला सिंधूचि येवढा। तेवीं एकदेशी होडा। पूर्ण ब्रह्म जाला ॥२१०॥ तेव्हां त्रिगुण अहंकार व्याला। वास प्रकृती वावरला। जो विधिनिषेधाच्या गरळा। सदासांडी ॥११॥ ज्याचेनि विषभेदें। जन जाली बोधमंदें। अविदेचि विषयें अंधें। केलीं जेणें॥१२॥ज्याचिया लहरी। विराजती राजपुरीं। मां इतरां चराचरीं। कवण पाडु ॥१३॥ नवल विषयांचा पडिपाडु। गोड परमार्थ केला कडु। केवळ विषप्राय तो गोडु। विषयो जाला ॥१४॥ त्या भुजंग फणी मंडळा। घातली ऐक्याची शिळा। तेव्हां विधिनिषेध गरळा। स्वयेंचि घुटकी ॥१५॥ त्या प्रकृती वावरला। शोधिले पावे तंव मुळा। मुळींच्या स्वप्रकाशा ज्वाळा। जाळिले गुण सकळी ॥१६॥ तेव्हां सर्प गरळ वावरले। जाळोनि ब्रह्माग्नी केवळ। जाला तो तेजबंबाळ। न मावळतु राहे ॥१७॥ ऐसा निस्त्रैगुण्य योगी। त्यासी विधीकवणु जगीं। आणि निषेधाही लागीं। वेगळा विभागु कैंचा ॥१८॥ एवं विधिनिषेध दोन्ही। गेले ज्या देखोनि। जो विश्व समरस होउनी। एकू ऐक्यें ॥१९॥ बहुतांसी एकपण। आलें तें कीं लक्षण। येचिविषीं निरोपण। शुक योगींद्र निरोपी ॥२२०॥

यद्वन्नद्योऽब्धिसमरसा : सागरत्वं ह्यव्याप्ता :
तद्वज्जीवो लयपरिगत : सामरस्यैकभूत : ।
भेदातीतं लयपरिगतं सच्चिदानंदरूपं
निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधि : को निषेध ।।५।।

सांडुनी दोन्ही कुळें। अवचितीं सकळ जळें। नाना सरिता मेळविले। उदधीमाजीं ।।२१।। तेथें सरितांचे भेद। जाउनी जळचि एकविध। होऊनियां पद। सिंधूचें भोगिती ।।२२।। तैसा नानाभूत ठसा। कां भिन्न भिन्न जीवदशा। आणुनी समरसा। सामरस्य करिती ।।२३।। प्रथम गुरुवाक्यासरिसा। बाणला हा ठसा। तरी कळिकाळाचा घसा। निमटिला तेणें ।।२४।। गुरु वाक्यप्राप्ती। बोधलें चित्त न राहे स्थिती। तरी तें अनुभूतीं। वाढतें कीजे ।।२५।। तेथें लाऊनियां वृत्ती। करीत जाईजे आवृत्ती। जंव हे देहस्थिती। निःशेष विरे ।।२६।। जें वृत्ति आवृत्ति करिते। तेंचि हारपे तेथें। मग पाहे सभोंवतें। तंव अभेद जालें ।।२७।। कनकबीज सेवणें कैसा। नसतेंचि भासे मानसा। तोचि सावध होये जैसा। तैसें झालें ।।२८।। ज्यासी दिग्भ्रम पडे। तो पूर्व म्हणे पश्चिमेकडे। तोचि उमजोनि पुढें। निजपंथीं लागे ।।२९।। हेंही जरी नये हातां। तरी आणिक येक भेदातीतां। सर्वभूतीं निजात्मता। अखंड पहावी ।।२३०।। जें दृष्टीं वरपडे। ते आत्मस्थिती रोकडे। लाऊनि मागेंपुढें। आपणासहित ।।३१।। जेवीं घटा सबाह्य

आकाश । तेवीं सर्वभूतीं परेश । पहावा सावकाश । अनन्य-प्रीती॥३२॥आकाशेंसी घटु रिता । करितां नकरवे सर्वथा । तेवीं भूतासी निजात्मता । सांडितां नये ॥३३॥ या उघ-डिया वृत्ति पाहतां । भेदू न दिसे सर्वथा । मन संकल्पा आंतौता । अभेद आत्माचि भासे ॥३४॥ या अभेद आत्मा सौरसें । भेदाची वाट पुसे । मग भेदातीत उल्हासें । स्वानंदोदधि ॥३४॥ तेणें आनंद भोग आमुपें । देहीं ज्ञान सोहं हारपे । मग सच्चिदानंद स्वरूपें । होऊनि ठाके ॥३६॥ तेव्हां सच्चिदानंदज्ञान । त्रैपदा अधिष्ठान । होऊनी आपण । उल्हासतु असे ॥३७॥ ज्या सुखासी नाहीं मर्यादा । दुःख रिघों न लाहे कदां । त्या सुखाचिया आनंदा । आनंदविता आपण ॥३८॥ एवं सच्चिदानंदू । या त्रैपदीं अभेदू । होऊनि एकविधू । नांदतु असे ॥३९॥ गोड आणि शीतळ । जैसें एक गंगाजळ । तेवीं सच्चिदानंद केवळ । त्रैपदीं येकु ॥२४०॥ ऐसा सच्चिदानंदपदीं । त्यासी प्राप्त त्रिगुणक्षयव्याधी । असेचिना मा बाधी । केवीं हें घडे ॥४१॥ ज्या त्रैगुणा क्षयव्याधी । जालें तें क्षया आधीं । असतांच विधिनिषेधीं । विषय पीडी ॥४२॥ जें व्याधिचेनि सन्निपातें । उमरडुनी विचारांहातें । वासनावनीं भ्रमतें । सैरावैरा ॥४३॥ कामिनी कुचाग्रीं पडत । विषयकर्दमीं बुडत । स्वर्गकामाचें टेंक चढत । निसरोनी पडे ॥४४॥ ते व्याधीचेनि उफाडा । देतां सत्कथेचा काढा । श्रवणमुखींचिया अतिदाढा । दांतखिळ पडे ॥४५॥ ते

व्याधीचेंनि त्रिगुणतापें। तापलीं जल्पती कोपें। 'मी माझें' येणें संकल्पें। वोसणताती ॥४६॥ करितां उपचार आपमती। जेवीं उत्कृष्ट होये पुढती। यालागीं सेविजेती। अक्षर रसज्ञ ॥४७॥ तो आचार्य धन्वंतरी। ज्याची दृष्टी नीरुज करी। तोवांचूनि चराचरीं। उपचारिता नाहीं ॥४८॥ तेणें ब्रह्मरस अर्धमात्रा। दाखवितां क्षयाचा थारा। मोडूनियां शरीरा। अक्षय केलें ॥४९॥ त्यासी दृढतेंचें पथ्य। लाविलें सीत सत्य। तेणे रोगाचे विगत। निःशेष जाले ॥२५०॥ मग सर्व धातूंच्या ठाईं। ब्रह्मरसु कोंदला पाही। यावरी देहीं विदेही। जालें कार्य ॥५१॥ तेव्हां उठणें का बैसणें। निद्रा ना जागणें। भोगणे अभोगणें। दोन्ही नाहीं ॥५२॥ तेथें क्रिया ना कर्म। अधर्म ना धर्म। वर्ण ना आश्रम। सहजस्थिती॥५३॥ तया अकुळ ना कुळ। निर्मूळ ना मूळ। कृश ना स्थूळ। विकाररहित ॥५४॥ मग आकार ना शून्य। बोल ना मौन्य। आपणचि सनातन। चिद्ब्रह्म जाला ॥५५॥ तयासी कवण विधि। सांगों काय निषेधीं। जेणें ठाकूनियां बुद्धी। ब्रह्म जाला ॥५६॥

दृष्ट्वा वेद्यं प्रमथनपदं स्वात्मबोधस्वरूपं
बुध्वात्मानं सकलवपुषामेकमंतर्बहिस्थं।
भूत्वा नित्यं समुदिततया स्वप्रकाशस्वरूपं।
निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः ॥६॥

तो ज्ञानदृष्टी ईक्षणा। भेदीं अभेद देखणा। जाणोनि पूर्णपणा। योग्य जाला ॥५७॥ अधमोत्तम पाउटी। नपडे त्याचिये दृष्टी। यालागीं वेद्यत्वाचिये उठी। नवचे सळु ॥५८॥ यानंतरें उत्कट। परमपद श्रेष्ठ। ते आपणामाजीं स्पष्ट। देखणा जाला ॥ ५९ ॥ तो प्रमाणासी परू। प्रकृतीसी अनावरू। मृगजळीं मेरू। विरेना कहीं ॥ २६० ॥ वासना तुटे जाळीं। नभ नुकडे ज्वाळीं। चित्रींच्या साबळीं। न खोमे मही ॥६१॥ शुक्तिकेचा रजताकारू। ज्ञाराही भिन्न करूं। नसके, तेवीं अनावरू। प्रकृती तो ॥६२॥ कैंचें अप्रमाणीं प्रमाण। तेथें कारणही अकारण। तें परमपद चिद्‌घन। स्वबोधें जाला ॥ ६३ ॥ नाहीं द्वैतसौरस। हे वपु हा पुरुष। स्वात्मत्वाचा विलास। तें हें विश्व ॥६४॥ भूतादिभूताच्या ठायीं। स्वयें आपणावांचूनि नाहीं। सबाह्याभ्यंतर पाही। दुजें न कोणी ॥६५॥ बोलावें बाह्यांतरीं। वेगळें असावें जरी। तेंचि नाहीं मां परी। सबाह्यें कैंचें ॥ ६६ ॥ तंव बाह्य प्रकाशील कायी। जंव अंतरीं प्रकाशिलें नाहीं। म्हणोनि जाणावें स्वदेहीं। तरी जाणितलें जगीं ॥ ६७ ॥ सविद्य स्यास्वतःसर्व०। याचेनि यावरी भासत। तें स्वात्मपद समस्त। आत्मत्वें जाला ॥ ६८ ॥ ऐसा चालतां सूक्ष्म मार्गें। टणकला बोध मार्गें। राहिला यावरी आंगें। भक्त होउनी ॥ ६९ ॥ तो बोध बोधातीतु। विषय भोगी भोगितु। देहीं असोनि देहातीतु। गुणी गुणातीतु स्वयें जाला ॥२७०॥स्वयें स्वप्नीं निमाला॥

तो जागृती स्वयें मीनला । तेवीं अनित्यता आला । ब्रम्ह-
भूत तो ।। ७१ ।। मिथ्या प्रपंचाजवळी । वृत्ती परतोनि
भ्रांती मेळी । न मेळे कोणे काळीं । यालागीं नित्य ।।७२।।
चराचर सर्व । भज आरूपाचे आवेव । ऐसा अकृत्रिम
स्वभाव । ते नित्यता म्हणिजे ।।७३।। लवभरी विस्मरण ।
जालेपणीं जाणपण । नव्हेचि या नांव नित्यपण । नित्य-
त्वाचें ।।७४।। नवल तो सदोदितु । अदृश्य उदोअस्तु । जें
तो स्वप्रकाशी नित्यू । प्रकाशमान ।।७५।। ईश्वरीचें वैभव ।
ते म्हणे माझे स्वभाव । पूर्ण परिपूर्ण सर्व । ते सदोदित
स्वयें ।।७६।। रवी सकळांतें प्रकाशवी । तो काय प्रकाशिजे
दिवी । तैसा प्रकृतिस्वभावीं । अन्य प्रकाशरहित ।। ७७ ।।
समस्त आत्मत्वें प्रकाशे । ज्याचेनि प्रकाशें प्रकाशिलें दिसे ।
स्वप्रकाश ऐसें । यालागीं नांव ।। ७८ ।। स्वरूपें सगळा ।
प्रकाशाचा उमाळा । जेवीं मंडणेंविण स्वलीळा । नभोमय
सूर्यो ।।७९।। तो तो प्रकाशुचि स्वादु । स्वादुचि सुगंधु । तो
स्वरूपाचा आनंदु । जें स्वरूप ।।२८०।। त्याचेनि स्वानंद-
सुखें । कडूपण अमृतीं ठाके । यापरी स्वसुखें । प्रकाशला
।।८१।। ऐसा जो प्रकाशी । कैंचा त्रिगुण वृक्ष त्याचया देशीं ।
जो विधि निषेध चोपासीं । लसलसितु ।। ८२ ।। जयासी अ-
विद्येचें आळें । तरी सूक्ष्म अनंत मुळें । संकल्पाचेनि जळें ।
सबळ जो कां ।।८३।। अहंतेचें बिड । पांच खांदिया प्रचंड ।
चौप्रकारीं उदंड । विस्तारिला ।। ८४ ।। पालवी मद्यमानें ।
विचित्र तृष्णेचीं सुमनें । विकाशलीं कामानें । जीवभ्रमर

॥८५॥ दों फळभारें फळला। अग्रें उतरती तळां। तो फळ-भोगु सोहळा। सेवी तयासी ॥ ८६ ॥ सर्वांगीं निरंतरा। विषयरसाचिया धारा। ठलोनि मदभारा। स्रवतु असे ॥ ८७ ॥ माझारी अवचितया। शोकाचिया पारंबिया। निगती आणिआळिया। संधिभागीं ॥८८॥ तेथ स्वर्गादिका कांमाणे। कामीं कामिकां अति गोडपणें। दीक्षित ज्या-कारणें। यजित याग ॥ ८९ ॥ ऐसा विपरीत भववृक्षु। देखोनि जो मुमुक्षु। छेदूनि दक्षु। अनाळसें जाला ॥ २९०॥ संदेहयुक्तींचा दांतीं। खरमरा सहजस्थिती। ऐसी विद्या-कर्वत हातीं। ऐक्यवृत्तीचा ॥९१॥ अहंचिन्मयाचे साहणें। प्रत्यावृत्ती खरमरपणें। शस्त्राचें सज्जणें। सिद्ध केलें ॥९२॥ स्वदेहा आणि शस्त्रां। ऐक्यतेचा उभारा। करूनिया तरु-वरा। निवटूं लागे ॥ ९३ ॥ तंव घालितां घावो। तरुवरा अभावो। मृगजळींचा हेलावो। संनिधी जैसा ॥ ९४ ॥ ऐसिये त्रैगुण्यमार्गीं। विचरतां राजयोगी। तयासी विधि-निषेध जगीं। वस्तुत्वा वेगळा कैंचा ॥ ९५ ॥ तें चिन्मया चिन्मय। आनंदा आनंदमय। विस्मया विस्मय। गिळूनि ठेला ॥ ९६ ॥

कार्याकार्ये किमपि सततं नैव कर्तृत्वमस्ति
जीवन्मुक्तः स्थितिरिह मृतो दग्धवस्त्रावभासः।
एवं देहे प्रविलयगते तिष्ठमानो विमुक्तो
निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः ॥७॥

ऐंसिया ब्रह्मयुक्ता। कार्याकार्यकर्तव्यता। करणें नाहीं सर्वथा। कवणे काळीं ॥९७॥ सर्व कर्में देहीं। निपजती परी कर्ता नाहीं। कर्मीं ब्रह्म पाही। स्फुरत अतीलि॥९८॥त्या स्वात्मप्रतीतीप्रमाणें। तेणें जें जें कर्म करणें। तें कर्मचि ब्रह्मपणें। उभें ठाके ॥९९॥ जळावरी लहरी। चंचळ निश्चळ कर्म करी। तेथें कर्मकर्त्याभाझारीं। जळचि जैसें ॥३००॥ एवं आत्मप्रतीति। वेगळे नुरेचि कर्मस्थिती। यालागीं करूनि अकर्तृत्वीं। बैसणें नित्य ॥१॥ उगवलिया रजनीकर। भरितें उलथे सागर। अमृत सेविती चकोर। सोमकांत द्रवती ॥२॥ कुमुदें विकसती। संतप्त विश्रांती। इतकें करूनि रजनीपती। अकर्ता स्वयें ॥३॥ तेवीं सकळ इंद्रियवृत्ती आत्मसत्ता प्रवर्तती। तऱ्ही कर्तृत्वमस्ती।आत्म्या-प्रती असेना ॥४॥ ऐंसिया पूर्ण प्रतीति। ठेली कर्माकर्म गती। म्हणोनि कृर्तृत्वमस्ति। नाहीं तया ॥५॥ दिसे एक-देशी देही। परी तो व्यापकु सर्व पाही। जो कूटस्थाच्या ठाईं। सनातनु जाला ॥६॥ घटीं दिसे घटाकाश। परी तेंचि सर्व दिवशीं सावकाश। तेवीं एकदेशीं दिसे वास। परी तोचि सर्व देशीं निवासी ॥७॥ यालागीं तो जीवन्मुक्तु। देहीं असोनि देहातीतु। देखण्यामाजीं दिसतु। राहे देहीं॥८॥ प्रदीप्त वस्त्रांची घडी। दिसे परी आगि रोकडी। तया देह हे गोष्टी कुडी। देखे मिथ्या ॥९॥ तेसा ब्रह्मावेगळा न होता। वर्ते ब्रह्माचिया सत्ता। म्हणोनि जिवन्मुक्तता। बोलाची आख्या॥३१०॥जैसा खैराचा खुंटू। जळोनि दिसे लखलखीत

निटु । परी पुर्बिल्या ऐसा हळुवटु । न धरवे हातीं ॥११॥ यापरी देहातीतु । होऊनि देहीं तिष्ठतु । तोचि जीवन्मुक्तु । मुक्तीवरील कळसु ॥१२। त्या त्रिगुण मोहनी । जो जाळितु स्नेह सुरालागुनी । विधिनिषेध धूम करूनी । धरठल्या बुद्धी ॥१३॥ ज्या ज्वाळाच्या शिखा । करपविती सत्यलोक-नायका । मा इंद्रादि जीवाचा लेखा । कवण पां ॥१४॥ ऐसिया त्रिगुणअनिळा । देहात्मकाष्ठाचा जिव्हाळा । तो तोडुनी जाळावया ज्वाळा । पुढें इंधन नाहीं ॥१५॥ मग तो जेथीला तेथें । त्रासिला कूटस्थवातें । तयावरी अवचितें । स्वानंदमेघ वरुषे ॥१६॥ तेव्हां त्रिगुणताप जाये । विधि-निषेध धूम्र राहे । मग सुशीतळ प्रकट होये । चिदानंद बोलावा ॥१७॥ ज्याचेनि उल्हासें । मनबुद्धी उल्हासे । तो उल्हासुचि दिसतुसे । बुद्धी आणि दृष्टी ॥१८॥ उल्हासु जाणिजे स्पर्शें । त्रिगुण गेलिया दृष्टी दिसे । त्या वेगळा भासे ऐसे । नुरेचि उरी ॥१९॥ ऐसिया उर्वरिता । चित्त नाहीं मा कैंची चिन्ता । स्वदेहीं परिपूर्णता । विश्वंभर जाला ॥३२०॥ तेथ इष्ट ना अनिष्ट । नीच ना श्रेष्ठ । गुप्त ना प्रकट । स्वतःसिद्ध झाला ॥२१॥ तया भेद ना अभेद । मंत्र ना छंद । स्वदेहीं गोविंद । सदोदित जाला ॥२२॥सांडूनि त्रिगुण बुद्धी । तया कैंची निषेध विधि । ब्रह्म-राणिवेच्या राजबिदीं । विचरतु जो ॥२३॥ तया आपपर दोन्ही । वक्ताळ गेली मावळोनी । मीचि कोण हें जनीं वनीं । नाठवे वेगळें ॥२४॥

कस्त्वं कोऽहं किमपि च भवान् कोऽयमत्र प्रपंचः
स्वसंवेद्यं गगनसदृशं पूर्णतत्त्वप्रकाशं ।
आनंदाख्ये समरसघनेबाह्यकेंऽतर्विहीने
निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः ॥ ८ ॥

मी कवणु कवणाचा । एकदेशी कैंचा । माझिया मीपणाचा । निर्वाहो कोठें ॥२५॥ दृढता जो मीपणा । तेणें ठावो केला तूं पणा । मीतूंपणाचा वाहाणा । प्रपंच भासे ॥२६॥ ज्या प्रपंचाचा उभारा । स्वरूपीं जणू पाठिमोरा । केला पैं नश्वरा । विषयासाठीं ॥२७॥ तें मूळ विचारितां। विचारा ठाके पैं पाहतां । जें मनाचिया हातां । हातवसेना ॥२८॥ तें बुद्धीसी कुवाडें । धृतीसी धरितां सांकडें । जें असतां मागेंपुढें। नाहींचि म्हणती ॥२९॥ जें चळे ना ढळे । गगनासी नातळे । ज्यामाजीं सगळें । हारपलें गगन ॥३३०॥ तें स्वदेहीं पाहतां । हारपली तूंपणाची वार्ता । प्रपंच दिसे मृगजळता । मृगजळाचिया ऐसा ॥३१॥ तेव्हां मीतूंपण वावो । प्रपंचाचा अभावो । स्वसंवेद्य पाहाहो । आत्मात्वाचा ॥ ३२ ॥ जें खंडोखंडीं अखंड । आपुलेपणें उदंड । जें अनंत ब्रह्मांड । अधिष्ठात्रये ॥३३॥ तें स्वसंवेद्य ब्रह्म । उपमेसी निरोपम । जें सूक्ष्माहूनी सूक्ष्म । व्यापक गगनाऐसें ॥ ३४ ॥ ज्याचेनि प्रकाशलेशें । समस्ता तत्त्वां प्रकाशूनि असे । तें पूर्ण तत्त्व कैसें । स्वदेहीं भोगी ॥ ३५ ॥ जो स्वादु गोडियेतें । कां सुवासु सुमनातें । पवन भोगिजे स्पर्शातें । तैसा भोगू ॥३६॥ प्रभा सूर्यातें । चांदणें चंद्रातें ।

तैसा पूर्णत्वातें । अद्वय भोगी ॥ ३७ ॥ तो अद्वयानंदाचा केवळ । वोतीव नित्य निर्मळ । जाला जो अढळ । आनंदरूप ॥३८॥ निबिड आणि घन । बाह्यअंतर विहीन । क्षेत्रक्षेत्रज्ञाहून । पूर्वजु जाला ॥३९॥ तेंव्हां मीतूंविण प्रपंचु । हा चित्पणेंचि वाच्यु । जेथें शून्याचा निर्वचु । ते हे दशा ॥३४०॥ होती त्रिगुणाची धाडी । जे धाडी जीव बांदवडी । घालूनी विधिनिषेध बेडी । जाची जन्म मरणें ॥४१॥ तेथें मागें आणि पुढें । खडखडीत उघडें । परब्रह्म डोळ्यापुढें । विराजत असे ॥४२॥ मग अहोरात्र तया । बैसवी विषय भरडावया । दळिलेंचि दळावया । चर्वितचर्वण ॥४३॥ क्षुधें तृषेचे अपाय । वाजती दरिद्राचे घाय । तेणें दुःखें विसावों जाय । गृहदाराकडे ॥४४॥ तें अतिजर्जर साचें । हातीं धरितां मोहविंचें । हाणितलें तेणें वेदनेचें । प्रबळ दुःख ॥४५॥ असूयेच्या तिडका । ब्रह्मांडीं निघती देखा । वित्तहानीचा भडका । तेणें न संडे उभड ॥४६॥ पुत्रनाशांचे इंगळ । तेणें सर्वांगीं जळजळ । आशा सर्पिणीची गरळ । मनमुखीं पडे ॥४७॥ तें सर्पिणीचें विख । मोहविंचुवाचें दुःख । कैंचें बंदिशाळे सुख । वरी विषय भरडिणें ॥४८॥ ऐसिये त्रिगुणाचें धाडिवे । देहात्मबुद्धी दैवें । सांपडली ते भोवे । भोगिती ऐसे ॥४९॥ हे देखोनि बांदवडी । जो ब्रह्माहमस्मिखर्ग काढीं । तो एकला करी देशधडी । त्रैवर्गिकातें ॥३५०॥ हा अविद्यामेळावा । पळोनि जाये गुणगांवा । तेथें करूनि रिघावा । सपिलीं मारी ॥५१॥ तंव तिही माजीं

पहाहो । थोर लागे घरकलहो । वडिल लागे खावों । दोघां-तेंही ॥५२॥ दोन्ही खाऊनी एकला । घाव न लगतां निमाला । एवं जो जाला । निस्त्रैगुण्य ॥५३॥ त्यासी विधि-निषेधाची कडी । पहिलेंचि तुटली बेडी । तोचि पावोनि पैलथडी । वस्तु जाला ॥५४॥ तुटली कर्माकर्मवोढी । निषेधीं पडली झांपडी । स्वानंदामाजीं सबळ बुडी । स्वसंवेद्य जाला ॥५५॥ तेव्हां नास्तिक्याची प्रौढी । उभऊनी आस्तिक्याची गुढी । उभवी तेणें धडफुडी । आचार्यकृपा ॥५६॥ तेव्हां अभाव कीं वैभव । सगुण की निरावेव । अनुभवा अनुभव । अनुभविजे॥५७॥तेथें हेतु ना मातु । दृश्य ना दृष्टांतु । सगुण ना गुणातीतु । चिद्वेद जो ॥५८॥ जो जगद्गुरु जनार्दनु । भवगजपंचाननु । ज्याचेनि सकळ जनु । परणितु असें ॥५९॥ जो अमनमनाची माउली । कीं श्रांता विश्रांतीची साउली । अनुभवाहि गुतुकली । आनंदें ज्याचेनि ॥३६०॥ तो श्रुतींचा धारकु । निजमनधरातारकु । स्वात्मबोधें कारकु । सकळद्रष्टा ॥६१॥ तो एकाकी एकपणें । एकनाम स्मरणें । एकाजनार्दनें भोगणें । हें निर्वेद्य सुख ॥६२॥ असारा सार मथ्य । जें सुख भोग्य नित्य । तेंचि बोलिला सत्य । श्लोकार्थेंसी ॥६३॥ आतां अष्टमावरिली टीका । काय अष्टमा सिद्धी होती एका । कीं अष्टम अवतार देखा । नाचती तांडव ॥६४॥ तेथें सांडूनियां असत्य । उघड दाविजेल सत्य । जेणें सत्यवंत । सत्यत्वा येती ॥६५॥

सत्यं सत्यं परममृतं शांतिकल्याणरूपं
मायारण्योद्दहनममलं ज्ञाननिर्वाणदीपं ।
तेजोरूपं निगोमसदनं व्यासपुत्राष्टकं यः ।
प्रातःकाले पठति मनसा याति निर्वाणमार्गम् ॥९॥

मागें श्लोकार्थयुक्त । बोलिलों सत्य सत्य । जें सकळ इंद्रियें सत्यातें । भोगुनी सत्यत्वें वदली॥६६॥भगवद्रूप सत्यरूप । तो सत्य भोगु इंद्रियें नित्य । यालागीं सत्यसत्य । द्वीवचनार्थ बोलिलें ॥६७॥ त्या इंद्रियांचा अनुभवु । नावेक प्रकट करूनि दाऊं । म्हणतुसे जिवाचा जीऊ । शुकशार्दूळ ॥६८॥ सकळही गुप्त । सेउनी परमामृत । तो अनुभव भोग गुप्त । परी प्रकट करूं ॥६९॥ पुढें पाहे अर्थें । तो तृप्त होये परमामृतें । मऱ्हाटें न म्हणावें येथें । अनुभवकसवटी हे ॥३७०॥ तरी दृष्टी सत्यत्वें कैसें । जो जो पदार्थ आभासे । तो स्वदेहासकट दिसे । दृश्यातीत ॥७१॥ कां दृश्यदृष्टीचे मेळां । नहोनी दृश्यदृष्टी वेगळा । भोगवी सत्यसोहळा । चिदानंदु ॥७२॥ जैसें हेमचि आयितें । प्रिये करी अळंकारातें । तैसें नांवरूप दृश्यातें । आवडीवरी भेटे ॥७३॥ एवं दृश्यदृष्टी देखणा । अनुस्यूत होउनी जाणा । जो श्रुतीसीहि अप्रमाणा । तो परिमाणामाजीं भेटे ॥७४॥ तरी ऐकावयाकारणें । श्रवणचि सत्य कर्णें । मग जे जे गिरा परिसणें । ते सत्यासिच ॥७५॥ कां श्राव्या श्रावक श्रुती । त्रिधा स्वात्म अनुस्मृती । सांगतां ऐकतां होती । गगनाचा पितामहो ॥७६॥ कां बोलासी बोलविता । त्यासी दृढ

केली आप्तता। परी बोलकिया आंतौता । विरोनि जाये ।।७७।। मग शब्दाआंत बाहेरा । निःशब्दाचाचि उभारा । याहेतु श्रवणद्वारा । सत्याचा भोगू ।।७८।। घ्राणाचिया परिमळा। सुमन करूनियां लीळा। भोगु जाये तंव सावळा। भोग्यभोगुभोक्ता ।।७९।। तो सुवासु वासाअंतरीं । घ्राणा आंतुबाहेरी। रिघाला भोगु करी । आपआपला ।।३८०।। रसीं रसपणें। जिव्हे रस रसज्ञे। उभय ऐक्य येणें। रसभोग भोगी ।।८१।। तो ग्रास घाली स्वमुखीं। तेणें जगदोदर पोखी। कीं विश्वंभरें सुखी। तृप्तीस ये ।।८२।। ग्रासु रसनें रसामाजीं। देखे अनुस्युतता सहजीं। मग अक्ष आणि भोजीं। भोगुनी अभोक्ता।।८३।।रसीं रसपणें न देखे। दृष्टी विषयो पारुखे। तेणें निर्विषयचि तोखें । नित्य-तृप्त ।।८४।। असो एवं तृप्ती जाली। तंव क्षुधा अधिक खवळली। रिती वाढी नाहीं उरली। परी अनुही न धाये ।।८५।। ताट भोक्ता भोजन। अवघे जाला आपण। हातु न माखितां सर्वापोशन। केलें तेणें ।।८६।। जो यापरी तृप्त जाला। सवेंचि संसारा अंचवला। सेखीं धाला ना भुकेला। नित्यतृप्त ।।८७।। स्पर्श जो लागे। तो आंगींचेनि आंगें। पार्थीव टाकुनी मागें। विदेह भोगी।।८८।।मृदु कां कठीण। शीत कां उष्ण। परिणमुनी एके प्रमाणें। द्वंद्वातीत ।।८९।। शय्या शयन सेजारीं। आपणचि तळींवरी। ऐसे मृदु आरु-वारी। शून्य होउनी पहुडे ।।३९०।। चालावया कारणें। आचरणीं आवेश हा नेणे। पृथ्वी अवलोकणें। सपाट करी

॥९१॥ मग निराळा होउनी आगळी। सप्तपाताळांतळीं। वाट करी सोज्ज्वळी। चालावया ॥९२॥ एवं वर्ततां ऐसा होये। एरव्हीं चिन्मात्र पाहे। पाहातीहि विद्या जाये। निपटूनिया ॥९३॥ सर्व इंद्रियांसीं देहीं। सत्यत्व या स्थितीं पाही। रोकडे ठायींच्या ठाईं। प्रत्यक्ष जाली ॥९४॥ एवढा स्वप्रकाशु ठसा। पहिलें झाकवला होता कैसा। आतां देखतो हे दशा। कैंची म्हणसी ॥९५॥ जरी जन्मलिया बाळा। उघडवितसे डोळा। परी ज्ञानाची कळा। अप्रत्यक्षा ॥९६॥ ज्ञान नाहीं तोचि प्रौढ वयसे। सर्व पदार्थी ज्ञाता दिसे। तेवीं अहंतेसि नाशे। सोहंता प्रत्यक्ष ॥९७॥ सर्वेंद्रिय प्रवृत्ती। जनीं भोगु हा भोगिती। त्यासी सत्याची प्रतीति। हातवसें सिद्ध ॥९८॥ जें सत्याचें सत्य। सत्यपणें नित्य। तेंचि जाण सत्य। त्याचा भोगु॥९९॥सत्य असत्य दोन्ही। त्यजूनि बैसे समाधानीं। तेणें सत्याची राजधानी। भोगिजे जेणें भोगें ॥४००॥ हा सत्य-स्वादु साचे। त्यासी अमृतहि न रुचे। अमृता गोडपण ज्याचें। तो सर्व इंदियीं भोगीं ॥१॥ ज्यालागीं अमृत आर्त। त्यासी ह्मणिजे परमामृत। प्रकट केलें गुप्त। होतें तें अष्टकामाजीं ॥२॥ या अष्टकाच्या अर्थें। शांती विश्रांतीतें। आणुन कल्याणातें। प्राप्त करी ॥३॥ जे शांती कल्याणरूप। मोडी अविद्येची झोंप। स्वानंदसुख आमुप। प्राप्त अष्टकें येणें ॥४॥शांतीचें कल्याण। तेंचि होये आपण। येणें अष्टकें जाण अर्थितां तया ॥५॥ मायेचें भववन। वासनावळी कवळून।

अहंकार कंटकीं पूर्ण । सावजेंसी ॥६॥ जेथें आशा आघवी व्याली । दुसरी तृष्णा आसवली । क्रोध अजगराची वळली । सदापुष्टी ॥७॥ उन्मत्त कामगजें । फळें कामनेनें केळिजे । मोहोनीडीं घुसिजे । असूयापरापती ॥८॥ जेथें इच्छेचीं कोल्हीं । कुकाती तोंडें वरतीं केलीं । वनामाजीं नाहीं चाली । मानवृश्चिकाभेणें ॥९॥ असत्याची आरांटी । अधर्माची बोरांटी । मदाचा घाट बेटीं । प्रमदामदें ।४१०। तेथें कटाक्षाचे पाश । बाहुळिंगण लावी दास । वरी कुचपाषाणाचे घोस । हाणती घायें ॥११॥ विषयांचे उमाळे । दिसती वांजाफळें । त्यालागुनी गुंतले । जीवभ्रमर ॥१२॥ त्या वनाचे शेवटीं । संकल्पश्वानगोष्टी । बैसला भुंकत पाठी । लागतुसे ॥१३॥ त्या वनाचें दाहक । समूह हें अष्टक । जो येअर्थी निष्ठंक । अभ्यास करी॥१४॥या अभ्यासाचेनि बळें । गुरुवाक्य आरणी मेळे । एकाएकीं ज्ञानानळें । प्रदीप्त होइजे ॥१५॥ तो प्रकटतांचि एकसरें । मायावनाचे फेरे । जाळितु भरें । ब्रह्मांडवरी॥१६॥तेथें श्वापदें वन विषम । जाळुनी केलें भस्म । मग चैतन्य अग्नि तेजोत्तम । स्वप्रकाशें ॥१७॥ वन अवघेंचि जळे । वन्ही अधिकचि प्रज्वळे । इंधन नाहीं परिबळें । आस्मासास ॥१८॥ ऐसा मायारण्यदाहकु । ये अष्टकींचा विवेकु । कीं शांतिदीपींचा दिपकु । सकळद्रष्टा ॥१९॥ जें सकळ क्षेम कल्याण । शांतीचें अधिष्ठान । तेथोल प्रकाशितें जाण । अष्टक विवेकु ॥४२०॥ जें सकळाचें बीज । कीं सर्व तेजांचें तेज । प्रकाशाचें निज । स्वरूप उघडें ॥२१॥

तें अष्टकमिसे। हातां पावे अप्रयासें। शब्दा सांडूनी वेदु वसे। तें हें प्रमेये ॥२२॥ हें अष्टक नव्हे साचार। वेदवस्तीचें आग्रहार। शास्त्रवेवाद वोरीबार। संपविते ॥२३॥ यालागीं निगमाचें सदन। समस्तगुह्य ज्ञानवदन। अध्यात्मसमाधान। तें हें अष्टक ॥२४॥ जो वेदसरोवरींचा हंसु। द्विभुज झाला जगदीशु। अवतरला व्यासु। द्वैपायनु ॥२५॥ तो विवेकाचा उदधी। आनंदाचा मंगळनिधी। त्याचा पुत्र सद्‌बुधी। शुक योगींद्र ॥२६॥ या शुक मुखाष्टकें पवित्रा। औट चरणी विचित्रा। वोविया नव्हती मात्रा। औटावीं हे ॥२७॥ वोवी दाखवी विवेकातें। पावन करी औट हातें। एकदेशीं सरतें। व्यापकामाजीं॥२८॥त्या व्यासपुत्राचें अष्टक। पढतां होये पाठक। यासी ज्ञानाचें सम्यक। तारूं लागे ॥२९॥ मां जो मनें निष्टंकु। विचारी हा विवेकु। त्यासी प्राप्ति-दायकु। सेवा करी ॥४३०॥ म्हणउनी या अष्टकाचें। मनन अध्ययन करी साचें। तरी प्राप्ती फळ तयाचें। ठेवणें होये ॥३१॥ जो निर्वाण अत्यंत असे। तो मार्गु तयाचें घर पुसे। प्राप्ती त्यापासीं असे। आज्ञारूप ॥३२॥ जो प्रत्यहीं प्रातःकाळीं। हे आठही मणी जपमाळीं। मनाच्या करमंडळीं। प्रत्यावृत्ती करी ॥३३॥ त्यासी सायं आणि माध्यान्हीं। हे गेली हारपोनी। आघवी उखाची उजळोनी। राहे ब्रह्म बाळ सूर्य ॥३४॥ ज्या सूर्याचेनि प्रकाशें।

स्वयें नुरिजे भिन्नवसें । त्या सूर्याचेनि सौरसें । अष्टक केलें ।।३५।। जो सकळ जन व्यापकु । जनार्दनु दाता येकु । त्याचेंनि एका एकू । भव भय पाशु तुटला ।।३६।। सायोज्य लग्न घटिका । घालूनियां अष्टका । ब्राह्म मुहूर्तीं पाठका । सावधान नित्य ।।३७।। पूर्वीं भानुदास कृपा सौरसु । पितामहाचा पिता भानुदासु । त्यापासूनिया हा वंशु । जनार्दना प्रिये ।।३८।। तो जनार्दना प्रिय एका । मूळ मार्गे श्रीशुका । लागोनी केली टीका । स्वात्मबोधें ।।३९।। पढे पाहे परिसे । ते तिघे येती एकदशे । तळी वरी पंक्तीं जैसें । रस सेव्य एक ।।४४०।। हें अष्टक नव्हे सायुज्य ताट । श्रीशुकालागी चोखट । केलें तेथें अवचट । शेष भागीं जालों ।।४१।। हें अष्टक नव्हे अष्टशाखा झाड । अग्रीं शुक फळें सेवी गोड । तेणें एका एकही पाड । शुद्धदिध आठहि ।।४२।। ऐसी कृपा श्रीशुका । उपजोनि दिधलें अष्टका । नित्यजनार्दन एका । एकपणें नांदवी ।।४३।। एका जनार्दनीं । कीं जनार्दन एकपणीं । सागरीं जैसें पाणी । तरंग जालें ।।४४।। एका जनार्दनी पाही । तरी हें कांहींचि नाहीं । रत्नमाळेसी कहीं । सापपण होतें ।।४५।। एका जनार्दना शरण । शब्दाचें भेदपण । परी सायोज्याहोनी जाण । गुरुभक्ती गोड ।।४६।। एका जनार्दन नामीं । बोलतांचि गौप्य आम्ही । यालागीं

आत्मारामीं । संपूर्ण ग्रंथु ॥४४७॥ इतिश्रीशुकाष्टकं एकाकारटीकायां संपूर्णमस्तु । श्लोक ॥११॥ ओवी ॥ ४४७ ॥ एवं ॥४५८॥ श्रीकृष्णार्पणमस्तु । शुभं भवतु । श्रीराम ।

श्रीएकनाथ महाराजकृत

शुकाष्टकं समाप्तम्

--०ᵒ₀०--

# श्रीएकनाथ महाराजकृत
# आनंदानुभव

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीगुरुकृपासिंधु । स्वामी तूं अनाथाचा बंधु । आतां कृपा करूनि सांग स्वयंभू । ह्मणोनि चरणीं लागला ॥१॥ इतर शिष्य प्रश्न करिती । ब्रह्म कैसें म्हणोनि पुसती । तरी माझें पुसणें नव्हे आनंदमूर्ति । मी कां तैसें पुसों ॥२॥ माझें पुसणें ऐसें असे । मज ब्रह्माहोनि काय खोळंबलें असे । मी कोण हें जाणत नसे । तें जाणवा आधीं मज ॥३॥ तुम्हीं ब्रह्म दावाल कृपेनें । परी तें देखावें कवणें । मी देखावें तरी आपणातें नेणें । मी कोण म्हणोनि ॥४॥ मी जीव किंवा शिव । उभयामाजीं मी न जाणें ठाव । म्हणोनि मज दावा निश्चय । जें मी कोण असे ॥५॥ म्हणोनि मजला आधीं जाणवा । मज मी पडलिया ठावा । मीच देखणा जरी आघवा । मग ब्रह्म पुसणें काय असे ॥६॥ पुसणें जरी मी कोण कोणाचा । कोठोनि आलों कोठें जायाचा । निश्चय बरवा सांगावा साचा । कृपा करूनि स्वामीनाथा ॥७॥ तंव श्रीगुरु म्हणे भला भला । त्वां बरवा प्रश्न केला । ऐसा नाहीं कोणी देखिला । प्रश्न करणारा ॥८॥ ब्रह्म काय ऐसा प्रश्न करिती । नाना मतें धुंडाळिती । परी मी कोण असें न पुसती । आपुला शोध ॥९॥ एरवीं तरी जाण बोलतों बोलणें । आपशुद्धी नेणें

तो परशुद्धी काय जाणें। जे आत्मशुद्धि नेणून ब्रह्म पुसणें। तें पुसणें न घडेचि ॥१०॥ म्हणोनि तुवां बरवा पुसिला प्रश्न। जे मी कोण म्हणोन। तरी स्वयें चैतन्यघन। असतां परी जीवत्व भोगिसी ॥११॥ भावना जे भाविजे। ज्या भावनें असिजे। त्याच भावनें देह पडिजे। तरी तेचि होईल देहांतीं ॥१२॥ जरी जीवत्वेंचि जीवदेह पडे। तेंचि देहांतीं येणें घडे। ब्रह्मभावनें देह पडे। तरी ब्रह्मचि होणें ठाके ॥१३॥ यद्भावनातद्भविष्यति। ऐसे श्रुतिस्मृति बोलती। अंतकाळीं भावना उरे तेचि होती। यदर्थीं गीता प्रमाण ॥१४॥ अंतकालेच्चमामेव। इति स्मृतेः॥ अंतकाळीं एकवटूनि अंतःकरण। जो देह टाकी माझें धरोनि स्मरण। तो मद्भावें होय मीच आपण। यदर्थीं संशयो नाहीं ॥१५॥ ज्या भावनें देह टाकी। अंतीं तेंचि होणें न चूके कीं। ब्रह्म भावनें देह टाकी। तरी सुखें ब्रह्मचि होणें ॥१६॥ देहीं ज्या भावनें भाविजे। देहांतीं तेंच होइजे। जडभरत काई होईजे। मृगध्यासें मृगचि ॥१७॥ तेंवि जीव भावनें भावीत होय। जीव सांडिता जीवचि होय। जो देह सांडी ब्रह्मभावनीय। तो ब्रह्मचि होय पार्था॥१८॥ ऐसे गीतेमाजीं बोलिले श्रीहरी। यांसि संशय न धरी। जो ध्यास असेल अंतरीं। तें होणें न चुके अंतीं ॥१९॥ म्हणोनि मी सोहं ब्रह्म। हेचि मानें सनेम। अखंड भावनें मी भावी पुरुषोत्तम। क्षराक्षराचा साक्षी जो ॥२०॥ मी सोहं ब्रह्म निःशेष। हाचि अखंड जयासी ध्यास। तेणें ध्यासें देह सांडी साव-

काश । तरी परब्रह्मचि होय ॥२१॥ ना तरी मी जीव हा ध्यास । अखंड असे जयास । त्याचि ध्यासें अंतीं सोडि देहास । तरी जीवचि होई पुन्हा ॥२२॥ म्हणोनि ब्रह्मभावनें अखंड असिजे । जीवभाव तो सांडिजे । ब्रह्मभावनें देह सांडिजे । तरी तें होय ॥२३॥ ज्या भावनें देह पडे । तेचि अंतीं होणें घडे । जडभरतासी मृगध्यासें रोकडें । मृगचि होणें घडलें ॥२४॥ म्हणोनि सोहं ब्रह्म । हें जाणोनि गुरुमुखें वर्म । तेणें ध्यासें देह पडे सनेम । तरि ब्रह्म होवोनि ठाके ॥२५॥ नाना विद्या साधिली सिद्धि । अंतकाळीं स्वरूपीं न बैसे बुद्धि । तरी व्यर्थची त्याची सिद्धि । जे जें केली ॥२६॥ तस्मात्सर्वेषुकालेषु० जगज्जीवन म्हणें अर्जुनासि । सर्वकालीं ध्यावें अहर्निशीं । नाना रूपें जरी देखसी तरि मीच मानी ॥२७॥ कानीं जें जें ऐकसी । तें तें मानी निश्चयेंसि ।मनीं जें जें भाविसि । अभेदभावानें ॥२८॥ मना बुद्धि हाचि ध्यास । अखंड माझेच सावकाश । माझ्या नामध्यासें सांडि देहपाश । तरी मीच होय ॥२९॥ ऐसें श्रीकृष्ण सांगे अर्जुनासि । ज्या ध्यासें सांडिसी देहासि । तेंचि होणें निश्चयेंसि । न चुके सर्वथा ॥३०॥ म्हणोनि ब्रह्मध्यासें जे देह सांडिती । ते देहांति ब्रह्मचि होती । ऐसी निजभक्ताची गति । अंतीं ब्रह्म होति ब्रह्मध्यासें ॥३१॥ येथें आणिक एक गुह्य असें । तें सांगो नये कोणास । कोप येईल सनकादिकांस । म्हणोनि गुह्य राखिजे ॥३२॥ परी त्यांचा कोप साहिजेल । परोपकारार्थ सांगिजेल । अन्याय

झाला म्हणोनि होइजेल । शरणागत ॥३३॥ सद्गुरु जरी लाहे । तरी आतांचि ब्रह्म होय । तया देहांतीं ब्रह्म होवो काय । उरलें असे ॥३४॥ तो देह असतांचि ब्रह्म जाला । तो देहांतीं स्मरेल कवणाला । जया स्मरावें तोचि होवोनि ठेला । निश्चयेंसि ॥३५॥ देह पडलिया स्वरूपीं मिळाला । तरी संत हासती या बोला । आधीं काय वियोग झाला होता त्याला । मग मिळाला म्हणिजे अंतीं ॥३६॥ घट भंगलिया घटाकाशीं । मग मिळणें होय चिदाकाशीं । की आधींच असे अखंड दशेशीं । हेंचि विचारी पां ॥३७॥ तेंवि देह पडलिया आत्मयासीं । मग मिळणें होय त्यासीं । परमात्मा कीं आधींच असे स्वरूपेसीं । हें विचारी पां ॥३८॥ अखंड स्वरूपेसि सलग्न असे । ऐसे जया गुरुकृपें भासे । तया देहांतीं मिळणें काय असे । आधींचे असे स्वरूपीं ॥३९॥ स्वरूपीं असें म्हणणें न साहे । तो स्वरूप अखंड आहे । परि जाणावया म्हणिजेत आहे । स्वरूपीं असिजे ऐसें ॥४०॥ असिजे नसिजे हें कांहीं । स्वरूप आत्मया वियोग नाहीं । सागरीं तरंगा वियोग आहे काई । या तरंग सागरीं मिळविजे ॥४१॥ ऐसें भावी मी स्वरूपसागरीं तरंग । तरीं मज स्वरूपीं कैचा वियोग । सागर माझें सर्वांग । अथवा सागरचि मी ॥४२॥ अहं ब्रह्म ऐसी स्फूर्ति । स्फुरे जयाप्रति । अखंडित बाणे ब्रह्मस्थिती । स्वरूपत्वेंचि असे ॥४३॥ स्वरूपभावनें देह पडे । तरी काय होईल आणखी कडे । तयासी अंतकालीं स्मरावें न लगे रोकडें । स्मरावें

जया तोचि तो ।।४४।। तोचि तो अघवा असे। तयासीं अंतीं स्मरण की असे। आधींच तो मिळोनि असे ।। देह नसे ब्रह्मचि ।।४५।। देहीं ब्रह्म होणें। तें निर्गुण सायुज्यता म्हणणें। हे पांचवी मुक्ती जाणणें। वेदांतशास्त्रीं ।।४६।। क्षीरसागरीं तरंग दिसे। तो सबाह्य क्षीरच असे। भंगतां भंगतां निजांशें। सागरची असे आपण ।।४७।। तेंवि ब्रह्म तो क्षीरसागर अभंग। देह तेथींचा तरंग। तरंगा सबाह्य सागराचेचि अभंग। स्वयं ब्रह्म सागर तोचि ।।४८।। आतां तो देहतरंग। फुटतां न फुटतां ब्रह्मचि असे अभंग तो देह नाशी ब्रह्म असे चांग। तेचि निर्गुण सायुज्यता ।।४९।। त्वां पुसिलें मी कोण। कोठोनि आलों कोठें जाईन। मी जीव कीं शिव हा प्रश्न। पुसिलें होतें तुवां ।।५०।। जरी संकल्प विकल्प सांडिशी। तरी तूं ब्रह्मचि असशी। संकल्पीं आणिलें जीवदशेशीं। संकल्पलोपें तूं परब्रह्म ।।५१।। वायुसंगें सागर। झाला दिसे तरंगाकार। वायुलोपें निरंतर। जैसा तैसाचि असे ।।५२।। संकल्प निमता जीव-दशा जाय। मग स्वयें परब्रह्मचि आहे। तया मग येणें काय। उरलें असे ।।५३।। तयासी मग येणें जाणें नाहीं। घट भंगतां घटाकाश काई। येणें जाणें असे पाही। विचारी पां ।।५४।। तेंवि निर्विकल्पपुरुषा। येणें जाणें नाहीं सहसा। घट भंगतां घटाकाशा। येणें जाणें नसे ।।५५।। घटाकाशीं मठाकाशीं। काय वेगळीक असे तयाशीं। घट-मठ भंगता महदाकाशीं। वेगळीक असे ।।५६।। तेंवि देह

पडतां न पडतां । आत्मा आत्मत्वेंचि असे तत्वतां । तोचि सबाह्यता । पूर्णपणें ॥५७॥ डोहामाजीं कुंभ असे । तया सबाह्य जळचि असे । कुंभ भंगतां न भंगतां सरिसें । उदकचि असे ॥५८॥ घट भंगतां उदक मिळालें । हेंही बोलणें न साहे वहिलें । वेगळें होतें या मिळालें । म्हणिजे तया ॥५९॥ ते विदेहकुंभ भंगलिया । मग आत्मा मिळे परमात्मया । पहिली वेगळीक काय तया । या मिळाला म्हणिजेतो ॥६०॥ तें विभूतें ब्रह्मचि असतीं । अंतर्बाह्य ब्रह्मचि होतीं । परी तें आपणातें नेणतीं । भावितो जीवसंकल्पें ॥६१॥ तें बापुडे करतील काई । सद्गुरु तया भेटलाच नाहीं । जो गुरु भेटला तयाची पाही । जीवदशा गेली नाहीं सर्वथां ॥६२॥ गुरूची जीवदशा गेली नाहीं । जीवानें जीव उद्धरेल काई । जो स्वयें ब्रह्म झाला असे पाहीं । तोचि उद्धरील जीवातें ॥६३॥ अंधानें अंध धरिला करीं । तरी दोघेंही पडतील गारीं । त्यास काढावया बाहेरी । तिसरा पैं पाहिजे ॥६४॥ ते दोघेही सद्भावेशीं । शरण जाती सद्गुरूशीं । तरी उद्धरती निश्चयेशीं । नाहीं तरी जाती अधःपातां ॥६५॥ म्हणोनि सद्गुरूशीं । शरण जावें सद्भावेशीं । तो तात्काळ करी शिष्याशीं । परब्रह्म ॥६६॥ तें परब्रह्म म्हणजे कैसें । तें सांगतां नये ऐसें तैसें । सांगावें जरी हाचि हा असे । तरी सांगणें घडे केंवि ॥६७॥ हाचि तोचि ऐसें काई । परब्रह्मीं नलगे पाहीं । तेंचि तें परब्रह्म पाही । पाहण्याविणें ॥६८॥ पाहिलें तें ब्रह्म नोहे । पहातें ब्रह्म

होईल काय । हा विचार करोनि पाहे । पाहाते ब्रह्म कीं पाहिलें ब्रह्म ॥६९॥ जरी पाहिलें ब्रह्म होय । तरी पाहाते आन आहे । पाहाते ब्रह्म होय । पाहिलें तेची ॥७०॥ दृश्याचा देखणा म्हणे द्रष्टा । एऱ्हवीं दृश्याभावें देखणे नष्टा । या उभय चेष्टा । न चले तेथें ॥ ७१ ॥ दृश्याचा देखणा । तो द्रष्टा जाणा । हाही विचार नामाभिधाना । न लगे तेथें ॥७२॥ परा पश्यंती मध्यमा वैखरी । वाचा उडालिया चाऱ्ही । द्रष्टा महाद्रष्टा कोण अक्षरीं । वाचा चारी कुंठित ॥७३॥ जेथें बावन्न अक्षरेंचि नाहीं । तेथें द्रष्टामहाद्रष्टा काई । हे उच्चारा आणि विचारा पाहीं । वाचें केंवि बोलवेल ॥७४॥ परी वाचे वाच्यानी कांहीं । अनिर्वाच्य न कळे कांहीं । भाषणाविण कळे काई । विचारी पां ॥ ७५ ॥ कर्म निषेधतीं नेणोनि वर्म । कर्माविण केंवि पावेल परब्रह्म । भक्तीविण पुरुषोत्तम । केंवि पाविजे ॥ ७६ ॥ मार्गाविण नगरा केंवि जाईजे । नगरा गेलिया मार्ग राहे सहजें । पाक केल्याविण तृप्ति पाविजे । हें केंवि घडे ॥७७॥ म्हणोनि कर्मेंविण ब्रह्म पाविजे । हें तो व्यर्थचि अनुमान बोलिजे । तृप्ति जालिया सहजें । पाप करणें ठेलें ॥७८॥ हरपलें सांपडल्याविण । दीप केंवि सांडिजे आपण । खणतां जोडलें जीवन । सहज खणणें राहे ॥७९॥ तैसें कर्में ब्रह्म पाविजे । मग कर्में रहाती सहजें । हें दृष्टांतें आलें ओजे । परी तें कैसें नोहे ॥८०॥ ठेविलें सांपडल्या दीप ठेविजे । हा दृष्टांत बोलावे वाजें । परी न

घडे बोलिजे । तें तूं एकें ॥८१॥ कर्में ब्रह्म पाविजे । मग कर्में त्यागिजे । हें बोलणें श्रुतीशीं सहजें । विरोध दिसे ॥८२॥ कर्में ब्रह्म पाविजे । तें कर्म न सांडिजे । लोकसंग्रहाकारणें कीजे । आज्ञा प्रभूची ॥८३॥ भक्तिज्ञानवैराग्याविण । न पाविजें ब्रह्म पूर्ण । ऐसें वेदशास्त्र प्रमाण । सांगती प्रसिद्ध ॥८४॥ म्हणोनि देहवंत जंव असिजे । तंव कर्म सज्जनीं न सांडिजे । संतीं उदास होवोनि जरी सांडिजे । तरी जनीं केंवि वर्तावें ॥८५॥ श्रेष्ठ जैसे आचरती । इतर जन तैसेचि वर्तती । श्रेष्ठ जन न आचरतां इतरजन भांबावती । हें काय भलें ॥८६॥ म्हणोनि संतीं कर्म भक्ति कीजे । न चाले त्या भक्ती लाविजे । परोपकारास्तव दाविजे । आचरोनियां ॥८७॥ आतां असो ह्या गोष्टी । त्वां वर्तावें परिपाठीं । नाहीं तरीं निर्वाणनिष्ठीं । निष्ठा धरोनि राहिजे ॥८८॥ जो अंतर्निष्ठ राहे । अंतरीं तन्मय होय । तयाशींच राहे । परीही कर्मभक्ती न सांडिजे ॥८९॥ जो जडभरताचे वृत्तीं राहे । तया कर्में करावें काय । इंद्रियांच्या व्यापारी जो नये । तयाशींच राहे कर्मकृत्य ॥९०॥ जो अंतरबोवरीं पहुडला । मन उन्मन होऊनि ठेला । तोचि कर्माशीं आंचवला । आत्मनिष्ठ म्हणोनि ॥९१॥ परी कर्म न सांडिजे । देह पडेतों आचरीजे । नाचरे त्या भक्ती लाविजे । त्या पुण्यास पार नाहीं ॥९२॥ आपणादेखतां बुडिजे । संवें धडाडि घालोनि त्यातें काढिजे । त्या पार नाहीं पुण्या जे । आत्मघात चुकला म्हणोनि

।।९३।। आतां असो जो परोपकारी । आपण तरोनि जड-
जीवा तारी । तो एक संसारीं । पुरुषार्थी म्हणावा ।।९४।।
जड उन्मत्त पिशाच्च जालें । तेणें त्यांही आपणाशींच तारिलें ।
आपुलें पोट भरिलें । परोपकार न घडेची ।।९५।। गीताज्ञानी
भरतर्षभ । ऐसें बोलिले पद्मनाभ । ज्ञानी तो आत्मा
स्वयंभ । बोलिलें सप्तमाध्यायीं ।।९६।। आपण तरोनि
अन्यातें तारिजेत । म्हणोनि आत्मज्ञानी म्हणिजेत ।
स्वमुखें सांगे भगवंत । तोषोनियां ।।९७।। निर्वि--
कल्प समाधि निर्गुणयोगी । संप्रज्ञातसमाधि कर्मयोगी ।
जो कर्म आचरे सर्वांगीं । परि अकर्ता तो ।।९८।। निर्वि-
कल्पसमाधि कैसी । कांहीं कल्पना नाहीं जयासी । निस्तरंग-
सागराचे ऐसी । स्थिति जयांची ।।९९।। जो अंतरखोवरीं
पहुडला । सहजचि इंद्रिय व्यापार खुंटला । मग शुभाशुभ
नाहीं त्याला । निर्विकल्प म्हणोनि ।।१००।। तया देहावरीं
येणेंचि नाहीं । या देहभावनें आतळेल काई । देह पडेल हें
स्मरणचि नाहीं । नसे कांहीं आठवण ।।१।। ठाव नाहीं मन-
बुद्धीशीं । मग आठवण कैची त्याशीं । तो निर्विकल्पसमा-
धीशीं । रत जाहला ।।२।। अंतरीं काहीं कल्पावें । कीं
इंद्रियद्वारीं वर्तावें । हें केलें कर्तव्य आघवें । नाहीं निर्वि-
कल्पयोगीयांशीं ।।३।। जाली जरी वर्तणूक । तरी परापेक्षां
वर्तणें देख । नातरी एकांतनिर्विकल्प । सुख अखंड भोगिजे
।।४।। निर्विकल्प समाधिपुरुष । आतां संप्रज्ञासमाधिपरीस ।
जे आठही प्रहर पांचही पालव सावकाश । मोकळे इंद्रियांचे

।।५।। तो इंद्रियातें नेणें। तो अवघी स्फूर्ति आपुलीच जाणें। सागरें तरंग मानणें। सागरचि तो ।।६।। तरी इंद्रियांच्या लहरी। ते तळपती याचीवरीं। विषयइंद्रियें हाचि जरी। वर्ततां बाध काय ।।७।। हाचि हा आघवा जरी। तेथें मनबुद्धिंइद्रिया कैंचि उरी। नसतां उरी कोणकोणा मारी। अद्वयानंदी वायां ।।८।। काय अग्नि अग्नितें जाळी। का सूर्य सूर्यातें पोळी। काय पाणी बुडवीजे जळीं। पाणीयातें।।९।।तेंवि हाचि आघवा असतां। आपणाशीं करी बद्धता। होय आपणांयां द्वंद्वे लाविता।देखिला असे कोठें।।११०।।परी अद्वयानंदज्ञान। झालें पाहिजे दृढीकरण। तयांशीं विषयेंद्रियपूर्ण। ब्रह्मत्वेंचि भासें ।।११।। तो जें जें करी तें तें ब्रह्म। हें नेणोनियां गुरुमुखें वर्म। ते करिती म्हणोनि हें इंद्रियकर्म। तरी बाधकता होय त्याशीं ।।१२।। विद्या नेणोनियां आपण जीवें। डोंब्या सर्प धरूं धांवे। तो वाचे कीं जाय जीवें। विचारी पां ।।१३।। तेंवि अध्यात्म विद्या नसतां। ते संतस्थिति वर्तो जातां। तया न चुके बद्धता। असंप्रदायी म्हणोनि ।।१४।। जीवदशा फिटली नसतां। ते पूर्णाची स्थिति वर्तों जातां। तयाशीं होय बद्धता। आत्मनिष्ठ नव्हे म्हणोनि ।।१५।। आतां असो ही बुद्धिवाद स्थिति। तूं आत्मनिष्ठ राहे ब्रह्मस्थिति। सोऽहं ब्रह्म मी हें स्मृति। असों दे सदा ।।१६।। पूर्ण ब्रह्मज्ञान। भावी मी चैतन्यघन। हेंच निष्ठा असों दे पूर्ण। अहर्निशीं ।।१७।। मुळींचाच मी परब्रह्म। ऐसें बिंबले मुळींचें वर्म। तो म्हणे मी झालों ब्रह्म।

मुळींचा असे म्हणोनि ॥१८॥ असे म्हणो तरी नसेपण येथें। असेनसेपण आइतें। असे तेंचि निरुतें। अससी बापा ॥१९॥ तूं क्षराक्षराचाही साक्ष। जीवशिवाचाही साक्ष। तूं बद्ध ना मोक्ष॥ आतां स्वतःसिद्धचि असशी ॥१२०॥ तूं आत्म्याचाही आत्मा। तूं उभयतांचा चिदात्मा। तूं परमात्म्याचा आत्मा। यालागीं बोलिलों ॥२१॥ एऱ्हवीं आत्मापरमात्मा बोलिजे। तरी दुसरा नसतां कोण म्हणिजे। जेथें दुसरा न साजे॥ तेथें आत्मापरमात्मा म्हणे कोण ॥२२॥ म्हणोनि म्हणती अनाम अनिर्वाच्य। तेथें ॐकार-सहित शब्दाची कचकच। राहिली विवेकाची वचवच। स्वतःसिद्ध कळलीया ॥२३॥ दोर दोरपणें असे। दोर कांहीं सर्प झाला नसे। दोर सर्पत्वें भ्रांताशी भासे। अपभ्रांति करोनि ॥२४॥ तेंचि ब्रह्म ब्रह्मत्वेंचि असे। ब्रह्म कांहीं प्रपंच जालें नसे। ब्रह्म प्रपंचत्वें अज्ञानाशी भासे। अपभ्रम जाणिजे ॥२५॥ भूमींतूनि मडकीं निघती काय। ते कुल्लाळ-मति होत आहे। तैसें ब्रह्म कांहीं करीत नाहीं पाहे। कर्ता संकल्प तेथें ॥२५॥ वायूचेनि संयोगें। सागर भरे तरंगें। ते सागर करी किंवा वायुसंगें। होय विचारी पां ॥२७॥ तेंवि ब्रह्म उगेंचि असे। संकल्पें प्रपंचाकार होतसे। संकल्प निमतां कांहींच नसे। ब्रह्मवेगळें ॥२८॥ तूं म्हणशीं ब्रह्मीं संकल्प नसे। तरी कोणापासोन होतसे। जो भावी तया होतसे। एऱ्हवीं नाहीं ॥२९॥ सोनें परोगेटा तानवडें। भावी तया लेण्याची आवड। भंगता न भंगता सोनेंचि

अखंड । भूषणाकार असे ॥१३०॥ सोन्याभूषणाचा दृष्टांत पाहें । सोनें आंगेंचि विस्तारले होय । परी हे न विस्तारोनि विस्तारलें आहे । अज्ञानवसे अज्ञानाशीं ॥३१॥ आपुलीच कल्पना । विविध रची स्वप्नें नाना । ते करितां दिसे रचना । प्रबोधीं कांहींच नाहीं ॥३२॥ तेंवि संकल्पें रचिलें दिसे । निर्विकल्पीं कांहीं न दिसे । रचे खचे संकल्पवसे । कल्पना नाशी दोन्ही नावी ॥३३॥ आतां नसले तरी नसो । याचा काय अंतीं नसो । तुझें मन स्वरूपीं बैसो । अखंड असो तेंचि होऊनि ॥३४॥ तेंचि अखंड होऊनि राहे म्हणिजे । तें आधींच असे सहजें । परी नेणतेपणा वाहशी ओझें । मी आपणातें नेणें म्हणशी ॥३५॥ त्या नेणिवेतें तूं जाणशी । जाणतें तें तूंचि होशी । आतां नेणीव वाहाशी । व्यर्थचि तूं ॥३६॥ नेणिवेशीं कोण जाणे । त्या नेणिवेशीं आत्माची जाणे । तो तूं आत्मा जाणपणें । जाणिवेशीं जाणसी ॥३७॥ जाणीव नेणीव दोहींशीं । तूंचि जाणपणें जाणशीं । जाणपणाचे जाणणें होसी । दोन्हीवीण ॥३८॥ होणें न होणें कांहीं । तूज बापा उरलें नाहीं । तूं स्वत:सिद्धचि पाहीं । आइताची असशी ॥३९॥ ब्रह्म माया कांहीं । तुजवांचोन आन नाहीं । दोन्हीं देव ते तुजवीण कांहीं । आन नसती ॥१४०॥ सर्व-सृष्टि चराचर । हा सर्व तुझाचि विस्तार । हाही भ्रम भासे साचार । होसी स्वयें तूंचि तूं ॥४१॥ डोंब गव्हाळा म्हणती । अपभ्रमें आपणचि नाम ठेविती । दीपें रज्जु पाहतां आपणचि म्हणती । सर्पभास लटिकाची ॥४२॥

पहा हो रज्जू रज्जूपणें असतां । मी भ्रमें सर्प भाविला होता । तो तरी रज्जूपणें आइता । असतां भ्रांति केवढी ।।४३।। तेंवि ब्रह्म ब्रह्मत्वेंचि असे। तेथें अपभ्रमें प्रपंचाकार भासे । तें गुरुकृपें पाहतां कांहीं न भासे । ब्रह्मचि असे स्वतःसिद्ध ।।४४।। पहा हो ब्रह्मपणें असतां । तेथें म्यां जीव भाविला होता। तो गुरुकृपें भ्रम गेला आतां । स्वतः-सिद्ध मीची ।।४५।। ऐसें स्वतःसिद्ध जाणें आपणासीं। प्रपंच तो ब्रह्म भासे तयासीं । सोन्याचें श्वान केलें तयासीं । कुतरें म्हणिजेत काई ।।४६।। तेंवि ब्रह्म प्रपंचाकारें दिसे । परी तें प्रपंच झालें नसे। तंतु पटाकार भासे परी पट नोहे तूंचि ।।४७।। तंतू म्हणसी पट प्रत्यक्ष दिसे तो कैसा नाहीं। परी पट काढोनि घेई तो तंतू देई। तंतू काढितां उरे काई। पटाशीं उरी विचारी पां ।।४८।। प्रत्यक्ष तरंग दिसे । परी तरंगरूपें पाणीचि असे। आणि तरंग घेतां गवसे। पाणीच अवघें ।।४९।। तेंवि देहाकार ब्रह्म दिसे । परी देह ब्रह्म जालें नसें । साखरेचें वृंदावन केलें दिसे । परी तें काय कडु झालें ।।१५०।। तेंवि ब्रह्म प्रपंचाकार दिसे । परी प्रपंच झालें नसे । प्रपंच म्हणणें सांडितां असे । ब्रह्मचि आइतें ।।५१।। आतां किती वटवट वाचेची। आइता स्वतः-सिद्ध तूंचि । गुढी उभारी आनंदाची । मी मी अघवा म्हणोनि।।५२।।ऐशीच भावी स्थिति अखंडिता। मीच मी स्वतः-सिद्ध आइता । नाना मतें नाना रूपें तत्वतां । मी माझीं आघवीं ।।५३।। मीच मी परब्रह्म । एसा असोदे नेम ।

मुळींचेंचि निःसीम । परी वर्म सांगतों तुज ॥५४॥ आतां जीवभावना सांडावी । मी ब्रह्म हेचि भावना भावी । मी-तूंपणा जाणणें जें जाणवी । तें मीच असे भावी तूं ॥५५॥ ऐशी ब्रह्मभावना दृढावली । बुद्धि ब्रह्मचि होऊनि ठेली । मग मी ब्रह्म ही भावना राहिली । स्वतःसिद्ध असे म्हणोनि ॥५६॥ मुळींचा राजा जो असे । तया राजा म्हणणें कायसें । म्हणतां कृत्रिम दिसतसे । म्हणोन ब्रह्म म्हणणें ठेलें ॥५७॥ गेठा म्हणे काय मी सोनें । म्हणतां येत असे उणें । आपण सोनें असतां म्हणणें । तें भुलीच कीं जाणिजे ॥५८॥ अहं ब्रह्म म्हणणें । ते म्हणती ज्ञान जाणणें । तें ज्ञानचि परी अज्ञान म्हणणें । दिसतसे ॥२१॥ ज्ञान तेंचि अज्ञान । अद्वयानंदीं काय तें जाणपण । द्वैत नसतां कोणा कोण । जाणें येथें ॥१६०॥ जाणावें तें बोलिजे ज्ञान । आपणा नेणें तें अज्ञान । नेणणें म्हणिजे तरी हाचि हा आपण । तेथें जाणणें नेणणें कायसें ॥६१॥ ज्ञानें उजळे ऐसा नाहीं । अज्ञानें मळे हें न घडे कांहीं । तो स्वतःसिद्धचि पाहीं । आइताची असे ॥६२॥ दीपें काय सूर्य उजळे । अंधारीं काय मळे । तो मळे ना उजळे । स्वतःसिद्धचि असे ॥६३॥ सूर्य कधीं अंधारीं वेष्टिला होता । या दीपें होय अंधार निवारिता । तो स्वयंप्रकाशरूप असतां । दीप काय करी तेथें ॥६४॥ सूर्य अंधाराशी नेटीं । कांहीं तरीं होय कल्पकोटी । सूर्यें अंधार देखिला नाही दृष्टीं । तो वेष्टिला काइं ॥६५॥ तेंवि आत्मा वेष्टिला अज्ञानें ।

म्यां सोडविला ज्ञानें । आत्मा अज्ञाना भेटी होतां उणें । घडे तया काय ॥६६॥ भेटी होतां तृणाग्निशीं । उरी नसे तृणाशीं । तेंवि आत्मया मिळणें अज्ञानाशीं । उरी नुरे तया ॥६७॥ मुळीं अज्ञानची नाहीं । तो आत्मा वेष्टिला काई । त्याची कल्पना तेंचि पाही । अज्ञानरूप ॥६८॥ ते कल्पना जें मुरे । मग जें उर्वरित उरे । तें तूं होवोनि राहें बारे । अखंडित ॥६९॥ अखंडित परब्रह्म । तूं हा न विसरें नेम । तें विसरे तरी चुकेल वर्म । पुन्हा जीवदशा नव-जाय ॥७०॥ ज्याची जीवदशा नवजाय । तो ब्रह्म केंवि लाहे । मी सोहं ब्रह्म अद्वय । हाचि नेम असोदे ॥७१॥ जें सच्चिदानंदघन । तें मीच असें आपण । येणें भावनें दृढी-करण । तोचि पूर्ण परब्रह्म ॥७२॥ येणेंपरी शिष्यराया । लटिकी मानोनि माया । मी साच परब्रह्म यया । ध्यास विसरूं नको ॥७३॥ एऱ्हवीं लटिकें तें लटिकें । लटिकें तें साच होय कें । अथवा साच तरी लटिकें । होऊं सके कां होई ॥७४॥ लटिके साचांत शिरेना । साच लटिकियांत भरेना । दोहींची संगति घडेना । लटिकियाचा भ्रम काय ॥७५॥ साच आत्मा तो साच असे । लटिकियांत कोठेंच असे नसे । लटिकियाचें भय कायसें । वाहशी व्यर्थ ॥७६॥ साच लटिकियास जाणते । लटिकें तरी साच ओळखितें । या गोष्टी भेटी होती दोहींते । सुखादुःखाच्या ॥७७॥ हें साच हें लटिकें । या दोहींशीं जाणें ते निके । ते साच कें लटिकें । कीं दोहीहोनि

वेगळें ॥७८॥ साच म्हणणें तें साचावेगळें । लटिकें जाणे लटिकिया निराळें । उभयांसीं जाणते केवळ । ज्ञप्तिमात्र तूं ॥७९॥ हें ज्ञान हें अज्ञान । दोहीतें जाणें तें निजज्ञान । तेंचि मी स्वयें आपण । हाचि ध्यास असोदे ॥१८०॥ हा निश्चय बिंबल्या पूर्ण । मग कोणाचें कोण करी ध्यान । ध्येय ध्याता हे ओळखण । त्रिपुटीशीं जेथें ॥८१॥ ऐशा त्रिपुटीच्या कोटयानुकोटी । त्या सर्वांचा साक्षी तूं जगजेठी । साक्षीचा साक्षी तूं अंतर्दृष्टि । तूंचि जाणता ॥८२॥ जाणता म्हणो तरी जाणपण नाहीं । नेणता म्हणो तरी नेणपण नाहीं । नेणण्याजाणण्यातें जाणता पाहीं । तोचि तूं असशी ॥८३॥ असणें आणि नसणें । उभय नसोनि तुझेंचि असणें । त्याही ज्ञानाज्ञानातें जाणणें । तेंचि तूं बापा ॥८४॥ आतां तें हें म्हणणें कासयासीं । जें असे नसे तें तूंचि असशीं । आतां कुंथाकुंथी कायसी । बद्धमोक्षाची ॥८५॥ जो निरंजनीं निजेला । तो कोणें सांग निजविला । पुन्हा जागा कोणें केला । सांग बापा ॥८६॥ तैसा चेता चेतविता हाचि । बोधा बोधविता हाचि । येथें दुसरा नाहींचि । तूंच तूं आइताचि ॥८७॥ आतां तूंचि होतासि । तरी भेद कर्तृत्वासि । जें जें करिसी तें तूंच असशी । अद्वयानंदपणें ॥८८॥ आतां तुज जाणें । नाहीं कोण्या पदासीं भेटणें । नाहीं कोण्या देवासीं । देवाधिदेव तूंच असशी । सर्वव्यापक तूंच तूं ॥८९॥ व्याप्य व्यापकपण केंवि साहे । आपणचि तो अवघा आहे । या दोहींसी नाहीं ठाय ।

व्यापकपण कैचें ॥१९०॥ अकर्ता अभोक्ता म्हणिजे । तरी हें बोलणें न साहिजे । कांहीं केलेंच नाहीं या भोगिजे । काय तेणें ॥९१॥ भोक्ता भोग्य भोगणें । हे त्रिपुटी जेथें क्षीण । सर्वभोक्ता तयावीण कोण । तरी भोक्ता ना अभोक्ता ॥९२॥ जयाचा संकल्प गेला होय । तो भोगीत असतां भोक्ता नोहे । पाहतां अवघां तूंचि आहे । तरी कोण कोणा भोगी ॥९३॥ काय आकाशीं आकाश लोळे । काय पाणी पाण्यावर खेळे । हें बोलणें कासया मिळे । तेंचि तूं असतां ॥९४॥ असो हें तें ऐसें । वटवट करणें कायसें । आतां दृढ धरी मानसें । मीच अवघा म्हणोनि ॥९५॥ आतां मीच मी अवघा हेचि दंडी । कांहीं नकरी सांडीमांडी । तूंच तूं अवघा जडाजडीं । अवघेवीणपणें ॥९६॥ अवघा तूंचि तूं एक । हेंही म्हणवितां नाहीं आणिक । आतां तूं एकावीण एक । एकलाचि ॥९७॥ एकला तूं म्हणणारा । हा कोण म्हणसी दुसरा । तरी तोचि तूं खरा । नाहीं दुसरा आन कोणी ॥९८॥ आतां नसेल तरी नसो का । व्यर्थ वचवचा वाढऊं नका । आतां तुझें सुख तूंच घेका । ऐक्यबोधाचें ॥९९॥ तें सुख गा अभंग । सुख तें सागरीचे तरंग । मीचि मी अभंग । अखंड होवोनि राहे ॥२००॥ होय म्हणो जरी तूंचि असती । ये-हवी विसर पडला होता तुजसीं । चुकला सांपडला आपणासी । आतां विसंबू नको सर्वथा ॥१॥ तंव शिष्य म्हणे गुरुराया । तुमचा बोध केंवि जाय वाया । उगवला असतां सूर्योदया । सामर्थ्य काय तमासीं ॥२॥ तुमचा

बोधसूर्य गहन । विसरत तमा करी छेद । स्वतःसिद्ध बोधां पालटरी कोण । करूं शकें स्वामिया ॥३॥ तुम्हा ऐसा दाता । पाहतां त्रिभुवनीं नसे सर्वथा । तुम्हासीं उपमा देतां । नातुळे कांहीं ॥४॥ कामधेनूची उपमा द्यावी । ती कल्पीत अर्थ पुरवी । कल्पनातीत भेटवी । सद्गुरुरावो ॥५॥ चिंतामणीची उपमा द्यावी । तरी तो चिंतिल अर्थ पुरवी । सद्गुरुरावी भेटवी । अचित्यदानीं ॥६॥ परिस लोहाचें परी सुवर्ण करी । आपणा ऐसें न करी । सद्गुरु आपणां ऐसें करी । परब्रह्म शिष्यासीं ॥७॥ याचिलागीं तुमचे दातेपणा । उपमा दीजेल कवणा । चिदानंदचिद्घना । देतां दाना तूंचि एकू ॥८॥ चिदानंददान देवोनि पूर्ण । केलें अखंड चिद्घन । ऐसिया उपकारा उत्तीर्ण । केंवी होइजे स्वामियां ॥९॥ तुमचें देणें सदोदित । संसारिक देणें सर्व नाशिवंत । म्हणोनि उत्तीर्ण-पणाची मात । काय करूं येईना ॥२१०॥ तंव श्रीगुरु बोलती शिष्यासि । आम्ही निरूपिलें तैसा वर्तसि । तरी सर्वस्व पावलें आम्हांसि । निश्चयेंसीं जाणपां ॥११॥ आम्ही ब्रह्मज्ञानी पूर्ण । जग हें सर्व अज्ञान । ऐसा धरिसी अभिमान । तरी ब्रह्मत्व जाय ॥१२॥ जो स्वयें ब्रह्म होय । तो सर्व जग ब्रह्मत्वेंचि पाहे । भेदाचे अंधारें जाय । अभेदसूर्य प्रकाशतां ॥१३॥ पूर्वे प्रकाशतां गभस्ती । तये क्षणीं सर्वदिशा उजळती । कीं अंधारें वेष्टून राहती । कीं प्रकाशती जाणपां ॥१४॥ तेंवि आपण ब्रह्म होय । तो जग सर्वही ब्रह्म पाहे । तयाचा भेदचि जाय । होवोनि ठायां

जगचि ब्रह्म ॥१५॥ तूं जगासी ब्रह्म होई। जग ब्रह्म तेंचि पाही। जग सर्व मानीं माझे ठाईं। हेंचि उतराई होणें सदा ॥१६॥ तूं अहंममता अभिमान सांडिशी। वित्पत्ती चातुर्य गाळिसी। जगा धाकुट म्हणविसी। हेंचि उतराई होणें आम्हा ॥१७॥ सर्व जीवांस दया करिसी। दुःख हरोनि सुख देसी। संतावे कूरवंडी करिसी। हेंचि उतराई होणें आम्हा ॥१८॥ म्हणसी उत्तीर्ण काय होईजे। तरी हेंचि उतराइ होइजे। जें सर्वभूतीं असिजे। निर्वैर होनि ॥१९॥ अवघा तूंचि अससी। तरी वैर करणें कोणासीं। म्हणोनि आर्जव सर्वांसि। असो देई शिष्यराया ॥२२०॥ जीव म्हणीतला म्हणऊनि। ही भावना भाविसी हो झणी। ब्रह्मभावनाचि भावीं मनीं। भेद सांडोनि बापा ॥२१॥ जो हा भेदाकार प्रपंच दिसे। तें ब्रह्मचि विस्तारिले असे। तेथें ब्रह्मावांचोनि आन नसें। हें भावना असो देई ॥२२॥ ब्रह्म प्रपंचाकार विस्तारलें। तें लोपलें कीं शोभेसी आलें। रत्नकिळेनें लोपलें। कीं शोभलें तेणेंचि ॥२३॥ सुवर्णखोटीचा गोळा। बांधला वधूचिया गळां। तरी ते शोभेची कळा। दिसों येईल काय ॥२४॥ त्या खोटींचीं भूषणें करोनियां। अंगीं प्रत्यंगीं लेवविलिया। तें सुवर्ण जाय वांया। कीं शोभें आलें ॥२५॥ तेंवि ब्रह्म प्रपंचाकार दिसे। परी ते कांहीं लोपलें नसें। तेणें तेंचि शोभलें असे। असें कळे जयासीं ॥२६॥ सागर तरंगें भरला। सागरपणा काय झांकला। कीं

विशेषशोभे आला । विचारीं पा ॥२७॥ ब्रह्मसागरींचा तरंग । तें हें जाणीजे जग । जगपणा सांडितां सर्वांग । ब्रह्मचि असे ॥२८॥ ब्रह्मसागरींचा तरंग । तूं आपणीयां भावीं जग । ब्रह्मसागरचि सर्वांग । होवोनि असे ॥२९॥ होवोनि ठाईं म्हणतां । तरी पूर्वीं काय नव्हता । जितुका भ्रम आला होता । तो गुरुकृपें प्रकाशला ॥२३०॥ जो सूर्य अभ्रें आच्छादिला । अभ्र जातां सूर्य काय नवा झाला । तेंवि तूं भावी आपणाला । मी स्वतःसिद्धचि असें ॥३१॥ आतां असें नसें हें किति । वटवट करितां संत क्षोभती हंसती । तूं अखंड राहे ब्रह्मस्थिति । सम दृष्टी सदां ॥३२॥ हें वाक्‌पुष्पपूजा । घडो श्रीगुरुराजा । एकनाथ म्हणें बुझाबुझा । हा ग्रंथ जे अनुभवोनि पाहती ॥३३॥ ते या देहींच ब्रह्म होती । जे जाणती बृहदारण्य-श्रृती । ते ओळखती । या ग्रंथातें ॥३४॥ मी तरी संताचा दासानुदास । तेणे वाक्यें रचूं पद्मदास । तुह्मी ओळखिले हा विश्वास । दृढ माझा ॥३५॥ जंव कृपा तुमची न जोडे । तंव स्वानुभव ज्ञान केंवि घडे । तुमचे कृपें ज्ञानानुभव जोडे । म्हणे एकनाथ ॥३६॥ हा ग्रंथ अध्यात्मपूर्ण । गुप्ता-चेंही गुह्यज्ञान । जो नित्य करी पठण । तो चैतन्यघन होऊनि राहे ॥३७॥ येथीचा गुह्यार्थ पहातां । ब्रह्मत्वें पूर्ण होय श्रोतावक्ता । मुक्ती सायुज्यता । पायां लागे ॥३८॥ जो वेदशास्त्राचा गुह्यार्थ । साचाहीं देखण्या हा परमार्थ । निजज्ञानासीं सामर्थ्य । होय या ग्रंथें ॥३९॥ येथें विवेक

उजळे। अनुभव विवळे। आपण आत्मा हें कळे। गुरुकृपेनें ॥२४०॥ हा ग्रंथानुभव पाहे। तो स्वयेंचि ब्रह्म होये। नित्यपठण करितां लाहे। आपुला निजठेवा ॥२४१॥ इतिश्री आनंदानुभवएकनाथविरचितसंपूर्णमस्तु। शुभंभवतु।

॥ समाप्त ॥

—०ः०—

# श्रीएकनाथमहाराजकृत अनुभवामृत

श्रीज्ञानदेवांच्या अनुभवामृतामधील पहिल्या पांच संस्कृत श्लोकांवरील श्रीएकनाथ महाराजकृत ओवीबद्ध टीका.

(१) ॐनमः श्रीनिवृत्ती । सदैव प्रकट तव कीर्ती । प्रेमळा आधार तूं चित्तीं । आश्रयिती अनन्य ॥१॥ केवलानंद स्वयंज्योती । शब्द नव्हे त्याची व्यक्ती । नाशरहित सर्व भूतीं । श्रुती वदती ॥ २ ॥ अक्षरा न शिवोनी असे । अक्षरत्व त्याचेनि भासे । अक्षरे जाहले सर्व पिसे । अक्षर नुमसे कवणाही ॥३॥ जातिधर्म क्रियायोग । सगुण निर्गुण विभाग । बद्धमुक्त प्रसंग । अक्षरमय सर्वही ॥४॥ तूं सच्चिदानंदपर । सदैव सर्व साचार । तूं सर्ववृत्तीस आधार । निवृत्ती डगर यासाठी ॥५॥

(२) वृत्त्यानुभवे निवृत्ती । वृत्तीस कवण उपपत्ती । विषय ज्ञाने वृत्ति । येर निवृत्ती सर्वही ॥६॥ नानारूपात्म विषय । तत्ज्ञाने अहं प्रत्यय । तेणे होये सर्व कार्य । कर्ता होय क्षणिक ॥७॥ संसारा होय जीवन । म्हणोनि निवृत्ती म्हणावें पूर्ण । वृत्तीप्रसर लघु जाणोन । गुरुत्वे होय निवृत्ती ॥८॥ स्वप्न सर्व मिथ्या भासे । ते विपाये खरे होतसे । तैसे गुरुनामे येतसे । विश्वगुरुत्व प्रत्या॥९॥ य म्हणोनि प्रसिद्ध कीर्ती । श्रीगुरुनामाची

अघटित शक्ती । कल्याणप्रद सर्वांप्रती । म्हणोनि म्हणती शांकरी ॥१०॥ हेचि जाणावी विद्या । येर सर्व अविद्या । दावावया स्वसंवेद्या । सर्वस्याद्या विलसत ॥११॥ जैसी कनकावरी कांती । गूळ गोडी निश्चिती । दीप आणि दीप्ती । ऐक्यपणें ॥१२॥ ते आदिजननी माया । दयारूप जीची चर्या । अक्षराभावे प्राणिया । सदा निवती सर्वपणें ॥१३॥

(३) दूधपाणी एकवटले । मोती किळेनी मढिले । माणिक प्रभे गुंजले । मोघारी निर्मिले नवनीत ॥१४॥ दोन नामे एकरूप । कोण नामाचा किती व्याप । हे निवडिता तर्कदीप । मावळोनि जातसे ॥१५॥ सर्वारूपी याची वसती । सर्व याचेनि शोभती । सर्व नाशे नाश पावती । अद्‍भुत शक्ती अनुपम्य ॥१६॥ पिंड ब्रह्मांड याचे रूप । दृश्यादृश्य हेचि अमूप । यासिं जाणतां ज्ञानप्रताप । हरे सर्व सर्वांपरी ॥१७॥

(४) सर्वाविशिष्ट सर्वोत्तम । जेथ नसे द्वैतभ्रम । तो अद्वैत मंगळधाम । प्रत्यया ये ज्याचेनी ॥१८॥आत्म विस्मृती जया मूळ ।संसृती सत्यत्व जया फळ । सहजें जाहल्या सत्संग प्रबळ । लोपती केवळ शब्दत्वे ॥१९॥ तो जयाची मातापितरें । वंदिली स्फुरणावीण अगोचरे । तेथेच स्वानंदाचे वारे । आंगी वाजे प्रेमळा ॥२०॥ ज्यासि पाहिजे स्वानंद सुख । त्यांही सांडूनि शब्द विवेक । शब्दाऽधिष्ठान सत्वतवक । अनुभवावे मुहुर्मुहुः ॥ २१ ॥ या युक्तीने जे

निपुण । तया द्यावया पूर्णपण । बोलिला ज्ञानविग्रही आपण । ज्ञानराज जगदात्मा ।।२२।। अमृत म्हणजे मोक्ष । तयाचा अनुभव प्रत्यक्ष । साक्षात्कार अपरोक्ष । अर्थ जाणिल्या पाविजे ।।२३।। श्री ज्ञानेश्वरी स्वात्माल्हाद । दाविला श्रीगुरुसी विशद । त्याही आस्वादोनि मंद । कोपलहरी दाविली ।।२४।। त्याचे ज्ञातृत्वरूप स्फुरण । तया प्रणवी मिळविले नमन । येथे मना देऊनि समाधान । मुक्ते मुक्ती भोगिजे ।।२५।।

५) नगा आदिमध्यान्त कनक । पटा मूलमध्याग्र तंतू एक । हे दृष्टांत जाणावया नावेक । ग्रंथारंभी वदलासे ।।२६।। आदिमध्यांतरहित गुरु । तेथ मना नव्हे अधिकारु । म्हणोनि आदिमध्यांत निवृत्येश्वरू । अद्वयत्वें वंदिला ।।२७।। आदिमध्यांत म्हणिजे त्रिगुण । तोचि अउमकार जाण । तिनीचे रूपे प्रणव पूर्ण । तया नमनपणे नमी ।।२८।। ऐसे प्रतिस्फुरणी नमन । तया म्हणिजे संप्रज्ञान । याहूनि जे उरे पूर्ण । ते निर्विकार तेणेची ।।२९।। ऐसी निरालंबी स्फुरण । शिवशक्ती तेचि खुण । वदवी श्रीगुरु आपण । निवृत्तीनाथ दातार ।।३०।।

—०ஃ०—

# श्रीएकनाथमहाराजकृत चिरंजीवपद

चिरंजीवपद पावावयासी । आन उपाय नाहीं साधकांसी । किंचित् बोलों निश्चयासी । कळावयासी साधकां ॥१॥ येथें मुख्य पाहिजे अनुताप । त्या अनुतापाचें कैसें रूप । नित्य मृत्यु लागला समीप । न मानी अल्प देहसुख ॥२॥ म्हणे नरदेह किमर्थ निर्मिला । तो मीं विषयस्वार्थी लाविला । थिता परमार्थ हातींचा गेला । करी वहिला विचार हा ॥३॥ ऐसा अनुताप लाहतां । तंव वैराग्य ये तयाच्या हातां । त्या वैराग्याची कथा । ऐक आतां सांगेन ॥४॥ तें वैराग्य बहुतांपरी । आहे गा हें अवधारी । सात्त्विक राजस तामस त्रिप्रकारीं । योगीश्वरीं बोलिजे ॥५॥ नाहीं वेदविधिविचार । नेणें सत्कर्म साचार । कर्मधर्मीं भ्रष्टाकार । तो अपवित्र तामस ॥६॥ त्याग केला पूज्यतेकारणें । सत्संग सोडूनि पूजा घेणें । शिष्यममता धरूनि राहणें । ते जाणणें राजस ॥७॥ वैराग्य राजस तामस । तें न मानेंच संतांस । तेणें न भेटे कृष्णपरेश । अनर्थास मूळ तें ॥८॥ आतां वैराग्य शुद्धसात्त्विक । जें मी जगद्वंद्य मानी यदुनायक । तें तूं सविस्तर ऐक । मनीं निष्टंक बैसावया ॥९॥ भोगेच्छाविषयक । तें तों सांडी सकळिक । प्रारब्धें प्राप्त होतां देख । तेथोनि निष्टंक अंग काढी ॥१०॥ कां जे विषय पांग

आहेती। ते अवश्य साधकां नाडिती। म्हणोनि लागो नेदी प्रीति। कवणे रीति ऐक पां ॥११॥ जेणें धरिला शुद्ध परमार्थ। त्यासि जनमान हा करी अनर्थ। तेणें वाढे विषयस्वार्थ। ऐक नेमस्त विचार हा ॥१२॥ वैराग्य पुरुष देखोनी। त्याची स्तुती करिती जनीं। एक सन्माने करूनीं। पूजेलागोनी पैं नेती ॥१३॥ त्याचें वैराग्य कोमल कंटक। नेट न धरीच निष्टंक। देखोनि मानस्तुति अलोकिक। भुलला देख पैं तेथें ॥१४॥ जनस्तुति लागे मधुर। म्हणती उद्धरावया हा हरीचा अवतार। आम्हांलागीं जाहला स्थिर। तेणें धरी फार शब्दगोडी ॥१५॥ हा पांच विषयांमाजीं प्रथम। शब्दविषय संभ्रम। स्पर्शविषय सुगम। उपक्रम तो ऐसा ॥१६॥ नाना मृदु आसनें घालितीं। विचित्र पर्यंक निद्रे प्रति। नरनारी शुश्रूषा करिती। तेणें धरी प्रीति स्पर्शगोडी ॥१७॥ रूपविषय कैसा गोंवी। वस्त्रें भूषणें देती बरवीं। तेणें सौंदर्य करी जीवीं। देहभावीं श्लाघ्यता ॥१८॥ रूपविषय ऐसा जडला। रसविषय कैसा झोंबला। जें जें आवडे तें तें याला। गोड गोड अर्पिती ॥१९॥ ते रस गोडीकरितां। घडी न विसंबे धरी ममता। मग गंध विषय ओढितां। होय तत्त्वतां त्या कैसा ॥२०॥ आवडे सुमनचंदन। बुका केशरविलेपन। ऐसे पांचहि विषय जाण। जडले संपूर्ण सन्मानें ॥२१॥ मग जे जे जन वंदिती। तेचि त्याची निंदा करिती। परि अनुताप नुपजे चित्तीं। ममता निश्चिती पूजकांची ॥२२॥ म्हणाल विवेकी जो आहे।

त्यासी जनमान करील काये। हें बोलणें मूर्खाचें आहे। जया चाड आहे मानाची ॥२३॥ ज्ञात्यासि प्रारब्धगति। मान झाला तरी नेघो म्हणती। परि तेथेंची गुंतोनि न राहाती। उदास होती तात्काल ॥२४॥ या परी साधकाच्या चित्ता। मान गोडी न संडे सर्वथा। जरी कृपा उपजेल भगवंता। तरी होय मागुता विरक्त ॥२५॥ तो विरक्त कैसा म्हणाल। जो मानलें सांडी स्थळ। सत्संगी राहे निश्चिळ। न करी तळमळ मानाची ॥२६॥ मांडीना स्वतंत्र फड। आंगा येईल अहंता वाड। न धरी जीविकेची चाड। न बोले गोड मन-धरणी ॥२७॥ नावडे प्रपंचीं बैसणें। नावडे कोणांशीं बोलणें। नावडे योग्यता मिरवणें। बरवें खाणें नावडे ॥२८॥ नावडे लौकिक परवडी। नावडती लुगडी लेणी। नावडे परान्नगोडी। द्रव्यजोडी नावडे ॥२९॥ नावडे स्त्रियांत बैसणें। नावडे स्त्रियांचें रगडणें। नावडे स्त्रियांतें पाहणें। त्यांचें बोलणें नावडे ॥३०॥ नको नको स्त्रियांचा सांगात। नको नको स्त्रियांचा एकांत। नको नको स्त्रियांचा पर-मार्थ। करिती आघात पुरुषासी ॥३१॥ म्हणाल गृहस्थ साधकें। स्त्रिया सोडून जावें कें। येच अर्थी उत्तर निकें। ऐक आतां सांगेन ॥३२॥ तरी स्वस्त्रीवांचोनि। नातळावी अन्यकामिनी। कोणे स्त्रियां सन्निध वाणी। आश्रयो झणीं न द्यावा ॥३३॥ स्वस्त्रीसहि कार्यापुरतें। पाचारावें स्पर्शावें निरुतें। परि आसक्त होऊनिया तेथें। सर्वथा चित्तें नसावें ॥३४॥ नरनारी शुश्रूषा करिती। भक्ति ममता उपज-

विती। परी शुद्ध जो परमार्थी । तो स्त्रियांचे संगती न बैसे ॥३५॥ अखंड एकांतीं बैसणें। प्रमदासंगे न राहणें। जो निःसंग निरभिमानें। त्याचे बैसणें सर्वदा ॥३६॥ कुटुंब आहाराकारणें। अकल्पित न मिळे तरी कोरान्न करणें। ऐसें स्थिति जें वर्तणें। तें जाणणें शुद्ध वैराग्य ॥३७॥ ऐसी स्थिति नाहीं ज्यासी। तंव कृष्णप्राप्ति कैची त्यासी। यालागीं कृष्णभक्तिसी। ऐशी स्थिती असावी ॥३८॥ या स्थितिवेगळा जाण। कृष्णीं मिळे तो अज्ञान। तो सकळ मूर्खाचे अधिष्ठान। लटकें तरी आण देवाची ॥३९॥ हें बोल माझिये मतीचे। नव्हेति गा साचे। कृष्णें सांगितलें उद्धवहिताचे। मी साच ते बोलिलों ॥४०॥ साच न मानी ज्याचें मन। तो विकल्पी न पवे कृष्णचरण। माझें काय जाईल जाण। मी बोलोन उतराई ॥४१॥ साधावया वैराग्य-ज्ञान। मनुष्यदेहीं करावा प्रयत्न। सांगे एका जनार्दन। आणिक प्रयत्न असेना ॥४२॥

॥ श्रीगोपालकृष्णार्पणमस्तु ॥

—: समाप्त :—

१६९५८
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
REFBK-0016959
REFBK-0016959
काव्य